

रंगचित्र - आशीष पाडलेकर

सुलेखन - अमुक

अनुक्रमणिका

अंकाविषयी

पीडीएफ / छापील प्रत वाचणाऱ्यांसाठी... ..... ०
संपादकीय १
"रानी कुठून आलो? गाऊन काय गेलो?" ३

ललित

जुनी मैत्री - गणेश मतकरी ७
शून्य दिवसानंतर आठ वर्षं दहा महिने आणि एकोणतीस दिवसांनी - राजेश घासकडवी १३
खोट्या जगातले खरे लोक - अस्वल २१
इदं न मम! - अमृतवल्ली २५

लेख

प्रयत्नें बांधिली मोळी! - 'भारा'वलेले ३०
पुत्र व्हावा ऐसा पढाकू – संवेद ३७
द यीरलिंग: दोन अनुवाद, एक तुलना - हेमंत कर्णिक ४४
भारा - मराठी 'व्हर्नीश' वाचकांचे लाडके अनुवादक – ऋषिकेश ४९
फुरसुंगीचा फास्टर फेणे आणि फास्टर फेणेची फुरसुंगी - केतकी आकडे ५५
रॅबिलेच्या पायावर उभा भागवती प्रासाद - हेमंत कर्णिक ६२
उदे उदे गं - स्नेहल नागोरी ६८
फाफे आणि सोविएतसद्दी – देवदत्त ७१
साता समुद्रापारची पुस्तकावळ - ऋग्वेदिता पारख ७६
बाल'मित्र' - सुबोध जावडेकर ८६
भारा: अेक स्मरणरंजन - निरंजन घाटे ९०
भा. रा. भागवत यांचे भाराभर आभार - जयंत नारळीकर ९४
बालसाहित्याचा दीपस्तंभ - सौ. नीला धडफळे ९६
बालवाचक, पण सत्तरीतले! - मीना वैद्य १००

कथा

ब्रह्मघोटाळ्यात फास्टर फेणे – आदूबाळ १०४

गेला कुठे श्रीरंग? (भारांची शेवटची कथा) - 'भारा'वलेले १३१

गोरख आया! (पुस्तकात नसलेली 'फाफे'कथा) - 'भारा'वलेले १३८

लेखनस्पर्धा पुरस्कार विजेती कथा :

फास्टर फेणे रिटर्न्स – फेसबुकवरून ब्लॅकमेलिंग! - फ्रेंक उर्फ फ्रेंडली कवडे १४५

मुलाखती

बिपिनवरचे सिनेमे लोकांपर्यंत पोचलेच नाहीत! - रघुवीर कूल - (ऋषिकेश) १५३

कुटुंबातले भारा - भाग १ - भागवत कुटुंबीय - (मेघना भुस्कुटे, स्नेहल नागोरी) १५९

कुटुंबातले भारा - भाग २ - भागवत कुटुंबीय - (अमुक, मेघना भुस्कुटे) १६५

बोक्याचे बाबा आणि रॉबिन हुड - दिलीप प्रभावळकर - (मेघना भुस्कुटे) १७१

भागवत आजोबांची पगडी घातलेला इंग्लिश फाफे - तेजस मोडक, प्रसन्न धांदरफळे
- (मेघना भुस्कुटे, स्नेहल नागोरी) १७३

माझं आणि फाफेचं नातं अजून संपलेलं नाही - सुमीत राघवन - (मेघना भुस्कुटे) १८०

संकीर्ण

पहिल्या 'मराठी बालकुमार साहित्य संमेलना'त भारांनी केलेले अध्यक्षीय भाषण (पूर्वार्ध) - 'भारा'वलेले १८२

पहिल्या 'मराठी बालकुमार साहित्य संमेलना'त भारांनी केलेले अध्यक्षीय भाषण (उत्तरार्ध) - 'भारा'वलेले १९९

काही शब्द, थोड्या रेषा: भारांचे काही मानसपुत्र (आणि कन्या) - 'भारा'वलेले २०४

एव्हलिन विलो: करामतींची राणी - श्रीजा कापशीकर २०९

भा. रा. भागवत - समग्र साहित्यसूची - सौ. नीला धडफळे २११

पीडीएफ / छापील प्रत वाचणाऱ्यांसाठी...

ऑनलाईन प्रकाशित होणाऱ्या अंकाची काही वैशिष्ट्यं असतात. आंतरजालीय सुविधा आणि संगणकीय प्रणालींमुळे त्यात छापील अंकाच्या मर्यादा ओलांडून काही गमतीजमती करता येतात, उदा. एखाद्या शब्दावर क्लिक करून विशिष्ट जालपानांवर वा अंकातच दुसऱ्या ठिकाणी जाता येणे. मात्र अशा स्वरूपातल्या अंकाची वैशिष्ट्यं पीडीएफ वा छापील प्रतीत वाचकाला उपलब्ध करून देणं हे कसरतीचं ठरू शकतं वा कधी कधी शक्य होत नाही. या अंकातही अशी वैशिष्ट्यं आली असल्याने ती आम्ही पीडीएफ / छापील प्रतीमध्ये यथाशक्ती आणण्याचा प्रयत्न केला आहे. पीडीएफमध्ये ठरावीक तपकिरी वा निळ्या रंगातील शब्दांवर क्लिक केल्यास अपेक्षित त्या ठिकाणी जाता येईल. परंतु छापील प्रतीसाठी ते शक्य नसल्याने काही आवश्यक ठिकाणी तळटिपा दिल्या आहेत, त्या वाचकांनी नजरेआड करू नयेत ही विनंती.

- 'भारा'वलेले

संपादकीय

ऐसी अक्षरे रसिके मेळवीन

नमस्कार,

'**ऐसी अक्षरे**' या संकेतस्थळाचा हा पहिलाच विशेषांक. प्रसिद्ध बालसाहित्यिक भा. रा. भागवत यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त प्रकाशित होणाऱ्या या अंकाचं महत्त्व खास आहे ते फक्त पहिलेपणामुळेच नव्हे. 'ऐसी'च्या सदस्यांनी अनौपचारिक गप्पांमध्ये एखाद्या नव्या उपक्रमाची कल्पना मांडावी आणि संपादकांनी त्यात सर्वतोपरी सहकार्य करून त्याचं एका देखण्या विशेषांकात रूपांतर करावं ही या संकेतस्थळाच्या खुल्या स्वभावाचं द्योतक असलेली खरीखुरी विशेष बाब आहे.

इथे वेळोवेळी होणाऱ्या गप्पांमधून लहानपणीच्या वाचनाचा आढावा घेताना भा. रा. भागवतांचं नाव वारंवार पुढे येत होतं. इथल्या अनेक बहुश्रुत सदस्यांच्या, पुढे विस्तारत गेलेल्या वाचनामध्ये आणि अनुभवविश्वामध्ये भारांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे स्मरणरंजनातून आलेला जिव्हाळा तर होताच, पण कृतज्ञताही होती. माहितीची देवाणघेवाण करताना असं लक्षात येत गेलं, की अतिशय मोलाची कामगिरी करून जाणाऱ्या या लेखकाबद्दल आंतरजालावर कुठेही पुरेशी माहिती उपलब्ध नाही. त्यांच्या समग्र लेखनाची सूचीही कुठे संदर्भासाठी मिळत नाही. त्या माहितीसाठी म्हणून या प्रकल्पाची सुरुवात झाली आणि जसजसं साहित्य गोळा होत गेलं, तसतसा भारांच्या लेखनाचा नि बालकुमारांसाठी त्यांनी केलेल्या विविधांगी उपक्रमांचा आवाका पाहून आम्ही अवाक होत गेलो. मग 'भारा'वलेल्या अनेक 'भागवत'पंथीयांच्या नवनव्या कल्पनांची भर त्यात पडत गेली. त्यातून हा अंक आकाराला आला आहे.

भारांच्या कुटुंबीयांनी या प्रकल्पाला भरभरून मदत केली. महत्त्वाच्या पूर्वप्रकाशित साहित्यापासून ते भारांच्या छायाचित्रांपर्यंत अनेक प्रकारचं साहित्य त्यांनी विनासायास उपलब्ध करून दिलं. 'उत्कर्ष' प्रकाशनाच्या सुधाकर जोशी यांच्याकडून काही महत्त्वाचे संदर्भ मिळाले. सौ. नीला धडफळे यांच्याकडून समग्र साहित्यसूचीसारखं महत्त्वाचं साधन मिळाल्यामुळे कामाला सुरुवात करता आली.

संपादनाच्या कामात 'ऐसी अक्षरे'च्या ३_१४ विक्षिप्त अदिती, ऋषिकेश, राजेश घासकडवी, मुक्तसुनीत व चिंतातुर जंतू या संपादक मंडळाबरोबरच - मेघना भुस्कुटे, अमुक, आदूबाळ आणि अस्वल या सदस्यांचा आणि सलिल बडोदेकर या 'ऐसी'बाह्य मित्राचा सहभाग होता. देखणं मुखपृष्ठ करून देऊन आशीष पाडलेकर यांनी अंकाची दृश्य बाजू जिवंत केली आहे. अमुक यांची रेखाटनं, सुलेखनं तर आता 'ऐसी'च्या अंकांचा एक अविभाज्य भागच झाली आहेत. मुद्रितशोधनाचं काम मेघना भुस्कुटे, अमुक आणि नंदन यांनी पार पाडलं आहे आणि तांत्रिक बाजू नेहमीप्रमाणे ३_१४ विक्षिप्त अदिती यांनी सांभाळली आहे.

या सगळ्यांचे आणि अंकात निरनिराळ्या प्रकारे सहभागी होणाऱ्या इतर अनेकांचे आभार मानणं जरा औपचारिकच होईल, पण ते आवश्यक आहे.

भारांनी आपल्या विपुल लेखनातून आपल्याला भरभरून दिलं. या अंकाद्वारे ते अंशत: का होईना, अधिकाधिक लोकांत वाटलं जावं आणि मराठी बालसाहित्याचं दालन अधिक समृद्ध व्हावं, अशी काहीशी उजळून टाकणारी नि नम्र करणारी भावना हा अंक वाचकांच्या हाती देताना आहे.

या अंकासोबतच भारांचं मराठीतलं विकीपिडिया-पान अद्ययावत करून मराठी-विकीच्या माध्यमातून होणाऱ्या प्रसारास आम्ही हातभार लावत आहोत. 'ऐसी अक्षरे'च्या अंकांमध्ये अशा अनेक विशेषांकांची भर पडत राहो आणि त्यातून मराठी आंतरजाल नवनव्या विषयांनी, संदर्भसंपृक्त लेखनानं आणि विविधरंगी दृष्टिकोनांनी समृद्ध होत राहो, अशी आशा करू या.

- संपादक, (http://aisiakshare.com)

***

रेखाटन : अमुक

***

"रानी कुठून आलो? गाऊन काय गेलो?"



चित्रस्रोतः भागवतकुटुंबीय

खरे तर संपादकीय ऋणनिर्देश करून झाला आहे. मग हे प्रकटन लिहिण्याचे प्रयोजन काय? प्रश्न रास्त आहे.

त्याचे असे आहे, ऋणनिर्देशाचे उपचार कितीही आवश्यक असले, तरी मनात भरून आलेली कृतज्ञतेची - स्नेहाची भावना त्या उपचारातून पुरती व्यक्त होतेच असे नाही. दिव्याला निरोप दिल्यानंतरही त्याची शांत आभा मनात रेंगाळत राहावी, तशी कृतज्ञतेची भावना मनात अजून आहे. ती व्यक्त करण्यासाठी हे प्रकटन.

निरनिराळ्या क्षेत्रांत कामे करणारी वा शाळा-कॉलेजांत शिकणारी, नुकतीच मिसरुडे फुटलेली वा बॉबकट केलेली, लहानमोठी सगळी माणसे काही निमित्ताने घरात जमावीत; वाद-संवाद, गप्पाटप्पा व्हाव्यात; क्वचित थोडी गरमागरमी व्हावी... आवाज चिरडीला यावेत; दबक्या संतापाचे स्फोट व्हावेत आणि पुन्हा कुणी समजुतीने जुळवून घ्यावे; पण भरलेल्या घराला कुटुंबाची एकतानता येऊ नये, असे अनेकदा होते. पण क्वचित कधी, एखाद्या नशीबवान निवांत दुपारी आजोबांची एखादी ठेवणीतली आठवण निघते आणि सारे वाद हळूहळू ओसरतात. घरभर विखुरलेली माणसे नकळत झोपाळ्याभोवती जमतात. बोलण्यात ओलसरपणा येत जातो. आजोबांच्या एखाद्या विशेष किश्शाची उजळणी होते. हसू फुटते. कुणीतरी थोडे हळवे होते, डोळ्यांतून पाणी काढते. त्या हळवेपणाची हलकीशी थट्टाही होते आणि "आजोबा असते, तर म्हणालेस्ते..." अशी सुरुवात करून पुन्हा हशाचा गदारोळ उठतो. काही मंतरलेल्या क्षणांसाठी तरी घर कसल्याशा चिवट धाग्याने घट्ट बांधले जाते...

असे गेला आठवडाभर झाले.

पण गेला आठवडाभरच का? खरे तर भा. रा. भागवत या लेखकाबद्दल असा काहीतरी प्रकल्प करावा, असा बूट निघाल्यापासून जवळपास गेले वर्षभर हे असे पुन्हा पुन्हा होते आहे. पुन्हा पुन्हा होत राहील, असे आश्वासन मिळते आहे. मराठी शब्दावर प्रेम करणाऱ्या अनेक पिढ्यांच्या अनेक वाचकांसाठी या आजोबाने असे एक घर कायमचे बांधून ठेवले आहे, याची जाणीव होते आहे.

या प्रकल्पाची कल्पना वर्षभरापूर्वी सुचली. सलिल बडोदेकर हा एक मित्र आणि मी यांच्यात गप्पा चालल्या होत्या. भागवतांची कितीतरी जुनी, आता कुठे न मिळणारी पुस्तके त्याच्याकडे आहेत. त्याबद्दलचे बोलणे चालले होते. त्यांतली त्यांची अस्सल मराठी भाषा, फ्रेंचांपासून इंग्रजांपर्यंत आणि विज्ञानापासून फॅन्टसीपर्यंत अनेक विषयांना स्पर्श करणारा त्यांचा विषयांचा आवाका, बालसाहित्याचा ध्यास घेतल्याप्रमाणे अखेरपर्यंत केलेले लेखन, प्रसंगी पदराला खार लावून राबवलेले बालसन्मुख उपक्रम, या सगळ्या कारकिर्दीत टिकून राहिलेला प्रसन्न-ताजा-टवटवीत विनोद आणि सर्वज्ञतेच्या अभिनिवेशाचा संपूर्ण अभाव... या साऱ्या गोष्टी आम्ही पुन्हा पुन्हा एकमेकांना बोलून दाखवत होतो. त्यांची सगळी पुस्तके जमवण्याचे बेत रचत होतो. पण बोलता बोलता असे लक्षात आले, की पुस्तके जमवण्यासाठी संदर्भ म्हणून पाहता येईल अशी साधी समग्र साहित्याची सूचीही भागवतांच्या बाबतीत उपलब्ध नाही. त्यांच्या निवडक लेखनाचे संकलन असलेले 'भाराभर गवत' हे पुस्तकही आता कुठे मिळत नाही. इतरही अनेक पुस्तके काळाच्या ओघात लुप्त झाली आहेत.

ही माहिती शोधण्याचे निमित्त झाले. त्यांच्या जाण्यानंतर त्यांना श्रद्धांजली वाहणारा एखादा जाहीर उपक्रम कुठेतरी केला गेला असेलच, अशी खातरी होती. त्या उपक्रमाशी संबंधित लोकांना भेटले वा तत्संबंधी साहित्य मिळवले म्हणजे झाले; मग आपल्याला हवी ती माहिती मिळेलच. पुढे पुस्तके जमवणे सोपे आहे, इतके साधे गणित मनाशी होते. पण आश्चर्य म्हणजे वर्तमानपत्रातील पुरवण्यांमधून प्रकाशित झालेले काही मोजके, प्रासंगिक लेख सोडले; तर मराठीतल्या भावी साहित्यव्यवहारासाठी वाचकांच्या काही पिढ्या घडवणाऱ्या या महत्त्वाच्या लेखकासाठी असा कोणताही उपक्रम झालेला नाही, हे लक्षात आले, तेव्हा काही काळ आम्ही हळहळलो. नेहमीप्रमाणे आपल्या कृतघ्नतेबद्दल कुरकुर केली, 'आपल्याच्याने काही व्हायचे नाही' अशी नकारात्मक खंत व्यक्त केली, आणि ते बोलणे तिथेच संपले.

पण विषय मनातून गेला नाही. आता आंतरजालीय मैत्र्यांच्या या दिवसांत समान रसविषय असणारी मैत्रे मिळणे तितकेसे अवघड उरलेले नाही. पुस्तके, वाचन आणि साहित्य या आवडीच्या विषयावर बोलणारी अनेक मंडळी जालावरून एकमेकांशी घट्ट जोडलेली असतात, एकमेकांना तत्परतेने संदर्भ आणि साहित्यही पुरवत असतात. अशा मित्रांच्या गोतावळ्यातही हा विषय पुन्हा पुन्हा डोके वर काढत राहिला. लोक आपली कृतज्ञता व्यक्त करत राहिले, भागवतांच्या अनेक पात्रांच्या आठवणी प्रेमाने नोंदत राहिले. तेव्हा 'असा उपक्रम आपणच का करू नये?' अशा महत्त्वाकांक्षी विचाराने मनात मूळ धरले.

तो भीत भीत बोलून दाखवला मात्र - खूप जणांकडून खूप प्रोत्साहन देणारे अनेक प्रतिसाद मिळाले. मदत करण्याची इच्छा दर्शवली गेली. अमुक, आदूबाळ, ऋषिकेश, स्नेहल नागोरी, अस्वल, गवि, केतकी आकडे, अमृतवल्ली, विनीत बेरी, सलिल बडोदेकर - असे अनेक मित्र या प्रकल्पात वेगवेगळ्या टप्प्यावर सामील झाले. मूळ कल्पना 'ऐसी अक्षरे'च्या २०१४ च्या दिवाळी अंकाच्या एका कोपऱ्यात असा प्रकल्प करण्याची होती. पण भारांच्या कामाचा एकूण आवाका लक्षात घेता 'ऐसी अक्षरे'च्या संपादकांनी आम्हांला एका आख्ख्या अंकाचे संपादकपदच देऊ केले. मग इमेलींच्या माळका लागल्या. फेसबुकावरच्या ओळखी निघाल्या. व्हॉट्सॅपवर चमू घडले. कुणी एकमेकांना पुस्तके पोचती केली, कुणी जिवावर उदार होऊन एकमेकांना पुस्तके उधार दिली. कुणी नव्याने बाजार धुंडाळून जुन्या पुस्तकांच्या प्रती हुडकल्या, कुणी दुर्मीळ पुस्तकांच्या प्रती काढून वाटल्या.

कुणी संदर्भ शोधून दिले. कुणी संपर्क शोधून दिले. कुणी भाषांतरे केली. कुणी चित्रे काढली. कुणी कामे वेळेवर व्हावीत म्हणून स्वतःकडे वाईटपणा घेऊन लोकांमागे कामाचे लकडे लावले. कुणी फुरसुंगी-पुण्यात भ्रमंती केली. कुणी आपल्या चुलत-चुलत मित्रांना या प्रकल्पात हक्काने ओढले. कुणी जाऊन मुलाखती घेतल्या. कुणी फोटो काढले. कुणी शब्दांकने केली. कुणी मोठाल्या फायली टंकनासाठी बिनबोभाट आपापसांत वाटून घेतल्या. कुणी आपली महत्त्वाची कामे बाजूला सारली आणि ऐन वेळेला लेख लिहून दिले. कुणी केलेले काम काही तांत्रिक कारणांमुळे फुकट गेले, पण त्याबद्दल जराही कडवटपणा न आणता लोक मन:पूत मदत करतच राहिले.

तेजस मोडक आणि प्रसन्न धांदरफळे या दोघांनी इतका अनौपचारिक आणि संकोच विरघळवून टाकणारा उत्साही प्रतिसाद दिला, की आपण करू घातले आहे, ते अगदी योग्य आणि आवश्यकच आहे, अशी खातरी पटली. आदूबाळाच्या ओळखीने सौ. नीला धडफळे यांच्याकडून संदर्भसूची मिळाली. त्यांची तब्बेत फारशी बरी नसतानाही आम्हांला मदत करण्याचा त्यांचा उत्साह आमच्या निश्चयाला बळ देणाराच होता. पुढच्या टप्प्यात इतरही अनेक मंडळी 'भारा'वलेल्या आमच्या चमूत येत राहिली.

फॅनफिक्शन हा खरे म्हणजे माझ्या विशेष आवडीचा प्रांत. पण फास्टर फेणेवर फॅनफिक लिहिण्याची कल्पना आदूबाळ याची. ती त्याला सुचावी आणि मला सुचू नये, यामुळे काही काळ मी स्वत:चा राग-राग केला. पण कुठवर? थेट भागवतांच्या शैलीत लिहिलेली त्याची झकास फॅनफिक वाचेस्तोवरच! पुढे त्या कथेबद्दल वाटणाऱ्या कौतुकात माझी स्वार्थी खंत कुठल्या कुठे वाहून गेली!

या अंकाची प्रसिद्धी परिणामकारकपणे करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचण्यासाठी प्रश्नमंजूषा आणि लेखनस्पर्धा घेण्याची अफलातून कल्पना ऋषिकेशची होती. त्याचे सगळे बाळंतपण त्यानेच केले. त्यात आदूबाळाच्या मित्राची - विनीत बेरी याचीही - मदत झाली. या स्पर्धेत विजयी झालेल्या सदस्यांचे अभिनंदन करण्याची संधी इथे घेतो आहोत.

'ऐसी अक्षरे'चे सगळेच संपादक मंडळ या काळात सर्वतोपरी मदत पुरवत होते. टंकनापासून ते तांत्रिक मदतीपर्यंत आणि आर्थिक मदतीपासून संपर्क मिळवून देण्यापर्यंत सगळ्या प्रकारची कामे त्यांनी केली. नंदन होडावडेकर याने नेहमीच्या तत्परतेने मुद्रितशोधनाचे मोठेच काम केले. पण हे लोक घरचेच. त्यांचे आभार कसे बरे मानणार?

वाईरकरांच्या चित्रांनी फास्टर फेणेला जिवंत करणाऱ्या भागवतांबद्दलचा प्रकल्प आणि त्यात चित्रे नसावीत? छे! असे शक्य होते काय? अंक नुसत्या मजकुराला वाहिलेला असता कामा नये, हे तेव्हाच ठरले. आशीष पाडलेकर या एका व्यावसायिक चित्रकार मित्राला अमुकने साकडे घातले आणि अंकाचे देखणे मुखपृष्ठ मिळवून मोठीच बाजी मारली. एकूण अंकालाच जे देखणे, नीटस रुपडे आले आहे, त्याचे श्रेयही अमुकलाच आहे. त्याचे सुलेखन आणि रेखाटने 'ऐसी अक्षरे'च्या वाचकांना घरचीच आहेत, त्यामुळे 'घर की मुर्गी दाल बराबर' या न्यायाने त्यांचे पुरेसे कौतुक होत नाही, हे तर आहेच. पण वरवर लहानश्या भासणाऱ्या, तरी एकूण रूपावर मोठाच परिणाम करणाऱ्या अनेक बाबी न थकता तपासत राहणे, दुरुस्त करत राहणे, त्यासाठी शांतपणे लोकांकडून कामे करवून घेणे; आणि प्रकल्पाच्या एकंदर वाटचालीबद्दल दिग्दर्शन करत राहणे हे त्याच्याखेरीज इतर कुणाला साधले नसते.

जयंत नारळीकर, दिलीप प्रभावळकर, सुमीत राघवन, सुबोध जावडेकर, निरंजन घाटे, हेमंत कर्णिक, गणेश मतकरी, रघुवीर कूल... ही प्रथितयश आणि प्रसिद्ध मंडळीही भागवतांवरच्या प्रेमाखातर वेळात वेळ

काढून या प्रकल्पात सामील झाली, तेव्हा भागवतांच्या पुण्याईचा चकित करून टाकणारा प्रत्यय आम्हांला आला. या अंकाबद्दल कुठूनसे कळल्यावर आम्हांला भागवतांचे देखणे रेखाटन धाडणारे भरत जगताप हेदेखील भागवतांच्या चाहत्यांपैकीच. भागवतांच्या कुटुंबीयांचा संपर्क मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम 'उत्कर्ष' प्रकाशनाच्या सुधाकर जोशी यांनी केले. भागवतांच्या घरी जाताना मनात थोडी धाकधूक होती. कितीही मनमोकळ्या आणि ऋजू स्वभावाचे म्हटले, तरी भा. रा. भागवत एक प्रसिद्ध लेखक. आणि आम्ही कोण? आम्ही फक्त चाहते. आपला मोलाचा वेळ आणि निगुतीने जपलेले आपले संदर्भसाहित्य आम्हांला त्यांच्या कुटुंबीयांनी का बरे देऊ करावे? पण रवीन्द्र भागवत, चंदर भागवत, विद्युत भागवत आणि रेवती भागवत या चौघांनीही आमचे जे प्रेमळ स्वागत केले; त्यात आमचा बिचकलेपणा, संकोच हे कधी कसे वाऱ्यावर उडून गेले ते कळलेही नाही. त्यांनी मारलेल्या मनमोकळ्या गप्पा आणि देऊ केलेली हृद्य छायाचित्रे या अंकाचा अतिशय मोलाचा ठेवा होऊन बसली आहेत. त्याबद्दल आभार मानण्याचा प्रयत्न केला असता विद्युतताईंनी काढलेले उद्गार हे असे - "अगं, दादांनाही तुमचा उपक्रम फार आवडला असता. त्यांचं साहित्य इतकं प्रेमानं वाचलं जातं, की ते आता एका प्रकारे तुमचं-आमचं-सगळ्यांचंच आहे. त्याबद्दल कुणी कुणाचे आभार मानायचे?"

खरेच, कुणी कुणाचे आभार मानायचे?

हे काही सर्वंकष काम नव्हे. प्रकल्पात इतर अनेक गोष्टी सामील होऊ शकल्या असत्या. त्या झाल्या नाहीत याची खंत आहेच. अनेक मान्यवरांनी या प्रकल्पाची गरज मान्य केली आणि काही कारणांनी आपल्याकडून मदत होणे शक्य नसल्याबद्दल मनापासून दिलगिरी व्यक्त केली. त्यांची, आणि प्रकल्पाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या अनेकांची, नावेही इथे घेणे शक्य नाही, हेही ठाऊक आहे. पण यापेक्षाही मोठी आहे, ती कृतज्ञतेची भावना.

हे काम भारांच्या पुण्याईखातर झाले. त्यांच्या नावाखातर हे निरनिराळ्या पिढ्यांचे, आवडीनिवडींचे, कर्तृत्वाचे आणि स्वभावांचे लोक काही काळ एकत्र आले. भारांच्या स्मरणरंजनात रंगले...

त्या साऱ्यांसह भागवत आजोबांच्या १०५ व्या जन्मदिनानिमित्त हा अंक सहर्ष सादर.

- **मेघना भुस्कुटे** आणि 'भारा'वलेले इतर 'भागवत'जन

ज्येष्ठ शुक्ल १३, शालिवाहन शके १९३७ (३१ मे २०१५)

(http://aisiakshare.com/brbf)

***

जुनी मैत्री

- गणेश मतकरी

मला मराठी मिडीअमला घातल्याचा म्हणावासा तोटा झाला नाही. म्हणजे, शैक्षणिक दृष्टीने किंवा व्यावसायिकही. कदाचित इंग्लिश मिडीअमचा फायदा अधिक झालाही असता, कारण मराठी मिडीअममध्ये असल्याने इंग्रजी साहित्याची दारं माझ्यासाठी बऱ्याच उशिरा उघडली. पाचवीमध्ये इंग्रजीची सुरुवात, मग सवय करणं अशी सगळी परिस्थिती असल्याने शाळेचा बराच काळ हा केवळ मराठी साहित्याच्या वाचनात गेला. कॉमिक बुक्स, सिनेमे हे इंग्रजी वाचणं, पाहणं होत असे. शिवाय आमच्या आणि माझ्या आजोबांच्या घरची इंग्रजी पुस्तकंही (जी चिकार होती) चाळली जायची. पण इंग्रजी वाचनाची शिस्त बऱ्याच उशिरापर्यंत आली नाही.

मराठी मी पुष्कळच वाचत असे. काहीही. नाटकं चिकार. कथा-कादंबऱ्याही, पण सरसकट साहित्यमूल्याच्या विचाराने असं नाही. करमणूक हाच प्रमुख विचार. मराठी पुस्तकंही घरात - दोन्ही घरांत - होतीच; शिवाय मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा मी सभासदही होतो. घरी बाबांची आणि इतर लेखकांची पुस्तकंही येतच असायची. अशातच कधीतरी एक छोटं पार्सल आल्याचं आठवतं. पॉप्युलर प्रकाशनामधून. या पार्सलमध्ये सहा पुस्तकांचा एक गठ्ठा होता.

बऱ्याचदा आपल्या डोळ्यासमोर प्रसंग जसेच्या तसे उभे राहिले नाही, तरी अनेक तुकड्यांमधून त्या वेळचा फील लक्षात राहतो. भा. रा. भागवतांच्या फास्टर फेणेच्या, माझ्या या पहिल्या भेटीचंही असंच काहीसं आहे. मला त्या वेळी घरी कोण होतं, नक्की पुस्तकांचा गठ्ठा कोणी सोडला, मी ती तेव्हाच वाचायला घेतली का नंतर, असा तपशील आठवत नाही. पण काहीसं ढगाळ वातावरण होतं, हे आठवतं, पुस्तकांची कव्हर्स स्पष्ट आठवतात, कव्हर्सना असणारं कसलंतरी बारीक टेक्श्चर, कव्हरच्या आतल्या पानावर असणारी, बनेश उर्फ फास्टर फेणेची वेगवेगळ्या ॲक्शनमधली चित्रं, अतिशय ग्रेसफुल स्ट्रोक्समध्ये, पण स्केचच्या सहजतेने, वाईरकरांनी काढलेली आतली इलस्ट्रेशन्स, छपाईचा उत्तम दर्जा (हा मला आजूबाजूची अनेक पुस्तकं पाहून आणि त्यांवरच्या चर्चा एेकून अतिशय लहान वयातच कळायला लागला होता) अशा बारीकसारीक अनेक गोष्टी आठवतात. अाता कोणी असंही म्हणेल, की ही तेव्हाची आठवण कशावरून? पुढे ती पुस्तकं वाचताना त्या आठवणीत तपशिलाची भर कशावरून पडत गेली नसेल? पण नाही. त्या पुस्तकांनी असं पुरतं इम्प्रेस करून टाकलं होतं, ते त्या पहिल्या भेटीतच; हे मी अगदी खात्रीने सांगू शकतो. पुढे वाढलेलं प्रेम होतं ते त्यातल्या गोष्टींचं आणि अर्थात त्यातल्या कथानायकाचं.

मराठी साहित्यात फास्टर फेणेचं स्थान अगदी युनिक म्हणण्यासारखं आहे. त्याआधी मी ताम्हनकरांच्या 'गोट्या'सारखी, लहान मुलांना केंद्रस्थानी ठेवणारी, साहित्यमूल्य असणारी उत्तम मालिका वाचली होती. नंतरही प्रभावळकरांनी बोक्या सातबंडेची या वळणाची आधुनिक मालिका तयार केली. पण फास्टर फेणेचा प्रकारच वेगळा होता. किशोरवयीन नायकाची या शैलीतली (अनेकदा हार्ड कोअर म्हणण्यासारखी) साहसं मी मराठीत याआधी पाहिलीच नव्हती आणि त्यापुढेही क्वचितच पाहिली. नाही म्हटलं तरी काही स्वतंत्र कथाकादंबऱ्यांमध्ये या प्रकारची हुशार पोरं येऊन गेली. स्वत: भागवतांच्याच 'तैमूरलंगाचा भाला', 'जयदीपची जंगलयात्रा' किंवा 'ब्रह्मदेशातला खजिना'मध्ये या वळणाचे उचापतखोर नायक-नायिका होते, इतर लेखकांच्या लिखाणातही ते क्वचित डोकावत असत; पण या प्रकारची चालू (म्हणजे ऑनगोईंग हं!) साहसमालिका इतर कोणाच्या वाट्याला आली नाही.

स्वत: भागवतांनी 'नंदू नवाथे' किंवा 'बिपिन बुकलवार'सारख्या इतर काही रिकरिंग व्यक्तिरेखाही आपल्या साहित्यातून जन्माला घातल्या; पण त्यांना फास्टर फेणेची सर आली नाही. नंदू तर एक प्रकारे फाफेचाच ॲन्टीथिसीस म्हणता येईल - ज्याचा पूर्ण भर स्वत:ला नायक कल्पिण्यावर होता, अन् जेव्हा ते जमत नसे, तेव्हा थापा मारून तसा आभास तयार करण्यावर. त्यामुळे फाफेच्या खऱ्याखुऱ्या पराक्रमांनी या व्यक्तिरेखेभोवती जसं वलय तयार केलं, तसं नंदूने कधीच केलं नाही. उलट एका कथेत (बलून चालून फास्टर फेणे!) जेव्हा तो आणि फाफे समोरासमोर आले, तेव्हा तो बन्याच्या एका साहसासाठी कारणीभूतही ठरला. बुकलवार तर भागवतांच्या जागतिक साहित्यवेडाचंच (ज्यापायी त्यांनी अनेक गाजलेल्या आणि मुलांनी आवर्जून वाचण्यासारख्या परभाषक साहित्याची मराठी रूपांतरंही केली) एक्स्टेन्शन होता. त्या काळात सातत्याने बालसाहित्य वाचणाऱ्यांना या व्यक्तिरेखा निश्चितच माहीत आहेत. पण हे नाकारता येणार नाही, की या व्यक्तिरेखांचा आपल्या वाचकांवरचा अंमल हा कायम मर्यादितच राहिला; त्याला फाफेची सर कधीच आली नाही.

इंग्रजी साहित्यात या प्रकारच्या साहस/रहस्यभेद करणाऱ्या छोट्या ॲक्शन नायक/नायिकांना तोटा नाही. फाफेच्या काळात (म्हणजे त्याची धाडसं नव्याने लिहिली जात होती त्या काळात), ते जसे होते तसेच ते आजही आहेत आणि तिथे त्यांना वाचकही आहे, हे अलीकडच्या काळात आयकॉनिक ठरलेल्या हॅरी पॉटर/ हन्गर गेम्स/ मेझ रनर सारख्या मालिकांवरून दिसतं. या साऱ्यांचे साहित्यप्रकार वेगवेगळे आहेत हे उघड आहे. त्यांच्याकडेही 'फाईव फाईन्ड आऊटर्स', 'फेमस फाईव', 'सिक्रेट सेवन'सारख्या जुन्या मालिका प्रामुख्याने डिटेक्टिव्ह फिक्शन वळणाच्या होत्या, पुढे आलेले हार्डी बॉईज, नॅन्सी ड्रू, थ्री इन्वेस्टिगेटर्स यांचंही वळण तेच पण अधिक ॲक्शन-ओरीएन्टेड. पण हल्लीच्या काळात त्यांच्या बालसाहित्याचा जेनेरीकली वाढत चाललेला आवाका दिसतो, तो फॅन्टसी, विज्ञान, सुपरहीरो अशा विविध साहित्यप्रकारांच्या यात होत गेलेल्या वापराने. आपल्याकडे मात्र दुर्दैवाने मराठी बालवाचक कमीच होतोय. काही प्रमाणात दृश्य माध्यमं आणि इन्टरनेटसारख्या वेडाने त्याचा वाचनावरचा रोखही कमी केलाय, अन त्याचबरोबर अधिकाधिक सुखवस्तू कुटुंबातल्या, वाचनसंस्कृती जपणाऱ्या कुटुंबातल्या मुलांचं शैक्षणिक माध्यम बदलून इंग्रजी होणं, हेदेखील मराठी वाचनावर परिणाम करणारं ठरलंय. या सर्वांवर उपाय काय हे माहीत नाही, पण या बदललेल्या काळातही परकीय साहित्याशी टक्कर देण्याची हिंमत असलेल्या भागवतांच्या मराठमोळ्या नायकाला आपण विसरू शकत नाही, हे खरं.

फास्टर फेणेचं साहित्य हे लघुकथांच्या फॉरमॅटमध्ये अधिक मोठ्या प्रमाणात आहे, अर्थात ते एपिसोडीक आहे. कादंबऱ्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या परदेशी नायकांमधला आणि फाफेमधला हा मोठा

फरक. याचं साधं कारण असंही आहे, की भागवतांच्या कथा ज्या काळात लिहिल्या गेल्या, तो काळ मुलांच्या मासिकांसाठी खूप चांगला होता. किशोर, कुमार, आनंद, यांसारखी महत्त्वाची आणि वर्षानुवर्षं मुलांसाठी दर्जेदार साहित्य छापणारी मासिकं तेव्हा होती. त्याखेरीज वृत्तपत्रांच्या पुरवण्यांमधेही सकस बालसाहित्याला जागा होती. भागवतांचा हा लोकप्रिय नायक या साऱ्या ठिकाणांहून मुलांच्या भेटीला आला नसता तरच नवल. आता मासिकां/वृत्तपत्रांमधूनही क्रमश: कादंबरी छापणं शक्य असतं; नाही असं नाही. फाफेने ती वाटही चोखाळली, पण तो शॉर्ट स्टोरी फॉरमॅटमध्ये अधिक रमला, असं वाटतं. तो आणि त्याची विद्याभवनची (सुभाष देसाई/ शरद शास्त्री वगैरे) गॅंग, मामेबहीण माली, आणि इंद्रू इनामदार, उत्तम टण्णू, लडकत कंपू सारखे दुश्मन यांनी बन्याच्या बऱ्याच गोष्टींमध्ये मजा आणली आहे. छोटेखानी (बऱ्याचदा, नेहमीच नाही - कारण बन्याच्या साहसात पाकिस्तानी हेर पकडण्यापासून ते पानशेतच्या पुरात अडकण्यापर्यंत सर्व प्रकारच्या घडामोडी आहेत) स्वरूपाचं साहस, भागवतांची वाचकांशी थेट संवाद साधणारी गमतीदार शैली, दर व्यक्तिरेखेचे आपापले ॲटीट्यूड, फाफेभोवती कायम असणारं वलय, 'ट्रॉक्' या पालुपदासारखे त्याचे मॅनरिझम्स, या सगळ्यामधून फास्टर फेणेच्या गोष्टी भलत्याच रंजक बनलेल्या आहेत.

माझा या मित्राशी पहिला परिचय करून देणाऱ्या त्या पहिल्या सहा पुस्तकांच्या संचात, प्रामुख्याने अशा कथाच होत्या. 'फुरसुंगीचा फास्टर फेणे'मध्ये बन्याच्या जन्मापासून ते विद्याभवनमधल्या प्रवेशापर्यंत घडणाऱ्या, थोड्या या व्यक्तिरेखेची ओळख करून देणाऱ्या, पार्श्वभूमी मांडणाऱ्या कथा होत्या. सुपरहिरो ग्रामरमध्ये बोलायचं, तर या पुस्तकातल्या साऱ्या एपिसोड्सना मिळून ओरिजिनल कथानक म्हणता येईल, कारण त्याचा शेवट हे उचापतखोर बनेशचं 'फास्टर फेणे' हे नामकरण होण्यात, त्याला आपण काय रसायन आहोत याची जाणीव होण्यात; म्हणजेच फाफे, फाफे बनण्यात होतो. वाचकाने या पोराबरोबर या सुरुवातीच्या कथांमधून केलेला प्रवास, हा त्याला या नायकाची पूर्ण ओळख करून देतो आणि पुढल्या पुस्तकांमधून काय अपेक्षा करायची, याची जाणीव करून देतो. इतर पुस्तकं त्या अपेक्षा यथायोग्य पुऱ्या करतात, हे वेगळं सांगायला नको.

नाही म्हणायला या सहातली दोन पुस्तकं थोडी वेगळी होती- 'जवानमर्द फास्टर फेणे' आणि 'फास्टर फेणेचा रणरंग'. वेगळी अशासाठी की, फाफे भारत-चीन युद्धात सामील होतो अशी कल्पना करून ('महाराष्ट्र टाईम्स'च्या शंकर सारडांचा या कथा लिहिल्या जाण्यामागे हात होता, असं एेकलंय) रंगवलेली बन्याची आघाडीवरली साहसं इथे होती. हे सारं मिळून एक कथानक, अशी कल्पना केली, तर हा कादंबरीचा एेवज मानला जाऊ शकतो; तरीही भागवतांनी संकल्पनेत या कथाभागाची रचना कादंबरीसारखी ठेवलेली नाही. या कथा

'जवानमर्द फास्टर फेणे'

तशा सेल्फ-कन्टेन्डच आहेत, स्वतंत्र वाचण्यासारख्या. 'क्रमशः'चा धाक वाचकाला न घालणाऱ्या. पुढल्या काळात भागवतांनी कादंबरीची रचना वापरली, पण मोजक्या ठिकाणी.

त्या पहिल्या सहा पुस्तकांच्या मी जशा वाचून-वाचून चिंध्या केल्या, तशा पुढच्या पुस्तकांच्या झाल्या नाहीत; पण मी बराचसा फास्टर फेणे वाचत राहिलो, जसा तो पुस्तकरूपाने प्रकाशित होत राहिला तसा. आमच्या शेजारी रहाणाऱ्या सुमती भालेराव उर्फ सुमनताई, 'प्रेस ॲन्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स' नावाच्या सरकारी संस्थेत काम करत. त्यांचं कामच असायचं की नव्या प्रकाशित होणाऱ्या सर्व मजकुराची (वृत्तपत्र / पुस्तकं इन्क्लुडेड) नोंद ठेवायची. मला घरातले पुस्तकांचे ढीग कमी पडायला वागले की मी सुटीचा मुहूर्त पाहून त्याच्याबरोबर त्यांच्या ऑफिसला जायचो. त्या मला मुलांची पुस्तकं नोंदवणाऱ्या विभागात घेऊन जायच्या आणि मी दिवसभर तिथे बसून वाचन करायचो. फास्टर फेणेच्या पुढल्या इन्स्टॉलमेन्टमधली, 'गुलमर्गचे गूढ आणि फास्टर फेणे'; किंवा 'फास्टर फेणे डिटेक्टीव', यांसारखी काही पुस्तकं मी अशी सरकारी कृपेने वाचली. त्याशिवाय वर्गात (शाळेच्या वाचनालयाच्या मुलांचं कल्याण पाहणाऱ्या कृत्रिम सिलेक्शनपलीकडे जाणारी) माझ्यासह काही मुलांची व्यक्तिगत कलेक्शन्सही असायची. प्रामुख्याने कॉमिक्स, पण इतर लोकप्रिय पुस्तकंही कोणा ना कोणाकडे असायची; जी सर्क्युलेट व्हायची. यातही काही माल मिळून जायचा. तेव्हापासून कलात्मक पायरसीची आवड लागली, ती कायमचीच.

अपवाद वगळता, फास्टर फेणेच्या कादंबऱ्या, या बऱ्याचशा विस्तारित कथेसारख्या आहेत. अधिक मोठी घटना, अधिक तपशिलात लिहिल्यासारख्या. उदाहरणार्थ, 'प्रतापगडावर फास्टर फेणे'. कदाचित एक विशिष्ट वयाचा वाचक डोळ्यापुढे असल्याने भागवतांनी लिखाण सोपं ठेवलं असेल. या कथानकांना टप्पे आहेत, पण कादंबरीत अपेक्षित असलेली अनेककेंद्री रचना किंवा गुंतागुंत नाही. तरीही 'गुलमर्गचे गूढ'सारख्या कादंबऱ्या, या बालवाचकाला गोष्ट म्हणून निश्चितच आवडण्यासारख्या. मला आजच्या वाचकाचा, या कादंबऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असेल हे मात्र नीटसं कळत नाही. ही मुलं आज जे पाहतात, वाचतात, एेकतात ते खूपच लेअर्ड आहे. अगदी मुलांसाठी रचलेलंसुद्धा. त्यांना कदाचित या कादंबऱ्या फार सोप्या वाटतील. कथांचं मात्र तसं होणार नाही नक्कीच.

कालांतराने फास्टर फेणेने दृश्यरूप घेतलं आणि टीव्ही मालिकेतही तो अवतरला. मात्र माझ्या आठवणीप्रमाणे 'किलबिल' वा तत्सम मुलांच्या कार्यक्रमात बऱ्याने आधीच पदार्पण केलेलं होतं. त्याची 'ट्रिंग ट्रिंग फास्टर फेणे' ही एक गोष्ट टीव्हीवर पाहिल्याचं आणि आवडल्याचं तरी मला नक्की आठवतं. त्यामानाने अधिक सुविहित प्रयत्न असूनही आणि प्रमुख भूमिकेत सुमित राघवनसारखा योग्य नायक मिळूनही, मालिकेशी माझं फार जमलं नाही. त्यात काही आश्चर्यही नाही. अनेकदा साहित्याच्या प्रेमात असलेला वाचक त्याच्या डोक्यात येणाऱ्या गोष्टी पडद्यावर पाहण्याचा प्रयत्न करतो आणि जेव्हा त्या दिसत नाहीत, तेव्हा माध्यमाला दोष देतो. ही गोष्ट फार जुनी आणि मी जागरूकपणे चित्रपट पहायला लागण्याच्या कितीतरी आधीची. त्यामुळे असं झालंच नसेल, असं मी शपथेवारी म्हणणार नाही. पण पहिल्या भागातच कसला तरी इको-फ्रेन्डली मेसेज मांडला गेला आणि माझं मालिकेवरून मन उडालं. पुढे मी काही एपिसोड पाहिले, पण मालिकेने माझ्या डोक्यातली पुस्तकांची जागा कधीच घेतली नाही, एवढं खरं.

आज एक चांगली गोष्ट म्हणजे ज्यांना वाचायचं असेल, त्यांच्यासाठी फास्टर फेणेचा उत्कर्ष प्रकाशनाने काढलेला वीस पुस्तकांचा संपूर्ण संच उपलब्ध आहे. त्याच्या प्रकाशनाचा दर्जा त्या पॉप्युलरच्या पुस्तकांसारखा नाही ही एक त्रासदायक गोष्ट. दुसरी त्रासदायक गोष्ट ही, की आतल्या चित्रांचा जो काही गोंधळ आहे तो! फास्टर फेणे वाचकांच्या डोळ्यासमोर उभा करण्यात भागवतांइतकाच हात होता तो राम

वाईरकरांच्या चित्रांचा. सहज वाटणारी, पण उत्तम निरीक्षण असलेली ही चित्रं या नायकाला विनासायास जिवंत करत. फास्टर फेणेच्या पुढल्या आवृत्त्यांमध्ये कव्हर वाईरकरांचं आणि आतली चित्रं दिलीप कदम / मुकुंद तळवलकर यांची असा सरसकट उल्लेख आहे. अगदी आत वाईरकरांची चित्रं असतानाही पुस्तकांवर असाच उल्लेख आहे. यातली कदमांची सही असलेली चित्रं (यांत काही ठिकाणी विजय कदम अशी सहीदेखील आहे) वाईरकरांइतकी खास नसली तरी मेहनतीने काढलेली आणि मूळ हेतूशी प्रामाणिक आहेत.

'प्रतापगडावर फास्टर फेणे'मध्ये केलेलं फाफेचं रेखाटन

पण मी नुकत्याच घेतलेल्या नव्या आवृत्तीत तिसऱ्याच एका व्यक्तीची चित्रं आहेत ज्यांखाली सही नाही. शैली आणि ऋणनिर्देश पाहिले, तर ही वाईरकर किंवा कदम यांची नाहीत, म्हणजे तळवलकरांची हवीत. पण हा ऋणनिर्देशही अजिबात भरवशाचा नाही. पण ती कोणाची का असेनात, एक मात्र खरं की या चित्रांचा इतर दोघांच्या शैलीशी दुरूनही संबंध नाही.

'जवानमर्द फास्टर फेणे'मध्ये केलेलं फाफेचं रेखाटन

ती फाफेला कॉम्प्लिमेन्ट न करता कार्टूनीश (वाईट अर्थाने) करतात. आश्चर्य म्हणजे, अनेकदा इतरांची चित्रं असताना ही अनावश्यक चित्रं मध्ये घुसवली आहेत. अगदी पहिल्या पुस्तकापासून. हे का आहे कळायला मार्ग नाही. कितव्या आवृत्तीपासून आहे माहीत नाही.पुढल्या आवृत्तीपासून जर का 'उत्कर्ष' ही घोडचूक सुधारू शकलं आणि छपाईच्या दर्जाचंही काही करू शकलं, तर मी त्यांचा व्यक्तिशः (आजन्म वगैरे) ऋणी राहीन. असो.

मराठी मिडीअमला घातल्याचा मला म्हणावासा फायदाही झाला नाही; पण जो झाला त्यात वाचनाचं महत्त्व आहेच. वयाची पहिली पंधरा/सोळा वर्ष हा तसा महत्त्वाचा काळ असतो आणि या काळात तुम्ही जे वाचता ते कायम तुमच्याबरोबर राहतं. कदाचित मी इंग्रजी माध्यमात असतो, तर जागतिक साहित्य माझ्यापर्यंत लवकर पोचलं असतं; कदाचित नसतं. पण फास्टर फेणेसारखा घरचा मित्र भेटला असता की नाही याची शाश्वती देता येत नाही; आणि तो न भेटणं हा तोटा मात्र कल्पनाही न करवण्याइतका मोठा.

***

शेवटचे चित्रः गणेश मतकरी यांच्याकडून.
लेखातील इतर चित्रे: जालावरून साभार.

***

शून्य दिवसानंतर आठ वर्षं दहा महिने आणि एकोणतीस दिवसांनी

- राजेश घासकडवी

***

अनेक वर्षांपूर्वीचा एक दिवस. याला आपण शून्य दिवस म्हणू.

शून्य दिवस

मी तिला 'मुक्काम शेंडेनक्षत्र'मधला एक भाग वाचून दाखवत होतो.

"या तीन तऱ्हेच्या वक्राकृती म्हणजे धूमकेतूंचे संभाव्य मार्ग होत. काही धूमकेतूंची कक्षा हायपरबोल्यासारखी असते; काहींची पॅराबोलासारखी असते; तर काहींची लंबवर्तुळाकृती. यापैकी पहिल्या दोन पद्धतींनी जर धूमकेतू फिरत असेल तर पृथ्वीवरच्या लोकांना त्याचं एकदाच दर्शन घडेल आणि अवकाशाच्या पोकळीत तो गडप होईल. पण तिसऱ्या जातीचे म्हणजे लंबवर्तुळाकार भ्रमण करणारे धूमकेतू आपल्याला ठरावीक काळाने पुन्हा पुन्हा दिसतात. कधी कधी त्यांचं आगमन आपल्याला थक्क करण्याइतकं वक्तशीर असतं."

मी वाचून दाखवल्यावर तिच्याकडे पाहिलं. तिच्या चेहेऱ्यावर अजूनही प्रश्नच होते.

"मला नीट कळलं नाही. हे हायपरबोला आणि पॅराबोला म्हणजे नक्की काय?"

"हायपरबोला म्हणजे इथे लिहिलं आहे त्याप्रमाणे अपास्त, आणि पॅराबोला म्हणजे अन्वस्त."

"पण त्याने काहीच अर्थ कळत नाही. ते नुसते प्रतिशब्द आहेत."

आठवीतल्या मुलीला हायपरबोला आणि पॅराबोला कसे समजावून सांगावेत असा विचार करत मी डोकं खाजवलं.

वजा १ दिवस

मी माझ्या जानी दोस्ताकडे गेलो होतो. हा माझा शाळेतला वर्गमित्र. आता आम्ही दोघेही तेरावीत असल्यामुळे तशा भेटीगाठी फार होत नसत. नेहमीच्या गप्पाटप्पा झाल्यावर मी कामाचा विषय काढला.

"अरे, तुझं 'मुक्काम शेंडेनक्षत्र' घेऊन जाऊ का? दोनचार दिवसांसाठीच हवं आहे."

"हो, ने की. पण तुझं काय झालं?"

"माझं सापडत नाहीये."

"विद्यार्थी घासकडवी! उद्या पाचशे ओळी लिहून आण!" मुशेमधल्या प्रोफेसरांचा एक डायलॉग त्याने म्हणून दाखवला आणि गडगडाटी हसला. मी कसनुसा हसलो. आमच्या घरी एरवी पुस्तकं हरवत नसत. पण मी तेव्हापासूनच थोडा विसराळू होतो. त्यामुळे ते कोणाला दिलं होतं का हेही लक्षात नव्हतं.

"पण तुला पुन्हा वाचायला म्हणूनच हवं आहे की... "

"अरे, एका मुलीला हवंय... म्हणजे आमचे बाबा तिची ट्यूशन घेतात. तिला हॅलेच्या धूमकेतूबद्दल निबंध लिहायचा आहे. तर तिच्याकडचं पुस्तक हरवलंय. मग त्यांनी म्हटलं 'राजेश करेल मदत. आमच्याकडे आहे ते पुस्तक.' "

"ओ हो, लडकी का मामला है... घेऊन जा." पुन्हा एक गडगडाटी हास्य. आणि माझं कसनुसं.



'मुशे'

पुन्हा शून्य दिवस

"तुम्हांला को-ऑर्डिनेट जॉमेट्री शिकवली आहे का?"

"को-ऑर्डिनेट जॉमेट्री म्हणजे काय?"

"म्हणजे ते क्ष अक्ष, य अक्ष वगैरे असतं ना?"

"हो हो."

"मग तुला ग्राफ पेपरवर बिंदू प्लॉट करता येतात ना..."

"अं... हो." तिच्या उत्तरावरून मला खात्री वाटली नाही. म्हणून मी एक कागद घेतला. त्यावर क्ष आणि य अक्ष काढले. त्यावर दोन बिंदू काढले.

"आता हा बघ, हा बिंदू आहे तो क्ष = २ आणि य = ४. हा दुसरा बिंदू आहे तो क्ष = ३ आणि य = ६. मग आता हे दोन बिंदू जोडणारी रेषा काढली तर त्यावरच्या सर्व बिंदूंसाठी य = २क्ष हे समीकरण लागू पडेल."

"बरं, मग?"

"म्हणजे आपल्याला क्ष आणि यचं कुठचंही समीकरण घेतलं तरी त्यासाठी एक कर्व्ह काढता येतो."

"हम्म्म... " 'आता तू म्हणतो आहेस म्हणून ठीक आहे', असा काहीसा स्वर होता. पण मी हताश न होता पुढे चालू ठेवलं.

"आता पॅराबोला म्हणजे 'य = क्ष वर्ग'ने जो कर्व्ह होतो तो. आणि हायपरबोला म्हणजे 'क्ष वर्ग वजा य वर्ग = १' याचा कर्व्ह."

"हे मला नीटसं कळत नाहीये." आता मात्र हे फारच झालं, हे तिने कबूल केलं. आणि आम्हांला आठवीनंतरच्या पुढच्या पाच वर्षांत जे शिकवलं ते आठवीतल्या मुलीला दोन मिनिटांत समजावून सांगणं कठीण आहे हे मलाही दिसत होतं. मी पुन्हा डोकं खाजवायला लागलो. काहीतरी नवीन स्ट्रॅटेजी वापरायला हवी होती.

शून्य दिवसाच्या सुमारे चारेक वर्षांपूर्वी

आमच्या घरी दिवाळीच्या वेळी फटाके आणून ते जाळून टाकण्याऐवजी तेवढ्याच पैशांची पुस्तकं आणण्याची पद्धत होती. मलाही ती आवडायची. कधीतरी एखाद्या दिवाळीत फटाके उडवणारी इतर मुलं बघितली की वाटायचं, आपल्यालाही उडवायला मिळावेत. पण पुस्तकं वाचायचीही प्रचंड हौस होतीच. त्या दिवाळीत किंचित काही असं वाटत असताना बाबांनी आणलेली पुस्तकं बघितली. त्यातलं एक पुस्तक होतं 'मुक्काम शेंडेनक्षत्र'. मूळ लेखक ज्यूल व्हर्न, भाषांतर भा. रा. भागवत. मी ते वाचायला घेतलं आणि पुढचे बरेच दिवस शेंडेनक्षत्रावरच वावरलो. त्यातला नायक हेक्तर सार्वादाक; त्याचा विनोदी नोकर बेन झूफ; जाडजूड चष्मा लावणारे, अंड्यासारख्या डोक्याचे प्रकांडपंडित प्रोफेसर रोझेत यांच्याबरोबर अंतराळाची सफर करण्यात गुंग झालो.

शून्य दिवसाच्या सुमारे चारेक वर्षांपूर्वी अधिक सुमारे साताठ दिवस

दिवाळीच्या सुटीनंतर शाळेत गेल्यावर माझ्या जानी दोस्ताला 'मुक्काम शेंडेनक्षत्र'बद्दल सांगितलं.

"आयला, तू वाचलंस! दे टाळी. माझ्याकडेपण आहे ते. धम्माल पुस्तक आहे." पुस्तकाच्या प्रेमात दोघेही पडलेलो असल्यामुळे आम्ही पुस्तकाबद्दल बडबड सुरू केली.

"...सर्वात मस्त भाग म्हणजे प्रोफेसर रोझेत बेन झूफवर क्विंटिलियन आणि सेक्स्टिलियनच्या तोफा डागायला लागतात तो."

"आणि बेन झूफपण काही कमीचा नसतो. त्यांच्या गालियाला तो 'हं, धूमकेतू म्हणे! मोहरीचं बी, वाळूचा कण! 'काही-नाही'चं टोक! जन्मभर दुर्बिणीला डोळा लावून मला हे असलंच भूत सापडलं असतं तर मी शरमेने दुकान बंद केलं असतं.' असं म्हणतो तेव्हा प्रोफेसर कसला चिडतो! "

"हो, आणि तोपण बेनला सांगतो की 'गालियाने जर तुझ्या माँतमार्त्रला टक्कर दिली तर त्याला पंधरा हजार फुटाचं भोक पडेल', तेव्हा बेन झूफपण चिडतो. "

"हो, त्यांची सारखी चाललेली मारामारी सॉल्लिड आहे."

"हो! "

त्यानंतर अनेक दिवस आम्ही 'मुक्काम शेंडेनक्षत्र'च्या भाषेतच बोलत होतो. म्हणजे शिव्या द्यायच्या असतील तर ज्यू इसाकला बेन झूफ म्हणतो तसं एकमेकांना ज्यूडास, इसाचार, पॉटिफर वगैरे म्हणायचं; "उत्तम! निराशेचं कारण नाही." असं म्हणायचं असेल तर गंभीरपणे प्रोफेसर रोझेतसारखं 'निल डेस्परेंडम' म्हणायचं; उगाच मध्येच 'विद्यार्थी घासकडवी! उद्या पाचशे ओळी लिहून आण!' वगैरे ओरडायचं; एखादी गोष्ट माझी आहे असं ठासून म्हणायचं असेल तर 'गालिया माझा धूमकेतू आहे! माझा!' असं म्हणायचं... एक ना दोन अनेक गोष्टी. मुशेने आमचा जणू काही ताबाच घेतलेला होता.

प्रोफेसर रोझेत

पुन्हा शून्य दिवस

"आपण हे समीकरण वगैरे जरा बाजूला ठेवू. आता आपास्त, म्हणजे हायपरबोला, हा साधारण असा दिसतो. म्हणजे कल्पना कर, की आपण बाणाच्या टोकासारख्या या दोन रेषा काढलेल्या आहेत. आता समजा बाणाचं हे टोक थोडं घासून गुळगुळीत, गोलसर केलं तर असं दिसेल. अगदी बरोबर गोल नाही, पण टोकाला गोलसर आणि तो गोलसर भाग किंचित सरळ सरळ होत या रेषांना मिळतो."

"ठीक आहे, पण धूमकेतूचा काय संबंध?"

"हां, आता अशी कल्पना करायची की या गोलसर भागाच्या केंद्राला सूर्य आहे. लांबून धूमकेतू येतो तो असा सरळ रेषेत. मग तो सूर्याच्या जवळ येतो तेव्हा गुरुत्वाकर्षणामुळे खेचला जातो, थोडा कलतो. आणखीन जवळ आल्यावर मग तो झर्रकन गोलात वळतो आणि मग या दुसऱ्या रेषेजवळ जायला लागतो. तो जसजसा लांब जातो, तसतसा गुरुत्वाकर्षणाचा परिणाम नाहीसा होतो आणि तो सरळ रेषेत दुसऱ्या दिशेने निघून जातो."

"ओह, समजलं." तिच्या चेहऱ्यावर खरोखरच समजल्याचे भाव होते.

"आणि अन्वस्त म्हणजे असंच थोडंसं. मात्र तो थोड्या लहान कोनातून आल्यामुळे त्याचा गोलसर भाग हा लांबपर्यंत गोलसर राहातो. म्हणूनच 'दूर जाणारे चिमट्याचे पाख म्हणजे आपास्त, तर लहान कोनात असणारे चिमट्याचे पाख म्हणजे अन्वस्त.' असं लिहिलंय." मी पुस्तकातल्या ओळी दाखवल्या.

"ठीक आहे."

"आणि लंबवर्तुळ म्हणजे... लांबट गोल. समजा, तू गोल कणकेची लाटी घेतलीस आणि केंद्राजवळ दोन्ही चिमटीत धरून ती खेचलीस तर त्या वर्तुळाचं लंबवर्तुळ होईल. आणि त्याचं केंद्र दोन ठिकाणी सरकेल. त्यातल्या एका केंद्रावर सूर्य असेल तर त्याभोवती फिरणारा धूमकेतू हा असा लंबवर्तुळात फिरेल. पृथ्वी आणि इतर ग्रहही किंचित लंबवर्तुळातच फिरतात. पण ते इतकं कमी ताणलेलं असतं, की त्याला आपण जवळपास वर्तुळच म्हणू शकतो."

"अच्छा." तिचं निश्चितच समाधान झालेलं दिसलं.

फास्ट फॉरवर्ड टू आजचा दिवस

'मुक्काम शेंडेनक्षत्र'चा विचार करताना मूळ लेखक ज्यूल व्हर्न आणि भाषांतरकार भा. रा. भागवत या दोघांचा विचार करायला लागतो. ज्यूल व्हर्न हा एकोणिसाव्या शतकातला विज्ञानकथालेखक. 'ट्वेंटी थाउजंड लीग्ज...', 'अराउंड द वर्ल्ड इन एटी डेज', 'जर्नी टु द सेंटर ऑफ द अर्थ' ही त्याची इतर पुस्तकं वाचकांना परिचित असतील. एक भन्नाट वैज्ञानिक संकल्पना घ्यायची आणि तिचे अनेक पैलू तांत्रिक बारकाव्यांसह मांडायचे यात त्याचा हातखंडा. त्यासाठी तो प्रचंड अभ्यास करत असे. त्याने गोळा केलेली आकडेवारी, त्या त्या तंत्राचे बारकावे, नव्या संशोधनातून पुढे काय होऊ शकेल याच्या कल्पना यांनी त्याची पुस्तकं भरलेली असायची. एकोणिसाव्या शतकाचा काळ हा यांत्रिकीकरणाचा होता. औद्योगिक क्रांतीने जोर घेतलेला होता. रेलवे नुकत्याच धावायला लागल्या होत्या. संपूर्ण युरोप यंत्रमय होण्याकडे वाटचाल चालू होती. वैज्ञानिक प्रगतीलाही

वेग आला होता. जगाबद्दल नवीन नवीन गोष्टी विज्ञानातून समजण्याचा हा कालखंड होता. त्यामुळे विज्ञान-तंत्रज्ञानाविषयी प्रचंड उत्सुकता होती. ज्या वाचकांसाठी ज्यूल व्हर्न लेखन करत असे त्यांना या तंत्रज्ञानाच्या कणाकणाबद्दल आकर्षण होतं. 'ट्वेंटी थाउजंड लीग्ज..' मध्ये त्याने महाकाय पाणबुडीवरच्या आयुष्याबद्दल लिहिलं. समुद्रातले जलचर, पाणबुडीतून युद्ध, अज्ञात-गूढ इंधन... अशा अनेक अचंबा वाटणाऱ्या तांत्रिक कल्पनांचा त्यात भरणा आहे. 'मुक्काम शेंडेनक्षत्र'च्या मूळ पुस्तकातही - 'हेक्तर सार्वादाक'मध्ये - धूमकेतू म्हणजे काय, ते कसे असतात याबद्दलच्या बारीकसारीक तांत्रिक माहितीची रेलचेल आहे. कितीतरी ठिकाणी प्रोफेसर रोझेत एक भाषणच देऊन सगळी माहिती सांगतात. पण गमतीची गोष्ट अशी की एखाद्या विज्ञानाच्या पुस्तकात आली तर कंटाळवाणी वाटेल अशी माहिती या पुस्तकात सहज खपून जाते. इतकंच नाही, तर वाचकच त्या यात्रेत सामील असल्यामुळे त्याला ती महत्त्वाची वाटते - त्यामुळे पुस्तकाच्या रंजकतेचा भाग बनते. वाचकालाच त्या कल्पनेच्या प्रवासाला घेऊन जाणं हे ज्यूल व्हर्नचं शक्तिस्थान होतं.

मागे वळून पाहताना ज्यूल व्हर्नच्या काही मर्यादाही दिसतात. त्या ठिकाणी जमलेले चार देशांचे छत्तीस-चाळीस जीव हे त्या त्या देशांचे स्टीरिओटाइप्स दाखवले आहेत. म्हणजे उदार, शूर, न्याय्य फ्रेंच हे हेक्तर सार्वादाकच्या नायकाच्या रूपात अवतरतात. त्यांची हुशारी आणि गोड वाटावा असा विक्षिप्तपणा प्रोफेसर रोझेतमधून दिसतो. तर रशियन हे उमदे, तरीही काहीसे कोरडे दिसतात. ब्रिटिशांच्या वर्णनातून त्यांची नोकरशाही वृत्ती, आढ्यताखोरपणा पुढे येतो. तर ज्यूंचं प्रातिनिधित्व करणारा इसाक हा पै पै करणारा चिक्कू मारवाडी आहे. (या ठोकळेबाजीचं वर्णन करतानाही मला 'चिक्कू मारवाडी'सारखी ठोकळेबाज प्रतिमाच वापरावीशी वाटली यातच ठोकळेबाजीची मर्यादा आणि तरीही सामर्थ्य दिसून येतं.) इसाकचं मूळ वर्णन हे अधिक बोचरं होतं - म्हणजे नावाऐवजी त्याला नुसतंच ज्यू म्हटलेलं होतं. त्यावरून या पुस्तकावर टीकाही झाली होती. त्यानंतर काही लहानसहान का होईना, पण बदल करावे लागले. हे केवळ ज्यूंबद्दलच मर्यादित नाही. पुस्तकातल्या लोकांना जेव्हा पृथ्वीवरचे देश दिसतात, तेव्हाही त्यांच्या वर्णनातून अशाच प्रकारचे स्टिरिओटाइप्स दिसून येतात. पण एकोणिसाव्या शतकातल्या युरोपीय विचारसरणीत हे देशांप्रमाणे प्रवृत्तींची विभागणी करणं ठाम होतं. किती बरोबर, किंवा उपयुक्त होतं हे फारसं महत्त्वाचं नाही. पण त्या काळात जो दृष्टिकोन, जी विचारपद्धती होती; तिचंच प्रतिबिंब ज्यूल व्हर्नच्या लेखनात पडलेलं दिसतं.

आधुनिक विज्ञानकथा लेखनानुसार ज्यूल व्हर्नच्या कथा 'तांत्रिक किंवा संकल्पनाप्रधान विज्ञानकथा' ठरतात. जेव्हा विज्ञानकथा लेखनाला सुरूवात झाली तेव्हा 'समजा असं झालं तर?' अशी काहीतरी संकल्पना घेऊन तिचे वेगवेगळे पैलू न्याहाळायचे, असा प्रयत्न असे. मग त्यासाठी कथानक किंवा पात्रं हे पूर्णपणे दुय्यम असतात. केवळ त्या आश्चर्यकारक विश्वाची वाचकाला सैर घडवून आणायची हा त्यांचा उद्देश असे. यात अर्थातच काही गैर नाही. आर्थर सी. क्लार्कसारख्या प्रतिभावंत लेखकाने अशा अनेक संकल्पना-पैलू-वर्णनात्मक उत्कृष्ट लिखाण केलेलं आहे. त्याच्या 'राँदेवू विथ रामा'मध्ये एक अज्ञात यान येतं आणि त्यावर काही लोक जातात. आत जे दिसतं ते विस्मयचकित करणारं असतं. यात ते लोक कोण असतात, वगैरे फारसं महत्त्वाचं ठरत नाही. त्यांना दिसणारं जग हाच खरा कथेचा नायक आहे. ज्यूल व्हर्नच्या लेखनातही त्याने चित्रण केलेलं विश्व हेच नायक असतं. मग त्या अनुषंगाने येणारी तांत्रिक माहिती ही त्या नायकाची व्यक्तिरेखा उभी करणारी असते.

आधुनिक विज्ञानकथा लेखकांना प्रस्थापित विज्ञानकथा मासिकांचे संपादक यापासून दूर जायला सांगतात. त्यांना कथा हव्या असतात त्या माणसांच्या - ज्यात हे नवीन विश्व पार्श्वभूमी म्हणून येईल. ही भूमिका घेण्यामागे काही ऐतिहासिक कारणं आहेत. उदाहरणार्थ, त्याच त्याच कल्पना पुन्हा पुन्हा मांडल्या गेल्या.

उदाहरणार्थ 'कालप्रवास करणारा नायक एका ग्रहावर उतरतो. तिथलं वर्तन पाहून त्याला आश्चर्य वाटतं आणि कथेच्या शेवटी त्याला - ही आपली पृथ्वीच! - असं लक्षात येऊन महाप्रचंड धक्का बसतो.' ही कल्पना किती वेळा पुन्हा पुन्हा मांडली गेली याची गणतीच नाही. कारण प्रत्येक नवख्या लेखकाला एकदा तरी ती सुचते. हा तोचतोपणा टाळण्याच्या प्रयत्नांमुळे सध्याचं विज्ञानकथा लेखन हे मानवकेंद्रित झालेलं आहे. अर्थात याचेही तोटे आहेत. कारण मग प्रत्येक नायकाला काही ना काही वैयक्तिक प्रश्न दाखवायचे, वडिलांशी असलेलं वाकडं नातं दाखवायचं, कोणीतरी गे असल्यामुळे येणारे प्रश्न दाखवायचे असे ठोकळेबाज 'मानवीकरणा'चेही प्रयत्नही होताना दिसतात. फारच थोड्या विज्ञानकथांमध्ये ती संकल्पना इतकी वेढून टाकते (असिमॉव्हची 'नाइटफॉल') किंवा मानवी प्रश्न आणि वैज्ञानिक संकल्पना एकमेकांत अनिवार्यपणे गुंफल्या जातात (डॅनिएल कीजची 'फ्लॉवर्स फॉर अल्गरनॉन'). जेव्हा संकल्पनांचं अवकाश मोकळं, अस्पर्शित, न वापरलेलं होतं. त्या काळात ज्यूल व्हर्नने त्यातली मोठमोठाली क्षेत्रं काबीज केली. या नवेपणामुळे आणि ताजेपणामुळे त्या काळी कदाचित मोठी माणसंही चवीने ही पुस्तकं वाचत असतील, पण मुख्य रोख तरुण - दहा ते सोळा वर्षांच्या - मुलांकडे होता.

शून्य दिवसांनंतर चार दिवसांनी

बाबा शिकवणीवरून घरी आले. तिचा निबंध मस्त झाला असं सांगितलं. वर सांगत होते, "गंमत म्हणजे ती म्हणत होती, 'काका, राजेश तुमच्यापेक्षा जास्त चांगला शिकवतो'."

मी सॉल्लिड खूश.

फास्ट फॉरवर्ड टु आजचा दिवस

भा. रा. भागवतांच्या कथा आज पुन्हा वाचतानाही गंमत वाटतेच, पण त्या वयात वाचताना त्या अंगात जशा भिनायच्या तशा भिनत नाहीत. आता 'मुक्काम शेंडेनक्षत्रा'तली पात्रं किंचित जास्त कृत्रिम आणि ठाशीव वाटतात. त्या काळी हपापून वाचलेली माहिती आता किंचित अतिरेकी वाटते. त्यातल्या साहसांनी थरारून जाणं कमी होतं. हे 'मुक्काम शेंडेनक्षत्र'बाबतच नाही, तर फास्टर फेणेच्या पुस्तकांबाबतही होतं. किंवा लहानपणी पत्रावळ्या होईपर्यंत वाचलेल्या रॉबिन हूडबाबतही होतं. हा अर्थातच भारांच्या लेखनाचा दोष नाही. त्यात माझ्या वयाचा भाग आहे. ज्यूल व्हर्नप्रमाणे त्यांचं लिखाणही १० ते १६ वर्षे वयोगटाच्या मुलांसाठी होतं. भारांच्या लढाया, भांडणं ही लुटुपुटूची नसली तरी हलकीफुलकी असतात - त्या वयोगटातल्या मुलांना आकर्षक वाटावीत पण अंगावर येऊ नयेत इतपतच. त्यांनी स्वतः लिहिलेली असोत की भाषांतर केलेली असोत - भारांची सर्वच पुस्तकं वाचताना पोरासोरांना बाजूला बसवून धमाल साहसाच्या गोष्टी सांगत बसलेल्या गोष्टीवेल्हाळ काकांचं चित्र डोळ्यासमोर उभं राहातं. एक साहजिक बोलण्यासारखी लय त्यांच्या लिखाणाला आहे. म्हणूनच ते लिखाण क्लिष्ट, बोजड कधीच होत नाही.

ज्यूल व्हर्नप्रमाणेच त्यांचाही पिंड शास्त्रीय बाबतीत काटेकोर. त्यांच्या पत्नी लीलावती भागवतांनी भारांबद्दलच्या पुस्तकाला जी प्रस्तावना लिहिली, त्यात त्या म्हणतात - 'शास्त्रीय कथांची त्यांना विलक्षणच आवड आहे. पण शास्त्रीय माहिती आत्मसात करण्यावरही त्यांचा कटाक्ष असतो. या बाबतीत ते आपल्या

मुलाशीही वाद घालतील... ...अशा वादावादीतून ते बरं काही मनाशी टिपून घेतात. ही त्यांची टिपणवृत्ती त्यांना ज्यूल व्हर्नच्या डझनभर कादंबऱ्यांच्या अनुवादाकडे खेचून घेऊन गेली. रुपांतरित 'चंद्रावर स्वारी'मध्ये तर त्यांनी जुनी पंचांगं शोधून आकाशातील ग्रहताऱ्यांचं भारतीय गणित मांडलं. कारण कादंबरी असली तरी शास्त्रीय माहिती बिनचूक असलीच पाहिजे, असा त्यांचा रास्त आग्रह असतो.'

त्याच प्रस्तावनेत त्यांनी भारांच्या विनोदबुद्धीबद्दलही लिहिलेलं आहे. भारांनी अनेक विनोदी कथा लिहिल्या आणि त्या गाजल्याही. त्यांचा हा मिश्किल दृष्टिकोन त्यांच्या भाषांतरातूनही जागोजाग दिसतो. त्यापोटीच त्यांच्या भाषांतरात मूळचा इंग्रजी विनोद अस्सल मराठी होऊन येतो. त्यांची गोष्टीवेल्हाळ प्रवृत्ती, विनोदाची जाण, आणि गप्पा मारल्यागत भाषा यामुळेच त्यांची भाषांतरं अत्यंत नैसर्गिक झालेली आहेत. 'चंद्रावर स्वारी'चं त्यांनी रूपांतर केलेलं आहे, तर 'मुक्काम शेंडेनक्षत्र'चं भाषांतर. दोन्ही वाचताना आपल्याला याचं मूळ बिनमराठी आहे, हे जाणवतच नाही. (अर्थात 'शेंडेनक्षत्रा'तली परदेशी नावं सोडली तर...) त्यांची अनेक भाषांतरं ही भाषांतरकलेचा नमुना म्हणून वाचता येतात.

म्हणून अजूनही 'मुक्काम शेंडेनक्षत्रा'चा प्रभाव त्या काळच्याइतका जाणवत नसला तरी वाचायला मजा निश्चितच येते. शिवाय त्याच्याशी आमच्या खूप जुन्या आठवणी निगडित आहेत हेही वेगळंच.

शून्य दिवसानंतर आठ वर्षं दहा महिने आणि एकोणतीस दिवसांनी

धूमकेतू आपल्या दर्शनाने जगात उत्पात घडवतात म्हणे... ते अगदीच काही खोटं नाही. माझ्याही जगात गालियाने उत्पात घडवून आणला.

माझं आणि त्या मुलीचं लग्न झालं.

***

प्रोफेसर रोझेतचे चित्रः जालावरून साभार.
'मुशे'चे मुखपृष्ठः मेघना भुस्कुटे.

***

खोट्या जगातले खरे लोक

- अस्वल

"शिंग वाजता रॉबिनकरता
शरवुड जंगल भंगेल
गडी लोटतील रंगेल!"

अशी 'रॉबिन हुड'शी झालेली माझी पहिली ओळख मला अजूनही नीट आठवतेय. त्यापूर्वी ह्या रॉबिन हुडबद्दल काहीएक कल्पना नव्हती. मग एकदा बाबांनी कुठलंसं पुस्तक आणून दिलं आणि म्हणाले - वाच. तुला आवडेल हे.



हे पुस्तक आता 'मुलांचा लाडका रॉबिन हुड' या नावानं उपलब्ध आहे.

बाबांनी 'छान' म्हटल्यामुळे जराशा संशयानेच मी ते पुस्तक उघडलं, पण १-२ पानांतच मी त्यात चिकटलो. खूप वर्षांपूर्वीची गोष्ट होती - राजा, युद्धं, ते सरदार आणि काय काय... मग ह्या सगळ्यातून वेगळा झालेला लॉक्सले; त्याला नंतर येऊन मिळालेले मित्र - आडदांड धाकला जॉन, टक पुजारी, तांबडा वुईल, रॉबिनची बालमैत्रीण मेरियन आणि म्हातारीची तीन मुलं, त्यातलाच एक तो विली स्ट्यूटली; नॉटिंगहॅमचा कोतवाल, असे सगळे ओळखीचे झाले. धनुष्यबाण घेऊन खतरनाक करामती करणारा असला हिरो न आवडला तरच नवल होतं! जसजसा रॉबिन हुड अंगात भिनत गेला, तसतसे आमच्या घरातल्या हिराच्या केरसुणीला वाईट दिवस येऊ लागले. मग आईने एक दिवस भयानक ओरडा दिल्यावरच माझ्या धनुष्याचा भाता रिकामा झाला. तर थोडक्यात रॉबिनच्या गोष्टीने मला टोटली जिंकून घेतलं होतं! शंभर टक्के.

त्यानंतर एका पुस्तक प्रदर्शनात 'भुताळी जहाज' नावाचं एक पुस्तक दिसल्यावर मी त्यावर उडी टाकली. लहानपणीच पोरका झालेला प्रवीण पतंगे, त्याच्या वडलांच्या मित्राने त्याला दिलेलं ते अजब पत्र आणि तिथून ओनामा होऊन सुरू झालेली ती यात्रा. मग भेटलेले कॅप्टन नायर, शामूभय्या, अण्णा गावडे हे सद्‌गृहस्थ; तसंच पांडू पाशा आणि लंगडा फकिरा, लुच्चू वगैरे दुष्ट त्रयी. आणि मग सगळ्यांत भारी म्हणजे जपान, होक्काईडो, कामचटाका अशा बर्फाळ आणि दुर्गम प्रदेशातली ती जहाजसफर. "हुहे हुहे ह" असा विचित्र आवाज काढणारं एक पुरातन जहाज....

पुस्तक एका बैठकीत संपवलं हे काय वेगळं सांगायला हवं? भा.रा. भागवतांची चित्रमय शैली यात पुन्हा दिसून आली. जहाजावरचा वादळाचा प्रसंग, दुष्ट त्रयी पत्ते खेळताना (वकई!) प्रवीणवर त्यांनी केलेला हल्ला आणि शेवटचा ग्रँड क्लायमॅक्स - अशा अनेक ठिकाणी भारांची प्रसंग खुबीने वर्णन करण्याची हातोटी परत एकदा अनुभवली. भुताळी जहाजाचाही मी मेजर फ्यान झालो.

ह्या 'इजा बिजा'नंतर तिजा मिळाला तो शाळेतल्या लायब्ररीतूनः फास्टर फेणे!

इथे मात्र मी संपूर्ण भारामय झालो. १०-१२ वर्षांच्या मुलांसाठी जे काही आदर्श आणि रोमांचकारी असू शकेल ते सगळं फाफेला (आणि म्हणूनच मला) अनुभवता येत होतं! साध्या मुंबई पुणे प्रवासात त्याला चिंकू चिंपाझी भेटे. मग तिथून खंडाळ्याचं जंगल आणि मग डायरेक्ट वरळीचा टीव्ही टॉवर! प्रतापगडावर जा - तिकडे कुणी ठग साधू. गुलमर्गला गेला - तिथे पाकिस्तानी हेर. फुरसुंगीचे प्रताप आहेतच. पुणे ही तर त्याची कर्मभूमी. युद्धावेळी गप्प बसला तर तो फाफे कसला? मग नेफापर्यंत जाऊन ये. चित्रपटात काम मिळालं तर तिथेही टिंगो-फिंगोंचा सामना कर! फाफे संकटात सापडत नसे तर संकटंच त्याचा पाठलाग करत येत, त्याला तो तरी काय करेल? बरं, संकट म्हणजे डाकूफिकू असले पाहिजेत असं नाही. मोगलगिद्दीकरांच्या रद्दीचीच गोष्ट घ्या! किंवा मग पानशेतच्या पुराच्या वेळी बन्याने प्रसंगावधान राखून दिलेला तो संदेश, "आम्हा सर्वांची फेफे. लवकर या - फा.फे." नाहीतर मग भूकंपाच्या वेळी गुहेत एकटाच अडकला असतानाही डोक्याचा आणि त्रिशूळाचा सुपीक वापर करणारा फाफे. हे सगळं माझ्या दृष्टीने अद्भुत होतं! बन्या (आणि म्हणूनच मी!) करू शकणार नाही असं काही नव्हतंच.

बन्या, त्याचे मित्र सुभाष देसाई आणि शरद शास्त्री, बरोबरीला कधी त्यांचे सुर्वे सर, हे सगळे लोक पुण्याला कुठे गेलं म्हणजे भेटतील हा प्रश्न बरेचदा माझ्या मनात घोळला असेल. एके काळी फाफेचा एवढा प्रभाव पडला होता, की मी कुठेही गेलो तरी माझ्यावर संकट यावं अशी प्रार्थना मी करत असे. एका मित्राबरोबर वसईला त्याच्या घरी गेल्यावर तिथे रिक्षा करून कुठेतरी जायचं होतं. पूर्ण प्रवासात मला बरेचदा असं वाटलं होतं की ते रिक्षावाले काका आम्हाला किडन्याप करतील आणि मग आम्हाला फाफेगिरी करून सुटकेची संधी मिळेल! फास्टर फेणे डोक्यातून निघून जायला बरीच वर्षं लागली, आणि तरीही तो तसा गेला नाहीच!

उलट त्याच्या जोडीला 'ज्यूल व्हर्न' साहेबांची नवी साहसं डोक्यात ठाण मांडून बसली! एका मे महिन्याच्या संध्याकाळी घरात पुस्तकांचा एक खोका येऊन पडला.

मी उघडून बघितल्यावर मला त्यात 'चंद्रावर स्वारी' डोकावताना दिसलं. पुन्हा अक्षरश: भान हरपून महिनाभर तो १५ पुस्तकांचा संच मी पुरवून पुरवून वाचला. भारांनी आता आमच्यासाठी सूर्यमालाच उघडून दिली होती. त्यातलं जवळपास संपूर्ण श्रेय अर्थात व्हर्नसाहेबांना दिलं तरी आमच्यासाठी तेव्हा भाराच हिरो होते. पुढल्या आयुष्यात वाचलेल्या सगळ्या विज्ञानकथांच्या मागे भारांची ही ज्यूल व्हर्नची मालिका आहे.

आता मागे वळून बघताना बऱ्याच गोष्टी दिसतात आणि भारांचं अजूनच कौतुक वाटतं.



नंबर एक म्हणजे त्यांची प्रसंग वर्णन करण्याची हातोटी. त्यांचं कुठलंही पुस्तक घेतलं तरी त्यात चित्तथरारक म्हणता येईल अशा पद्धतीने त्यांनी प्रसंग रंगवले आहेत. फाफेच्या प्रत्येक कथेमधले प्रसंग त्यांनी तपशीलवार वर्णन करून सांगितलेत. उदा. फाफे आणि गुलमर्गचे गूढ. बन्याचा मित्र अन्वर जेव्हा एका बंगल्याच्या तळघरात कैद होतो तिथला एक प्रसंग आहे. अन्वर तळघरात एकटाच बंदी आहे. घाबरलेला आणि हताश. पण तो स्वत:ला धीर देतो, त्या गडद अंधारात चाचपडत काही मिळतंय का ते अन्वर शोधत असतो. मिट्ट काळोखातल्या अन्वरच्या त्या धडपडीचं वर्णन भारांनी प्रचंड परिणामकारक केलंय. मी तेव्हा Claustrophobia म्हणजे काय हे न समजता निव्वळ ते वर्णन वाचून ती स्थिती अनुभवली होती.

रॉबिन हुडच्या पुस्तकातला एक प्रसंग म्हणजे तिरंदाजीचे सामने! रॉबिनच्या टोळीतील पुंड आणि राजेसाहेबांचे तिरंदाज (गिल्बर्ट प्रभृती) ह्या दोन गटातील सामन्याचं वर्णन एवढं खुमासदार होतं, की मी कित्येकदा तेवढाच भाग पुन्हा पुन्हा वाचायचो. अगदी डोळ्यांपुढे चित्र उभं राहायचं. प्रत्येक बाण सोडल्यावर काय झालं, कसं झालं, ते भा.रा. तिथे बसून आपल्याला सांगताहेत - रनिंग कॉमेंट्रीच जणू!

नंबर दोन म्हणजे भाषांतरावरची हुकूमत. तेव्हा जाणवलं नाही, पण आता समजतं. भारांच्या भाषांतरात कसली सहजता होती! माझ्या दृष्टीने रॉबिन हुड आणि त्याच्या रंगेल गड्यांची मातृभाषा अस्सल मराठी होती. त्यात मला काहीही वावगं वाटलं नाही आणि ते पुस्तक वाचताना अजूनही वाटत नाही! ज्यूल व्हर्नची भाषांतरंही अगदी झकास होती. नंतर काही कृत्रिम भाषांतरं वाचल्यावर मला त्या ज्यूल व्हर्न कथांचं माहात्म्य कळलं. भारांनी निव्वळ अनुवाद केला नव्हता. पाताळलोकच्या अद्भुत यात्रेत जिथे मूळ आल्प्स पर्वत आहे, तिकडे त्यांनी हिमालय आणला, त्याबरोबर संस्कृतात श्लोकही जोडला. पात्रांना जमेल तितकं(च) भारतीय बनवलं आणि त्यांचे संवाद लिहिताना बाजही मराठी ठेवला. किशोरवयातल्या वाचकांना पचेल अशी भाषांतरं केली.

नंबर तीन - विनोद. भारांच्या कुठल्याही पुस्तकात कितीही गंभीर संकटं असली तरी त्यांची सगळी पात्रं एक सॉलिड विनोदबुद्धी बाळगून असत. बिपिन बुकलवार किंवा फाफे गंभीर होऊन आलेल्या संकटावर विचार करतायेत, हे दृश्य माझ्या डोळ्यापुढे येऊच शकत नाही. बन्याचं चित्र त्याच्या मिश्किल लुकलुकत्या डोळ्यांशिवाय समोर आणणं अशक्य! कदाचित त्यात भारांचा स्वभाव डोकावत असेल!

भारांच्याबद्दल कधीच कुठल्या मासिकात वाचलं नाही. कुठल्या चॅनेलवर कधी ते दिसलेत असंही आठवत नाही. त्यांनी मुलाखती, चरित्र किंवा तत्सम काही लिहिलंही असेल, पण ते मला कधी आवर्जून उल्लेखल्याचं स्मरत नाहीये. मात्र भारांच्या काल्पनिक दुनियेतली सगळी सगळी मंडळी मला अजूनही आठवतात. तशीच - अगदी नेमकी. बरेचदा ती माझ्या खऱ्या मित्रांएवढीच जवळचीही वाटली आहेत. त्या

खोट्या दुनियेतल्या पात्रांना एवढं खरं बनवू शकणारे भारा माझ्या दृष्टीने एकदम ग्रेट आहेत! माझे मोठेपणी तरी काही आयडॉल वगैरे असल्याचं लक्षात नाही. कदाचित त्यातला फोलपणा समजला असेल! पण लहानपणी आणि किशोरवयात माझे सर्वात आवडते लेखक कोण ह्या प्रश्नाला एकच उत्तर आहे - भा. रा. भागवत!

एकाच गोष्टीचं वाईट वाटतं - त्यांना एकदा प्रत्यक्ष भेटून "तुम्ही माझे खूप आवडते लेखक आहात" असं सांगायचं होतं. माझ्या फाफे संग्रहावर त्यांची सही घ्यायची होती. तेवढं मात्र राहून गेलं. 🥲

***

चित्रे: जालावरून साभार

***

इदं न मम!

- अमृतवल्ली

गावातल्या किर्तनेकर यांच्या किराणामालाच्या दुकानाच्या व्हरांड्यात पायपोस नि सतरंज्या टाकून दर वर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत महोदय पाठक गुर्जी ऊर्फ म्हाद्या गुर्जी संध्याकाळी पाच वाजता पायावर पायावर टाकून आम्हां पोराटोरांची वाट बघत उच्चस्थानी बसायचे. 'संस्कृत ही बोली-भाषा व्हायला हवी' असा चंग बांधलेले हे आमचे पाठक गुर्जी दर वर्षी दोन-तीन आठवड्यांची 'अभिजन' कार्यशाळा ('महोदय', 'उच्चस्थान'सारखा हाही त्यांचाच शब्द!) घेण्यासाठी गावात महिनाभर मुक्काम ठोकायचे आणि सालाबादप्रमाणे आम्हीही 'अहम् खावामि। अहम् बैठामि।'चं रवंथ करायला जायचो. पाठाची सांगता संस्कृत श्लोकाच्या पठणाने व्हायची. गुर्जींच्या मागे डोळे मिटून श्लोक म्हणायचा, तो संपल्यावर 'परमेश्वराचे स्मरण' करायचे आणि त्यांनी सांगितल्यावर डोळे उघडायचे, असा शिरस्ता असायचा.

श्लोक संपल्यासंपल्या आमची चुळबुळ सुरू व्हायची. मग एक डोळा हळूच उघडून गुर्जी म्हणायचे 'ओम भाराय नमः।'. मग लगेच एखादं पोरगं उठून किर्तनेकरांच्या रद्दीच्या कपाटातून एक ट्रंक बाहेर काढणार आणि सगळी पोरंपोरी त्याच्यावर झडप घालायला धावणार. हाच श्लोक कधी 'टागोराय नमः।' किंवा 'छात्रप्रबोधानाय नमः।'च्या चालीवर संपायचा. आता पुस्तकं काय आमच्या गावच्या वाचनालयात नव्हती का? चांगली बक्कळ होती. घरीपण आणि नगरवाचनालयातसुद्धा. पण तरी, त्या ट्रंकेच्या पोटातली पुस्तकं वाचायची/चाळायची इतकी उत्सुकता होती, याचं कारण म्हणजे त्यांतली बरीचशी किंवा जवळजवळ सगळी आमच्यासाठी नवीन होती. कुठल्याच वाचानालयात याआधी ती आम्हाला पाहायला मिळाली नव्हती. 'छात्रप्रबोधना'च्या अंकातल्या विज्ञानकथा, गणितातली कोडी, प्रयोग इतक्या सोप्या नि आम्हांला समजणाऱ्या भाषेत होत्या, की आमच्या विज्ञानाच्या मास्तरांची आणि पुस्तकाची भाषा त्रेतायुगातली आहे, असा आमचा पक्का समज झाला होता. शाळेची प्रयोगशाळा फक्त नववी-दहावीच्या विद्यार्थांच्या वापरासाठी होती. बाकीच्या इयत्तांना वर्षातून दोन-तीनदा प्रवेश असायचा आणि शिक्षकच सगळे प्रयोग करून दाखवायचे. पण या अंकातल्या सोप्या सोप्या कृतींमुळे प्रयोगशाळेचं अप्रूप थोडं कमी झालं होतं. तसंच काहीसं टागोरांच्या अनुवादित कथा आणि कवितांचं होतं. महाभारतातल्या भीष्मांसारखे दिसणारे हे आजोबा दूरच्या देशात राहूनही अगदी मनातलं ओळखून आपल्यासाठीच कसं काय लिहितात, याची भारी मजा वाटायची.

पाठक गुर्जींच्या याच ट्रंकेतून भा. रा. भागवतांची बरीचशी पुस्तकं आम्हांला वाचायला मिळाली. त्यातली काही आठवणारी पुस्तकं म्हणजे .. 'भुताळी जहाज', 'शाब्बास शरलॉक होम्स', 'थँक्यू मिस्टर शार्क', 'भटाच्या वाड्यातली भुतावळ' आणि बराचसा 'फास्टर फेणे'. यांतली काही पुस्तकं वाचताना धमाल मजा आली होती. कारण 'भुताळी जहाज'च्या अद्भुत सफरीबद्दल वाचल्यानंतर वाड्याच्या चौसोपीत चाच्यांबरोबरचं युद्ध चांगलंच रंगल्याच्या आठवणी आहेत. एकदा पाठक गुरुजींनी 'बालमित्र'चा खूप जुना अंक वाचून दाखवला होता, त्या संध्याकाळचं पुसटसं चित्र आठवत आहे.

पण या आठवणी सोडल्या, तर इतर पुस्तकं जशी मी झपाटून वाचली होती, तशी भारांची पुस्तकं झपाटून वाचल्याचं माझ्या स्मरणात किंवा जाणिवेत नाही. त्यांची पुस्तकं, विशेषत: फास्टर फेणेचं गारूड माझ्यावर झालंच नाही. आपल्या बऱ्याच मैतरांच्या बालपणाचा अविभाज्य भाग असलेला हा फेणे आपल्याला 'अपील' झालाच नव्हता याची लख्ख जाणीव मात्र माझ्यासोबत आहे. लहानपणी वाचलेल्या चंपक, चांदोबा,

पंचतंत्र, राम-कृष्ण-कर्ण, ज्ञानेश्वर-तुकाराम वगैरेंच्या गोष्टींत फास्टर फेणेच्याच आठवणी इतक्या पुसट का आहेत? शिवाय हे मलाच वाटतंय की माझ्याबरोबर वाढलेल्या भावा-बहिणींना/मित्र-मैत्रिणींना हीच भावना आहे, याचा मी शोध घ्यायचा प्रयत्न केला. त्यायोगे एक ठळक बाब माझ्या निदर्शनाला आली, ती म्हणजे ग्रामीण किंवा निमशहरी बालपण घालवलेल्या बऱ्याच लोकांना भागवतांची पुस्तकं, विशेषतः फास्टर फेणे, फार भावत नाही.

मला हे वाक्य लिहून किंवा माझं मत ठामपणे मांडून उगाचच वादाला वाद घालायचा नाही. भारांच्या १०५व्या जन्मदिनाच्या निमित्ताने त्यांचं फॅन-फॉलोइंग इथे लिहायला आणि वाचायला येणार आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. मुळातच आपण भारांविषयी लिहितो-बोलतो आहोत, तेव्हा एका अर्थाने आपण आपल्या लहानपणीच्या आठवणींविषयी लिहितो आहोत. स्मरणरंजन हा भारांविषयीच्या लेखांमधला अविभाज्य भाग आहे. तेव्हा, मी इथे लिहीत असलेली मतं ही माझ्या आणि माझ्या काही मित्र-मैत्रिणींच्या लहानपणीच्या आठवणी/घटना यांच्या आधारे मांडत आहे. पुराव्यानिशी गोष्टी शाबित करायचा माझा रोख नाही. शिवाय वर म्हटल्याप्रमाणे 'स्मरणरंजन' हा प्रकार वैयक्तिक अनुभवात मोडत असल्यामुळे इथे सडेतोड वकिली विधानं नसली तरी चालतील, अश्या धारणेने लिहीत आहे.

कुठल्याही पुस्तकातली पात्रं ही वाचकांना किती आपलीशी वाटतात, त्या पात्रांच्या व्यक्तिरेखा कश्या आहेत, कथानक काय आहे, यावर वाचक त्या पुस्तकात किती गुंततो हे अवलंबून असतं. विशेषतः लहान मुलांच्या बाबतीत पात्रांबरोबरचं भावनिक नातं यावर फार अवलंबून असतं. 'फास्टर फेणे'मधली आमच्या वयाची पात्रं - म्हणजे दस्तुरखुद्द फेणे, माली आणि त्यांचे मित्र - आम्हांला (इथे प्रत्येक वेळी आम्हांला - म्हणजे मला आणि माझ्या काही मित्र-मैत्रिणींना) आपलीशी वाटली नाहीत. याचं एक कारण म्हणजे, मुळात आम्ही मुलं-मुली जराही फेणेसारखी नव्हतो. चौकटीचौकटीचे शर्ट, पायात बूट, केसांचा लफ्फेदार कोंबडा, पाठीवर असणारी सॅक, छोटा चाकू, पाण्याची बाटली कधीच आमच्याजवळ नव्हती. फेणेच्या आणि आमच्या दिसण्या-बोलण्यामध्ये फार फरक होता. सायकलवरून गावकुसात हुंदडताना, भरधाव वेगाने ती दामटताना, काळ-काम-वेगाचं गणित आणि फेणेला असणारं त्याचं व्यवधान कधीच आमच्या डोक्यात नव्हतं. अर्थात याचं कारण - गावातलं लहानसं संकुचित जग - हे असू शकेल. फेणेकडे असणारा शहरी स्ट्रीटस्मार्टपणा आमच्याकडे जराही नव्हता आणि त्याचं आकर्षणही एका मर्यादेपलीकडे नव्हतं. सठीसामाशी पुण्या-मुंबईहून हुरड्याच्या दिवसात येणाऱ्या लांबच्या आत्या-मावश्यांच्या मुलांप्रमाणे हा फेणे दिसायचा. त्या मुलांशी खेळताना, बोलताना थोडं बिचकायला व्हायचं; तसंच फेणेबरोबर काहीतरी.

फेणे शहरी असल्यामुळे त्याच्या आजूबाजूचं वातावरणही शहरी आहे. आजूबाजूला फिरणाऱ्या मोटारी, वेगवेगळ्या प्रकारची लोकं, (एक उदाहरण देते, जसं की, टॅक्सी चालवणारा सरदारजी. आमच्या गावात औषधालाही ही टॅक्सी आणि सरदारजी सापडणार नाही), उल्लेखलेले सायकलचे वेगवेगळे ब्रँड, त्याची शाळा, त्याच्या ट्रिपा, वगैरे वगैरे. आमच्या आजूबाजूला असलेल्या वातावरणाशी ते बऱ्याच अंशी विसंगत होतं. मग तुम्ही म्हणाल की बाकीच्या चंपक, चांदोबा किंवा तत्सम बालमासिकांमधल्या कथांचं वातावरण तरी कुठे जुळतं? तरीपण रंगून जाऊन आपण त्या कथा वाचतच होतो ना? इथे येते भागवतांनी घेतलेली 'लीप ऑफ फेथ', याच 'लीप ऑफ फेथ'मुळे फास्टर फेणेला सुपर हिरोची झालर मिळते आणि मग मुले पळवणाऱ्यांना पकडून देणे, पानशेतच्या पुरातला धाडसीपणा, काश्मीरमधल्या पाकिस्तानच्या गुप्तहेरांना अद्दल घडवणे, लहान गावातून मोठ्या गावात एकट्याने शिकायला जाणे, सायकलवरून पाठलाग करणे, वगैरे करामती तो लीलया पार पाडतो. ही 'लीप ऑफ फेथ' शहरी वाचकांच्या पचनी पडते, कारण मुळातच 'फास्टर फेणे'मधलं वातावरण त्यांच्या ओळखीचं आहे. थोडसं अतिशयोक्तीनं सांगायचं तर शहरातल्या पेपरमध्ये मुलं पळवणाऱ्या टोळ्यांच्या बातम्या येतात, ही मुलं सुट्टीत आई-बाबांबरोबर काश्मीरच्या ट्रीपला जातात, शाळेतल्या ट्रिपा दिल्लीला वगैरे जातात शिवाय कथांमधे आलेले बरेचसे स्थळविशेष त्यांच्या आजूबाजूला दिसतात, विशेषतः पुण्यातल्या मुलांनी पानशेतचे धरण फुटल्याच्या आठवणी थोरांकडून ऐकलेल्या असतात. त्यामुळे अशा प्रसंगांतली त्यांच्यासारख्याच दिसणाऱ्या, वागणाऱ्या फेणेची सुपरहिरोगिरी अगदी सहज पचनी पडते. लहान गावातल्या मुलांना ही झेप भावेलच असं नाही.

मित्र-मैत्रिणींच्या बोलण्यातून आलेली अजून एक गोष्ट म्हणजे फेणेला भेटणारी माणसं. त्याला भेटणारे हवालदार, दुकानदार, चोर, कैदी, पोलीस सुप्रिटेंडंट, शाळेतले शिक्षक, मित्रांचे आई-वडील आम्हांला एकाच पठडीतले वाटतात. इथला हवालदार बिल्लेवाला, पोट सुटलेला असतो. शाळेतले शिक्षक आदर्श आणि

कनवाळू असतात. मित्रांचे आई-वडील धाडसी आणि समजूतदार असतात. थोडक्यात सांगायचं तर या पात्रांचं जरा 'बॉलिवुडायझेशन' झालंय. लहान मुलांना व्यक्ती-व्यक्तींच्या संबंधांमधला क्लिष्टपणा किंवा नात्यांची पेड उमजत नाही, असं थोडंच आहे? आपण कितीही लहान असलो तरी रोज भेटणारी माणसं, त्यांच्यातले हेवेदावे-प्रेम, शिक्षकांची वर्तणूक, गावातल्या सभा, बाजार, दंगली, उत्सव अशा असंख्य गोष्टींनी आपल्याभोवतीचा गोफ विणलेला असतो. जसजसं वय, समज वाढत जाते, तसतशी या गोफाची उलगड प्रत्येक जण आपापल्या परीने करत असतो. असे कंगोरे नकळतपणे टिपणाऱ्या आमच्यातल्या काहींना फेणे-पठडीतलं जग भावलं नसावं. इथे आमच्यातले काही जण - असं मी मुद्दाम म्हणते आहे, कारण काही जणांना फेणेची नेमकी हीच गोष्ट फार आवडली आहे. त्यांच्या भाषेत सांगायचं तर त्यामुळे 'फेणेची गोष्ट एकदम सरळ-सोपी झालेली आहे'. 'कुंभ के मेले में' हरवलेले भाऊ नक्की भेटणार, याची त्यांना जशी खात्री आहे, तसंच काहीही झालं तरी फेणे अमुक एक संकटातून सहीसलामत बाहेर पडणार, याची खात्री त्यांना आहे. आणि या खात्रीमुळे निर्धास्तपणे ते फेणेच्या लीला दंग होऊन वाचतात.

आमच्यातल्या बऱ्याच जणांना जाणवलेली अजून एक गोष्ट म्हणजे फेणेच्या गोष्टीत कुठेच झाडा-फुलांना, डोंगर-नद्यांना, पशुपक्षी, किडेमुंग्यांना स्थान नाही. गोष्टीतल्या जागा म्हणून फुरसुंगी, पुणे, प्रतापगड यांचे उल्लेख येतात पण तिथे फेणे रमत नाही. त्याची गोष्ट प्रतापगडावरचा खजिना शोधायला किंवा खूँखार कैद्याला पकडायला धावू लागते. गोष्टीत आलेले कुत्र्यांचे उल्लेखसुद्धा त्या अनुषंगानेच आलेले आहेत. अर्थात सगळ्यांच्या नाही, पण काही मुलांच्या भावविश्वात दारातली रांगोळी, रोज उगवणारा सूर्य, बागेतल्या कुंडीतल्या झाडाचं फूल, गोग्रास खायला न चुकता येणारी गाय यांना अढळ स्थान असतं. फेणेच्या गोष्टीत मला हे सापडलं नाही. कदाचित म्हणूनच माझी त्याच्याशी गट्टी जमली नसावी.

इथे मला माझ्या वैयक्तिक अनुभवावरून सांगावसं वाटतंय की साधारण त्याच वयात श्रीनिवास विनायक कुलकर्णींच्या 'डोह'मधल्या काही गोष्टी आणि प्र. ना. संतांच्या 'लंपन'च्या काही गोष्टी वाचल्या होत्या. आणि त्या मला प्रचंड जवळच्या वाटल्या होत्या. त्या गोष्टींत आणि माझ्या लहानपणात खूप साम्य होतं, अशातला भाग नाही. पण लंपनचा जसा 'विठोबा होतो' तसा आपलाही कधीमधी व्हायचा किंवा 'डोह'मध्ये पुराच्या पाण्यात उडी मारताना जशी घालमेल झाली, तशी आपलीही एकटीने विहीरीत उडी मारताना झाली होती, अशा ओळखीच्या खुणा मला त्या पुस्तकांत जागोजागी भेटल्या होत्या. मला याची पूर्ण कल्पना आहे, की मुळात फास्टर फेणे, 'वनवास' आणि 'डोह' यांची तुलनाच होऊ शकत नाही. फेणे एका विशिष्ट वयाच्या मुला-मुलींना समोर ठेवून त्यांच्यासाठी लिहिलं आहे, तर 'वनवास', 'डोह' यांतल्या गोष्टी म्हणजे ते वय ओलांडल्यावर आलेली अनुभूती आहे. तरीसुद्धा ही तुलना करायचा मोह मला आवरत नाही.

जाता जाता अजून एक मुद्दा. फाफेवरच्या संभाषणाची गाडी पुस्तकातल्या भाषेवर आली. तुमची भाषा, आमची भाषा, पुण्याची भाषा, फेणेची भाषा असा कीस पाडताना ही चर्चा अनेक गटांत विभागली गेली. अनेक लोकांचं असं मत होतं, की फाफेतल्या पात्रांची भाषा त्याच्या वाचकांच्या बोली भाषेपेक्षा बरीच वेगळी आहे आणि महत्त्वाचं म्हणजे ती एकाच छापातली आहे. उदाहरणार्थ, शहरी प्रसंगात पुणेरी छापाची भाषा, खेड्यातल्या किंवा आडगावच्या गावातील प्रसंगात एकाच बाजाची (शक्यतो कोल्हापूरची) ग्रामीण बोली आणि चिनी युद्ध असो किंवा दिल्लीतला प्रसंग असो, थोडी 'बंबय्या' हिंदी भाषा. थोडक्यात भाषा पात्रानुरूप असली तरी साचेबंद आहे. मला मात्र हे मत अगदीच पटलं नाही. मूळ कथाच जर फुरसुंगी, पुणे-मुंबईच्या आजूबाजूला घडत असेल तर उर्वरित महाराष्ट्रातल्या भाषांचा बाज मांडणार कसा? अर्थात हे मत असणारे बरेचसे मित्र मराठवाडा-विदर्भातले असल्यामुळे फाफेमधली भाषा त्यांना जवळची वाटली नाही यात नवल नाही. पण याच

लोकांना असाही प्रश्न विचारला, की जर फाफेमधल्या पात्रांपैकी एखादं पात्र तुमची भाषा बोलणारं असतं, तर फेणे जास्त भावला असता का? तर त्याचं उत्तर बव्हंशी 'होय' असं आलं. याच चर्चेत ऐकलेलं, सातारा-कोल्हापूरला वडिलांची बदली झालेल्या एका मैत्रिणीचं उत्तर फार मजेशीर होतं. तिला भाषेपेक्षाही फाफेमधलं काय आवडलं असेल, तर फाफेतल्या काही पात्रांच्या तोंडी 'हरामखोर', 'लुच्चा' अश्या शिव्या आहेत हे! तिच्या घरातल्या संस्कारी पुस्तकांच्या जंजाळात न मिळणाऱ्या या गोष्टीसाठी तिला फाफे आवडला होता. आजूबाजूच्या वातावरणाशी आणि भाषेशी मिळतंजुळतं घेणारं काही तिला त्या गोष्टींत मिळालं होतं.

असो. ह्या संपूर्ण लेखात कुठे तक्रारीचा सूर लागला असेल तर तो तसा अभिप्रेत नाही. भागवतांच्या शैलीला निंदालण्याचा हा प्रयत्न नाही. मला इतकंच म्हणायचं आहे, की कुणाला काय भावावं आणि कुणाला काय उमजावं हा ज्याच्या त्याच्या पिंडाचा आणि जडणघडणीचा प्रश्न आहे.

इथे मला माझ्या लहानपणीची एक गोष्ट ठळक आठवते आहे. आमचं घर म्हणजे मोठं बारदानच असल्यामुळे दळण टाकणं, तांदूळ निवडणं, फारफार तर भाजीला वाफ देणं सोडलं, तर स्वैपाकघरातली कामं मी फारशी कधी केली नव्हती. एकदा दुपारच्या खुडबुडी करताना 'किशोर'च्या एका अंकात 'सुट्टीतले स्वयंपाकघरातले प्रयोग' किंवा तत्सम मथळ्याखाली छापलेलं 'तिरंगी सॅन्डविच' करायचा मी घाट घातला. टॉमेटो सॉस, पुदिन्याची चटणी, लोणी ब्रेडला लावून ते एकावर एक ठेवायची अशी काहीशी कृती होती. कृती बघितल्यावर माझ्या लक्षात आलं, की त्यातलं लोणी सोडलं, तर एकही घटक घरात सहजासहजी मिळणारा नव्हता. टॉमेटो सॉस आणि ब्रेडसाठी तर अख्खा दिवस किरकिर करावी लागली असती आणि वर आईने तासाभराचं आख्यान ऐकवलं असतं ते वेगळं. तस्मात् - सहज करता येणारा - असं म्हणून छापलेल्या त्या पदार्थाचा मी 'इदं न मम!' असं म्हणून नाद सोडला होता.

***

मैदानातील फाफेचे रेखाचित्र: जालावरून साभार.
इतर रेखाचित्रे: अमृतवल्ली.

***

प्रयत्नें बांधिली मोळी!

- लीलावती भागवत

'भाराभर गवत' हे भा. रा. भागवतांच्या निवडक लेखनाचं संकलन. त्याला प्रस्तावना लिहिताना लीलावती भागवत यांनी भारांच्या लेखनाचा आणि लेखनामागच्या सदाबहार वृत्तीचा नेमका आणि खुसखुशीत आढावा घेतला आहे. 'ऐसी अक्षरे'च्या या प्रकल्पाच्या निमित्ताने तो पुनर्प्रकाशित करतो आहोत.

***



चित्रस्रोतः भागवत कुटुंबीय

श्री. भा. रा. भागवतांनी या संग्रहाला सुचवलेलं 'भाराभर गवत' हे शीर्षकच त्यांच्या विनोदी लेखनप्रवृत्तीची चुणूक दाखवतं. शाब्दिक कोट्यांची त्यांना जबरदस्त आवड आहे. त्यांच्या लेखांना, कथांना दिलेली शीर्षकं, त्यांच्या पात्रांची नावं, या सर्वांमधून त्यांची ही आवड प्रकट होते. ते नेहमी म्हणतात, "मला मोरोपंत आवडतात ते त्यांच्या शब्दांच्या कोलांट्यांमुळे; भले टीकाकार त्यांना कमी लेखोत, पण त्यामुळे त्यांच्या शब्दांच्या खेळाची लज्जत कमी होते थोडीच!"

स्वतःच्या नावावरसुद्धा ते विनोद करतात. मुलांना म्हणतात, "भागवत या नावाचा अर्थ ठाऊक आहे? भागवत म्हणजे भाड्याने गवत वाहणारं तट्टू!" - तर अशी ही वृत्ती त्यांच्या मनाच्या निकोप आणि निखळपणामुळेच त्यांना लाभली आहे.

एके काळी ते विनोदी कथालेखक म्हणूनच मराठी वाचकवर्गाला माहीत होते. मराठीतील उत्कृष्ट विनोदी कथासंग्रहात श्री. राम कोलारकरांनी त्यांच्या जवळपास वीस कथा अंतर्भूत केलेल्या आहेत. त्यांचा विनोद वाचकांना आवडतो, त्याचं कारण तो कुठल्याही व्यक्तीवर, व्यंगावर कटू प्रहार करत नाही; तर एखाद्या प्रवृत्तीला, पद्धतीला, समाजातल्या विक्षिप्त रीतीभातींना कोपरखळ्या मारून इतरांना खुसखुशीत हास्याचा आस्वाद घेऊ देतो.

तरीही त्यांच्यावर विनोदी लेखक म्हणून शिक्का बसलेला नाही; कारण त्यांनी लेखनाचा एकच एक प्रांत कधीच हाताळला नाही. त्यांनी आयुष्यभर लेखन केलं - भरपूर लेखन केलं, विविध प्रकारचं लेखन केलं. म्हणजेच भाराभर लिहिलं. पण ते लिखाण 'एक ना धड...' अशा स्वरूपाचं मात्र झालं नाही. त्यांनी हाताळलेला प्रत्येक लेखनप्रकार वाचकप्रिय ठरला. एके काळी ते विनोदी कथा, विडंबनकथा, विनोदी लेख इतक्या सहजपणे आणि निखळपणे लिहीत की तेच त्यांनी चालू ठेवलं असतं तर विनोदी लेखक म्हणून आजही ते ख्यातनाम ठरले असते. पण त्यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात बालसाहित्यात लहान मुलांच्याच उत्साहाने उडी घेतली आणि मराठी बालवाङ्मयाच्या आणि बालवाचकांच्या दृष्टीने ती आभाळउडी ठरली.

बिपिन बुकलवार - त्यांनीच प्रथम इंग्रजीत बुकलव्हर म्हणून जन्माला घातला आणि 'बुकलवार' हे मराठी आडनाव त्याने धारण केले. हा त्यांचा तरुण नायक म्हणजे फूटपाथवर जुन्या पुस्तकांचा दुर्मीळ खजिना शोधत हिंडणाऱ्या स्वतःचीच त्यांनी रेखाटलेली साहित्यिक प्रतिकृती. हा स्वतः छोट्या मुलांना साहसकथा सांगतो आणि त्यांच्याकडून साहस करवूनही घेतो. नंदू नवाथे हा त्यांचा थापाड्या, पण चांगल्या मनाचा, एक मानसपुत्र; विनोदी ढंगाने वावरणारा. फास्टर फेणे हा त्यांचा मानसपुत्र तर गेली ३० वर्षं बालवाचकांच्या आग्रहाखातर वय वाढू न देता, आहे तेवढाच लहान राहिलेला आहे आणि मुलांचा जानी दोस्त बनला आहे. या त्यांच्या मानसपुत्रांच्या साहसकथा वाचताना त्यांचे वाचकपुत्र खुर्चीवर, पलंगावर, हातात पुस्तक असेल तिथे उड्या मारू लागले. विनोद आणि साहस या दोन्हींनी भरलेल्या आणि भारलेल्या त्यांच्या कथाविश्वात त्यांच्याबरोबर त्यांचे वाचकही भरकटू लागले, अंतराळात उडू लागले, समुद्राच्या पोटात डुबक्या मारू लागले. भा. रां. नी दिलेल्या पुस्तकातून खजिनेच्या खजिने लुटू लागले.

लेखक होण्याचं वेड मला वाटतं भागवत मंडळींच्या रक्तातच असावं. आमच्या मोठ्या मुलाने, रवीने वयाच्या बाराव्या वर्षी एक रहस्यकथा लिहिली आणि घरातल्या हलकडीला टांगून ठेवली. त्या कथेत दर पाच-सहा पानांगणिक एक, या हिशोबाने आठ-दहा खून होते. पण रहस्याचा शेवट सुचेना म्हणून कथेचं बाड टांगलेलं पाहिल्यावर 'रात्री तिथून हिंडताना आपल्या अंगावर रक्त तर सांडणार नाही?' अशी एक मजेशीर कल्पना माझ्या डोक्यात आली. ती मी रवीला सांगितली आणि तो हलकडीइतकाच उंच उडाला. त्याच्या रहस्यकथेला दाद दिली होती ना मी!

आमच्या धाकट्या मुलाने, चंदरनेही जवळजवळ याच वयात 'प्रकाशकिरणांचे रहस्य' म्हणून एक वैज्ञानिक कादंबरी लिहिली तीही रहस्यमयच. ती 'गंमतजंमत' या मुलांच्या मासिकात छापूनही आली.

आता हा रहस्यकथेचा किडा पोरांच्या डोक्यात वळवळायला कारण त्यांचे पिताजी भा. रा. भागवत आहेत, हे उघड गुपित आहे. भा. रां. नीही याच शाळकरी वयात एक रहस्यकथा लिहिली होती. मुलांनी पुढे हा नाद

सोडला. पण वडिलांनी लेखनाचा धबधबा कोसळतच ठेवला. त्या धबधब्यातली ती पहिली धार म्हणजे त्यांनी लिहिलेलं 'निळे पाकीट' हे पुस्तक. ते त्याच वेळी छापूनही आलं. त्या पुस्तकाची जन्मकथा 'पहिलं वाहिलं' म्हणून तेच स्वतः या संग्रहाच्या सुरुवातीला सांगताहेत.

साहस, रहस्य आणि विनोद या गोष्टींची त्यांना लहानपणापासूनच आवड. त्यांनी बऱ्याच इंग्रजी रहस्यकथांची भाषांतरं केली. स्वतंत्र कथाही लिहिल्या. त्यांनी लिहिलेल्या अशा कथांना त्यांनी वाचलेल्या रहस्यकथांमधून स्फूर्ती मिळालेली आहे. त्यांचे 'धाराधरशास्त्री' म्हणजे चेस्टरटनच्या फादर ब्राउनचा अस्सल मराठी अवतार - बाराबंदीतला.

त्यांची रहस्यकथा नंतर विनोदी अंगाने, म्हणजे रहस्यकथेच्या विडंबनाच्या स्वरूपातही, पुढे आली. रहस्यकथा लेखकांचे गुप्तहेर रहस्य सोडवतात, पण प्रत्येकाची रीत निराळी असते. ॲगाथा ख्रिस्तीचा हरक्यूल पॉयरॉ किंवा मिस मार्पल घरात बसून, थोडं हिंडून, तर्कबुद्धीचा जास्त आधार घेऊन रहस्याची उकल करतात; तर कॉनन डॉइलच्या शरलॉक होम्सचा फार मोठा भर बारीकसारीक पुरावा गोळा करण्यावर असतो. एखादा केस, एखादं तुटकं बटण, चोर किंवा खुनी गेला असेल त्या रस्त्यावरची एखादी मातीची चिमूट, सिगरेटची राख आणि हा पुरावा गोळा करण्यासाठी तो बदलत असलेले असंख्य वेष - या सर्वांचं विडंबन म्हणजे 'फूल आणि मूल' ही रहस्यकथा. त्याच्या वेषपरिवर्तनाची शेवटची भा. रां. ची कल्पना तर...! शरलॉक होम्सच्या रहस्यकथांचे बरेच अनुवाद - म्हणजे सरळसरळ अनुवाद हल्ली-हल्ली त्यांनी केले आहेत; पण त्याच्या रहस्यकथांचं विडंबन त्यांनी खूपच पूर्वी केलेलं होतं.

वृत्तपत्र व्यवसायतर प्रथमपासूनच जसा त्यांच्या अंगात भिनलेला. याची सुरुवात 'सकाळ'पासून झाली. त्यातली साहसं अनुभवायला त्यांना आवडत. काबालींच्या विमानातून त्यांनी प्रथम प्रवास केला तो वृत्तपत्रकार म्हणून 'प्रकाश' साप्ताहिकासाठी. पण विमानात चहा न मिळाल्याने.... अर्थात ही जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट! ही विमानसर्व्हिस म्हणजे औरच होती. उघड्या विमानातून पोस्टाच्या थैल्या नेल्या जात. एखाद्या लहान मुलाने आपल्या छोट्या गाडीतून मित्राला बसवून न्यावं तसे भारा त्या विमानात वैमानिकाबरोबर बसलेले. कारण त्या छोट्या विमानात फक्त दोघेच होते. वैमानिक आणि भागवत. आत्ताच्या विमानाच्या स्वरूपाचा तिथे मागमूसही नव्हता. पण सांगायची गंमत अशी की त्या प्रवासातल्या त्रासाने त्यांची जी फजिती उडाली, ती हसत हसत सर्वांना त्यांनीच सांगितली. त्यांना अशा काही अडचणी, फजिती उडवणारे प्रसंग आले की सगळ्यात गंमत वाटते. सहलीला गेलं आणि ती सुरळीत झाली की त्यांना भावत नाही. पण दहाबारा मंडळींबरोबर गाडीत बऱ्याच मुलांना कोंबून सहलीला गेलं आणि वाटेत घरच्या फोर्ड - फियाट गाड्यांची टायरं पंक्चर होऊन फट्ट झालं की यांची तबियत खूष. मग गोष्ट तयार 'फोर्ड - फियाट - फट्ट!'

वृत्तपत्रीय माणसांना, मला वाटतं, अशा गोष्टींची ओढच असते. हाच त्यांचा स्वभावविशेष 'प्रकाश' साप्ताहिकात काम करताना, त्यांनी लिहिलेल्या 'चक्करसंघाची साप्ताहिक सभा - लेखक घनचक्कर' या स्फुटलेखातून उमटलेला दिसतो. काही प्रत्यक्ष काम न करता प्रत्येक गोष्टीवर टीका-टिप्पणी करणारी बाताराम पंथाची मंडळी, या चक्कर संघाची सभासद. त्यांच्या त्या बैठकीमधून काही निष्पन्न होण्याची अपेक्षा नसल्याने बिघडत काहीच नाही म्हणा! समाजातल्या एका विशिष्ट प्रवृत्तीवर या स्फुटलेखमालेत चांगलेच टोले लगावलेले आहेत.

अडचणीतून, साहसातून विनोदाची झलक भागवतांना अलगद सापडते. दैनंदिन जीवनातल्या अडचणीतून मजा घेणं त्यांना सहज जमतं. ते मुंबईत राहत असताना, लग्नाबिग्नाच्या फंदात पडलेले नसतानाही एखाद्या

'संत्रस्त' (हे त्यांनी त्या वेळी घेतलेलं नाव) विवाहित गृहस्थाप्रमाणे मुंबईत येणाऱ्या कौटुंबिक अनुभवांवरून लिहिलेलं त्यांचं पुस्तक, नावाने जरी वैतागवनातील वाफारे सोडत असलं तरी वाचणाऱ्याला मात्र त्यातल्या विनोदाच्या झुळुकीने सुखावतं.

सध्याच्या भर वेगाने धावणाऱ्या वाहनांचीच ज्यांना ओळख आहे त्यांना ट्रॅम-बस-लोकल यांचं त्या काळचं स्वरूप वाचून, आपण कुठल्या जुन्या युगात वावरतो आहोत असं वाटेल, तर पाश्चात्त्य रीतीभातींचा लेप वागणुकीवर चढवणारे त्या काळातले सुशिक्षित लोक आणि त्यांचं वागणं म्हणजे उसन्या अतिरेकाने माणूस स्वतःचंच हसं करून घेण्याच्या भानगडीत अक्षरशः पडलेला पाहून हसू येईल, तर नवल नाही. त्यातल्या मुंग्या, उंदीर, झुरळांशी युद्ध किंवा उरूस, जत्रा अशा प्रसंगी मुलाबाळांमुळे उडालेली तारांबळ काहींनी प्रत्यक्ष अनुभवलेली असण्याची शक्यता आहे. पण भा. रां.नी मात्र कल्पनेत ते इतकं हुबेहूब वठवलं आहे की त्याविषयी वि. स. खांडेकर म्हणतात -

'श्री. भागवत यांच्या वैतागवनातील वाफाऱ्यांत सापडलेला वाचक हसतमुखाने बाहेर येईल यात शंका नाही. शाब्दिक कोट्यांपासून ते उपरोधापर्यंतचे विनोदाचे सर्व प्रकार श्री. भागवतांना अवगत असून मुंबईतील सामान्य मनुष्याच्या कोंडमाऱ्याचे वर्णन करताना आपल्या विनोदशक्तीचा त्यांनी कौशल्याने उपयोग केला आहे. स्त्रीदाक्षिण्य, वक्ते, श्रोते व व्याख्याने इत्यादी विषय निवडण्यात लेखकाची मार्मिकता दिसून येते. कॅ. लिमये व चिंतामणराव जोशी यांच्या लेखनाची परंपरा श्री. भागवत चांगल्या रीतीने चालवू शकतील.'

मला वाटतं, काही माणसं कल्पनेतल्या गोष्टींचा धसका घेतात तसा त्यांनी तो घेतला असावा. पण नंतर तो धसका विसरून प्रत्यक्ष गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतर, मला या लेखनातल्या अनुभवांची फारशी प्रचीती आलेली दिसली नाही. कारण नंतर मुंबईतच संसारातली ही या प्राण्यांशी झालेली युद्धं नेहमी गमतीने घेतली गेली - त्यांच्या विनोदशोधक स्वभावानुसार!

ही अफाट कल्पनाशक्तीच त्यांना विनोदी प्रेमकथा लिहिण्यात आणि प्रेमकथांची विडंबनं करण्यात उपयोगी पडली असावी. स्वतः प्रेमात पडण्याच्या वयात त्यांनी दुसऱ्यांच्या प्रेमकथांची भंबेरी उडालेली कशी लिहिली, हे मला आयुष्यात कधीच न उलगडलेलं कोडं आहे. कारण प्रेमभंगाच्या विडंबनकथांना स्वानुभूतीचा आधार म्हटलं म्हणजे... शिवाय स्वतःच्या फजितीवर विनोद करण्याचा यांचा स्वभाव म्हणजे तर माझ्या दृष्टीने... मग मी एका समीक्षकाने लिहिलेलं वाक्य मनात घोळवते. हे समीक्षक म्हणतात - 'गंभीर साहित्यनिर्मिती करणारा लेखक प्रामुख्याने स्वानुभूतीचा आधार घेतो, पण विनोदी लेखक पुष्कळदा इतरांच्या आयुष्यातले किस्से पकडतो.'

असो. तर भा. रां.च्या प्रेमकथांची प्रत्येक विडंबनकथा प्रेमभंग झालेल्या प्रेमवीरांना आपली वाटावी इतकी दिलफोडक - हा लेखकाचा शब्द - झालेली आहे. वि. सी. गुर्जरांच्या प्रेमकथा यांना फार आवडत. पण त्यातल्या प्रेमवीरांच्या मिठ्ठास वर्णनाचं विडंबन त्यांनी इतक्या मिठ्ठासपणे केलेलं आहे की गुर्जरांसारख्या रोमँटिक-करुण-गंभीर लिहिणाऱ्या लेखकानेदेखील भा. रां.ची पाठ थोपटावी.

यांचं हे विडंबनवेड सर्वच कथाक्षेत्रात धुमाकूळ घालतं. प्रेमकथांप्रमाणेच स्वतः लिहिलेल्या वीरकथांचंही ते विडंबन करतात. त्यांची 'सूंबाल्या भागूबायकोव्हा' ही कथा याची साक्ष देते. अनुवादित असूनही 'सोव्हिएटच्या समरकथा' अत्यंत हृद्य आणि चटका लावणाऱ्या आहेत. पण या कथा लिहिल्यानंतरही 'सूंबाल्या...'सारखी विडंबनकथा लिहिल्याशिवाय त्यांना राहवलं नाही.

वुडहाऊस हा त्यांचा आवडता लेखक. त्याचा नायक मि. मलिनर जसा पडेल प्रेमवीरांच्या कथा सांगतो तसाच भा. रां.चा छगनही सांगतो. लेखनपद्धती तीच, पण नायक आणि प्रसंग संपूर्ण स्वतंत्र. छगन या फजितीच्या गोष्टी इतरांच्या सांगतो. तशाच स्वतःच्याही. त्याही अफाट. 'छगनचं सुपरसॉनिक प्रेम' ही अशीच एक कथा. या छगनच्या लक्षात आलं की खादी, सुती कापड यांना मागे ढकलत नवीन धागे आले आहेत नायलॉनचे. आणि याचे धागेदोरे छगनने थेट दत्ता दडेकरच्या 'मंगळसूत्रा'ला नेऊन बांधले आणि एका वात्रट कथेचा जन्म झाला.

खरं तर त्यांना विज्ञानाची आवड आहे; पण वृत्तपत्रीय पिंड त्यांना प्रासंगिक विनोदाच्या कट्ट्यावर नेऊन उभा करतो. उडत्या तबकड्यांचं युग होतं, त्या बातम्यांनी वृत्तपत्रांचे रकाने भरत असत, तेव्हा त्यांनी 'उडती छबकडी' लोकांपुढे ठेवली. 'धिक्-कालयान' ही याच शास्त्रीय विडंबन-सूत्रातली एक गोष्ट.

दुसऱ्या महायुद्धाचे वारे वाहू लागले त्याबरोबर 'माझा विक्रम'मध्ये 'ह-ह-हु' आलं. हे थंडीने कुडकुडणं नव्हे, त्या शीर्षकाचा अर्थ - 'हवाई हल्ला हुश्शारी' - अर्थात या प्रासंगिक विनोदाचा खरा आस्वाद त्या वातावरणातून गेलेल्या वाचकांना जास्त आपलेपणाने घेता येतो. विडंबनसाहित्य प्रकाराचा तो एक विशेषच म्हणावा लागेल. अत्रेच ज्यांनी बघितले नाही ते अत्र्यांची नक्कल पाहताना संपूर्ण रसास्वाद घेऊ शकत नाहीत; पण विनोदविषय सार्वत्रिक आणि सार्वकालिक असेल तर ही अडचण भासत नाही. भा. रां.च्या काही विडंबनकथा आणि विनोदी कथा अशाही आहेत.

शास्त्रीय कथांची त्यांना विलक्षणच आवड आहे. पण शास्त्रीय माहिती आत्मसात करण्यावरही त्यांचा कटाक्ष असतो. या बाबतीत ते आपल्या मुलाशीही वाद घालतील. या वादाचा एक लेख यात वाचायला मिळेल. अशा वादावादीतून ते बरं काही मनाशी टिपून घेतात. ही त्यांची टिपणवृत्ती त्यांना ज्यूल व्हर्नच्या डझनभर कादंबऱ्यांच्या अनुवादाकडे खेचून घेऊन गेली. रूपांतरित 'चंद्रावर स्वारी'मध्ये तर त्यांनी जुनी पंचांगं शोधून आकाशातील ग्रहताऱ्यांचं भारतीय गणित मांडलं. कारण कादंबरी असली तरी शास्त्रीय माहिती बिनचूक असलीच पाहिजे, असा त्यांचा रास्त आग्रह असतो.

तरीही त्यांची विनोदशोधक वृत्ती, विज्ञान आणि साहित्य यांच्या मिश्रणातून विनोदी शास्त्रीय कथा लिहिण्यावाचून त्यांना चैन पडू देईना. अशा या मिश्रणातून तयार झालेल्या त्यांच्या शास्त्रीय विडंबनकथा, मगाशी मी म्हटल्याप्रमाणे त्यांच्या विषयातील सार्वत्रिकपणामुळेच आजच्या वाचकालाही तितक्याच भावतात. त्याचप्रमाणे त्यांनी विनोदी ढंगाने लोकांसमोर पुन्हा मांडलेल्या, वाढवून, खुलवून लिहिलेल्या 'बाईलचोर' या पुस्तकातल्यासारख्या कित्येक लोककथा आवडीने वाचल्या जातात.

विनोदी वाङ्मयात फार्सचं मोठं स्थान आहे. एखादी अत्यंत गंभीर गोष्टही मर्यादा सोडून अतिशयोक्त झाली की तटस्थपणाने पाहणाऱ्याला ती फार्सिकल वाटू लागते. फ्रेंच लेखक मोलिएर याने तत्कालीन फ्रेंच समाजजीवनाची खिल्ली उडवणारे फार्स लिहिले. गंभीर नाट्यलेखकांइतकाच तोही त्या काळी फार्स लेखनामुळे गाजला. आपल्याकडे अत्र्यांनी त्याच्या एका फार्सवर आधारून 'कवडीचुंबक' लिहिलं. हरीभाऊ आपट्यांनीदेखील 'मारून मुटकून वैद्यबुवा' आणि इतर दोन अशी तीन प्रहसनं लिहिली.

भागवत विनोदी श्रुतिका आकाशवाणीसाठी लिहीतच असत. त्यांची 'मधुचंद्र मनमाडला' ही श्रुतिका याच अतिशयोक्त फार्सिकल ढंगाची - त्या वेळी खूप गाजली होती. भागवतांची आणि मोलिएरची पत्रिका त्यामुळेच जुळली आणि त्यांनी मोलिएरच्या नाटकाचं रूपांतर केलं- 'साट्यालोट्याचा फार्स!', आणि हे नाटक वाचताना आपल्याकडच्या एखाद्या मेलोड्रॅमॅटिक नाटकाचं विडंबन वाचतो आहोत, असं वाटायला लागतं.

या खट्याळ आणि प्रौढ विनोदाच्या खळखळाटाप्रमाणे बालविश्वातल्या नाजूक विनोदाची झुळझुळही त्यांच्या लेखणीने शब्दबद्ध केलेली आहे. 'जाईची नवलकहाणी' आणि 'आरसेनगरीत जाई' यांतले प्रसंग आणि काव्य यांतल्या विनोदाची प्रचीती शब्दाशब्दाला येते. मग ही जाई लुईस कॅरोलची ॲलिस न राहता -

"उंद्रोबा उंद्रोबा

भागलास का?,

चहाच्या किटलीत

लपलास का..."

म्हणणारी खरीखुरी भारतीय जाई वाटायला लागते. मराठी मुलांना ती हसत खेळत आपल्याबरोबर घेऊन जाते. 'जाई' आल्यानंतर 'पाचूनगरीत जाई' अवतरल्याशिवाय कशी राहील? या कादंबऱ्यांप्रमाणेच 'मायापूरचे रंगेल राक्षस' या कादंबरीने त्यांच्या सर्व शाब्दिक विनोदप्रकारांना सामावून घेतलेलं दिसतं.

त्यांचं बालसाहित्य विनोदी नाही. पण फा.फे. उर्फ फास्टर फेणेचा मिस्किलपणा, नंदू नवाथेचा थापेबाजपणा आणि बिपिन बुकलवारच्या साहसात त्याला अडचणीत टाकणारे विलक्षण चमत्कारिक प्रसंग या सगळ्याला खुसखुशीत विनोदाची खमंग फोडणी आहे. फास्टर फेणे त्यांचा लाडका मानसपुत्र. पण स्वतःच्या मुलांशीदेखील बोलायचा त्यांना कधी कधी संकोच वाटतो. मग या मानसपुत्राची ते पत्रकार बनून मुलाखत घ्यायला जातात. अर्थात ती बारगळते ते सोडा! त्याचप्रमाणे 'अँटोनिओची मेजवानी', 'चिन्याचा जमालगोटा', 'झनक झनक झुरळ' या लोककथांमधला विक्षिप्त विनोद त्यांनी 'मायापूरचे रंगेल राक्षस' मधल्या 'कोबीच्या गड्ड्या'प्रमाणे फुलवला आहे.

स्वतःच्या आयुष्यात घडलेले काही प्रसंग, आपल्याला भेटलेली माणसं, त्यांचे आलेले अनुभव फारसे गंभीरपणे मनावर न घेता त्यातलीही गंमत अनुभवायला लागणारं मिस्किल मन भा.रां.जवळ आहे. त्यामुळेच असे काही व्यक्तिचित्रणात्मक लेख, किंवा प्रसंगकथा म्हणावं वाटल्यास, त्यांनी लिहिल्या. त्या त्या व्यक्ती वाचकांच्या समोर उभ्या केल्या आणि 'जीवननाट्याची ऐशी तैशी' रंगवली. शाब्दिक कोट्या आणि विनोद करण्याचा, चुटके रचण्याचा आणि जमवण्याचा अजूनही त्यांना छंद आहे.

वास्तविक तुरुंगात इतर माणसं तुरुंगातल्या जीवनाच्या आठवणी लिहितात. घनगंभीर, वैचारिक, तात्त्विक असं लिहितात. पण १९४२च्या स्वातंत्र्यलढ्यात विसापूरच्या तुरुंगात जवळजवळ दोन वर्षं स्थानबद्ध असताना भा.रां.नी एक कादंबरी लिहायला घेतली. त्यांच्या वृत्तपत्रीय जीवनाच्या अनुभवांवर. शीर्षक - 'मुद्रणपिशाच्च!' खरं तर मुद्रणपिशाच्चाची करामत दाखवणारे 'उ.सं.डु.' किंवा 'मुद्राराक्षस' यांसारखे शब्द आपल्याला परिचित असतील. इंग्रजीत या मुद्रणातील चुकांना 'Printer's Devil' म्हणतात. या नावावरून कादंबरीला यांनी हे शीर्षक दिलं. पण मुद्रणदोषांना पिशाच्च न म्हणता वृत्तपत्रसृष्टीतली माणसं म्हणजेच विविध पात्रं, त्यांनी मुद्रणपिशाच्च म्हणून रंगवली.

या कादंबरीची शेवटची एकदोन प्रकरणं लिहून होण्यापूर्वीच सरकारने त्यांना तुरुंगातून सोडल्यामुळे त्यांचा नाइलाजच झाला. शेवटची प्रकरणं लिहिलीच गेली नाहीत - हा यांचा लेखनप्रक्रियेतला नेहमीचा खंड - एकदा खंड पडल्यावर पुन्हा न लिहिणं, यामुळे कादंबरीच्या संपूर्ण मेजवानीचा आस्वाद न घेता लिहिलेल्या प्रकरणातला एखादा 'सा. मो. सा.' खाऊनच पोट भरणं भाग पडेल.

खंड पडल्यावर त्याच्यापुढे पुन्हा न लिहिण्याच्या त्यांच्या सवयीमुळे ते मुद्रणपिशाच्च वाचकांच्या मानगुटीस बसलं नाही; पण बसलं असतं तर त्याने आपला भूतपणा विसरून वाचकांना घाबरवण्याऐवजी हसवून गुदगुल्या केल्या असत्या हे नक्कीच!

इतर लेखनप्रकारांप्रमाणेच काव्याचाही प्रांत याच विडंबन-प्रवृत्तीने त्यांनी हाताळला आहे. पण या कविता बहुतांश मुलांसाठी किंवा मुलांसंबंधी आहेत. मोठी माणसं या कवितांना पोरकट म्हणतात; पण मुलं मात्र त्यांच्या विनोदवृत्तीशी नातं सांगणाऱ्या या कविता वाचताना रंगून जातात. कारण त्यातले शब्द आणि कल्पना पोरांना सुचतील किंवा त्यांच्या स्वभावधर्माशी, सवयीशी जुळतील अशाच असतात. भा.रां.च्या कवितांच्या आक्षेपावर ते एकदा म्हणाले होते - "अहो, हे पोरकट कसं होईल? यातून पोरं 'कट्' कुठे केली आहेत?

सगळीकडे विनोद शोधण्याच्या त्यांच्या या सहजसुलभ प्रवृत्तीमुळेच त्यांचं विनोदी लेखन विषयांच्या मर्यादा पाळीत नाही. नाटक, कथा, कादंबऱ्या, ललितलेख, बालगीतं, विडंबनकथा, विनोदी शास्त्रीय कथा वगैरे विनोदी साहित्याचे असे तऱ्हेवाईक विविधरंगी, विविधढंगी आविष्कार या संग्रहात आपल्याला आढळतील.

लेखन साहित्य, लिखित साहित्य आणि मुद्रित साहित्याची कात्रणं यांचा घरभर घातलेला पसारा नेहमी आवरण्याची आणि व्यवस्थित कागद लावून ठेवण्याची जन्मभर सवय असल्यामुळेच की काय, त्यांच्या लेखनाच्या सगळ्याभर विखुरलेल्या काड्या एकत्र करून त्यांची मोळी बांधण्याचं हे काम मी करू शकले असं वाटतं. आणि काहीतरी हरवलेलं - फार मोठं काही नाही - एखादा कपटादेखील शोधण्यासाठी ही व्यवस्थित बांधलेली मोळी भा.रां.नी विस्कटण्यापूर्वीच छापून वाचकांच्या पुढे ठेवण्याचं काम उत्कर्ष प्रकाशनाचे श्री. सुधाकर जोशी आणि श्रीमती सविता जोशी या दोघांनी अत्यंत दिलखुलासपणे केलं त्याबद्दल त्यांची, तसंच हे पुस्तक सुंदर मुखपृष्ठाने सजवल्याबद्दल चित्रकार राम वाईरकर यांची मी अत्यंत आभारी आहे.

- लीलावती भागवत

***

***

पुत्र व्हावा ऐसा पढाकू

- संवेद

सोप्या गोष्टींबद्दल लिहिणं फार कठीण असतं हे वाक्य अनंत वेळा वाचूनही टोचत नाही, जोपर्यंत ती वेळ तुमच्यावर येत नाही. आज ही वेळ माझ्यावर आणल्याबद्दल संपादकांचे आभार मानावेत की त्यांना बोल लावावेत हा प्रश्नच आहे.

भा. रा. भागवतांची पुस्तकं आनंदानं वाचणं वेगळं आणि त्यांच्या लिखाणाचं तथाकथित मूल्यमापन करणं वेगळं. आज मागं वळून बघताना जाणवतं, की भारांचं स्थान तेच आहे जे आपल्या आवडत्या मावशीचं, दादाचं, आजीचं असतं. तिथं डावं-उजवं करताना मनात एक हळवा कोपरा आधीच तयार झाला असतो. भारांच्या लिखाणाचं मूल्यमापन करताना हा दुसरा अडथळा! असो. प्रयत्न करण्यात फिजूल मुजोरी कशाला?

मराठी साहित्याच्या मर्यादित परीघात आपण असंख्य वर्तुळं आखून ठेवली आहेत; विविध साहित्यप्रकार (कथा, कादंबऱ्या, कविता, लघु-दीर्घ कथा, कविता, प्रवासवर्णनं, इ. इ.) हे सर्वात मोठं क्लस्टर. त्यातही आपण दलित-बहुजन-ब्राह्मणी, शहरी-ग्रामीण, पुरुष-महिला, प्राचीन-अर्वाचीन, पश्चिम महाराष्ट्रातलं-विदर्भाकडचं-वऱ्हाडी-मराठवाडी-खानदेशी, बालसाहित्य-कुमारसाहित्य-मोठ्यांचं साहित्य, गंभीर-विनोदी-शृंगारिक अशी असंख्य डबकी तयार करून ठेवली आहेत.

त्यांतला सर्वांत दुर्लक्षित वर्ग म्हणजे बाल/कुमार साहित्य. ना समीक्षकांनी याची कधी फारशी दखल घेतली, ना गंभीर वाचकांनी. 'मुलांचं साहित्य... त्यात बोलण्यासारखं काय असतं?' हा जो आविर्भाव आपण सगळ्यांनीच बाळगलेला असतो, त्यामुळे राजा मंगळवेढेकर, साने गुरुजी, ना. धों. ताम्हनकर, भा. रा. भागवत, विंदा करंदीकर, सुमती पायगांवकर, लीलावती भागवत, आत्ताचे माधुरी पुरंदरे, दिलीप प्रभावळकर (आणि इथे उल्लेख नसलेली असंख्य नावं) यांच्या लिखाणाचा विशेष गंभीरपणे अभ्यास केला गेला नाही. भारांच्या बाबतीत बोलायचं झालं, तर ज्या काळात, ज्या संख्येनं आणि ज्या दर्जाचं लिखाण त्यांनी केलं, त्याला खरं तर तोड नाही. ज्यूल व्हर्नच्या कादंबऱ्यांचं भाषांतर असो, शरलॉक होम्सचं भाषांतर असो, हॅरी पॉटरचा बाबा शोभेल असा फाफे असो किंवा पुस्तकी किडा बिपिन बुकलवार असो; त्यांचं लिखाण प्रवाही, भाषांतर नैसर्गिक आणि भाषा वाचकाच्या वयोगटाला साजेशी होती. त्यांच्या दोन मानसपुत्रांपैकी फाफे निर्विवादपणे वाचकांचा सर्वात लाडका होता. फाफे स्वतःच त्याच्या साहसकथांचा नायक होता. पण दुसरी वल्ली - बिपिन बुकलवार, पुस्तकांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला नक्कीच तेव्हढीच जवळची वाटते हेही खरंच.

तर या पढाकू मुलाची ही 'किंचितकुंडली'...

बिपिन बुकलवारबद्दल लिहिण्याआधी, मुलं काय वाचतात, याबद्दल आपल्याला थोडासा विचार करावा लागेल.

बाल ते कुमार हा वयोगट सर्वसाधारण २ ते १८ वर्षं अश्या सोळा वर्षांमधे विभागला गेला आहे. या सोळा वर्षांमधे वाचनाच्या आवडी कशा बदलतात हे मांडण्याचा प्रयत्न या चित्रातून केलेला आहे. ही मांडणी कुठल्याही अभ्यासावर केलेली नाही, तर ती निरीक्षणावर आधारित आहे. शिवाय काळानुरूप यातली काही निरीक्षणं बदलतील किंवा बदललेली असतील. २ ते ६ या वयोगटातल्या मुलांना गोष्टी 'सांगितल्या' तरच

त्यांना त्यांचं आकलन होऊ शकतं. त्या अर्थानं ते वाचक कमी आणि श्रोते जास्त असतात. पालक मुलांच्या वाचनासाठी कशी वातावरणनिर्मिती करतात (त्यांचं स्वतःचं वाचन, घरामधलं पुस्तकांचं स्थानं, पुस्तकांची खरेदी, इ.) यावर, भविष्यात हे श्रोते वाचन हा छंद म्हणून जोपासतील का, हे बऱ्याच अंशी अवलंबून असतं. ६ ते ८ वर्षं या वयोगटातल्या मुलांना जर वाचनाची आवड निर्माण झाली, तर ती छोट्या छोट्या गोष्टी स्वतः वाचू शकतात आणि ती खऱ्या अर्थानं वाचकाच्या भूमिकेत शिरतात. या वयोगटातल्या मुलांसाठी पुस्तकांची आणि विषयांची निवड बहुदा पालक मंडळीच करतात. नवव्या वर्षानंतर वाचणारी मुलं 'स्वतंत्र वाचक' या भूमिकेत अधिक ठामपणे शिरलेली असतात. आपल्याला काय वाचायचं आहे, आपल्याला काय आवडतं याच्या निवडीचा आत्मविश्वास त्यांच्यामधे निर्माण होतो.



आता या चित्राकडे जरा नीट बघितलं, तर असं लक्षात येईल की सर्वसाधारण ९ ते १८ वर्षं या सर्वात मोठ्या कालावधीच्या वयोगटामधे धाडस, पराक्रम, रहस्य, गूढ या जॉनरचं वर्चस्व आहे (हा कदाचित थोडा पुरुषी दृष्टिकोन असू शकेल!). गंमत म्हणजे इंग्रजी पुस्तकांच्या बाबतीतही सर्वसाधारणपणे हाच साहित्यप्रकार जास्त 'चालतो'. या प्रकाराचं गारूड वाचकांवर दीर्घ काळ, पिढ्यानंपिढ्या चालत आलेलं आहे. या गोष्टींचे नायक एका अर्थानं कालातीत असतात. या नकाशावर आपण आपले लेखक मांडले तर असं लक्षात येतं, की भारांनी मुख्यतः या वयोगटासाठीच आणि याच जॉनरच्या गोष्टी लिहिल्या. भारांच्या नायकांची मोहिनी मराठी वाचकांवर प्रदीर्घ काळ रेंगाळण्याचं हे एक कारण.

बिपिनच्या बालमित्रांना तो ज्या गोष्टी सांगतो, त्या याच प्रकारात मोडणाऱ्या होत्या. पण एक फरक असा की त्या ६ ते ८ वर्षं या वयोगटातील मुलांनादेखील समजण्याजोग्या होत्या.

पात्रं

बिपिन बुकलवारच्या पुस्तकांचं स्वरूप हे 'कुणीतरी सांगितलेल्या गोष्टी' (असॉर्टेड गोष्टी) असं आहे. जेव्हा एक संदर्भबिंदू तेवढा पक्का असतो आणि इतर रचना विसविशीत असते, तेव्हा ही पद्धत वापरलेली दिसते. उदा. विक्रम-वेताळाच्या गोष्टी, सत्यनारायणाच्या गोष्टी, अरेबियन नाईट्स, इत्यादी. बिपिन आणि विजू-मोना हे एवढेच काय ते भारांनी ठरवलेले संदर्भबिंदू आहेत. त्यात बिपिन हा गोष्ट सांगणारा आणि विजू-मोना हे गोष्ट ऐकणारे, अशी रचना आहे. या तिघांबद्दल ठामपणे काही सांगणं थोडंसं कठीण आहे. 'भारा' ती पार्श्वभूमी तयार करत नाहीत. बिपिन कुठून आला, कुठे राहतो, विजू -मोनाशी त्याचं नेमकं नातं काय आहे, हे त्यांनी वाचकांवर सोडलेलं आहे. विजू-मोना ही जुळी देशपांडे भावंडं बिपिनच्या शेजारी राहतात हे नक्की. बिपिन कुठेतरी कॉलेजमधे जात असावा, बहुधा पदवीच्या दुसऱ्या वर्गात वगैरे, आणि त्याला विविध विषयांमधे रस असावा. त्याचं वाचन चौफेर आणि जबरदस्त आहे हे नक्की. विजू-मोना ही मराठी माध्यमातली आणि नुकतंच इंग्रजी येऊ लागलेली पाचवी-सहावीतली मुलं असावीत असा सावध अंदाज बांधता येतो.



जेव्हा लेखक पात्राधारित पुस्तकांची मालिका तयार करतो, तेव्हा त्या पात्रांना पार्श्वभूमी असेल तर वाचक नकळत त्या रचनेत सामील होऊन जातो. पण, हे फाफेच्या बाबतीत जसं होतं, तसं बिपिनच्या बाबतीत होत नाही. अर्थात असोर्टेड गोष्टी असं त्यांचं स्वरूप असल्यानं त्यानं फारसं नुकसान होत नाही. पात्राधारित पुस्तकांची मालिका जेव्हा तयार केली जाते, तेव्हा एक तर कालनिरपेक्ष सलगता (कंटीन्यूटी) किंवा काळानुरूप पात्रांची वयं, आजूबाजूची बदललेली परिस्थिती ही पुस्तकांत क्रमाने दाखवणं आवश्यक असतं (आठवा - हॅरी पॉटर). बिपिनच्या गोष्टींमधे बहुसंख्य पुस्तकांमधे कालनिरपेक्ष सलगता (कंटीन्यूटी) असली, तरी विजू-मोनाचे संवाद क्वचित त्यांच्या वयात होणारी स्थित्यंतर दाखवतात. 'पळालेला चोर', 'म्हातारी नवरी' आणि 'पिप' या गोष्टींत विजू छोटा आहे, तर 'सिग्नलमनचा गुन्हा' या गोष्टीत विजूची जुळी बहीण मोना ही 'गार्की' या रशियन लेखकाचा संदर्भ देते; मग तिचं वय काय? (दोन्ही उदाहरणं 'पुत्र असावा ऐसा गुंडा'मधून).

प्रश्न असा आहे, की हे निरीक्षण बरोबर असेल तर त्यानं वाचकाचा रसभंग होतो का? निदान माझं उत्तर तरी 'नाही' असंच आहे. जेव्हा आपण चित्रकलेतल्या क्युबिझमप्रमाणे विविध कोनांतून या पुस्तकांची चिकित्सा करतो, तेव्हाच असं काहीसं निरीक्षण संभवतं. अभ्यासासाठी, समीक्षेसाठी वाचणाऱ्या प्रौढ वाचकाला हे प्रश्न पडण्याची शक्यता जास्त. आनंदासाठी वाचणाऱ्या लहानग्यांचा सारा रस बिपिनच्या नव्या गोष्टीत तेवढा असतो हे नक्की!

भाषा आणि शैली

माझ्या मते योग्य साहित्यप्रकाराची निवड, कथाबीज आणि ते फुलवत नेण्याची हातोटी हे भारांच्या लेखनाचं ५०% यश असेल, तर उर्वरित ५०% यशाचं श्रेय त्यांच्या भाषेला आणि शैलीला द्यायला हवं. आपण ज्या वयोगटासाठी लिहितो आहोत, तो कोणती आणि कशी भाषा बोलतो याचं पूर्ण भान भारांना असावं. गोष्ट सांगताना बिपिन अकृत्रिम बोली भाषा वापरतो. तो उगाच प्रत्येक इंग्रजी शब्दांचं भाषांतर करत बसत नाही. त्यामुळे गोष्टीचा प्रवाह कुठे थांबत नाही, उदा. वॉचमन, सर्टिफिकेट, केबिन हे शब्द बिपिनच्या गोष्टीत सर्रास आढळतात. मुलांच्या पुस्तकात काय भाषा वापरावी, याचे हल्ली बरेच अलिखित नियम असतात. ते भारांच्या काळात नसतील, पण त्यामुळे बिपिनचे डाकू सहगत्या 'बदमाष', 'हलकट' या शिव्या देतात, त्यांना रक्ताच्या उलट्या होतात, ते एकमेकांचे मुडदे पाडतात... सर्वसाधारणपणे १२-१४ वर्षाच्या मुलांकडे इतपत शब्दसंपत्ती आणि अंगभूत शहाणपणा नक्कीच आलेला असतो. भारा हे न करते, तर बिपिनच्या गोष्टींमधले डाकू मिळमिळीत, तकलादू, पुट्ठ्याचे वाटले असते. थरारकथांमध्ये सतत काहीतरी घडत राहण्याची गरज असते. मुलांसाठी अश्या कथा लिहिताना थरारक घटनांचा अतिरेक होणार नाही आणि गरजेपेक्षा तसूभरही जास्त हिंसाचार त्यात येणार नाही, याची 'भारा' पुरेपूर काळजी घेतात. या कथा वाचताना उसळणारं रक्त काबूत

ठेवण्यासाठी ते अत्यंत कौशल्यानं विनोदाचा मर्यादित वापर करतात. केवळ बिपिनच नव्हे, तर विजू-मोना हीदेखील नर्मविनोदी कोट्या करतात. 'चल रे तट्टा टुणुक टुणुक' या गोष्टीमध्ये अगदी छोटासा विजूदेखील म्हणून टाकतो, "ऐटीची छान फैटी झाली!" किंवा मौसा नावाच्या माणसाबद्दल बोलताना मोना म्हणते, "मौसा म्हणजे मनीमावशीचा नवरा?"

भारांचा विनोद

हा एक वेगळा विषय आहे. तो निरागस अतिशयोक्तीतून फुलतो. "ह्यॅ... असं कुठं होतं असतं का?" म्हणणाऱ्यांनी त्याच्या वाटेला जाऊ नये. 'अगडबंब मंडळाच्या गोष्टी'मध्ये सहा गोष्टी आहेत. प्रत्येक कथेची पार्श्वभूमी वेगळी असली, तरी एखाद-दुसरी कथा वगळल्यास साऱ्या भारताबाहेर घडणाऱ्या अतिशयोक्त गोष्टी आहेत. त्यांत जो विनोद आहे, तो कृतीतून घडणारा आहे, पण म्हणून तो हिणकस आणि अंगाशी झोंबणारा नाही. उदाहरणार्थ, 'सहा मूर्ख - महामूर्ख'मधली उडी मारून पॅन्ट घालण्याची कृती किंवा तलावातून चंद्र उपसण्याचा प्रसंग.

मराठीतले बरेच विनोदी लेखक येणाऱ्या काळात कालबाह्य होतील, कारण त्या विनोदाला प्रासंगिक, सांस्कृतिक आधार आहे. बदलत्या काळानुसार नव्या पिढीला या विनोदांमागचे संदर्भ कळणार नाहीत आणि ते लेखन केवळ इतिहास म्हणून उरेल. पण भारांच्या विनोदाची जातकुळी त्यातली नाही. एकतर तो मुलांना डोळ्यासमोर उभा करता येणारा, कृतीतून घडणारा, विनोद आहे. मर्यादित आहे, पण जास्त टिकाऊ आहे. किंवा तो भाषिक गंमती करणारा विनोद आहे. उदाहरणार्थ, 'अगडबंब मंडळाच्या गोष्टी'मधल्या पात्रांची ही नावं बघा. लंगडणाऱ्या माणसाचं नाव 'तंगडोबा दौडे', जमिनीला कान लावून ऐकणाऱ्या बुवाचं नाव 'काका कर्णे', थंडपणे हालचाली करणाऱ्या माणसाचं नाव 'बाबू बर्फे', नेमबाज माणसाचं नाव 'बंदूकराव नेमे', जोरदार फुंकर मारून झाडाची फळं पाडणाऱ्या बुवाचं नाव 'चक्रदेव फुंकरे'... किंवा त्यातला हा संवाद बघा - "आता तर राजानं बक्षीसच लावलंय म्हणे. हणगूबाई हडळीबरोबर धावून जो कुणी रेस जिंकील त्याला **मोतंभर पोहरा** बक्षीस?" "मोतंभर पोहरा नाही, पोहरा घेऊन विहीर का उपसायचीय? **पोतंभर मोहरा**!" अनुप्रास वापरून केलेली गंमत नि अक्षरांचा थारेपालट करून आणलेली धमाल हा त्यांचा लाडका विनोदप्रकार.

कथांचं स्वरूप आणि जागतिक स्थित्यंतरं

बिपिनच्या बऱ्याचशा गोष्टी भाषांतरित वाटाव्यात, इतपत वेगळ्या पार्श्वभूमीवरच्या आहेत. तो समुद्री चाच्यांच्या, क्रूर डाकूंच्या गोष्टी सांगतो. त्याच्या काही गोष्टी चिनी दंतकथा असतात, तर काही गोष्टींना इतिहासाची पार्श्वभूमी असते. अनेक गोष्टींमधे भौगोलिक संदर्भ असतात, चपखलपणे दडवलेले नीतिमत्तेचे पाठ असतात, संवाद आणि वर्णन यांचा योग्य समतोल असतो. पण- पण या गोष्टी एक-दोन दशकं जुन्या वाटतात. मराठीत फक्त लेखनावर जगणारे लोक कमी होते/आहेत. त्यांच्या अनुभवाचं संचित हे सुगीच्या काळात जीवनावश्यक गोष्टींची तरतूद करुन ठेवणाऱ्या मुंगीसारखं असतं. उद्याची पर्वा न करता आलेला दिवस, अनुभव बेडरपणे पचवण्याची नाकतोड्याची जिगर मुंग्यांमधे नसते.

भारांसकट खूपसे मराठी लेखक त्यांच्या सुवर्णकाळाचं आणि त्याच्याशी निगडित असलेल्या 'इको-सिस्टिम्स'चं (भाषा, नीती-अनीतीच्या कल्पना, भौगोलिक संदर्भ इत्यादी) प्रतिनिधित्व करत असतात, हे गृहीतक मानलं, तर बिपिनच्या गोष्टींमधले संदर्भ जुने का असतात याचा उलगडा होतो. याउलट पूर्ण वेळ कलावंतांकडे समाजात

होणारे बदल निवांतपणे टिपण्याची मोकळीक असते (क्षमता आणि इच्छा असेलच असे नाही). अशा कलावंतांच्या कलाकृती काळाशी सुसंगत राहण्याची शक्यता जास्त असते, उदाहरणच द्यायचं झालं तर पाब्लो पिकासोचं देता येईल. भारा १९१० मध्ये जन्मले आणि आणि त्यांनी त्यांच्या नव्हाळीच्या काळानंतर, म्हणजे त्यांच्या सत्तरीत, बिपिनच्या गोष्टी लिहिल्या. हा पूर्ण काळ ते लेखक नव्हते. हे त्रैराशिक सोडवलं, तर असं दिसतं की भारांनी सर्वसाधारणपणे १९२५ ते १९५५ या काळात मराठी मध्यमवर्गीय समाजाशी सुसंगत असलेल्या गोष्टी बिपिनच्या माध्यमातून सांगितल्या असाव्यात. अर्थात असा सावध अंदाज.

पण ते असो. ८०च्या दशकात जागतिक बाल-कुमार वाङ्मयात तरी नक्की काय घडत होतं?

१९७९-८० च्या आसपास भारांनी जेव्हा या कथा लिहिल्या, तेव्हा इंग्रजीमधल्या बालवाङमयाचा चेहरा बऱ्याच अंशी बदलेला होता. ९ ते १२ वर्षं या वयोगटातल्या मुलांच्या साहसकथा जास्त वास्तववादी झाल्या होत्या, रहस्यकथा सौम्य झालेल्या होत्या; कल्पनाशक्तीचा आविष्कार वेगळ्या पातळीवर जाऊन प्राणी, झाडं यांचा मुलांशी संवाद झालेला दिसत होता; भाषेच्या बाबतीत सजगता आली होती. 'डॉक्टर दे सोतो', 'फ्रॅन्क्लीन इन द डार्क', 'दी आयर्न मॅन', 'इंडिअन इन दी कबर्ड' ही त्या काळाच्या सुमारास आलेली पुस्तकं या बदलाची साक्ष देतात.

दरम्यानच्या काळात, १२ ते १८ वर्षं या वयोगटासाठी जागतिक साहित्यात एक नवीन क्लस्टर तयार झालं होतं. पौगंडावस्थेतल्या मुलांच्या या वेगळ्या साहित्यविश्वाला आता 'यंग-अडल्ट' किंवा 'कुमारसाहित्य' असं म्हटलं जातं. १९७०-८० चं दशक हे 'यंग-अडल्ट' साहित्याचा सुवर्णकाळ आहे असं मानलं जातं. 'ॲनी ऑन माय माईंड' (समलैंगिक संबंधावर आधारित), 'सीक्स मन्थ्स टू लीव्ह' (कॅन्सरशी लढा), 'एव्हरीवन्स पॅरेन्ट्स सेड येस', 'धिस प्लेस हॅज नो ॲटमॉस्फीअर' (२०५७ मध्ये घडणारी गोष्ट), 'दी वुमन हु राईड्स लाईक अ मॅन' ही यंग-अडल्ट' साहित्यामधली काही दादा पुस्तकं. त्यांच्या नावांवरूनदेखील विषयांमधली गुंतागुंत लक्षात यावी! आणि हे कधी? जेव्हा बिपिन 'दर्यावर्दी डाकू'सारख्या चाच्यांच्या गोष्टी सांगत होता, तेव्हा. तेव्हा इंग्रजी 'यंग-अडल्ट' वाङमयात स्वतःची ओळख, मानसिक तणाव, कौटुंबिक उलथापालथी, मुलांमधली दादागिरी (बुलीईंग) हे विषय हाताळले जात होते.

विजू-मोना ही मुलं ११-१२ वर्षांची असली तरी ती 'यंग-अडल्ट फिक्शन'च्या या बदललेल्या सुरापासून प्रचंड दूर दिसतात. मर्यादित भवतालामुळे (एक्सपोजर) असेल, वैयक्तिक आवडीनिवडींमुळे असेल किंवा सांस्कृतिक मर्यादांमुळे असेल; पण भारांचा हा मानसपुत्र मध्यमवर्गीय मराठी घराला पेलतील अशाच गोष्टी सांगत राहिलेला दिसतो.

८०च्या दशकाच्या उत्तरार्धात शहरांमधून (आणि त्यानंतर वेगानं निमशहरांतून आणि गावांतूनही) इंग्रजी माध्यमाच्या शाळा चांगल्याच रुजायला लागल्या होत्या. या माध्यमातून शिकणाऱ्या वाचकांना 'चॅप्टर बुक्स'चे (७-९ वर्षांच्या मुलांना चित्ररूप गोष्टी बालीश वाटतात. पण औपचारिक भाषेतल्या गोष्टी बोजड वाटतात. म्हणून त्यांच्यासाठी बोली भाषेतच 'चॅप्टर्स' (प्रकरणं) पाडून पुस्तकं लिहिली जातात. त्यांना 'चॅप्टर बुक्स' म्हणतात), 'यंग-अडल्ट फिक्शन'चे जागतिक संदर्भ उपलब्ध होते. म्हणून मग बिपिनच्या गोष्टींमधे याचं प्रतिबिंब पडायला हवं होतं का? त्यानं बिपिनचे संदर्भ कालानुरूप राहिले असते का? की आज आपण अल्लादीनची, तेनालीरामाची एका काळात गोठून राहिलेली गोष्टही चवीने ऐकतो, तशी बिपिनची अजिबात संदर्भ न बदललेली गोष्ट उद्याही ऐकू?

कालौघात टिकलेल्या गोष्टी जश्याच्या तश्या राहिल्या, तर त्यांना हळूहळू अभिजात वाङ्मयाचं (क्लासिक्सचं) रूप यायला लागतं आणि त्या स्मरणरंजनाच्या आधारानं तगून राहातात. उदा. अकबर-बिरबल किंवा इसापच्या गोष्टी. त्याच गोष्टींना कालौघात नवे अर्थ प्राप्त झाले, तर त्या करमणुकीच्याही पल्याड जातात. त्यांची मिथकांकडे वाटचाल सुरू होते.

बिपिनच्या गोष्टी या प्रकारात मोडणाऱ्या नव्हेत. मराठी पुस्तकं वाचणारी पिढी आहे, तोवरच बिपिनच्या गोष्टी वाचल्या जातील. अभिजात वाङ्मयात मोडण्यासाठी त्यांना कालच्या-आजच्या १-२ पिढ्यांची पुण्याई पुरेशी नाही, हे दुर्दैवी सत्य आहे. बिपिनच्या गोष्टींमधून बदलत्या साहित्यिक प्रवाहाचं प्रतिबिंब पडतं, तरीही कदाचित कुमार साहित्याची अधिक गंभीरपणे दखल घेतली गेली असती. येणाऱ्या लेखकांनी करमणुकीपल्याडच्या किंवा निदान वास्तवाजवळच्या गोष्टी लिहिल्या असत्या, तर कदाचित मुलांचे प्रश्न, त्यांची मानसिक जडणघडण, तंत्रज्ञानाचे त्यांच्या जीवनावर होणारे परिणाम, आकुंचित झालेली कुटुंबव्यवस्था हे विषय गोष्टींमधे आलेही असते.

या कदाचिताला अंत नाही. पण दुर्दैवाने आजही मराठीत हा साचा कणखरपणे कुणी मोडलेला दिसत नाही.

आज आणि उद्या

'बिपिन बुकलवार आज असता तर...' हा कल्पनाविस्तारासाठी छानच विषय आहे. जगाची अफलातून उलटापालट झाली आहे. लहान मुलांसाठी लिहिलेल्या 'हॅरी पॉटर' आणि 'गेम ऑफ थ्रोन्स'सारख्या गोष्टी मोठी माणसं आवडीनं वाचताहेत. 'काईट रनर'सारख्या मोठ्यांच्या वाङ्मयात लहान मुलांचं विश्व चितारलं जातं आहे. रुबिक क्यूब विस्कट्वून सुंदर असं नक्षीकाम करावं तसं गोष्टींचे विषय, वाचकांचं वय, गोष्टींचे सरळसोट अर्थ आणि शब्दांच्या त्वचेखाली लपलेले अर्थ, यांची सरमिसळ होऊन नवी परिमाणं लाभलेल्या देशोदेशीच्या गोष्टींचा खजिना आज बिपिनला केवळ एका क्लिकच्या अंतरावर उपलब्ध आहे.

आज बिपिन असता तर?

(पण विजू-मोनाला बिपिन हवासा तरी असता का? त्यांना 'ऑडिओ-बुक'मुळे एक यांत्रिक बिपिन बुकलवार भेटता. कानात बोंडूक घालून अल्लादीनच्या दिव्यासारखं किंडलचं बटन घासलं की बिपिन नावाचा यक्ष हजर!) बिपिन आज असता, तर मोना-विजूंच्या 'मॅड्च्याप' वेळापत्रकापुढे तो कदाचित हताश झाला असता. कदाचित इंटरनेटमुळे उपलब्ध असलेल्या स्वस्त करमणुकीपुढे त्याचा निभावही लागला नसता. किंवा गोष्टींमधली हरवत जाणारी निरागसता बघून तो अवाकही झाला असता.

किंवा नाहीही...

कदाचित संगणकावर हजारो भाषांमधल्या गोष्टींचा खजिना उपलब्ध असलेला बघून त्याला हर्षवायूही झाला असता. दुर्मीळ पुस्तकांसाठी रद्दीवाल्याचं दुकान पालथं घाणाऱ्या बिपिननं एखाद्या चोरट्या साईटवरून पायरेटेड पुस्तक उतरवून घेतलं असतं का? कदाचित. शेवटी पुस्तकांचा मोह फार वाईट! पण भारांची मुलं 'अच्छे बच्चे' होती. मला नाही वाटत, त्यानं तसं काही केलं असतं. तो नक्कीच 'प्रोजेक्ट गुटनबर्ग'सारख्या प्रकल्पात सामील झाला असता आणि त्यानं दुर्मीळ पुस्तकांचं डिजीटलायजेशन करवून घेतलं असतं.

त्यानं विजू-मोनाला या सगळ्या गोष्टी नक्की सांगितल्या असत्या.

या साऱ्या शक्यता आजचं वास्तव आहेत. मुलांना बिपिन बनून गोष्टी सांगणं ही त्यांना बुक-लव्हर बनवण्याची पहिली पायरी आहे. अशी काही पढाकू मुलं उद्या लिहिती झाली तरच भारांच्या बिपिनचं गोष्ट सांगणं सुफळसंपूर्ण होईल.

***

संदर्भ:

भारांची पुस्तके -
मुंबईला चक्कर, अक्काचे अजब इच्छासत्र, साखर सोंड्या, थँक्यू मिस्टर शार्क, जुनाट भावलीची भन्नाट कथा, दुर्मिळ तिकिटाची साहसयात्रा, दर्याई डाकू, शार्की सिंकदरचा बिलंदर कुत्रा, कॅप्टन किडचा खजिना, पुत्र असावा ऐसा गुंडा, दर्याई डाकूच्या गोष्टी, अगडबंब मंडळाच्या गोष्टी, ढोरगावचा चोर, डाकू बनला डिटेक्टिव्ह.

आंतरजालीय संकेतस्थळे -
https://www.ideals.illinois.edu/handle/2142/7052
http://en.wikipedia.org/wiki/List_of_children's_literature_writers
https://www.goodreads.com/genres/childrens?original_shelf=children-s
http://www.goodreads.com/list/show/24589.Favorite_Children_YA_books_from...
http://childrensbooksguide.com/top-100
http://www.whatdowedoallday.com/2012/11/classic-childrens-books-1980.html

***

चित्रे: जालावरून साभार

***

***

द यीरलिंग: दोन अनुवाद, एक तुलना

- हेमंत कर्णिक

कुणीतरी म्हटलं आहे, कवितेची सार्थ समीक्षा म्हणजे दुसरी कविताच होय. ललितकृतीच्या भाषांतराच्या बाबतीत - विशेषतः ते भाषांतर देश, काल, संस्कृती ओलांडून जाणारं असेल तेव्हा - त्याच चालीवर म्हणता येईल. की भाषांतराची गणना कौशल्यात न करता कलेत व्हायला हवी. ललितकृतीच्या भाषांतरात दोन टोकाच्या भूमिका घेता येतात. एक म्हणजे, मूळ कलाकृतीतला भाव अधिक महत्त्वाचा असल्याकारणाने, तो भाव नेमका पकडण्याकरिता इथले सांस्कृतिक संदर्भ आणि भाषिक वाक्प्रचार यांचा सढळ वापर करणे. उलट बाजूने असंही म्हणता येतं की मूळ कलाकृती ज्या सांस्कृतिक चौकटीत घडली, त्या चौकटीच्या जाणिवेविना कलाकृतीचा आस्वाद शक्य नाही आणि म्हणून तिथले सांस्कृतिक संकेत आणि भाषिक वळणं तशीच राखण्याचा प्रयत्न करणे.

महाराष्ट्राला लांबलचक समुद्रकिनारा असूनही प्रमाण मराठीत समुद्रावरची भाषा नाही. इंग्रजीत ज्याप्रमाणे fathom, sight, navigate, anchor, aboard, above या संज्ञा सर्वसाधारण भाषेत प्रचलित आहेत, तशा मराठीत नाहीत. आधुनिक मराठीच्या बाबतीत शेती आणि ग्रामीण जीवनाला, 'गावकुसाबाहेरच्या', भटक्यांच्या जीवनालासुद्धा प्रमाणभाषेत कमी स्थान आहे. या कारणामुळे प्रमाण भाषेला अपरिचित असणाऱ्या जीवनाविषयीच्या साहित्याचा अंतर्भाव वेगवेगळ्या कप्प्यांमध्ये केला जातो. जसं ग्रामीण साहित्य, दलित साहित्य वगैरे. हे असले कप्पे त्या साहित्याविषयी काही सांगत नाहीत; मराठी प्रमाणभाषा तोकडी, कुपोषित आहे, असं मात्र नक्की सांगतात. मार्जोरी किनन रॉलिंग्ज यांच्या 'द यीरलिंग' या कादंबरीत निसर्गवर्णन आहे, कृषिव्यवहारांचं वर्णन आहे आणि कादंबरीतले संवाद अमेरिकेत त्या काळी, त्या जागी बोलल्या जाणाऱ्या भाषेत आहेत. ती भाषा रांगडी, खऱ्या अर्थाने 'ग्राम्य' आहे. मराठीत भाषांतर करताना जर कृषिजीवनातील नेमके प्रतिशब्द शोधून वापरले, तर शहरी वाचकाला अडखळायला होईल. त्याच्या आस्वादात बाधा येईल आणि थोडीबहुत तडजोड करून शहरी जीवनाला जवळचे असे शब्द वापरले, तर वाचताना अडणार नाही, पण आशय मार खाण्याची शक्यता वाढेल.



कुठल्याही भाषेची एखादी बोली तिच्या प्रमाण रूपापेक्षा कसकशी वेगळी असते, यातून केवळ तिचं सौंदर्यच दिसतं असं नाही तर तिची आशयक्षमतासुद्धा व्यक्त होत असते. भाषांतरात हे आणणं दुरापास्त. मात्र, इथल्या एखाद्या समांतर सांस्कृतिक, भौगोलिक प्रदेशाची बोलीभाषा वापरून ही त्रुटी काही अंशी भरून काढणं शक्य आहे. परंतु, ज्या कारणामुळे मराठीची प्रमाणभाषा कुपोषित राहिली आहे, त्याच कारणामुळे या बाबतीतही ती मार खाते! ग्रामीण जगण्याचा आतून परिचय असणाऱ्यांनी इंग्रजी (वा अन्य भाषेतील) तसल्या कलाकृतींची भाषांतरं केलेली दिसत नाहीत. गो. नी. दांडेकरांना महाराष्ट्रातल्या कोकणापासून विदर्भापर्यंत अनेक बोलीभाषा अवगत होत्या आणि त्यांच्या या सामर्थ्याचं दर्शन त्यांच्या 'प्रादेशिक', तसंच 'इतिहासकालीन' कादंबऱ्यांमधून होतं. पण त्यांचा इंग्रजी वाचनाशी कमी संबंध होता आणि त्यांनी भाषांतरं केली नाहीत. अजूनही स्थिती फारशी बदललेली नसावी. जेव्हा बदलेल, तेव्हा भाषांतराच्या वाटेने मराठीला भरीव समृद्धी प्राप्त होईल. भा. रा, भागवतांनी 'द यीरलिंग'चं भाषांतर 'हरिण बालक' या नावाने केलं आहे. राम पटवर्धनांनी केलेल्या दुसऱ्या भाषांतराचं नाव आहे 'पाडस'. भागवत आणि पटवर्धन यांची भाषांतरं अर्थातच वरील चर्चेतील त्रुटींपासून मुक्त नाहीत, हे उघड आहे; पण मूळ कादंबरीचा निसर्गवर्णनापलीकडे जाणारा आशय या दोघांनी कसा पकडला आहे, हे बघणं शक्य आहे.



माझ्या माहितीनुसार भा. रा. भागवतांनी जी जी भाषांतरं केली, त्या सगळ्यांना संक्षिप्त रूपही दिलं आहे. म्हणजे, मूळ कृतीतला कोणता भाग घ्यायचा आणि कोणता गाळायचा, हा निर्णय त्यांनी वेळोवेळी घेतला आहे. तुलना करताना भागवतांनी घेतलेल्या भागाचाच विचार करावा लागेल; त्याचबरोबर भागवतांनी काय गाळलं, याच्याकडेही पाहावं लागेल. आपण दोन्ही करू.

मार्जोरी किनन रॉलिंग्ज यांची ही कादंबरी ज्योडी नावाच्या एका मुलाबद्दल आहे. या एप्रिलपासून पुढच्या एप्रिलपर्यंतचा वर्षभराचा काळ तिने व्यापला आहे. एका वर्षात ज्योडी बालपण कसं ओलांडतो, याचं निसर्गाच्या पार्श्वभूमीवरचं, एका हरणाच्या पिल्लाच्या माध्यमातून रंगवलेलं चित्र त्यात आहे. जे घडतं, ते निसर्गचक्रानुसार घडतं. जे तपशील येतात, ते शेती, जंगल आणि ज्योडी बॅक्स्टर आणि त्याचे आईवडील राहत

असतात, त्या भागाचा भूगोल यांच्याशी संबंधित आहेत. थोडा संदर्भ काही मैलांवर राहणाऱ्या फॉरेस्टर कुटुंबाचा आणि क्वचित इतर माणसांचा येतो. कादंबरी बारीक बारीक तपशील तरलपणे टिपत संथगतीने सरकते आणि आपोआपच तिला 'एपिक'चं - भव्य, उदात्त गाथेचं - स्वरूप प्राप्त होतं.

भागवत जेव्हा याला संक्षिप्त रूप देतात, तेव्हा ते त्या जीवनाचं सार पकडू जातात. एक पुरुष आणि एक स्त्री मिळून फारशा प्रेमळ नसलेल्या निसर्गाशी झगडत, जुळवून घेत आयुष्य रेटत असताना त्यांना उशिरा झालेल्या आणि त्यामुळे वयाने अगदी कोवळ्या असलेल्या मुलाचं काय होतं, याचं यथार्थ चित्रण ते करू बघतात. पण लांबी कमी करताना आपोआपच त्यातला एपिकचा भाव लोपतो. कहाणी ज्योडी आणि त्याने पाळलेल्या फ्लॅग, या हरणाच्या पिल्लाची राहते. कहाणी संवेदनशीलता गमावत नाही; पण त्या तरल अनुभवाचं कोंदण विशाल राहत नाही.

उदाहरणार्थ, 'यीरलिंग'मधल्या पहिल्या प्रकरणात ज्योडीची आई घरात भरपूर काम करते; ज्योडीलासुद्धा घरात, शेतात भरपूर काम असतं, पण त्याला जंगलात हुंदडण्याची ओढ जास्त असते, ज्योडीच्या बापाला तर असल्या कामांबरोबर दूर बाजारातही जावं लागतं, असा सगळा पट येतो. ज्योडीला भुलवणाऱ्या निसर्गशोभेचं वर्णन येतं. एप्रिल महिन्यातल्या वसंतागमनाचं कौतुक येतं आणि या तीन माणसांबरोबर घोडा, कुत्रे, गाय, अशा जनावरांची ओळखही होते. शिवाय ज्योडीला जंगलात रकून, खारी, हरीण अशा प्राण्यांचे पाऊलठसे दिसतात आणि प्राण्यांचा वावर तिथे नित्याचा आहे, हे वाचकाला समजतं. पुन्हा हे वर्णन त्रयस्थपणे येत नाही; वयस्क आईवडील सोडता अन्य सोबत, संगत नसलेल्या आणि एकटेपणावर निसर्गातच उत्तर शोधणाऱ्या ज्योडीच्या नजरेतून येतं. मिनिटं आणि तास नव्हे, तर ऋतूंना अनुसरणाऱ्या कालगणनेप्रमाणे निवेदन संथपणे पुढे सरकतं आणि हा नैसर्गिक सुशांत निवांतपणा वाचकाच्या जाणिवेत रुजावा म्हणून चांगले साडेचार हजारांपेक्षा जास्त शब्द पहिल्या प्रकरणातच खर्ची होतात. पटवर्धनांचं 'पाडस' यासाठी असेच साडेचार हजार शब्द घेतं. आणि भागवत हा पसारा पंचवीसशे शब्दांमध्ये आटपतात. परिणामी आपल्याला ज्योडीचं कुटुंब, घर आणि परिसर या सगळ्याची ओळख जरी होत असली, तरी काळ आणि अवकाश यांचा भव्य पट लाभत नाही.

इंग्रजी आणि मराठी चलनात एक मोठा फरक म्हणजे इंग्रजीत आदरार्थी अनेकवचन नाही. मग ज्योडी किंवा ज्योडीची आई ओरी, हे ज्योडीच्या बापाला मराठी भाषांतरात अरे-तुरे करतील, की अहो-जाहो? पटवर्धन 'अरे-तुरे'च्या बाजूने आहेत; तर भागवतांच्या काळातल्या सर्वसाधारण मराठी वाचकाला 'नॉर्मल' वाटावं म्हणून भागवतांनी 'अहो-जाहो'चा निर्णय घेतला असावा. यात पटवर्धनांची बाजू थोडी जड होते, याचं एक कारण बॅक्स्टर कुटुंबीयांचा रांगडेपणा. त्यांची राहणी आणि भाषा शिष्टाचार पाळणारी नाही.

आणखी एक गोष्ट म्हणजे ज्योडीच्या बापाला 'पेनी' असं संबोधलं जातं कारण तो लहानखुरा, हडकुळा आहे. त्याला अरे-तुरे करणं जास्त नैसर्गिक ठरतं. पार जंगलातल्या मोकळ्या जागेवर घर आणि शिवार घडवून, तिथे जगण्यासाठी अपार कष्ट करणाऱ्या कुटुंबातल्या मुलाची गोष्ट सांगताना नागर मराठी मध्यमवर्गीय संवेदनेशी जवळीक राखणं बरोबर वाटत नाही. ज्योडी - पेनी किंवा पेनी - ओरी यांच्या नात्यात आदर जाणवला तरी अंतर जाणवत नाही; जे नागर मराठी मध्यमवर्गीय मुलगा आणि त्याचे वडील यांच्या नात्यात असतं.

भागवतांनी मराठी वाचकाचा विचार करून भाषेचा बाज सांभाळला आहे, हे प्रतिपादन टिकणारं नाही. त्यांची भाषा अनेकदा कृत्रिम होते. कष्टकरी जीवन जगणाऱ्याच्या वा सर्वसाधारण मराठी वाचकाच्या तोंडी येणार नाही, असे शब्दप्रयोग ते करतात. उदाहरणार्थ, 'Howdy, Mr Forrester. Proud to see you.' याचं भाषांतर ते "काय मि. फॉरेस्टर! कसं काय? तुमची भेट झाल्यामुळे धन्य वाटलं." असं करतात. पटवर्धन "कसं काय मिस्टर फॉरेस्टर! तुम्हांला बघून फार आनंद वाटला." असं करतात. अमेरिकेतल्या काही भागात glad to see you न म्हणता proud to see you म्हणण्याची रीत आहे / होती, हे भागवतांना माहीत नसेल, असं कसं असेल? स्टाइनबेकच्या 'Grapes of Wrath' मध्ये हा proud प्रकार सर्रास सापडतो. पुढे फॉरेस्टर म्हातारा "माझ्या मुलांपुढे उपजीविकेचे दुसरे मार्ग ..." असं म्हणतो. नंतर रागावलेला ज्योडी बापाला "तुम्ही मला दिलेला शब्द मोडलात ... मला तुमचा तिरस्कार वाटतो. मला आशा आहे की तुम्ही एकदाचे मराल! मला तुमचं दर्शनसुद्धा नको!" असे शब्द वापरतो. ही कोणाच्याही तोंडची बोलीभाषा नाही. हे निर्विकारपणे केलेलं भाषांतर आहे. भागवतांसारख्या गोष्टीत सहज रंग भरणाऱ्या निवेदकाकडून असं का व्हावं समजत नाही. संभाषणात अशा त्रुटी असल्यावर निवेदनात त्या असणारच. Penny Baxter lay awake beside the vast sleeping bulk of his wife. याचं भाषांतर पटवर्धन संवेदनशीलतेने 'गाढ झोपलेल्या आपल्या आडमाप बायकोच्या शेजारी पेनी बॅक्स्टर पडला होता,' असं करतात. बॅक्स्टर कुटुंबीयांच्या, एकूण कादंबरीतल्या निवेदनाच्या भाषिक सुराशी प्रामाणिक न राहता, 'आपल्या निद्रिस्त पत्नीच्या प्रशस्त देहाजवळ पेनी बॅक्स्टर जागाच होता' असं भागवत म्हणतात. 'गाढ झोपलेल्या' आणि 'आडमाप' या शब्दांच्या समोर 'निद्रिस्त' आणि 'प्रशस्त देहाच्या' या रचना यांत्रिक वाटतात.

भागवत आणि पटवर्धन यांच्यात एका पिढीचं अंतर आहे का? की भागवतांच्या काळी मराठीला अनौपचारिकतेचा नसलेला स्पर्श पटवर्धनांच्या वेळी झाला होता? पण असं म्हणून भागवतांच्या भाषेतील पुस्तकी, छापील शब्दकळेचा खुलासा होत नाही. 'ज्योडीला वाटले, काय आश्चर्याची, अविश्वसनीय गोष्ट ही!' हे कसं खपवून घ्यायचं? यात मूळ रचनेचा अर्थ अवश्य आला असेल; आशयापासून मात्र हे भाषांतर लांब आहे.

पाचशेपेक्षा जास्त पानांच्या पुस्तकातल्या फक्त पहिल्या परिच्छेदामध्ये आलेल्या काही संज्ञांचं मराठीकरण पटवर्धन आणि भागवत यांनी कसं केलं आहे, हे पाहूया.

	पटवर्धन	**भागवत**
floor	पायाखालची लाकडी तक्तपोशी	जमीन
corn shucks shrub	तुसांनी	मक्याच्या बोथ्यांचा ब्रश
Glen	घळ	दरड
hoe	कुदळ	टिकाव
clearing	वाडी	पटांगण

यावरून लक्षात येतं की पटवर्धनांनी सरलता साधण्यासाठी स्वातंत्र्य घेतलं आहे; याउलट भागवत प्रतिशब्द वापरत आहेत. यातील विरोध असा की शब्दाला शब्द वापरणारे भागवत मूळ सांस्कृतिक आशय पकडत नाहीत!

एकूण, लहान मुलांसाठी रसाळ भाषांतर करणारे आणि भाषांतर करताना भरपूर स्वातंत्र्य घेणारे भा. रा. भागवत या अभिजात कादंबरीच्या बाबतीत अवघडलेले आहेत. ते ना धड मोकळी, सहज, स्थळ-काळाला अनुरूप शब्दयोजना करतात, ना मूळ इंग्रजी वाक्प्रचार जसेच्या तसे मराठीत आणू पाहतात. यात आणखी वाईट गोष्ट म्हणजे, 'पाडस' हे संवेदनशील, अस्सल मराठी संज्ञांनी समृद्ध असं दुसरं भाषांतर उपलब्ध असल्यामुळे भागवतांच्या त्रुटी डोळ्यात चटकन भरतात.

***

संपादकीय टिपण:

१. 'पाडस'चे मुखपृष्ठचित्रः ऋषिकेश यांच्याकडून. लेखातील इतर चित्रे जालावरून घेतली आहेत.
२. प्रमाणलेखनाच्या नियमानुसार 'हरीण बालक' हा शब्द बरोबर आहे. पण पुस्तकाच्या नावात 'हरिण बालक' असल्यामुळे ते कायम राखले आहे.

***

भारा - 'व्हर्नीश' वाचकांचे लाडके अनुवादक

- ऋषिकेश

ही आठवण आहे तेव्हाची, जेव्हा पनवेल हे मुंबईहून नुसते वेगळेच नाही, तर दूरवर प्रवास करून पोचायचे एक हिरवेकंच गाव होते. तिथल्या मामाकडे आम्ही दर वर्षी, उन्हाळ्याच्या नि गणपतीच्या सुट्टीत, असे दोनदा जात असू. गणपतीच्या निमित्ताने जमल्यावर चालू असलेला दंगा, आरास, उन्हाळ्यात गच्चीतल्या खोलीत रचलेली आंब्याची अढी आणि तिन्ही त्रिकाळ आमची चालणारी आंबाखादाडी, इत्यादी अनेक गोष्टींमध्ये दंग असलेली आम्ही जवळपास सारख्याच वयाची भाचरे आमचा मामा एकट्याने अक्षरशः हाकीत असे.

या सगळ्याबरोबर पनवेल नि मामाचे घर म्हटले की डोळ्यासमोर हमखास येणारी गोष्ट म्हणजे त्याचे पुस्तकांचे कपाट. तसे अस्मादिक मामाच्या इतर भाचरांच्या मानाने अधिक नशीबवान होते. आमच्या घरी 'ठकठक', 'चंपक' यांचा नियमित, तर प्रसंगी 'टॉनिक' आणि दिवाळीत 'अबब हत्ती' यांचा रतीब बाबांतर्फे चालू असायचा. त्याचबरोबर 'मुंमग्रंसं'ची शाखा घराजवळ उपलब्ध झाल्याने, तेथील बालविभागातून आठवड्याला एक पुस्तक आणायची ऐष मी नुकतीच करू लागलो होतो. तरीही मामाकडे असलेल्या पुस्तकांचा खजिना, त्याचे वैविध्य आणि त्यातही तीन-चार खण फक्त लहान मुलांच्या (म्हणजे अभ्यासाच्या नसलेल्या) पुस्तकांनी भरलेले बघायला मिळणं, असं त्यानंतर आजतागायत कोणत्याही घरात दिसलेलं नाही. दर सुट्टीआधी, खास मुलांसाठी म्हणून प्रयत्नपूर्वक काहीतरी शोधून त्या कपाटात भर घालणाऱ्या मामाने आम्हांला न मागता बरेच काही दिले. त्याच कपाटात आम्हांला 'देनीसच्या गोष्टी' सांगणारा द्रागून्स्की भेटला, 'साखरेचं बाळ', 'चांदोबा', 'काळा पहाड' आणि 'खजिन्यांच्या कथा' इत्यादींपासून 'पाश्चात्त्य लोक भारतातील लोकांची कल्पना कशी करत असत?', 'जगाचे वेगवेगळे नकाशे कसे घडत गेले?' याची इत्थंभूत माहिती देणारे एक पुस्तक ('लोकांनी पृथ्वीचा आकार कसा शोधला?', अनु. - अनिल हवालदार), ब्रिजवासीची स्वच्छ छपाई व देवनागरीतले ॲटलास (नुसते हाताळायलाच नाही तर त्या निमित्ताने विविध शहरे शोधून त्यावर बोलायला मामा हजर), अजून थोड्या मोठ्या वयात तर 'चीपर बाय द डझन', 'तोत्तोचान', 'गोट्या' वगैरे पुस्तके तिथेच मिळाली.

अशाच एका उन्हाळ्यात मामाकडे एक संच आला होता. त्यातील पुस्तकांवर एका नव्या लेखकाचे (म्हणजे माझ्यासाठी नवे) नाव होते 'भा. रा. भागवत'. आम्ही त्या पुस्तकांवरील चित्रे अधाश्यासारखी पाहू लागल्याचे नेमके आठवते आहे. पुस्तकांची नावेच उत्कंठा वाढवणारी होती. 'कंपनी चालली सूर्याकडे', 'गिरिशिखराचे गुपित', 'चंद्रावर स्वारी', 'साता समुद्राचा सुलतान', 'पाताळलोकाची अद्भुत यात्रा', 'ध्रुवाने लावले वेड' इत्यादी पुस्तके आणि त्यावरील चित्रे हा लेख लिहिताना इतक्या वर्षांनंतरही डोळ्यांसमोर येताहेत. आम्हांला ती पुस्तके मनसोक्त हाताळू दिल्यानंतर आम्ही आपापसात ती पुस्तके वाटू लागलो असता, मामाने पहिला प्रश्न केला,

"कशी वाटताहेत?"

"सॉल्लिड!" आमच्यातलं कुणीतरी पुस्तकांवरची भिरभिरणारी नजर न हटवता म्हणाले.

"लेखक बघितलात?"

"हो!", एका सुरात आम्ही सगळे म्हणालो, "भा. रा. भागवत!"

"पूर्णतः बरोबर नाही!"

"अं! पुस्तकावर तर भा. रा. भागवत असंच लिहिलंय."

"बरोबर, पण या पुस्तकांचे ते अनुवादक आहेत."

"म्हणजे? देनीसच्या गोष्टींसारखे?" आमच्यापैकी बहुतेकांसाठी तोवर हाती आलेले एकमेव अनुवादित पुस्तक 'देनीसच्या गोष्टी' होते. त्याच्या मूळ लेखकाचे नावही एका दमात सांगता येणे आमच्यासाठी अप्रुपाचा (नि अभिमानाचा) विषय होता.

"बरोबर! या पुस्तकाच्या लेखकाचे नाव आहे 'ज्यूल व्हर्न' आणि भागवतांनी त्याचा मराठीमध्ये अनुवाद केलाय. 'ज्यूल व्हर्न' हा लेखक तुम्हाला ऐकून तरी माहितीये का?"

आम्हांला अर्थातच माहीत नव्हते.

ज्यूल व्हर्न

"ही जी पुस्तके आहेत ना, त्यांना 'विज्ञानकादंबरी' म्हटले जाते. तुमच्यासाठी जरा नवीन काहीतरी म्हणून हा संच आणलाय. 'विज्ञानकादंबऱ्यांचे जनक' म्हणून ज्या तीन लेखकांकडे बोट दाखवले जाते, त्यांपैकी एक म्हणजे 'ज्यूल व्हर्न'. या लेखकाची गंमत अशी की त्याने जवळ जवळ शंभर-एक वर्षांपूर्वी ज्या गोष्टी लिहून ठेवल्या होत्या त्यातल्या बऱ्याच आज खऱ्या होताना दिसताहेत."

"म्हणजे तो ज्योतिषी होता?"

"नाही रे, ज्योतिषी नव्हता; पण विज्ञानाची उत्तम जाण असलेला लेखक होता. त्याने सांगितलेल्या गोष्टी या केवळ कल्पनेतले तीर नव्हते, तर फार विचार करून केलेले काही तर्कशुद्ध आराखडे होते. त्या कथांमध्ये सांगितलेल्या अनेक कल्पना केवळ प्रत्यक्षात आल्या असेच नाही; तर त्या घटना घडण्यामागचा तर्क, त्यांची कल्पिलेली रचना, कारणांमागची मीमांसादेखील प्रत्यक्षात जवळपास त्या कथांप्रमाणे आहे."

मामा तेव्हा काय म्हणाला ते पूर्णपणे कळले नव्हते. पण शंभर-एक वर्षांपूर्वी अशा प्रकारचे शोध लागले नसताना अंतराळप्रवासापासून ते भूगर्भशास्त्रापर्यंत अनेक विषयांशी संबंधित हा गोष्टी लिहिणारा अवलिया काहीतरी भलतेच इंटरेस्टिंग प्रकरण आहे, इतकी खूणगाठ बांधली गेली होती.

भागवतांच्या अनुवादाच्याही आधी मूळ पुस्तकांवर व मूळ लेखकावर काही लिहिणे अगत्याचे व आवश्यक ठरावे.

पण मी काही लिहिण्यापेक्षा स्वतः भागवतांनी 'मुक्काम शेंडेनक्षत्र' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ज्यूल व्हर्नबद्दल लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, *"विमान नावाचे हवेपेक्षा जड असे वाहन शक्य कोटीतही आले नसताना या प्रतिभाशाली लेखकाने बलून व विमानाच्या विस्मयजनक गोष्टी लिहिल्याच. इतकेच नाही तर अंतराळाचा भेद करून त्याच्या कल्पनेची भरारी चंद्रसूर्यापर्यंत जाऊन पोचली. अंतराळयुगाचा हा द्रष्टा लेखक म्हणजेच फ्रान्समधील नाँत (Nantes) गावी जन्मलेला ज्यूल व्हर्न होय. आज वैज्ञानिक चमत्कारांच्या कथांना अमेरिकेत इतका ऊत आला आहे - त्यातील ९५ टक्के कथा खरोखरच 'चमत्कारिक' असतात! - की ललित वाङ्मयाचा तो एक स्वतंत्र विभाग बनला आहे. पण विज्ञानकथाकारांच्या पंक्तीतले ज्यूल व्हर्नचे स्थान आजदेखील एकमेवाद्वितीयम् असेच आहे. महान पंडित एच्.जी.वेल्स आणि आधुनिकांतला 'रे ब्रॅडबरी' हेदेखील त्याचे आदरणीय स्थान हिरावून घेऊ शकले नाहीत. याचे एक कारण ज्यूल व्हर्नचा तर्कशुद्ध शास्त्रीय दृष्टिकोन हे तर आहेच; पण त्याचे साहित्यगुणही त्याला कारण आहेत. स्त्रीपात्रे बव्हंशी गैरहजर असूनही मनाची पकड घेणारे कथानक, मती गुंग करणाऱ्या घटना आणि तलवारीच्या फटक्यांसारखे चपल संवाद हे त्याच्या साहित्याचे गुणविशेष होत. त्याची कथनशैली इतकी आकर्षक असते की गोष्टीच्या ओघात एखाद्या वैज्ञानिक विषयाची त्याने दिलेली काटेकोर माहिती आपल्या नकळत पचनी पडते."*

आज इतक्या वर्षांनीही मूळ लेखकाचे नाव विसरलेलो नाही, की त्या कथांची कथासूत्रे. याचे जितके श्रेय ज्यूल व्हर्नच्या कथासूत्राला म्हणा किंवा कथानकाला आहे, तितकेच श्रेय भा. रा. भागवतांच्या अतिशय सहज अनुवादाला आहे. आता हे माझं नशीब म्हणावं का माहीत नाही, पण 'फास्टर फेणे' किंवा इतर कोणत्याही पुस्तकांच्या आधी माझ्या हाती भागवतांच्या या ज्यूल व्हर्नच्या पुस्तकांचे अनुवाद लागले. किंवा नारळीकर, मोहन आपटे आदिंचीची पुस्तके, व्याख्याने वगैरे ऐकायच्याही कितीतरी आधी ज्यूल व्हर्नने मोहिनी घातली होती. त्यामुळे विज्ञानकथा या नुसत्याच 'अद्भुतकथा' किंवा 'कल्पितकथा' न राहता एकूणच तर्कसंगत विचार करणे, प्रयोगशीलता, भावना आणि प्रत्यक्ष माहिती यांच्यात फरक करून प्रसंगी योग्य निर्णय घेणे, आदी गुणांना बऱ्याच लहान वयात अप्रत्यक्ष प्रेरणा/चालना देणाऱ्या ठरल्या. व्हर्न यांच्या कथा आणि नारळीकर आदी प्रभृतींच्या विज्ञानकथा यांत रंजकता नि तर्क समसमान असले तरी भागवतांच्या अनुवादांमुळे मुलांना सहज समजणाऱ्या आणि अचूक शब्दरचना, कथेव्यतिरिक्त परिसरातील तपशिलांचे भान, रंजक स्थळयोजना, निरागस पात्रयोजना इत्यादींमुळे व्हर्नकथा मनाचा अधिकच ठाव घेतात.

भागवतांनी ज्यूल व्हर्नच्या अनेक कादंबऱ्यांचा अनुवाद , तर काही कादंबऱ्यांचे रूपांतर केले आहे. कोणत्याही चांगल्या अनुवादाप्रमाणे भागवतांच्या या अनुवादाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मूळ कथांमधील भाव, मूळ लेखनाचे वैशिष्ट्य जपून तसेच्या तसे वाचकांपुढे उभे करणे. स्वतः भागवतांनी म्हटल्याप्रमाणे व्हर्न यांच्या लेखनाचा गुणविशेष म्हणजे पकड घेणारे कथानक आणि त्यातील पात्रांचे नेमके व नेमक्या शब्दयोजनेत झालेले संवाद. अनुवादकाला अर्थातच केवळ पर्यायी शब्द शोधून जोडण्याचे काम नसते, तर ही वैशिष्ट्ये अनुवादातही उतरावी लागतात. भागवत इथेच बहुतांश बाजी मारून जातात. या अनुवादातही संवादांची खुमारी जराही कमी झालेली नाही. मग ते पल्लेदार वाक्यांतील संवाद असोत वा अल्पाक्षरी. परदेशातील कित्येक गोष्टी मराठी वाचकाला - त्यातही कुमारवयीन मुलांना - समजतील असे नाही. हे लक्षात घेऊनच त्याचा अनुवाद इतका 'देशी' करतात की त्या स्थळाची, क्रियेची अगर वस्तूची लगेच कल्पना येते.

आता 'एका चिन्याचा जमालगोटा' ही काही विज्ञानकादंबरी नाही. पण ज्यूल व्हर्नने दीडशे वर्षांपूर्वीच्या चिनी साम्राज्यवादाचे चित्र त्यात रंगवले आहे. त्याचा अनुवाद करताना चिनी वातावरण नेमके उतरतेच, शिवाय

पात्रांची नावेही चिनीच (व अगम्य) ठेवल्याने एका नव्या प्रदेशाबद्दलचे मुलांचे कुतूहल तसेच राहते. त्यात एके ठिकाणी त्यांनी केलेल्या चिनी पदार्थांच्या अनुवादाचा नमुना पहा: (कंसातील टिपण्या माझ्या)

स्वैपाकाचा थाट तोंडाला पाणी आणील असा होता. साखरेच्या केका (म्हणजे बहुदा ***हा केक***[1] *असावा), खाव्यार मासे (इंग्रजीत Cavior, पर्शियन उच्चार खाव्यार), तळलेले टोळ, सुका मेवा, निंग-पो कालवे (निंग पो हे स्थळाचे नाव आहे, तर कालवे माशांचे. निंग पो हे मासेमारीच्या विशेष तंत्रासाठी पूर्वी प्रसिद्ध असलेले गाव)). हे खाऊन झाल्यावर पुढे येत होती ती बदकाची नि कबुतराची नि पिवित पक्ष्यांची अंडी (पिवीत पक्षी हा भारतात फारसा नसतो. दक्षिण/पूर्व चीन आणि रशिया व युरोपात आढळतो. तिथे त्याला* ***लॅपविंग***[2] *म्हणतात. मूळ कथेत बहुदा लॅपविंग हे नाव असावं), जिनत्सान कंदाची कोशिंबीर, गोड्या खारात मिसळलेले देवमाशाचे स्नायू, गोड्या पाण्यातल्या बेटकुळ्या (अर्थात बेडक्या), तळलेले खेकडे, चिमण्यांची आतडी, लसूण भरलेले मेंढीचे डोळे, जर्दाळूच्या शिकरणीत मुळ्यांच्या फोडी (हे काय असावे?), सरबतात घोळलेले बांबूचे कोवळे अंकूर (बांबू तिथे अतीव औषधी मानला जातो), आणि नाना जातींचे मधुर मुरंबे.*



या उदाहरणावरून हेही लक्षात यावे की 'लहान मुलांना काय चिमणीची आतडी खातात वगैरे सांगायचे' असा त्यांचा दृष्टिकोन नव्हता, उलट एकीकडे वातावरणनिर्मितीसाठी तेथील नावे, स्थळे तशीच ठेवताना त्या देशातल्या पदार्थांच्या नावांची मात्र कोरडी जंत्री देणे त्यांनी टाळले होते. मुलांना वाचताना तिथे नक्की काय खातात याचा चांगला लेखाजोखा, एका सक्षम व मुलांना समजेल अशा अनुवादातून त्यांनी मांडला होता. केवळ अशा लेखनातच नाही तर विज्ञानकथालेखनातही जेव्हा लहान मुलांसाठी लिहिले जाते व त्याचा अनुवाद करायचा असतो, तेव्हा ही 'नेमक्या' अनुवादाची मेख अधिकच अवघड होते. कारण केवळ अर्थाशी व भावाशी सुसंगत शब्दयोजना पुरेशी नसते, तर वाचकाला - म्हणजे इथे मराठी मुलांना - समजेल व त्याचा कथेत निर्माण झालेला रस, वेग व सातत्यात खंड पडणार नाही अश्या बेताने शब्दनिवड करावी लागते. अर्थात, भागवतांसारख्या कसलेल्या लेखकाला हे फारसे कठीण गेलेले दिसत नाही.

इथे अजून एका बाबतीत भागवतांची कमाल वाटते. या कथांमध्ये अनेक वैज्ञानिक, भौगोलिक विषयातील शब्द येतात. त्यांच्या व्याख्या, यंत्रांची नेमकी रचना, त्या त्या परिसरांचे वर्णन येते. पण हे मराठीत आणताना कुठेही ओढाताण झालीये असे वाचताना वाटतही नाही. प्रत्येक शब्दाला हट्टाने मराठी शब्दनिर्मितीचा बालिश कारखानाही भागवतांनी सुरू केलेला दिसत नाही. 'हवाई हुकूमशहा' व त्यातील 'रोबर' आणि त्याचे यंत्र हा ज्यूल व्हर्नच्या अचाट कल्पनाशक्तीचा नमुना मानला जातो. 'एरोडायनॅमिक्स'मधील अनेक संज्ञा, रोबरने बनवलेल्या यंत्रांचे विभागवार व तपशीलवार वर्णन इत्यादी करताना त्यांनी 'एंजिनियर', 'स्क्रू', 'इन्स्टिट्यूट' इत्यादी शब्द तसेच ठेवले आहेत. इतकेच नाही तर 'एरोप्लेन' किंवा 'आर्थॉप्टर' वगैरेंचे वर्णन करताना मूळ तंत्राचे वर्णन अतिशय नेमके केले आहे. त्यातही अनेक इंग्रजी शब्द तसेच ठेवले आहेत. खोल्या,

घुमट, शिडे, पंखे वगैरे मुलांना परिचित शब्द एकीकडे वापरताना कप्तानाची खोली न म्हणता 'कॅबिन' हा शब्द मात्र तसाच ठेवला आहे. ज्या कल्पना मुळातच परदेशी आहेत, तिथे देशी शब्द शोधण्यात आपली ऊर्जा न घालवता मुलांना ती माहिती, ते वापरतात त्या भाषेत अधिक सुलभ कशी करून देता येईल याकडे त्यांचे अधिक लक्ष असावे.

आधी म्हटल्याप्रमाणे स्थळे, शहरे, डोंगर/पर्वतांची नावे याचबरोबर कथानकातील पात्रांची नावे देखील पाश्चात्त्यच आहेत व ती तशीच ठेवली आहेत, त्यामुळे त्या त्या देशातील वातावरण, परिसर नेमका चित्रित होतोच; शिवाय कथानक एखाद्या काल्पनिक जागी न घडता अस्तित्वात असलेल्याच (व मुले नकाशात शोधू शकत असतील अशा) जागी घडत असल्याने मुलांना ती कथा काल्पनिक आहे की नाही, असे वाटत राहतेच नि कथेला एक सत्याची चौकट मिळते. अजून एक गंमत जाणवलेली अशी की त्यांनी संवाद लिहिताना कित्येक उद्‌गारवाचक शब्द, चटकन येणारी संबोधने वगैरे अस्सल मराठी वापरली आहे. हात्तिच्या, अबब!, धत्तेरेकी वगैरे उद्‌गारांमुळे पात्रांची नावे बाहेरची असली तरी अशा परिचित भाषेमुळे, संवादांमुळे लहानगे वाचक मात्र कथेशी लगेचच जोडले जातात.

भागवतांनी सगळ्याच व्हर्न कथांचे थेट अनुवाद केलेले नाहीत. काही कथांचे त्यांनी भारतीय वातावरणात रूपांतरही केले आहे (चंद्रावर स्वारी, पाताळलोकाची अद्भुत यात्रा). इतकेच नाही तर काही पुस्तकांच्या प्रस्तावनेत मूळ पुस्तकांवर परीक्षणात्मक/चिकित्सात्मक टिप्पणीही आहे.



'पाताळलोकाची अद्भुत यात्रा' या पुस्तकाच्या पूर्वपरिचयात ते म्हणतात, *"आजवर आकाश-अवकाशात नि समुद्रावर संचार करणाऱ्या ज्यूल व्हर्नने एका विवरात उतरून पृथ्वीचा मध्य गाठायलाही कमी केले नाही! हा चमत्कारिक आणि 'अशक्यप्राय' (कारण पृथ्वी खरोखर पोकळ तरी आहे का?') वाटणारा प्रवास त्याने एका कथानकात गोवला. त्या फ्रेंच कादंबरीचा इंग्रजी अनुवाद म्हणजे जगप्रसिद्ध 'जर्नी टू दि सेंटर ऑफ दि अर्थ '. "* इथे त्यांची टिपणी एका 'अशक्यप्राय' या शब्दाने संपत नाही. ते प्रस्तावनेत म्हणतात, *"पाताळ-लोकाची यात्रा-कथा चित्तथरारक आहे, पण शास्त्रीयदृष्ट्या ज्यूल व्हर्नला न शोभणारी कथा वाटते." मग अशा पुस्तकांची त्यांनी भाषांतरे का केली असावीत, याचे उत्तरही तेच देतात. ते म्हणतात "पाश्चात्त्य देशांत - विशेषतः फ्रान्समध्ये, गिर्यारोहणाप्रमाणे, विवरोतरणाचा छंद म्हणजे एक शास्त्र बनले आहे. नॉर्बर्त कॅस्तरे नावाच्या संशोधकाने ५०० गुहांचे संशोधन करून 'टेन इयर्स अंडर द सी' नावाचे पुस्तक प्रकाशित केले आहे. ही काल्पनिक कथा वाचल्यावर 'ती' सत्यकथाही तुम्हांला कदाचित वाचावीशी वाटेल."*

तेव्हा भागवत हे व्हर्नप्रेमी असले तरी एक साक्षेपी अनुवादक होते, असे म्हणता येईल. ते कोणत्या दर्जाच्या पुस्तकांचा अनुवाद करत आहेत, त्याचा उद्देश काय, त्यातून मुलांना/वाचकांना नक्की काय मिळू शकेल, त्यांनी नक्की काय घ्यावे, कोणत्या कल्पनांकडे लक्ष देऊ नये इत्यादी बाबी त्यांच्यासाठी स्पष्ट होत्या.

आता जालावर ज्यूल व्हर्नच्या सगळ्या कथांचा संग्रह विकत मिळतो. त्यातील काही कथांचे संक्षेप प्रकाशित झाले आहेत. मात्र ते संक्षेपही कथांची व अनुवादाची खुमारी दाखवून देण्यास पुरेसे आहेत, असे वाटते.

परदेशात 'व्हर्नीश' लोकांचा कल्ट असतो. आपण 'व्हर्न परंपरा' चालवतो सांगणे लेखकांना सांगणे भूषणावह वाटते. मात्र भारतात, मराठीत व्हर्न मुलांपर्यंत पोचला तो भागवतांच्या शब्दांत! तेव्हा भागवत हेच आमचे मराठी व्हर्न. दुर्दैव हेच की इतक्या लालित्याने भरलेले, अद्भुतरसाने परिपूर्ण तरीही भरपूर माहिती देणारे बालवाङ्मय, त्यानंतर मराठीत (मारून मुटकून करायचाच तर नारळीकरांचा अपवाद करता येईल; पण तोही 'प्रेषित' वगैरे त्यांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्यांपुरताच) अजिबातच दिसत नाही. स्वतः लिहिलेले तर नाहीच, पण अनुवादितही नाही. जसा व्हर्न कल्ट निर्माण झाला तसा भागवतांचा कल्ट निर्माण झाला असता, तर इथल्या मुलांचे भाग्य फळफळले असते. मराठी मुलांना अजूनही भागवतांच्याच या अनुवादित पुस्तकमालिकेचा आधार असावा, ही भागवतांची कमाई की मराठी सारस्वताची ढळढळीत मर्यादा, असा प्रश्न राहून राहून पडतो. असो.

या पुस्तकांचे नि त्या योगे भागवतांचे माझ्यासारख्या अनेकांवर मोठे उपकार आहेत. 'फास्टर फेणे'सारख्या तद्दन देशी हिरोने आमचे विश्व व्यापण्यापूर्वी भागवतांनी अनेक वैज्ञानिक कल्पनांची बीजे आमच्यात पेरली. आमच्यातला प्रत्येक जण शास्त्रज्ञ झाला असं नाही; पण जी वैज्ञानिक, शास्त्रकाट्याची कसोटी लावण्याची वृत्ती आमच्यात निर्माण झाली त्याबद्दल भागवतांप्रती कृतज्ञतेशिवाय दुसरी भावना मनाला शिवत नाही.

***

१ हा केक (http://en.wikipedia.org/wiki/Nian_gao)

२ लॅपविंग (http://en.wikipedia.org/wiki/Northern_lapwing)

चित्रे: जालावरून साभार.

***

फुरसुंगीचा फास्टर फेणे आणि फास्टर फेणेची फुरसुंगी

- केतकी आकडे

फास्टर फेणे लहानपणी वाचलं तेव्हा ना पुणं माहिती होतं, ना फुरसुंगी! बाकीच्या ठिकाणांची नावंही वाचूनच माहीत. फाफेने त्याच्या २० पुस्तकांच्या कारकिर्दीत अनेक करामती केल्या. रत्नागिरीच्या किल्ल्याजवळच्या गुहेत अडकलेल्या नानांना सोडवलं, फुरसुंगीच्या स्टेशनमधे आलेल्या उमद्या रेसच्या घोड्याला पळवून नेण्यापासून वाचवलं, गुजरातमधे काठेवाडला जाऊन तेल विहिरींमधलं तेल वाचवलं. देशासाठी काहीतरी करण्याच्या दुर्दम्य इच्छेमुळे हा काटकुळ्या मुलगा साक्षात भारत-चीन युद्धात नेफा आघाडीवर पॅराशूटमधून उडी मारली आणि शत्रूचा रणगाडा उलथवला, 'G7' छावणीमधे राहून सैनिकांना पडेल ती मदत केली, प्रसंगी पायावर गोळीही झेलली, तिथल्या गावातल्या मुला-मुलींना गोळा करून 'बनियन कंपू' स्थापन केला आणि कितीतरी चिनी हेर पकडून सैन्याच्या हवाली केले, काश्मीरला गेला असताना तिथेही आपला दोस्त अन्वर याच्यासोबत पाकिस्तानी हेरांचे मनसुबे धुळीला मिळवले, मुंबईच्या समुद्रात एका छोट्या बेटावर असणाऱ्या कपारीत लपवून ठेवलेला तस्करीचा माल सोडवला, दहशतवाद्यांनी हायजॅक केलेलं विमानसुद्धा सुखरूप परत आणलं. तुरुंगातून पळालेल्या किती सराईत चोरांना त्याने पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं याची तर गणनाच नाही. आता १०-१२ वर्षं पुण्यात गेल्यावर फाफे पुन्हा वाचायला मिळालं, तेव्हा जाणवले ते फास्टर फेणेमध्ये विखुरलेले अनेक जागांचे संदर्भ. त्यांपैकी पुणे आणि आसपासच्या जागांचा घेतलेला हा धांडोळा!

जुन्या पुण्याचं वर्णन अनेक ठिकाणी वाचायला मिळेल, पण एका काल्पनिक कथेत इतकी हुबेहूब वर्णनं फक्त भागवतच करू जाणोत! फाफेच्या कथांचं पहिलं पुस्तक- 'फुरसुंगीचा फास्टर फेणे' प्रकाशित झालं ते साधारण १९६० च्या सुमारास. नंतर १९८९ पर्यंत इतर सगळे भाग येत गेले. मग त्या पुस्तकांतली वर्णनं वाचून उत्सुकतेपोटी आम्ही त्यांपैकी माहीत नसलेल्या ठिकाणी भटकायचा मनोरंजक उद्योग करायला घेतला.

फाफे वाचताना कर्वे रस्ता, पौड फाटा, पुणे स्टेशन, कॅंप, लक्ष्मी रस्ता, कसबा पेठ, बंडगार्डन, रेसकोर्स, बिबवेवाडी अशी शेकडो ठिकाणं लगेच डोळ्यासमोर तरळतात. 'साचपिर' रस्त्यासारख्या छोट्या छोट्या दुर्लक्षित जागासुद्धा मधूनच डोकावून जातात. पाताळेश्वर मंदिर आणि त्याच्या गुहेत लपून बसणारा चिनी हेर बन्या आणि त्याची मामेबहीण माली या दुकलीने पकडून दिलेला दिसतो. पानशेत धरण फुटल्यावर आलेला पूर आणि त्या वेळची परिस्थिती याचं अतिशय चित्रदर्शी वर्णन भागवतांनी 'आगे बढो फास्टर फेणे'मध्ये केलंय. जंगली महाराज रस्त्यावरची २०-२२ फुटी झाशीची राणी बुडवणारा पूर किती भयंकर असेल याची आत्ता कल्पनासुद्धा करवत नाही. ज्या पुराने भविष्यात पुण्याचा तिप्पट विस्तार केला, त्या पुराची रेषा अजूनही मुठेच्या पात्राजवळ असलेल्या एका जुन्या इमारतीवर आखलेली दिसेल. अशा पुरात आबासाहेब देवकुळ्यांच्या ऐतिहासिक तळघरातून महत्त्वाची कागदपत्रं आणि माली, मधू यांचे जीव वाचवून 'आमची उडालीय फेफे, लवकर या - फा.फे.' असा संदेश धोतरावर पताकेसारखा लिहून ठेवणाऱ्या या हडकुळ्या पट्ट्याची गोष्ट कल्पनेतली आहे म्हणता? असेल बुवा!

पुण्याच्या आजूबाजूला असणाऱ्या जागांपैकी जेजुरी गड एका कथेत येतो. प्रतापगडावर सहल गेलेली असताना सुभाषचं झालेलं अपहरण, त्याच रात्री झालेला कोयनानगरचा महाभयानक भूकंप आणि त्यातून वाचलेल्या फाफे आणि सुभाषची गोष्ट 'प्रतापगडावर फास्टर फेणे' मधे आहे. 'चिंकू चिपांझी आणि फास्टर

फेणे'मध्ये खंडाळ्याचं जंगल, पुणे-मुंबई असा पूर्ण रेल्वेमार्ग आणि त्यात साखळी खेचून ट्रेन थांबवून कर्जतजवळच्या जंगलात चिंकूचा शोध घेणारा फास्टर फेणे दाखवला आहे.

फाफेची शाळा- विद्याभवन- ही साधारण रेसकोर्सच्या जवळपास असावी. आत्ता त्या जागी इतर बऱ्याच शाळा आहेत, पण 'विद्याभवन' किंवा तत्सम नावाची कोणतीही शाळा आढळली नाही. आत्ता हडपसर आणि फुरसुंगीपासून शाळेची जागा जवळ वाटते, पण फाफे पहिल्यांदा गावातून शाळेत आला, तोच मुळी साक्षात ग्लायडरमधे बसून! हे ग्लायडिंग सेंटर अजूनही हडपसरला आहे.

ग्लायडिंग सेंटर, हडपसर

याच हडपसरला फास्टर फेणेचा जालीम शत्रू इंद्रू इनामदार आणि त्याच्या श्रीमंत वडलांचा बंगला होता ते आठवलं. कदाचित इथेच कुठेतरी एका कुंभाराच्या खोपट्यात बनेश आणि त्याच्या जिगरी मित्राला - सुभाषला - किडनॅप करून ठेवलं असेल. ज्या सायकल रेसमध्ये फाफे हरावा म्हणून एवढं सगळं केलं, ती शर्यतसुद्धा याच रस्त्यावर झालीय 'आगे बढो फास्टर फेणे'मध्ये.

मग आम्ही भेट दिली फाफेच्या जन्मगावी - फुरसुंगीला. फुरसुंगी गाव पुण्याच्या पूर्वेला सासवडकडे जाताना डावीकडे लागेल. हडपसरच्या पुढे सोलापूर रस्त्याला गेलात की सोलापूरकडे न जाता वारीच्या मार्गे सासवड रस्ता घ्या; १० मिनिटांवर फुरसुंगी ग्रामपंचायत आपलं स्वागत करेल. पण आपल्या फाफेचं खरं गाव इतक्या लवकर सुरू होत नाही. फुरसुंगी फाट्यावरून सरळ आत गेलात आणि साधारण २ किमी अंतर आत गेलं की खरं गाव सुरू होतं. मोठी उसाची शेतं, छोटेखानी घरं, पेरूच्या आणि नारळाच्या तुरळक बागा, आणि या सगळ्यांसोबत हवेत असणारा उरळीच्या कचरा डेपोकडून येणारा दुर्गंध. अर्थातच हा कचरा डेपो अलीकडचा असावा, कारण फाफेमध्ये असा काहीही उल्लेख नाही. पण हळूहळू त्या वासाची नाकाला सवय होते आणि आपण फाफेच्या गावात शिरतो. भागवतांनी त्या काळी फुरसुंगीला जाण्याच्या बस आणि रेल्वे या पर्यायांचं तपशीलवार वर्णन केलेलं आहे. थोड्याफार फरकाने ते आजही तसंच आहे. आधी मला वाटलं होतं की इतर रामपूर, सोमपूर वगैरे सारखं हे काहीतरी काल्पनिक गाव असणार, पण आपण जेव्हा गावात पुस्तकातले संदर्भ शोधायला लागतो, तेव्हा लेखकाचं कौतुक वाटल्यावाचून राहत नाही. एकमेकांशेजारी असलेली मशीद आणि विठोबाचं मंदिर, मंदिरात असलेल्या नरहर महाराजांच्या पादुका, मंदिराबाहेरची चावडी, तुकाई देवीचं मंदिर, त्या शेजारची मराठी शाळा, सगळं अजूनही जागच्या जागी आहे.

मशीद

विठोबाचं मंदिर

तुकाई देवीचं मंदिर

शेजारची मराठी शाळा

मंदिराबाहेरची चावडी

पूर्वीचं पुणं राहिलं नाही असं लोक म्हणतात, खरं आहेच ते! सामाजिक आणि आर्थिक व्यवहार पूर्वीपेक्षा अर्थातच बदलले, लोकसंख्या प्रचंड वाढली. तसंच फुरसुंगीसुद्धा बदललंय. गावात शिरताना लागणारी थोडीफार उसाची शेतं सोडली तर इतर शेतजमीन बरीचशी संपलीय. कौलारू घरं जाऊन पक्की घरं आली आहेत. चावडीशेजारचं वडाचं झाड आणि त्याचा पार मात्र अगदी आत्ता गेल्या वर्षीच्या पावसाला बळी पडला. चावडीचं रूप बदलून तिचा 'ज्येष्ठ नागरिक सेवा संघ' झाला. धुळीने माखलेले रस्ते जाऊन छान सिमेंटचे रस्ते आले आणि जवळ असलेल्या कचरा डेपोमधून उडून येणाऱ्या कचऱ्यामुळे असेल, पण गाव मुद्दाम स्वच्छ ठेवण्याचे प्रयत्न जाणवले.

फाफेच्या पहिल्याच पुस्तकात गावच्या जत्रेची एक गोष्ट आहे. आम्ही विचार केला की एवढ्या सगळ्या खऱ्या खऱ्या जागा गावात सापडल्या, तर या जत्रेबद्दलसुद्धा विचारून पाहू. चौकशी केल्यावर कळलं की ही वैशाख पौर्णिमेची जत्रा त्यानंतर ८ दिवसांतच आहे! जत्रेचं वर्णन पुस्तकात वाचताना इतकं अतिरंजित वाटतं, की जेव्हा गावकरी 'अहो, खरंच असं होत असतं' असं म्हणाले, तेव्हा त्या जत्रेला हजेरी लावायलाच हवी असं आम्ही ठरवलं. ज्यांना पुस्तकातलं वर्णन आठवत नसेल त्यांना थोडी माहिती सांगते - जत्रेचा मान फार पूर्वी हरपळे घराण्याकडे असावा. पुस्तकात तसा उल्लेख आहे. पण आता गेल्या काही वर्षांपासून तो खुटवड घराण्याकडे आहे.

बबन खुटवड

तर या घराण्यातला मानकरी जत्रेआधी ९ दिवस देवीच्या देवळात उपवासाला बसतो. फक्त फळं खायची, दूध, पाणी प्यायचं आणि देवळाच्या आवारातच राहायचं. सुरुवात म्हणून आम्ही बबन खुटवड यांना भेटायला गेलो.

बबन खुटवड आज ८६ वर्षांचे आहेत आणि ते तरुण असल्यापासून हा मान त्यांच्याकडे आहे. आपल्या गावच्या जत्रेचं वर्णन असं कित्येक वर्षांपूर्वी लिहिलेल्या पुस्तकात आहे असं कळल्यावर त्यांना इतका आनंद झाला, की त्यांनी आमच्याकडचं 'फुरसुंगीचा फास्टर फेणे' वाचायलाच ठेवून घेतलं.

ऐन जत्रेच्या दिवशी देवीची पूजा होते. ढोल ताशांच्या गजरात मंदिरासमोर पोतराज देवीची गाणी म्हणतो. जो माणूस गाडा ओढणार, त्याची पूजा होते आणि त्याच वेळी त्या उपवास केलेल्या मानकऱ्याच्या

अंगात त्या दिवशी देवी संचारते. देवी अंगात येणे हे बऱ्याचदा जत्रांमधे मी याआधी पाहिलं होतं, पण ते विशेषत: स्त्रियांच्या बाबतीत. अंगात देवी येणारे पुरुष इथेच पाहिले. डोक्यावर लालभडक रंगाची - धनगर लोक घालतात - तशी पगडी, कमरेला धोतर आणि संपूर्ण अंग हळदीने माखलेलं, अशा वेषात तो माणूस घुमायला लागतो. त्याला कसंबसं आवरत देवीच्या पारंपरिक गाड्याकडे नेलं जातं. या गाड्याला १२ बैलगाड्या एकामागोमाग एक जोडून तयार असतात आणि त्यात माणसं खच्चून बसलेली असतात. तातडीने मानकऱ्याच्या कमरेला दोरी अडकवली जाते आणि तो एकटाच या सगळ्या गाड्या ओढून गावात फिरवून आणतो.

फुरसुंगीतली जत्रा

अंगात येणे हा प्रकार कितीदा पाहिला तरी असं कुणी माणूस आजूबाजूला असलं की तयार होणारं भारावलेलं वातावरण, आख्ख्या गावातल्या लोकांनी त्या माणसाकडे अपेक्षेने पाहत राहणं आणि काहीतरी संमोहन झाल्यासारखं त्याने अपेक्षापूर्ती करणं हे मला पाशवीपणाकडे झुकणारं वाटत राहिलं. यात अजून एक अंधश्रद्धा अशी, की या गाड्यांमधे बसलेल्या आणि आजूबाजूला असलेल्या कुणाच्याही अंगावर काळ्या रंगाचं कापड असेल तर या गाड्या हलत नाहीत. जर गाड्या थांबल्या, तर एक नारळ फोडून हवेत भिरकावला जातो. तो (म्हणे) बरोब्बर जाऊन काळं कापड घातलेल्या माणसाला जाऊन लागतो. आमच्यापैकी एकीनं घातलेलं काळं जॅकेट त्यांनी तिला काढून ठेवायला लावलं.

दुसरं म्हणजे, या फोटोंमधेही नीट पाहिलं तर दिसू शकेल की दोरी जरी एकाच माणसाच्या कमरेला बांधलेली असली, तरी पहिल्या गाड्याच्या दांडीच्या मागे ४-५ चांगले पेहेलवान लोक पोझिशन घेऊन उभे असतात, ज्यांची गाडी ओढणाऱ्याला नक्कीच मदत होत असावी. आणि हे सगळ्यांना माहीत असतं, दिसतही असतं पण कुणीही त्याचा उल्लेख करत नाही. जुन्या काळापासून असलेल्या समजुती, त्याही विशेषतः देवाच्या बाबतीत, या

इतक्या घट्ट रुजलेल्या असतात की दिसत्या गोष्टीलाही एवढा मोठ्ठा समूह सहज नाकारू शकतो. जत्रेच्या गोष्टीमधेही भागवत या अंधश्रद्धेबद्दल सांगतात. खुद्द फाफेला असं वाटत असतं की त्या बैलगाड्यांच्या आजूबाजूला इतकी माणसं असतात, की ती गर्दी नक्कीच गाड्या पुढे लोटण्यात सहभागी असेल. फाफेच्या त्या गोष्टीत गाड्या मधूनच थांबतात तेव्हा एकाकडे काळा दोरा सापडतो आणि पब्लिक त्याच्या अंगावर धावतं. तेव्हाही फाफे त्या प्रकरणाचा छडा लावतो आणि गाड्या अचानक थांबण्याचं खरं कारण गावकऱ्यांसमोर आणतो. जत्रा बघून पुस्तकातलं ते सगळं वर्णन आठवलं.

अशा एकामागून एक ओळखीच्या गोष्टी गावात जसजशा सापडत गेल्या, तशी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, - हा काल्पनिक का असेना, पण त्यांच्या गावचा असलेला, सुपरहिरो बनेश फेणे गावात कुणालाही माहिती नाही. आम्ही जितक्या लोकांशी बोललो, त्यातल्या फक्त २ लोकांना फास्टर फेणे हे नाव ऐकून माहिती होतं. इतरांना तेही नाही. शाळेपासून सायकल हाणत फाफे आख्ख्या पुण्यात सगळीकडे फिरला, पुण्याबाहेरही अनेक करामती करून तो प्रसिद्ध झाला. पण त्याला ओळखणारे बालवाचक त्याच्याच गावात उरलेले नाहीत.

फाफेच्या गोष्टीतल्या पुण्यात आंतरशालेय सायकल शर्यतींसाठी रस्ते बंद ठेवले जायचे. पर्वतीच्या पायऱ्या सायकल चालवत उतरून दाखवण्याच्या स्पर्धा होत असत. आता स्वतः फुरसुंगीपासून पुण्यात सायकल चालवत आणली तेव्हा जाणवलं की सुरक्षितपणे सायकल चालवता येतील असे रस्तेच पुण्यात राहिलेले नाहीत आणि मुळात फाफेच्या वयाची मुलंही सायकल हे वाहन म्हणून वापरताना फारशी दिसत नाहीत. इतर गोष्टीतल्यासारखी काल्पनिक ठिकाणं फाफेच्या गोष्टीत नाहीत, पण आता अर्थातच सगळे संदर्भ बदलले आहेत.

हे सगळे बदल होणं जितकं अपरिहार्य आहे, तितकंच भाषिक बदल, बदललेली मूल्यं, सादरीकरणाची माध्यमं यामुळे फास्टर फेणेसारख्या गोष्टी विस्मृतीत जाणं हेही अपरिहार्य आहे. जीवनशैलीशी सुसंगत असणारं बरंच बालसाहित्य कायमच कोणत्या ना कोणत्या रूपात येत असतं आणि ते स्वागतार्ह आहेच. पण भागवतांचे विशेष आभार यासाठी की त्यांनी तेवढ्यावरच न थांबता फास्टर फेणेच्या निमित्ताने मुलांना देशासाठी प्राण वेचणाऱ्या सैनिकांची आणि त्यांच्या कामाच्या गांभीर्याची जाणीव करून दिली. भूकंप, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमधे कसं वागावं ते शिकवलं. गोवा मुक्ती संग्रामासारखे संदर्भ देऊन मुलांची इतिहासाबद्दलची उत्सुकता चाळवण्याचा प्रयत्न केला. अंधश्रद्धा न मानणारा, विज्ञाननिष्ठ, धर्मनिरपेक्ष,

भूतदयावादी, दोस्तांसाठी जीव टाकणारा, अतिशय तरल आणि संवेदनशील मनाचा फास्टर फेणे जन्माला घातला. हा फास्टर फेणे आजच्या मुलांनाही नक्की आवडू शकेल. पण फक्त गरज आहे योग्य माध्यमातून केलेल्या सादरीकरणाची!



***

श्रेयोल्लेखाशिवाय असलेली सर्व छायाचित्रे: केतकी आकडे.
हडपसरच्या ग्लायडिंग सेंटरचे चित्रः जालावरून साभार.
फास्टर फेणेचे पुणे: ऋषिकेश.

***

रॅबिलेच्या पायावर उभा भागवती प्रासाद

- हेमंत कर्णिक

'मायापूरचे रंगेल राक्षस' हे पुस्तक प्रथम वाचलं तेव्हा मी लहान होतो. पुस्तक वाचताना त्याची प्रस्तावना वाचायची असते, निदान डोळ्यांखालून घालायची असते, हे तेव्हा मला माहीत नव्हतं. त्यामुळे मी तेव्हापासून बरीच वर्षं ही गोष्ट भा. रा. भागवतांची स्वतःची आहे, असंच मानून चाललो होतो. भागवतांची 'रॉबिन हुड आणि त्याचे रंगेल गडी' आणि 'समुद्रसैतान' ही पुस्तकं अर्थातच मी वाचली होती. त्या दोन पुस्तकांतल्या पात्रांची, ठिकाणांची नावं परकी होती. त्यामुळे त्या गोष्टी इथल्या नव्हेत, हे कोणी सांगावं लागलं नाही. पण मायापूर, घंटासुर, चंडासुर, चक्रवाक ही नावं इथली होती. वातावरण इथलं होतं. तेव्हा बेहद्द आवडलेले त्यातले विनोद पूर्णपणे इथले होते. त्यातल्या कशालाही परक्या संस्कृतीचा किंवा भाषांतरातून हमखास येणारा कृत्रिमतेचा वास बिलकुल नव्हता. लहान मनाला आवडेल, असं लिखाण कसं असतं, असं जर मला कुणी विचारलं असतं; तर मी तत्काळ या गोष्टीचं नाव घेतलं असतं. ना. धों. ताम्हनकरांचा 'गोट्या' मला आवडला नाही, बाळबोध वाटला. 'श्यामची आई' आवडली नाही, असं म्हणायची माझी टाप नव्हती (आणि नाही); पण ते रडू आणणारं पुस्तक. विरंगुळा म्हणून, वाचनाचा आनंद घ्यायचा म्हणून लहान वयात कोण 'श्यामची आई' वाचत बसेल!



तर, खूप वर्षांनंतर जेव्हा मला 'मायापूर'सुद्धा रूपांतरित आहे, असं कळलं; तेव्हा आश्चर्य वाटलं. आणि तेव्हा वय वाढलेलं असल्याकारणाने मूळ लिखाण वाचावंसं वाटलं. ते वाचल्यावर - खरं तर वाचण्याचा प्रयत्न केल्यावर - जे सापडलं, ते इथे मांडायचं आहे. आणि तसं करण्याअगोदर मूळ पुस्तकाचा संदर्भ न घेता केवळ मराठी 'मायापूर'कडे पाहिलं, तर काय वाटतं, हे तपासणं गरजेचं आहे.

आता काही घटकांचा विचार करू. एक, कथावस्तू.

काहीही म्हणायच्या अगोदर एक गोष्ट स्पष्ट करणं आवश्यक आहे; ती म्हणजे मला फ्रेंच येत नाही. त्यामुळे मी रॅबिले या फ्रेंच लेखकाने लिहिलेलं मूळ पुस्तक वाचलेलं नाही. भा रा भागवतांच्या 'मायापूरचे रंगेल राक्षस' या साहित्यकृतीवर लिहिताना मी **'गर्गांटुआ अँड पेंटाग्रुएल'**[१] या इंग्रजी पुस्तकालाच मूळ लिखाण म्हणणार आहे. पुढे.

गोष्ट सुरू होते, ती वास्तव काळात. जानूला शेतात भलं मोठं पुस्तक सापडतं आणि त्यात साऱ्या साऱ्या राक्षसांच्या कुळकथा दिलेल्या असतात.

शंकरभटजी ते चाळून वृत्रासुर, भस्मासुर, घटोत्कच, सुंद-उपसुंद, अशा पुराणातल्या अनेक राक्षसांची नावं घेतात. म्हणजे, मायापूर हे जरी एक काल्पनिक गाव असलं, तरी मायापूरची गोष्ट पुराणातल्या गोष्टींच्या नंतरची आहे, असं लेखक सांगतो. गोष्टीत राक्षसांच्या अवाढव्य आकाराचा अपवाद सोडला, तर अद्‌भुत, अतार्किक घटना वा वैशिष्ट्य जवळपास नाही. तो आकारही एक प्रकारे लवचीक आहे. केवळ अतिरेकातून विनोद निर्माण करायला आकाराचा आधार घेतला आहे, असं म्हणता येतं. बाकी त्या आकाराला वेगळा संदर्भ नाही, जसा गलिवरच्या गोष्टीत उघडपणे आहे. जोनाथन स्विफ्टने आकारांच्या विषमतेमधून मानवी दृष्टिकोन आणि पूर्वग्रह यांच्यावर जसं भाष्य केलं आहे, तसं 'मायापूर'चं नाही.

अर्थात, हे असं मुळातच आहे, असं म्हणता येईल. पण भागवतांनी रूपांतर करताना स्पष्टपणे एक पथ्य पाळलं आहे, ते म्हणजे ही गोष्ट त्यांनी बालकांना समोर ठेवून सांगितली आहे. मूळ गोष्टीतलं जे काही बालकांपुढे ठेवणं त्यांना अयोग्य वाटलं, ते त्यांनी गाळलं आहे. गंमत अशी, की ते गाळल्यामुळे भागवतांनी सांगितलेल्या गोष्टीत न्यून येत नाही! त्यात विस्कळीतपणा, तुटलेपणा येत नाही. याचा एक अर्थ असा, की मूळ गोष्टीत जे काही 'ओंगळ', 'वाह्यात' आहे, ते अलंकार म्हणून घातलं आहे; ते नसलं तरी बिघडत नाही. दुसराही अर्थ आहे, तो असा की भागवतांची छोट्यांची गोष्ट मराठीकडून उलट मूळ कथावस्तूकडे गेल्यावर मोठ्यांसाठी होते, ती त्या गाळलेल्या भागामुळेच! काही असो; भागवतांनी एक सुसंगत निर्णय घेतला, ज्यामुळे गोष्टीतलं एक अंग कमी झालं, पण दुसरं वाढलं : त्यात बालकांवर कुसंस्कार करणारं काही न राहिल्याने ते बालकांची निखळ करमणूक करणारं झालं.

इथे एक मुद्दा मांडायला हवा. मूळ गोष्टीत असलेली ओंगळ वर्णनं ही, मराठी मुलांनाच काय, थोरांनाही चालली नसती. मुळात रॅबिलेने जरी काही ओंगळ आणि वाह्यात वर्णनं केली असली, तरी त्यांना 'ओंगळ' आणि 'वाह्यात' ही विशेषणं लावणं ही एक विशिष्ट सांस्कृतिक भूमिका आहे. त्या भूमिकेपासून दूर असणाऱ्या वर्गाला त्यात काही खटकणारही नाही. समाजात असे दोन वर्ग दिसतात. एक अर्थातच कष्टकरी वर्ग, ज्यावर अभिरुचिसंपन्न कलास्वादाचे, साहित्यवाचनाचे संस्कार झालेले नाहीत. दुसरा, असे संस्कार अजून

व्हायचे आहेत असा अल्लड, अल्पवयीन वर्ग. या दोन वर्गांमध्ये फरक असा, की कष्टकरी वर्ग स्वतःला हवं ते वाचायला, करायला मोकळा असतो, बालकांनी काय करावं, काय वाचावं हे वडीलधारे ठरवत असतात. या दुसऱ्या कारणामुळे ओंगळ वर्णनं आणि वाह्यात संवाद बालकांच्या साहित्यातून बाद होतात.

भागवतांची शैली प्रसन्न आहे. गोष्ट लहान मुलांना सांगायची आहे, असं ठरवल्याने बुद्धिगम्य क्लिष्टता, बहुपदरी व्यक्तिमत्त्वं, छुपा गर्भितार्थ, सूक्ष्म उपहास यांना जागा नाही. एखाद्या पात्राविषयी प्रथमदर्शनी जे मत होतं, तेच खरं असतं आणि ते धरून ठेवून वाचत गेल्याने फसगत होत नाही, उलट घटनांची संगती नीट लागत राहते. मित्रपक्षातला कुणी अचानक सुप्त कुहेतूने वाईट वागायला लागत नाही.

मात्र 'यामध्ये लपून बसलेला अर्थ आपल्या बुद्धीला समजला' यात लहान मुलांनाही आनंद मिळत असतोच. 'मायापूर'मध्ये हे भाषेच्या माध्यमातून साधलं जातं. घंटासुराच्या गुरूचं नाव आहे 'कस्तमहाम'. या अगम्य आणि उटपटांग नावाचा उलगडा त्याच्या शिकवण्याच्या पद्धतीतून होतो. तो ज्ञ पासून अ पर्यंत मुळाक्षरं शिकवतो. "शब्द उलटे वाचायचे, ते कसे?" असं विचारल्यावर कस्तमहाम उत्तरतो, "हीना चंयळाक ते लातु रमाकुजरा!" म्हणजे काय, हे लक्षात आल्यावर पुढे "लालचा लार्याकाष्ट्रा राडे झातु नि डारे झातु!" याची दुहेरी मजा बालवाचक घेऊ शकतो. त्याला त्याचा अर्थ तर कळतो - आणि त्यातला विनोद आकळतो - शिवाय या उद्गारातली लयसुद्धा त्याला आस्वादता येते. हे भागवतांचंच! हे कुठून परभाषेतून येणार? भागवतांनी एकदा ही रीत उचलली की मग "तू राक्षस होतास, आता साक्षर झालास." असं ते लीलया लिहून जातात.

भाषेमध्ये वाच्यार्थ आणि लक्षणार्थ, असं असतं; व्याजोक्ती असते; त्याबरोबर भाषेतल्या शब्दांना रूप असतं, नाद असतो. शब्दाच्या अर्थापलीकडल्या या वेगळ्या वैशिष्ट्यांमुळेदेखील भाषेला सौष्ठव प्राप्त होत असतं. बालकांकडून अनवधानाने या वैशिष्ट्यांचा वापर होत असतो आणि शब्दांची अर्थावेगळी तोडमोड करून मुलं शब्दरूपाची, नादाची गंमत अनुभवत असतात. म्हणूनच त्यांच्या आपापल्या कूट भाषा असतात. त्या कूट भाषांत संभाषणाचे प्रयत्न चालतात. याची दखलही अर्थातच 'मायापूर'मध्ये आहे. चक्रवाक हे पात्र असं बोलतं, लिहितं. "आमवर्तला आखूवर्तप आभावर्तषा आयेवर्ततात." हे त्याचं एक उदाहरण. "चक्रचारवि चक्ररतोक." हे दुसरं.

पुढे दोन बेटांची जोडगोळी येते. तिथल्या उधळ गावात माधळ पेठ असते. नदीवर समोरासमोर आदळ आणि हापट नावाचे दोन घाट असतात. तिथला बाप धष्ट असला की मुलगा पुष्ट असायचाच. अक्राळ आणि विक्राळ हे तिथे राज्य करत असतात; एक आड असतो, तर दुसरा दांड. अक्राळची राणी तिच्या साळकाया आणी, तर विक्राळची राणी तिच्या माळकाया घेऊन येई. अक्राळ शेंडीतोड्या (चांडाळाचं डोकं कापून डाळ करणारा) तर विक्राळ पोटफोड्या. पाहुणीचं पोट फाडून पाणी मिळवणारा!

ज्याला भाषेत रस आहे, त्याला यातून अचाट आनंद मिळेल आणि भाषेकडे बघण्याची नवी दृष्टी मिळेल. ज्याला रस नसेल, त्याला रस उत्पन्न होईल! एकूणच भाषा नुसती परस्परसंपर्काचं काम करत नाही; त्याहीपेक्षा खूप गंमतजंमत तिच्यात असते, ही संकल्पना बालकाच्या मनात शिरकाव करेल. वाढत्या, संस्कारशील वयात त्यामुळे बुद्धीच्या वाढीला नवा आयाम मिळेल. लहान मुलांची नुसती निर्भेळ करमणूक करणंसुद्धा अत्यंत संस्कारशील असू शकतं, ते असं!

भागवतांनी गोष्टीच्या तपशिलांमध्येसुद्धा ही भाषिक गंमत भरली आहे. आणि बाकी तपशिलांमध्ये लहान वयाला पसंत पडेल अशी गंमत आहे. साहसकथा म्हटल्यावर युद्ध होणारच. पण 'मायापूर'मधलं युद्ध

बऱ्यापैकी अहिंसक आहे. त्यात तेलावरून घसरणं आहे आणि उसाने घायाळ करणं आहे. महापुरामुळे कलिंगडं अमाप होतात आणि कुणाचं पोट फुगतं, तर कुणाचं डोकं, कुणाचं नाक. तीक्ष्ण बुद्धी असूनही "वाचल्याने डोळे बिघडतात" असं म्हणून ग्रंथाचं एकही पान न उघडणारे पंडित इथे भेटतात; तसेच अर्ध्या तासात मेंदूची शस्त्रक्रिया करण्यात पटाईत असणारे हातातल्या कात्रीने केवळ नाकातले केस कापत असतात.

या एकूण आनंदी, प्रसन्न वातावरणातला विनोद दुसऱ्याच्या व्यंगावर हसणारा नाही. यात अतिशयोक्ती आहे, शाब्दिक कोट्या आहेत, विसंगती आहे. पण ओंगळपणा, वाह्यातपणा औषधाला नाही! वरवर पाहता 'मायापूर'चा सर्वात मोठा दोष त्यातली भाषा आता जुनी झाली, हा आहे. मात्र या 'दोषा'ची दुसरी बाजूदेखील बघायला हवी. मुळात ही कहाणी लहान मुलांसाठी लिहिलेली असल्यामुळे आजही त्यातली गंमत नष्ट झालेली नाही. नगरांची, पात्रांची नावं मजेदार आहेत, भाषा शुद्ध (म्हणजे प्रमाण नव्हे. शुद्ध म्हणजे जिच्यात स्मार्ट, थँक्यू असल्या इंग्रजी टर्म्स वा 'गंभीरपणे घेणे' या प्रकारच्या रचना वा 'माझी मदत कर' यासारख्या हिंदीसम रचना नाहीत; अशी) मराठी आहे. म्हणजे, गोष्टीतल्या मजेदार, मनमोहक ऐवजामुळे मुलं रमतील आणि आपोआप 'शुद्ध' मराठीचे संस्कार करून घेतील!

आता या गुणवैशिष्ट्यांपैकी किती श्रेय मूळ लेखक रॅबिले याचं आहे, हे पाहू.

गर्गांटुआ अँड पेंटाग्रुएल

रॅबिलेने लिहिलेल्या मूळ फ्रेंच गोष्टीचं नाव आहे 'गर्गांटुआ अँड पेंटाग्रुएल'. जोनाथन स्विफ्टच्या 'गलिवर्स ट्रॅवल्स'प्रमाणे ही गोष्टदेखील लहान मुलांसाठी लिहिलेली नाही. दोन्हीकडे प्रौढ मनाला उद्देशून केलेली वर्णनं आहेत. दोन्हींमध्ये अद्भुत घटना भरपूर आहेत आणि दोन्हीकडे अद्भुताचा उद्देश वाचकाचं लक्ष पकडून ठेवणे, हाच आहे. वाचनात रमलेल्या वाचकाला त्याच्या नकळत स्वतःच्या - काहीशा बंडखोर - विचारांचे घास भरवता येतील असं लेखकाचं गणित आहे. मात्र स्विफ्टच्या तुलनेत रॅबिलेच्या गोष्टीत फारच पाल्हाळ आहे. रॅबिलेच्या लिखाणातलं पाल्हाळ एका अर्थी त्याच्या काळातल्या लेखनमूल्यांचा (सोळाव्या शतकातल्या लेखनमूल्यांचा) भाग आहे. भागवतांनी जेव्हा ते मराठीत आणलं, तेव्हा अतिपाल्हाळामुळे रंजकतेला, वाचकाचं लक्ष धरून ठेवण्याच्या हेतूलाच छेद गेला असता. लहान मुलांच्या बाबतीत तर हे फारच मारक ठरलं असतं.

लहान, निरागस मनाचं निखळ मनोरंजन करण्याच्या स्वतःच्या उद्देशाला अनुसरत त्यांनी मूळ गोष्टीतलं पाल्हाळ काढून टाकलं आहे. आणखीही बरंच काही केलं आहे. रॅबिलेची भूमिका भागवतांच्याच शब्दात वर्णन करायची तर 'ढोंगधत्तुऱ्याचे भस्म अन् समाजकंटकांचे चूर्ण करणे आणि निरागस (की बावळट?) नागरिकांना अकलेच्या मात्रा उगाळून देणे' ही आहे. गर्गांटुआला घंटासुर आणि पँटाग्रुएलला चंडासुर करताना भागवतांनी भूमिका बदलली आहे. वर म्हटल्याप्रमाणे निरागसच पण वयाने लहान मनाला एक रंजक गोष्ट मराठीत सांगताना भागवतांनी भरपूर स्वातंत्र्य घेतलं आहे. त्यांनी ओंगळ आणि वाह्यात वर्णनं पूर्णपणे काढून टाकली आहेत. मात्र, रॅबिलेच्या विनोदातच असलेली बालसुलभ निरागसता त्यांनी नीट सांभाळली आहे आणि रॅबिलेचा एकूण रोख, तसंच त्याच्या लिखाणाची प्रकृती लक्षात घेऊन त्यात स्वतःची भर टाकली आहे.

म्हणजे हे भाषांतर नाही, रूपांतर आहे. 'मूळ कल्पना परकीय' असं म्हणून खुशाल मोकळं होणं जरी भागवतांना शक्य होतं, तरी त्यांनी रॅबिलेचं ऋण मान्य केलं आहे. आणि ऐसपैस स्वातंत्र्य घेताना त्यांनी रॅबिलेच्या गाभ्याला धक्का लावलेला नाही. विनोद बऱ्याचदा कोणावर तरी - at the cost of somebody - केलेला असतो. तशा विनोदाचा संस्कार सातत्याने झाल्यास विनोद म्हणजे तेच, विनोद करताना कोणाला तरी खाली खेचायचं असतंच, असं मूल्य रुजतं. भा. रा. भागवतांचं काहीही वाचलं तरी हा कुसंस्कार बालकांवर होणार नाही.

आता काही उदाहरणं पाहू.

शेजारच्या राज्यातल्या 'केक बेकर्स'ना भागवतांनी बुंदीच्या लाडवांचे हलवाई बनवलं. आपोआप, लढाई करताना लाडू भिरकावणं आलं आणि लढाईला 'बुंदीच्या लाडवांचे युद्ध' असं नाव मिळालं! या लढाईत विशेष पराक्रम गाजवणाऱ्या फ्रायर जॉनचा झाला 'दंडभद्र'. क्रुसाचा दांडा काढून जॉन तो हातात घेतो आणि त्यानं शत्रूचं निर्दाळण करतो. तो एकेकाला कसा कसा मारतो, हे अगदी तपशीलवार सांगताना रॅबिले 'चविष्ट' म्हणावं अशा रीतीने त्या हिंसाचाराचं वर्णन करतो. शत्रुसैनिक ठार झाल्याचा स्पष्ट उल्लेख करतो. भागवत द्राक्षांच्या मळ्याच्या जागी उसाचं शेत आणतात. आपोआप दंडभद्राच्या हाती उसाची कांडकं येतात. उसाचा उल्लेख 'इक्षुदंड' असा होतो. आणि दंडभद्र उसाच्या दांडक्याने शत्रुसैनिकांना रट्टे लगावतो. 'ते वार झेलताना त्या शेंदाड शिपायांचे दंड नि बरगड्या दुखायला लागल्या' इथवरच भागवतांच्या हिंसेची मजल जाते! पुढे 'त्याच्याभोवती घायाळ आणि मृत सैनिकांचा खच पडला" असं म्हटल्यावर 'रक्ताने न्हालेले सैनिक गोड गोड मिठ्ठास रसात बुचकळलेले दिसत होते' असंही येतं!

आक्रमकांवर हल्ला करण्यासाठी निघालेला रॅबिलेचा गार्गांटुआ 'सेंट मार्टिन्स ट्री' नामक झाडाखाली थांबतो आणि गार्गांटुआ तो उंच दांडगा वृक्ष उपटून त्याचा, भाला व दांडकं असा, दुहेरी उपयोग करतो. हे भागवतांना मान्य आहे आणि ते याला 'मायापुरा'त स्थान देतात. पण गार्गांटुआची घोडी तिथे मुतते आणि तिच्या मूत्राचा प्रवाह शत्रूने बळकावलेल्या किल्ल्याच्या दिशेने गेल्याने तिथला खंदक ओसंडून वाहतो आणि त्यात तिथे असलेले शत्रूचे सर्व सैनिक बुडून मरतात; याला मात्र 'मायापूर'मध्ये जागा मिळू शकत नाही. एका बाजूने अशी सेन्सरशिप लागू करणारे भागवत, ज्या बाबतीत त्यांचा हातखंडा आहे, ते शब्दखेळ मुबलक प्रमाणात करून रंजकतेत भर घालतात. मग घंटासुराचे सैनिक "मारीचदुर्ग - भारीच दूर गं!" अशा घोषणा देतात, गडाजवळ पोचल्यावर "बघा बघा तो घंटासुर, बुरुजांचा करी चक्काचूर!" असं ओरडू लागतात.

मारीचदुर्ग सर केल्यावर 'मायापूर'मध्ये थेट कोबीच्या गड्ड्यात लपलेल्या यात्रेकरूंची कथा येते. म्हणजे मूळ गोष्टीत असलेला बाकीच्या लढाईचा, लोकांच्या राहणीवर्णनाचा, भाषणाचा वगैरे भाग गाळलेला आहे. त्या भागातही अतिशयोक्ती, विसंगती, चमत्कारिकपणा यांचा आढळ आहे; ज्यातून विनोद वा रंजकता यांची निर्मिती शक्य आहे. पण law of marginal utility आपल्याला सांगतो की प्रमाण वाढलं, की लाभ कमी होत जातो. तसंच, इथेही मजकुराची लांबी रंजकतेवर मात करण्याची शक्यता वाढते. एकूण पुस्तक किती लांबलचक असावं, याला मराठी बालसाहित्यात मर्यादा असल्याकारणाने रॅबिलेच्या प्रदीर्घ कहाणीत नुसती काटछाट करून भागणार नव्हतंच; बरंच काही अजिबात काढून टाकण्याला पर्याय नव्हता (**गुटेनबर्ग प्रकल्पामध्ये उपलब्ध असलेला ५ खंडीय मजकूर**[२]).

घंटासुराचा पुत्र चंडासुर. त्याच्या जन्माची गोष्ट रॅबिलेने रंगवून सांगितली आहे. त्यात तेव्हा पडलेल्या कोरड्या दुष्काळाचं खास रॅबिलेच्या अतिशयोक्तीपूर्ण शैलीत केलेलं वर्णन आहे. भागवतांनी केलेली अतिशयोक्ती अगदी माफक आहे आणि त्यात अतिरेकापेक्षा अतर्क्याचं प्रमाण जास्त आहे. म्हणजे, दुष्काळात किती ऊन पडलं, किती गरम झालं, हे सांगत न बसता ते म्हणतात, 'त्या वर्षी बाराऐवजी अकराच महिने आले; जसा एखाद्या तिथीचा लोप होतो, तसा पुसाचा महिना लोप पावला. श्रावण महिन्यात नऊ सोमवार आले आणि उपास करणाऱ्यांच्या तोंडचं पाणी पळालं. मृगाचा ते हस्ताचा पाऊस पडला नाही; पण स्वाती नक्षत्रात जो पाऊस लागला, तो थेट शिवरात्रीपर्यंत.' म्हणजे, ते सगळं वातावरण देशी - मराठी - करून टाकतात. रॅबिलेने वर्णन केलेली अद्भुतं त्यांनी त्या त्या ठिकाणी न ठेवता विखरून टाकली आहेत. एका प्रकारे भागवतांनी रॅबिलेच्या लिखाणाला खनिज मानून त्यातून स्वतःचं खाणकाम केलं आहे. आणि ते करताना धार्मिकता, प्राचीन युरोपातल्या साहित्यकृती व साहित्यिक यांचे उल्लेख बाजूला केले आहेत.

याचाच अर्थ असा की रॅबिलेने जरी चमत्कृती, वैविध्य, संदर्भ, अद्भुततेच्या दिशा वगैरेंचा कच्चा माल पुरवला असला; तरी त्यातून एक सलग, सुसंगत, सुबोध आणि रंजक मराठी गोष्ट रचण्याचं कसब भागवतांचं आहे. 'मायापूरचे रंगेल राक्षस' हे भाषांतर नाही, ते रूपांतरही नाही; ती एक स्वतंत्र निर्मिती आहे. फक्त त्यातील पात्रं आणि 'मूड' हे सामान उधार घेतलेलं आहे. ज्या कोणाला हे विधान सोयीस्कर वाटेल, त्याने भागवतांच्या गंमतीजंमतींचं मूळ रॅबिलेच्या 'गार्गांटुआ आणि पेंटाग्रुएल'मध्ये शोधण्याचे कष्ट घेऊन पाहावेत!

***

१ 'गर्गांटुआ अँड पेंटाग्रुएल' (http://en.wikipedia.org/wiki/Gargantua_and_Pantagruel)

२ गुटेनबर्ग प्रकल्पातले ५ खंड (https://www.gutenberg.org/files/1200/1200-h/1200-h.htm)

चित्रे : जालावरून साभार.

***

उदे उदे गं!

- स्नेहल नागोरी

भा. रा. भागवत माझ्या कुमारवयातल्या वाचनाचा महत्त्वाचा भाग होते. लेखक, त्याची विशिष्ट लेखनशैली असं काही प्रकरण असतं हे समजण्यापूर्वी त्यांची बरीच पुस्तकं मला आवडायला लागली होती. भारा त्यांच्या गोष्टींमध्ये वाचकाला सामावून घेत असत. त्यांनी शब्दबंबाळ लेखन केलं नाही, पण त्यांनी केलेलं वर्णन थेट चित्र डोळ्यासमोर उभं करतं. भारांबद्दल बोलायचं झालं तर असंख्य गोष्टी आहेत. स्वत:च्या भाषेवर असलेलं प्रभुत्व आणि परकीय भाषेतील अमर्याद वाचन यांमधून त्यांनी मराठी भाषेत वैज्ञानिक बालसाहित्याचं एक नवं दालन उघडून दिलं. परदेशी अनोळखी वातावरणाला देशी लिहाज चढवून संहितेचे मूळ सौंदर्य न घालवता रूपांतरं करण्यात भारांचा हातखंडा होता. ती रूपांतरं अगदी अस्सल मराठमोळ्या मातीत रंगलेली वठत. त्यातलं मला सगळ्यांत आवडणारं पुस्तक म्हणजे 'भुताळी जहाज'.

भारांनी साहसांच्या थरारक गोष्टी लिहिल्या, गूढ आणि सुरस गोष्टीही लिहिल्या, पण पूर्वजन्म-पुनर्जन्म-भुतंखेतं अशा संकल्पना त्यांनी अजिबात हाताळलेल्या नाहीत.

'भुताळी जहाज' हा एकच सणसणीत अपवाद.

पेशवाईच्या उत्तरार्धात पार जपानच्याही पुढच्या समुद्रात जहाज घेऊन जाण्याचं धाडस दाखवणाऱ्या उदाजीरावांच्या खापरपणतूने उदाजीरावांच्या हरवलेल्या जहाजाचा शोध कसा लावला, याची शब्दचित्रकथा म्हणजे 'भुताळी जहाज'. प्रवीण पतंगे हा या गोष्टीचा नायक. प्रवीणचे खापरपणजोबा असलेल्या उदाजीरावांनी 'जय मल्हार' नावाचं एक लढाऊ जहाज घेऊन चाचे लोकांचा पाठलाग केला. या पाठलागात ते पार जपानच्याही पुढे पोचले. पण तिथून ते कधीच परतले नाहीत. पुढे त्यांचं काय झालं याचाही काहीच पत्ता लागला नाही. प्रवीणचे वडील जयाजीराव पतंगे यांनी उदाजीरावांच्या जहाजाचा शोध घ्यायचा खूप प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी ८ शिडांचं एक जहाज खरेदी केलं. त्याचं नाव 'अष्टावसू'. पण या शोधमोहिमेवर असतानाच त्यांना मरण आलं. प्रवीणला लिहिलेल्या शेवटच्या चिठ्ठीत, ही कामगिरी पार पाडण्याची जबाबदारी प्रवीणनं घ्यावी, अशी इच्छा त्यांनी व्यक्त करून ठेवली होती.

प्रवीणनं त्यांची इच्छा पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. 'पुनर्वसू' नावाच्या नव्या जहाजातून त्यानं केलेल्या शोधप्रवासाची ही गोष्ट. या शोधात प्रवीणला आणि त्यांच्या साथीदारांना चक्क एका भुताळी जहाजाचं मार्गदर्शन मिळालं आणि अनेक संकटांना तोंड देत ही सफर यशस्वी झाली.

जहाजाचं वर्णन जरी 'भुताळी' अशा विशेषणानं केलेलं असलं, तरी भूत म्हटल्यावर आपल्या डोळ्यांसमोर ज्या भीतिदायक प्रतिमा उभ्या राहतात, त्याहून अगदी विरोधी स्वभावाचं हे जहाज आहे. जपानच्या आसपासच्या समुद्रात वावरणाऱ्या सगळ्या खलांश्यांमध्ये या जहाजाबद्दल चर्चा रंगत असते.. ते जहाज - ना अभद्र आहे, ना जीवघेणं. पण त्याच्याभोवती सांगता न येणाऱ्या कसल्यातरी गूढाचं वलय आहे,

एवढं मात्र नक्की. या भुताळी जहाजाचं फार सुरेख वर्णन भारा करतात. 'क्षितिजावरील धुसर धुक्यातून झळाळत बाहेर पडणारं ते स्वर्गीय जहाज, त्याची राजहंसाच्या डौलाची चाल आणि त्याच्या पंखांप्रमाणे दिमाखाने फडफडणारी पांढरीशुभ्र शिडं' ही पुस्तक संपल्यानंतरही बराच काळ आपल्या नजरेसमोर तरळत राहतात. समुद्राच्या प्रवासात अनुभवास येणारे हवामानाचे टोकाचे बदल - म्हणजे प्रचंड कोंदट, घामेजून टाकणारा असह्य उकाडा आणि कपड्यांचे थर चढवूनही हाडांपर्यंत शिरणारी बोचरी थंडी - यांचं वर्णन थेट शारीर अनुभूती देऊन जातं. समुद्राच्या पार्श्वभूमीवर उलगडत जाणाऱ्या या गोष्टीला खाऱ्या पाण्याचा - खाऱ्या वाऱ्याचा 'फील' आहे असं वाटत राहतं.

सरतेशेवटी प्रवीणच्या जहाजावर कोसळणारी संकटं, तिथं घडणारी कटकारस्थानं, या सगळ्यांवर मात करत प्रवीण त्याच्या ध्येयापर्यंत पोचतोच.

इंजीन बंद पडल्यामुळे शिडाच्या आधारे चालणारं जहाज अनेकदा मृत्युसंकटातून वाचतं, त्यात भुताळी जहाजाचा मोठा वाटा असतोच. पण कप्तान आणि खलाशी यांनी वारंवार प्रयत्न करूनही भुताळी जहाजानं दाखवलेल्या वाटेखेरीज इतर कुठल्याही मार्गावर जाणं त्यांना अशक्य होतं. खलाशांच्या इच्छेप्रमाणे किनारा गाठण्याचे प्रयत्नही फोल ठरतात. भुताळी जहाज त्यांना एका विशिष्ट मार्गावर हाकारत राहतं.

गंमत म्हणजे या पुस्तकाखेरीज इतर कुठेही भारा इतिहास वा पुराणकथांच्या आकर्षणात गुंतलेले दिसत नाहीत. पण या गोष्टीला मात्र एक मराठमोळा ऐतिहासिक-पौराणिक बाज आहे. 'उदे उदे गं, उदे उदे गं' अशी अंबेची हाक आणि भंडाऱ्याच्या पिवळ्या रज:कणांनी भारून टाकलेलं ते भुताळी जहाज थेट आंग्र्यांच्या आरमारातून अवतरलेलं गुराबा जातीचं ऐटबाज लढाऊ जहाज आहे. त्याचा उंचावणारा बाकदार पुढा आणि त्याच्यावर केलेलं नक्षीकाम, जुन्या मजबूत लाकडांचा काठ, काळ्या रोगणाच्या गुळगुळीत, भक्कम नि उंच डोलकाठ्या, त्यावर फडफडणारे भगवे ध्वज, तक्तपोशीवरच्या देवदार लाकडाच्या फळ्या, त्यावर पडलेला ऐतिहासिक धाटणीचा कर्णा आणि तुतारी; यांखेरीज जहाजावर सापडलेली विविध हत्यारं - तलवारी, ढाली, कट्यारी, जंबिये, भाले... हे सगळं आपल्याला थेट मराठी आरमारात घेऊन जातं.

नुसतं समुद्राचं आणि प्रवासाचं वर्णन करून भारा थांबत नाहीत, तर प्रवीण आणि साथीदारांच्या सफरीचा एक नकाशाही पुस्तकात देतात. मजा म्हणजे, हा नकाशा काल्पनिक गोष्टीसाठी काढलेला असला, तरी तो काल्पनिक प्रदेशाचा नाही. तो खऱ्या भूगोलाचे मार्ग अनुसरत जातो.

भारांच्या लेखनात मला सतत जाणवणारी गोष्ट म्हणजे वयाला शोभेल असा समजूतदारपणा असलेले त्यांचे नायक आणि त्यांच्या बुद्धिमत्तेला समजून घेणारी, त्यांच्याशी मैत्री असलेली, त्यांच्या जवळची मोठी माणसं. भारांच्या लेखनकाळात ही गोष्ट फारशी प्रचलित नव्हती. मुलांना समजून न घेणारी, 'त्यांना काही समजत नाही' असं म्हणत त्यांची मतं धुडकावून लावणारी मोठी माणसं, ही खरं तर 'टिपिकल' मराठी संस्कृती. पण भारांनी ती सपशेल मोडून काढली. या पुस्तकातले कॅप्टन नायर किंवा शामूभय्या काय, 'फाफे'मधले सुर्वे सर किंवा इन्स्पेक्टर बखले काय, अशी अनेक उदाहरणं देता येतील.

ही सगळी मोठी माणसं मुलांच्या मताला महत्त्व तर देतातच, पण साहस करायला प्रोत्साहनही देतात; एवढंच नाही, तर त्या साहसांत सहभागीही होतात.

भुताळी जहाज कुठे गेले ?

आपल्या पूर्वजांच्या जहाजाचा शोध घेत प्रवीण पतंगे 'पुनर्वसू'मधून ज्या मार्गाने गेला तो नकाशात ठिपक्याठिपक्यांनी दाखवला आहे.

भारा वेगवेगळ्या प्रदेशांचं अप्रतिम आणि चित्रदर्शी वर्णन करतात. पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे गोष्टीच्या ओघात ते त्या त्या प्रदेशाच्या भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीची नेमकी वैशिष्ट्यं गोष्टीत सहजपणे गुंफतात. भारतातून जपानला जाणाऱ्या जहाजाच्या मार्गाचं प्रवासवर्णन करताना नागासाकीच्या भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे ते आशिया-पॅसिफिक मार्गाने होणाऱ्या व्यापाराचं प्रवेशद्वार बनलं आहे आणि महायुद्धातल्या अणुहल्ल्यानंतर जपान्यांनी तिथे अवघ्या २० वर्षांत उत्तम बंदर उभं केलं आहे, अशी माहिती भारा सहजपणे नोंदवून जातात.

भारांच्या सगळ्या लेखनाचा शेवटही नीट, रीतसर केलेला असतो. त्यांनी गोष्टींचा शेवट कधीच संदिग्ध किंवा अर्धवट सोडलेला नाही. लहान असताना मला सगळ्या गोष्टी अशाच नीटपणे संपलेल्या आवडत. लहानपणी का म्हणा, अजूनही गोष्टींतल्या सगळ्या भागांची शेवटची टोकं नीट जुळवून संपवलेली गोष्ट मला अधिक समाधान देते. भारांच्या जवळजवळ सगळ्याच गोष्टींचा शेवट '... and they lived happily ever after... ' अशा बाजाचाच आहे. पूर्वजांचा मिळालेला खजिना प्रवीणला देताना भारा सगळ्या कायदेशीर बाबी आणि अर्थात नैतिक बाजू व्यवस्थित सुरळीत करून घेऊन मगच त्याला तो खजिना प्राप्त होऊ देतात. 'प्रतापगडावर फाफे'मध्येही फाफेला सापडलेला गडावरचा खजिना तो कोयना भूकंपनिधीला देऊन टाकतो, फक्त एक माणिक तेवढं चुकून त्याच्याकडे राहतं, त्याची इथे आठवण येते!

लहान मुलांसाठी लिहिलेली जादुई आणि भुताखेतांच्या गोष्टी असलेली पुस्तकं मोठेपणी त्यातली जादू हरवून बसतात. पण भारांचं हे पुस्तक मात्र तसं नाही. इतक्या वर्षांनंतर एक अडल्ट म्हणून वाचतानाही त्यातला थरार जसाच्या तसा जिवंत आहे.

असे बालसाहित्यिक खूप कमी असतात, ज्यांचं लेखन वेगवेगळ्या वयात आणि बदललेल्या दृष्टिकोनातून वाचलं, तरीही ते कालबाह्य वाटत नाही. आपण आजही त्या लेखनापेक्षा मोठे झालेले नसतो.

***

'भुताळी जहाज'चे मुखपृष्ठचित्र: जालावरून साभार.
प्रवीणच्या प्रवासमार्गाचे चित्रः स्नेहल नागोरी यांच्याकडून.

***

फाफे आणि सोविएत सद्दी

- देवदत्त

भा. रा. भागवतांच्या कथा वाचायला नक्की कधी सुरुवात केली ते आठवत नाही, पण सातवी-आठवीपर्यंत फाफे आणि बिबु बऱ्यापैकी वाचून झाले होते. वर्गातल्या सर्वांचीच थोडीबहुत हीच परिस्थिती होती, आणि त्यामुळे सायकलींना ब्येसे, हडकुळी वगैरे म्हणणे हा प्रघातच होता. मिसरूड आणि शिंगे फुटण्याच्या त्या वयात, चौथी-पाचवीत वाचलेले इसापनीतीसारखे बालवाङ्मय बाळबोध वाटत असे आणि 'गोट्या', 'चिंगी', 'गुणसागर टिळक' इत्यादी पुस्तके फारच प्रचारकी वाटत असत. त्यामुळे भारा हे शाळेतल्या बऱ्याच जणांना जणू साहित्याचे कर्तुमकर्तुम बादशहा, अनभिषिक्त सम्राट इत्यादी वाटत. माझ्या मनात त्यांच्या सद्दीला प्रथम शह दिला तो 'देनीसच्या गोष्टी' नामक अनुवादित रशियन पुस्तकाने.

आता हा देनीस कोण? तर 'डेनीस द मेनीस' या अमेरिकन व्यक्तिमत्त्वाशी याचा बिलकूल संबंध नाही. हा आहे विक्तर द्रागून्स्की या लेखकाचा मानसपुत्र - मॉस्कोमध्ये राहणारा एक खोडकर, निरागस मुलगा.

तर हा देनीस पहिल्यांदा दिसला तो एका पुस्तक प्रदर्शनात. हत्तीवर बसलेल्या, हेल्मेट घातलेल्या मुलाचे चित्र असलेलं ते मुखपृष्ठ चित्तवेधक होतंच, आणि सहज मधलं एक पान उघडलं तर तोच पट्ठ्या सायकलवर बसून झोकात चालला होता आणि आजूबाजूला कौतुकाने बघत काही जण उभे होते.



हे अख्खं पानभर रंगीत चित्र म्हणजे गोट्या, चिंगी, आणि फाफे, बिबुच्या तीनरंगी मुखपृष्ठांच्या खुराकावर वाढलेल्या मला पर्वणीच होती. ही चित्रं अगदी 'किशोर'च्या दिवाळी अंकातल्यापेक्षाही छान होती. आणि तो कागद, पुस्तकाची बांधणी हेसुद्धा फारच निराळं काहीतरी होतं. आईकडे थोडा हट्ट करून 'देनीसच्या गोष्टी' विकत घेतलं आणि भारांचं सिंहासन कुठेतरी थोडंसं डळमळलं.

हा आमचा देनीस कराब्ल्योव्ह शूर, हुशार किंवा महाचतुर नव्हता. आदर्श मुलगा वगैरे तर बिलकूल नव्हता. तो मस्ती करायचा, कुंपणावर चढायचा, खेळाच्या नादात गृहपाठ विसरायचा, नावडता खाऊ खायला नकार द्यायचा, अनोळखी कुत्र्याला घाबरायचा. देनीस कधी फाफेसारखा सुपरहिरो नाही वाटला, आपल्यातलाच वाटला.

आणखी एक गोष्ट म्हणजे देनीसच्या सगळ्या गोष्टी प्रथमपुरुषात होत्या. त्यातले शब्द आणि भावना मुलाच्या दृष्टिकोनातून होते. रटाळ प्रश्न विचारणाऱ्या पाहुण्यांना सामोरे जाणाऱ्या सात वर्षांच्या देनीसपासून सर्कशीतील चेंडूवर नृत्य करणारी मुलगी आवडायला लागलेल्या टीनएजर देनीसचा हा प्रवास आम्हीसुद्धा अनुभवत होतो.

आणि या देनीसच्या निमित्ताने रादुगा प्रकाशन, झूबोवस्की बुलवार अशा मंडळींची ओळख व्हायला सुरुवात झाली. 'देनीसच्या गोष्टी', 'सूर्यावरचे वारे', 'दोन भाऊ', 'इवान', 'माणूस महाबलाढ्य कसा बनला', इत्यादी पुस्तके वाचता वाचता लवकरच या ओळखीचं ऋणानुबंधात रूपांतर झालं. उत्क्रांतीपासून अंतराळविज्ञानापर्यंत विविध विषयांची तोंडओळख करून देणारी आणि नर्म विनोदापासून युद्धाच्या भीषण वास्तवापर्यंत मानवी भावनांचा पट उलगडून दाखवणारी ही सोविएत पुस्तकं त्या काळात एक अमूल्य ठेवा होती.

त्यानंतर भारांची पुस्तकं आणि रशियन पुस्तकं हे दोन्ही वारू समांतर रस्त्यांवरून चौखूर धावू लागले, ते कॉलेजात जाऊन 'पॅपिलॉन' आणि 'डेझर्टर'ची ओळख होईपर्यंत.

सातवी ते दहावीच्या काळातील वाचनाचे सिंहावलोकन (का स्मरणरंजन?) करताना आता त्या दोन समांतर रस्त्यांतील साम्य आणि फरक जाणवतात. ते मांडण्याचा हा एक प्रयत्न.

नमनाला अजून थोडे तेल ओततो. भा. रा. भागवत यांनी बरेचसे वैश्विक साहित्य अनुवादित केले - उदा. ज्यूल व्हर्न, लॉरा इंगाल्स वाईल्डर, इत्यादी. भारांची खास शैली या पुस्तकांमध्येही दिसून येते, पण कथाबीज त्यांचे नसल्याने ही पुस्तके येथील तुलनेत वगळली आहेत. रशियन कुमारसाहित्यातील काही टक्के भागच अनुवादित झाला आहे. त्यामुळे सुमारे १९३५ ते १९८५ या कालावधीत लिहिलेल्या काही पुस्तकांचा विचार केला आहे.

माझ्या मते या दोन साहित्यप्रकारांत सर्वात महत्त्वाचा फरक म्हणजे भारांच्या बहुतांशी कथांमध्ये प्रमुख पात्र एखाद्या संकटातून मार्ग काढते. 'स्लाईस ऑफ लाईफ' प्रकारचे लेखन जवळपास नाही. याउलट निकोलाय नोसोव, विक्तर द्रागून्स्की यांच्या साहित्यात 'स्लाईस ऑफ लाईफ' पद्धतीचे किस्से आढळतात. गृहपाठ करताना केलेल्या चुका, आगगाडीचा प्रवास अशा साध्यासोप्या प्रसंगांचे चित्रण, नायक आणि खलनायक अशी सरळसोट विभागणी नसलेल्या कि१२यांमध्ये केले आहे.

भारांच्या कथांमध्ये चांगले आणि वाईट याची स्पष्ट विभागणी असे - इंद्रू इनामदार नेहमी वाईटच असतो. तो कधी चांगुलपणा दाखवतो असे दिसत नाही. आणि नंदू नवाथेचे पराक्रम वगळले तर, कथानायक बहुधा चुकीचे वागत नाही. रशियन कथांमध्ये मात्र मानवी स्वभावाचे कंगोरे दाखवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

देनीसचंच उदाहरण घ्यायचं झालं तर, शाळेला उशीर झाल्याबद्दल शिक्षा होऊ नये म्हणून तो आगीतून लहान मुलाला वाचविल्याची थाप मारतो. देनीसची आईसुद्धा, त्याने खूप मस्ती करू नये म्हणून त्याच्यावर नजर ठेवणाऱ्या दुर्बिणीचा शोध लावल्याची बतावणी करते, दुसऱ्या एका गोष्टीत कोंबडी शिजवायची जबाबदारी अंगावर पडलेले देनीसचे बाबा चिकनच्या वेगवेगळ्या डिशेसचं पाल्हाळ लावतात आणि शेवटी कोंबडी साफ न करता अख्खीच शिजत ठेवतात. किंवा मारीया पेत्रोवना नावाची 'लट्ठ थापाडी' देनीसला तलवार देण्याचे खोटे आश्वासन देते, अशा गोष्टी.

पण दुसरीकडे, नावडती पेज खायला चक्क नकार देणारा देनीस, बाबांनी युद्धकालात एकदाच मुश्किलीने मिळालेल्या कलिंगडाची गोष्ट सांगितल्यावर तीच पेज शहाण्यासारखी संपवतो. मित्रांनी खिजवल्यानंतर खूप उंचीवरून स्विमिंग पूलमध्ये उडी मारून आपल्याच भीतीवर मात करतो. आणि आपली तान्ही बहीण तिला आंघोळ घालताना घाबरली असता तिला धीर देण्यासाठी आपले बोट धरायला देतो. कोणीच परिपूर्ण नसतं, पण प्रत्येकात एक अंगभूत चांगुलपणा असतो, ही बाब रशियन पुस्तकांनी कुठेतरी बिंबवली. (अर्थात, दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरील अर्कादी गैदार यांची पुस्तके याला अपवाद आहेत.)

आणखी एक म्हणजे, भारांची मुख्य पात्रे शहरी वातावरणातील आहेत. बिपिन बुकलवार आणि नंदू नवाथे मुंबईत राहतात. फास्टर फेणे मूळचा फुरसुंगीचा आहे, परंतु त्याची बहुतेक साहसं पुण्यात घडतात. याउलट रशियन पुस्तकांचे नायक विविध ठिकाणचे असतात - 'देनीसच्या गोष्टी'मधील देनीस कराब्ल्योव मॉस्कोमधील मध्यमवर्गीय कुटुंबात राहतो, व्लादिमिर बोगोमोलोव यांचा 'इवान' युद्ध आघाडीवरील खेड्याचा रहिवासी असतो, आणि इतर काही पात्रे शेतांवर राहतात. पण साहसी वृत्ती निर्माण होण्याला पोषक अशी पार्श्वभूमी दोन्हींत दिसते. साता समुद्रांचा आणि अंतराळाचा वेध लागलेले कथानायक कुमार-बालवाङ्मयाचा महत्त्वाचा भाग आहेत.



युद्धाच्या पार्श्वभूमीवरच्या कथा रशियन कुमारसाहित्यात आढळतात - व्लादिमिर बोगोमोलोवची 'इवान', अर्कादी गैदारची 'दोन भाऊ' या कथांमध्ये प्रत्यक्ष युद्धआघाडीचं किंवा त्या काळातील जीवनाचं वर्णन केलं आहे. भारांच्या काही कथांमध्येही युद्धाची पार्श्वभूमी आहे. पण त्यांतील वर्णन बरंचसं बाळबोध आहे. त्यात युद्धाची भयाणता कुठेही व्यक्त होत नाही. फाफे शौर्य दाखवतो त्या गोष्टींमध्ये एखादा भारतीय किंवा शत्रुपक्षाचा सैनिक मृत्युमुखी पडल्याचा उल्लेख आढळत नाही. 'युद्धस्य कथा रम्या' ची अनुभूती भारांच्या कथांतून येते, पण रशियन कथांमध्ये युद्धाचं जळजळीत वास्तव दिसतं.

भारांच्या कथानकांमध्ये मुलींचा सहभाग बहुधा दुय्यम असतो - माली, मोना, सीमा या कथेतील मुख्य किंवा दुय्यम पात्रांच्या बहिणी आहेत. रशियन कथांमध्ये स्वतंत्र स्त्री पात्रे आहेत, परंतु तेथेही त्यांचा कथेतील सहभाग दुय्यम आहे.



'देनीसच्या गोष्टी'मधील आल्योन्का, अर्कादी गैदारच्या कथांमधील मुली यांचा कथानकावर फारसा परिणाम नसतो. पण आईची व्यक्तिरेखा मात्र 'दोन भाऊ'सारख्या कथांमध्ये फार छान रंगवली आहे. नवरा दूर तैगामध्ये काम करत असताना 'चुक' आणि 'गेक'ची आई मॉस्कोसारख्या शहरात मुलांना एकट्याने वाढवते. त्यांना घेऊन ट्रान्स-सैबेरियन रेल्वेचा आणि त्यानंतर घसरगाडीचा प्रवास एकटी करते, भूगर्भतज्ज्ञांच्या निर्जन तळावर राहते, आणि मुलगा हरवल्यावर बंदूक घेऊन त्याच्या शोधात जाते.

आपले कथानक भावुक होऊ नये म्हणून भारांनी मुद्दामच कुटुंबाच्या सदस्यांचा उल्लेख वगळला का? माहीत नाही. पण त्यांच्या बऱ्याचश्या कथांमध्ये कथानायकाच्या कुटुंबाचा अभाव जाणवतो. फाफेच्या कुटुंबाचा थोडा तरी उल्लेख आढळतो, पण बिबुचे नातेवाईक कोण आहेत याची माहिती वाचकांना मिळत नाही. साहसी कुमारकथांचा मापदंड असलेल्या 'ट्रेझर आयलंड'मधील 'जिम हॉकिन्स'च्या आईवडिलांचे कादंबरीत त्रोटक वर्णन आहे. पण 'अडमिरल बेन्बो' खानावळ चालवणारे जिमचे वडील कादंबरीच्या सुरुवातीलाच मृत्युमुखी पडतात आणि त्यानंतर काही दिवसांतच जिम आईचा निरोप घेऊन जहाजावरून कूच करतो. पुढील प्रवासात आणि साहसांत जिमच्या आईचा उल्लेखही येत नाही. (कदाचित या पुस्तकापासूनच ही परंपरा सुरू झाली का?) याउलट 'बाबा जेव्हा लहान होते' या अलेक्सांद्र रास्किन यांच्या पुस्तकातील सर्वच कथांमध्ये नायकाच्या कुटुंबीयांचा मोठा सहभाग आढळतो. (टीप - ही साहस कथा नाही.)

भारांचे एक वैशिष्टय म्हणजे कथानकाच्या अनुषंगाने दिलेली जागतिक इतिहास व भूगोलाची माहिती. 'जयदीपची जंगलयात्रा'चा नायक दक्षिण अमेरिकेत जातो, तर 'भुताळी जहाज'चा नायक पूर्व आशियात. तसंच काही पुस्तकांमध्ये ऐतिहासिक पार्श्वभूमीवर कथानक घडतं. उदा. भारत-चीन युद्ध, पानशेत धरण फुटणं, इ. त्याउलट, सोविएतकालीन रशियन पुस्तकांमध्ये मात्र हा पैलू रशियातील विविध प्रदेशांपुरता सीमित ठेवल्याचं आढळतं. उदा. आर्क्टिक समुद्रात जाणारे वीर, तैगामध्ये जाणारे 'दोन भाऊ'मधील चुक आणि गेक.

भारांच्या कथांमधील शाब्दिक विनोद व शाब्दिक क्लृप्त्या कथांना अधिक रोचक बनवतात. काष्ठशिल्पाचे शुक्लकाष्ट, फाफेची फेफे, मारजॉरी मावशीच्या इमारतीतील मार्जारी, इत्यादी विनोद वाचनानंदात आणि शब्दसंग्रहात भर घालतात. काही वेळा शाब्दिक क्लृप्त्या जागतिक भूगोलावर अवलंबून असल्याने त्यांचा सहजासहजी बोध होत नाही. उदा. 'भुताळी जहाज'मधील 'निपाण' हा Nippon (जपान) या अर्थी उल्लेख, किंवा 'खजिन्याचा शोध'मध्ये ऑस्ट्रेलियातील 'अराफरा' समुद्राचा 'अराफरासी' असा मराठी भासणारा उल्लेख. अशा शब्दांचा भारांनी कथेत मोठ्या खुबीने वापर केला आहे. अशा भाषिक गमतीजमती असल्याच, तर अनुवादाच्या प्रक्रियेत त्या बहुधा लुप्त होत असाव्यात, त्यामुळे अनुवादित रशियन कुमारसाहित्यात समांतर उदाहरणे आढळत नाहीत.

पण सरतेशेवटी भारांची पुस्तकं आणि सोविएत रशियन पुस्तकं या दोन्हींमध्ये संस्कारक्षम कुमार मन विकसित करण्याचे सामर्थ्य होते आणि आहे. साहस, हुशारी, देशप्रेम, कुतूहल, विनोदबुद्धी हे गुण कथानायकांच्या अंगी दाखवून वाचकांमध्येही ते गुण आत्मसात करण्याची इच्छा या दोन्ही साहित्यप्रकारांनी जागृत केली. त्यामुळेच ते साहित्य केवळ 'बालिश' न राहता अभिजात वाङ्मयाचा एक मोठा ठेवा बनले आहे.



इंग्रजीतून हिंदीत व तेथून मराठीत 'किशोर'च्या दिवाळी (१९८५) अंकाद्वारे मुलांपर्यंत पोहोचलेले सोविएत साहित्य

***

सर्व चित्रे: देवदत्त यांच्याकडून.

शेवटच्या चित्रपट्टीचे संस्करण: अमुक, देवदत्त..

***

साता समुद्रापारची पुस्तकावळ

- ऋग्वेदिता पारख

मैत्रेयी माझी लेक. वय वर्षं ७. माझा बालवाङ्मयातला रस वाढत गेला, तो खरं तर तिच्याचमुळे.

मैत्रेयीला वाचायला जाम आवडतं. पण तिच्या वाचनाची सुरुवात माझ्यासारखी मराठी पुस्तकांपासून झालेली नाही. कल्पनेचं समृद्ध विश्व तिच्यासाठी उघडलं, ते इंग्रजी पुस्तकांच्या माध्यमातून. डॉ. सूस, एरिक कार्ल, आरनॉल्ड लोबेल, मॉरीस सेंडॅक अशा लेखक - रेखाटनकारांनी तिला गोष्टींची गंमत उलगडून दाखवायला सुरुवात केली. 'डिज्नी', 'पिक्सार' यांच्या लाडक्या कथानायकांच्या कहाण्यांबरोबरच तिने मुलांचं अभिजात वाङ्मय (टॉम सॉयर, हकल्बरी फिन, ट्रेजर आयलंड), वाचायला सुरुवात केली. '**न्यूबरी ॲन्ड कॅल्डेकॉट मेडल**' विजेती पुस्तकं वाचली. तर इतर भाषांमधून इंग्रजीत आलेली पुस्तकंही वाचली. अर्कादी गैदारचं 'चुक ॲन्ड गेक', चिनुआ अचेबेचं 'चिके ॲण्ड दी रिव्हर', केन्जी मियाझावाचं 'नाइट ऑन दी गॅलेक्टिक रेलरोड' ही काही उदाहरणं. तिला मराठी पुस्तकं आवडतात, पण ती तिला कुणीतरी वाचून दाखवायला लागतात. तीही एकदा ऐकून तिचं समाधान होत नाही. काही आवडत्या गोष्टी आणि पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचून दाखवावी लागतात. तिचं एकूण वाचन पाहिलंत, तर तिच्या वयाच्या मुलांपेक्षा खूपच जास्त आहे. वयाच्या मानानं थोडं वरच्या पातळीवरचंही. ती 'ट्वाइस एक्सेप्शनल' (2(e)) मुलगी आहे. म्हणजे 2SD पेक्षा जास्त बुद्ध्यांक असलेली 'गिफ्टेड चाइल्ड'. तिच्या शाळेच्या 'स्कूल डिस्ट्रिक्ट'मधल्या ३००० मुलांमध्ये ती पहिली आली होती. त्यामुळे तिची आकलनशक्ती तिच्या वयाच्या मानानं जास्त आहेच. पण लेकीचं कौतुक पुरे.

सांगायचा मुद्दा असा की तिच्या प्रचंड वाचनाचं निमित्त झालं आणि मी या विषयाकडे अजूनच जिव्हाळ्यानं ओढली गेले. अहं, अभ्यासकबिभ्यासक नाही मी. तुमच्याआमच्यासारखीच एक पुस्तकप्रेमी मराठी व्यक्ती आहे. आता बालवाङ्मयाबद्दल हे जे काही बोलणार आहे, त्याला मुख्य आधार आहे तो माझ्या नि माझ्या लेकीच्या वाचनानुभवाचा. माझ्या नि तिच्या आवडीनिवडी, आमची पुस्तकांची हौस, भाषेबद्दलची ओढ, इथे उपलब्ध असणारं लहान मुलांच्या पुस्तकांचं समृद्ध आणि अद्ययावत विश्व, निरनिराळ्या प्रकारच्या पुस्तकांतून अधिकाधिक प्रकारचे अनुभव लेकीपर्यंत आणून देण्याचा माझा प्रयत्न... या सगळ्याची मर्यादा माझ्या प्रकटनाला असणार आहे. आमचं वाचन काही सर्वव्यापी नव्हे. आमच्या वाचनात न आलेल्या अनेक गोष्टी असणारच, हे ध्यानात असू द्या. त्या अर्थानं हा मराठी - किंवा कोणत्याच - बालवाङ्मयाचा सर्वंकष लेखाजोखा नव्हे. आमच्या चश्म्यातून दिसलेला एक अनुभव, इतकंच.

सर्वसाधारण मध्यमवर्गीय मराठी कुटुंबातल्या मुलींसारखीच मीही. भा. रा. भागवत हा माझ्या पुस्तकप्रेमातला सुरुवातीचा आणि महत्त्वाचा टप्पा होता. पण त्या पुस्तकांच्या बरोबरीनं मी इतरही पुस्तकं खूप वाचत असे. शकुंतला परांजपे यांच्या 'देशोदेशीच्या गोष्टी', शामला शिरोळकरांची पुस्तकं, इंदिरा देशपांडेंचं 'नागमणी', मराठीत अनुवादित झालेलं - मुख्यत्वे अनिल हवालदारांनी केलेलं - रशियन बालसाहित्य , झालंच तर सई परांजपेंचं 'हरवलेल्या खेळण्यांचे राज्य' अशा अनेक पुस्तकांचा माझ्यावर कायमचा ठसा आहे. दक्षिण मुंबईत राहणाऱ्या सुस्थित चुलतभावंडांमुळे मला इंग्रजी बालवाङ्मयाचं जगही तसं लवकरच खुलं झालं होतं. शाळा संपत येते त्या टप्प्यावर 'हार्डी बॉईज', 'नॅन्सी ड्रयू' वगैरे प्रकरणं मला फारशी परकी नव्हती.

त्यांकडे पुन्हा वळणं झालं, ते मैत्रेयीच्या निमित्तानं. तिच्यासाठी मी हौसेनं पुस्तकं हुडकायला लागले नि 'आपल्या' नि 'त्यांच्या' पुस्तकांच्या जगातले कितीतरी फरक लख्ख दिसायला लागले. ते मांडताना इंग्रजीसारख्या जागतिक भाषेत प्रकाशित होणाऱ्या बालवाङ्मयाची तुलना भारांसारख्या एकांड्या शिलेदाराच्या लेखनाशी करायची म्हणजे भारांवर तसा अन्यायच आहे, हे मला पटतंय. मराठी बालवाङ्मय म्हटलं की भारांचं नाव येतंच - कित्येकदा फक्त भारांचंच नाव येतं. लोकप्रियता, पुस्तकसंख्या, कालौघात टिकून राहिलेली त्यांची पुस्तकं हे सगळं पाहता ते मराठी मुलांच्या विश्वातले अनभिषिक्त सम्राट आहेत असंच म्हणायला हवं. देशोदेशींच्या वाङ्मयाकडे डोळस नजर ठेवून मराठी मुलांच्या विश्वात मोठीच भर घातल्याचं श्रेयही त्यांच्या खात्यावर जमा आहे. त्यांच्या साहित्याच्या रोखानं आपल्या भाषेतलं बालवाङ्मय तपासून बघण्याचा हा उपद्व्याप त्यांनाही आवडलाच असता. म्हणून हा छोटा प्रयत्न.

तर - मुख्य फरक मला जाणवतो, तो कथाकथनाच्या शैलीतला.

भारांचा फास्टर फेणे मैत्रेयीलाही खूप आवडतो. पण मजा म्हणजे मला फाफे निराळ्या कारणांसाठी आवडत असे. फाफे हा माझ्या दृष्टीनं एखाद्या सुपरहिरोसारखा होता. तो कायम कोणत्या ना कोणत्या संकटात जाऊन अडकायचा, पण त्याच्याकडे त्या संकटातून सुटायची काही ना क्लृप्ती असायचीच. एखाद्या 'लार्जर दॅन लाईफ' व्यक्तिरेखेसारखा होता फाफे. त्याचं हे सुपरहिरो असणं मला प्रचंड आवडायचं. पण मैत्रेयीला तसं वाटत नसावं. सुरुवातीचा थोडा भाग ऐकल्यानंतर पुढे काय होणार, हे तिला लगेच ओळखता येतं. तिच्यासाठी त्यात प्रचंड थरारक, अनपेक्षित असं काही नसतंच. तिला खरी आवडते ती भारांशी शैली. काय सहज यमक जुळवतात, शब्दातल्या एखाद्या अक्षराची फिरवाफिरव करून काहीतरी गंमत आणतात, मुलांना आवडतीलसे गंमतीदार नवेच शब्द वापरतात! उदाहरणार्थ, 'ढोंगधत्तुरा'. हा भारांनी 'मायापुरचे रंगेल राक्षस'मध्ये वापरलेला शब्द तर तिनं इतका एन्जॉय केला, की बस! त्याचा अर्थ कळल्यावर तर झालंच. बाईसाहेबांनी धाकट्या भावाला चिडवायला म्हणून तत्काळ त्याचा वापर सुरू केला! भारांनी शब्दांशी केलेली ही असली गंमत तिला मनापासून आवडते. बाकी गोष्टीतली वळणं, त्यातले उपदेशाचे वळसे, अपेक्षित रहस्यस्फोट... या सगळ्यांत ती अजिबात गुंतत नाही. तिथे 'सिक्रेट सेव्हन सोसायटीज्', 'बॉक्सकार चिल्ड्रन', 'एन्साय्क्लोपीडिया ब्राउन सीरिज', 'नॅन्सी ड्रयू' वा 'पर्सी जॅक्सन' यांसारख्या पुस्तक-मालिकांमुळे परिपक्व झालेल्या तिच्या बुद्धीला जे हवं असतं, त्यापुढे भारा फिके पडत असावेत. रॉल्फ हाइनमानच्या किंवा मार्टीन हॅन्फर्डच्या '**व्हेअर इज वॉल्डो**'सारख्या पुस्तकातून तर फक्त चित्रांमधून रहस्याची उकल, असा अफलातून प्रकार असतो.

लाल-निळ्या पोशाखातला
चश्मेवाला वॉल्डो चित्रात शोधा:



अकबर-बिरबल, इसापनीती, सिंहासन बत्तिशी आणि परीकथा या सूत्रबद्ध विश्वात मुलांना जे मिळत नव्हतं, ते भारांनी यशस्वीपणे दिलं हे खरंच आहे. मोठ्यांच्या साहित्याला समांतर असलेला एक हक्काचा कोपरा त्यांनी कुमारवयीन मुलांसाठी तयार करून दिला. तिथे रहस्यं होती, पाठलाग होते, विनोद होता, वेगवान घटनाक्रम होते... त्याबद्दलचं त्यांचं श्रेय वादातीत आहे. पण हे सगळं आजच्या पिढीच्या मानानं आता काहीसं संथ, प्रेडिक्टेबल आणि उपदेशपर झालेलं आहे, हेही आहेच.

मला प्रकर्षानं जाणवणारी दुसरी गोष्ट म्हणजे मराठी पुस्तकांत तर्काधारित गंमतीचा भाग फारच कमी आहे. भारांनीच भाषांतरित केलेला एक शरलॉक होम्स सोडला, तर ही असली डोकॅलिटी कुठे नाहीच. उलट 'दी मिस्टीरियस बेनेडिक्ट सोसायटी'मधला हिरो 'रेनी'च घ्या.



तो फाफेच्याच कुळातला आहे. पण लोकांच्या भावना एखाद्या पुस्तकासारख्या वाचण्याचं त्याचं कौशल्य, तर्काधारित निष्कर्ष, घटनेतल्या कोड्याचा नेमका वेध घेऊन त्याच्याकडे गणिती नजरेनं पाहण्याची त्याची वृत्ती... अहाहा! त्यासि तुलना नसे. त्याच्या तुलनेत फाफे अगदी फिका वाटतो. मुलांना प्रत्यक्ष आयुष्यात रेनीच्या कौशल्यांचा उपयोग होईल, की फाफेच्या? निर्विवादपणे रेनीच्याच. नि हे भारांसारख्या दिग्गजाबद्दल झालं. म्हणजे बाकीच्या मराठी बालसाहित्यातल्या कोड्यांबद्दल नि रहस्यांबद्दल नि थरारक गोष्टींबद्दल तर बोलायलाच नको.

विश्लेषणात्मक / तर्काधारित विचारपद्धती, नैतिक पेच यांसारखी महत्त्वाची कौशल्यं मुलांना शिकवण्यासाठी **'मिस्ट्री ॲट ब्लॅकबेअरर्ड्स् कव'**सारख्या पुस्तकांना इथल्या अभ्यासक्रमात सामावून घेण्यात आलं. याचं कारण ही पुस्तकं गंमतीदार असूनही सामाजिक, भौगोलिक, राजकीय पट मुलांना आकर्षक वाटेल अशा प्रकारे मांडतात. त्यामुळे मुलांना अमेरिकन इतिहासाचं स्पष्ट भान येतं. अमेरिकेच्या इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सामाजिक-राजकीय शक्तींबद्दल ही मुलं या पुस्तकांतून शिकतात.



मराठी पुस्तकांत अजिबात नसलेला आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे 'फॅक्शन'. इथे एकतर गोष्ट तरी असते, नाही तर मग माहितीपर पुस्तकं तरी. 'खजिन्याचा शोध' तरी, नाही तर मग 'खगोलशास्त्राचे विश्व' तरी. अधेमधे काही नाहीच. नारळीकरांच्या काही विज्ञानकथांचा काय तो अपवाद. याउलट इंग्रजीत ज्याला फॅक्शन (fact + fiction) म्हणता येईल अशा



पुस्तकांची एक स्वतंत्र शाखाच आहे. मुलं त्यातल्या गोष्टीमध्ये रंगतात आणि सोबतच त्यांना तळटिपांमधून म्हणा, सोबतच्या चित्रांमधून नि तक्त्यांमधून म्हणा, कितीतरी विस्तृत आणि सखोल माहिती मिळत असते.

मेरी पोप ऑस्बॉर्नची '**मॅजिक ट्री हाउस**' नावाची एक पुस्तकमालिका आहे. जॅक नि ॲनी ही दोन सर्वसाधारण मुलं 'मॉर्गन'ची एका काळ्या मंत्रापासून सुटका करायला निघतात. त्यांच्या सोबत जादूचं मचाण - ट्रीहाउस - असतं. मग ते त्या प्रवासात चार प्राचीन कूटकथांची उत्तरं शोधून काढतात, 'मास्टर लायब्ररियन्स' होतात, चार प्राचीन मिथ्यकथांचं पुनरुज्जीवन करतात - त्या काळाच्या पोटात लुप्त होऊन जाण्यापासून वाचवतात, अशी गोष्ट. फक्त याच पुस्तकात नव्हे, तर या पुस्तकासोबत 'मॅजिक ट्री हाउस फॅक्ट ट्रॅकर्स' अशी एक जोडपुस्तिकाही मिळते. त्यातही मूळ गोष्टीतल्या कितीतरी घटकांची पार्श्वभूमी आणि इतर सखोल माहिती पुरवलेली असते. असं आपल्याकडे कुठे असतं?

एक साधा डायनॉसॉरचा विषय घ्या. डायनॉसॉरवर आधारित अंकलिपीपासून (A for Apatosaurus, B for Baryonyx,...) ते कोशांपर्यंत सगळं काही उपलब्ध आहे. गोष्टीची पुस्तकं आहेत, विषयाची रंजक पद्धतीनं ओळख करून देणारी पुस्तकं आहेत. 'आय लव्ह यू स्टिंकी फेस'सारख्या चित्रकथेच्या पुस्तकापासून ते '**एन्सायक्लोपिडिया प्रीहिस्टॉरिका - डायनॉसॉर्स**' या माहितीनं खचाखच भरलेल्या 'पॉप-अप-बुक'पर्यंत अनेक प्रकारची पुस्तकं. कोडी, खेळ, गाणी... चकित करून टाकेल असा मोठा पटच्या पट आहे.

काही पॉप-अप-बुक्स -







असं काही आहे का मराठीत? मला अजून तरी इतकी समृद्धी दिसलेली नाही. साधनं कमी आहेत. मान्य आहे. पण भारांनी केलेल्या अनेक रसाळ भाषांतरांत मजकुराखाली एखादी माहितीपर तळटीप घालणं वा संदर्भासाठी एखादा नकाशा रेखाटणं इतकं अवघड होतं? पण ते झालेलं दिसत नाही.

अजून एका महत्त्वाच्या विषयाबद्दल मला बोलायचं आहे. तो म्हणजे दुजाभाव. भारांचे तीन महत्त्वाचे मानसपुत्र घ्या. फाफे, बिपिन बुकलवार आणि नंदू नवाथे. सगळेच्या सगळे मुलगे. मुली आहेत कुठे? मला लहानपणी वाचताना हे कधीच लक्षात आलं नाही. तेव्हा लिंगभावाचं इतकं भानच आलेलं नसतं, म्हणूनही असेल कदाचित. पण मी फाफेच्या जागी स्वत:ला कल्पून त्याच्या गोष्टी अगदी सहज वाचू शकत असे. पण आता लक्षात येतं. त्यात महत्त्वाचं स्त्रीपात्र नाहीच. इंग्रजीतही हे अगदी आदर्श आहे असं माझं म्हणणं नाही. तिथेही हे काहीसं एकांगीच आहे. पण ही फट भरून काढायचा प्रयत्न 'नॅन्सी ड्रयू', 'ॲन ऑफ ग्रीन गेबल', 'अमेरिकन गर्ल सिरीज'सारख्या पुस्तकांनी जाणूनबुजून केलेला दिसतो. हल्ली तर कितीतरी नायिका मुलांच्या पुस्तकांतून भेटतात. पण मराठीत पाहिलं तर अशा गाजलेल्या हिरॉईन्स नाहीतच. एक सुमा आहे, तीही गोट्याची बहीण. तिला तसं स्वतंत्र कथानक नाही. मला श्यामला शिरोळकरांच्या 'चंबळची मुले' या पुस्तकातली एका सामान्य गोड मुलीची धाडसी गोष्ट तेवढी आठवते. त्या मुलीला दरोडेखोर पळवतात. मग ती ज्या कुटुंबात राहते, त्या कुटुंबाला कधीतरी तिच्या डॉक्टर वडिलांनी मदत केलेली असते... अशी खास भारतीय योगायोगांची गोष्ट. त्यात नायिका होती, हे महत्त्वाचं. पण ते अपवादच. एरवी मुलींनी म्हणजे असंच वागायचं असतं... ताई आणि भाऊ! असंच सगळं... नुसता उपदेश.

सगळ्या मराठी बालवाङ्मयातून पालक आपला कोणता ना कोणत्या प्रकारचा अंतस्थ हेतू राबवत असतात, असं माझं थोडं धाडसी मत आहे. एकतर ओढून ताणून उपदेश करायचे, नाहीतर मग मुलांची कोवळी मनं जपून त्यांना स्वैराचार करू द्यायचा. 'पंचतंत्रा'चं उदाहरण घ्या. त्या एकातून एक उलगडत गेलेल्या गोष्टी आहेत खरं तर. कोल्हा कावळ्याला म्हणाला, की मला ते कासव सांगत होतं त्याला भेटलेल्या सिंहाच्या गोष्टीबद्दल. असा एक मस्त ओघ आहे त्याला. पण आपण तो कुठे अनुभवू देतो? एक गोष्ट घ्यायची आणि त्याला खाली एक तात्पर्य चिकटवायचं! साने गुरुजींच्या पुस्तकात तर हे फार. सगळं आदर्श वागणं. एकतर हे टोक. नाहीतर मग दुसरं टोक. आता मी अनिल अवचटांचं नाव घेते आहे. पण गैरसमज नको. ते माझ्या बाबांचे अतिशय चांगले मित्र आहेत. आणि माझ्या लहानपणीच्या खूप सुंदर आठवणीही त्याच्याशी निगडित आहेत. पण त्यांच्या पुस्तकांत हे जे काही असतं ना, की मुलं म्हणजे फुलं, त्यांना कुस्करू नका, त्यांना जे जसं करायचं असेल, तसं करू द्या. पसारा करताहेत, करू द्या! खेळणी मोडताहेत, मोडू द्या! ते मला नाही आवडत. मुक्तता आणि स्वैरपणा यांत आपण काही फरक करतो की नाही? आणि तो मुलांना अगदी तरल

पद्धतीनं, उपदेश न करता जाणवून देता येतो की! सई परांजप्यांचं 'हरवलेल्या खेळण्यांचे राज्य' घ्या. त्यात हे बटबटीतपणा टाळून फार सुरेख प्रकारे केलेलं आहे. मला फार आवडतं ते पुस्तक. 'विजर्ड ऑफ ओझ' आणि हॅन्स ॲन्डरसनचा 'ब्रेव्ह टिन सोल्जर' यांच्या मधलं प्रकरण आहे ते. त्यातही मुलांना एक संदेश आहेच. पण त्यात काय हलकंफुलकं, खेळकर वातावरण आहे! उपदेशाचा बटबटीतपणा नाही.

पण हे श्रेय आपण भागवतांनाही दिलंच पाहिजे. त्यांच्या सगळ्या गोष्टींमध्ये एक छान उत्साहाचं, हलक्याफुलक्या मिश्कील विनोदाचं वातावरण आहे. थेट उपदेशाचे डोस कुठे नाहीत. सामाजिक समता, चूक नि बरोबरच्या संकल्पना यांच्याबद्दल हिंट्स आहेत. सूचन आहे. पण "हा घे उपदेश, चल हो शहाणा!" असा 'bolus dose' प्रकार कुठेही नाही.

भागवतांना अजून एक महत्त्वाचं श्रेय द्यायलाच पाहिजे. ते म्हणजे त्यांनी भाषांतरित केलेली पुस्तकं. आता शरलॉक होम्स काय, किंवा ज्यूल व्हर्न काय, ते मराठीत आणणं हेच आधी अवघड. मुलांसाठी आणणं अजूनच अवघड. मोठाली विशेषणं टाळायची. त्या त्या संस्कृतीतले संदर्भ असणारी भाषा वळवून मराठी करायची नि तरी अर्थ मात्र निसटता कामा नये. बरं, त्या गोष्टींमधला भूगोल आपल्या मुलांच्या फार परिचयाचा नसणार. त्याचं भान बाळगून त्याबद्दल थोड्या टिपा द्यायच्या. काही गोष्टींना इकडची समांतर उदाहरणं शोधायची. काही गोष्टी तशाच ठेवायच्या काही गाळायच्या. उदाहरणार्थ, व्हर्नच्या कादंबऱ्यांमधला अटलांटिक समुद्रात जाण्याचा उल्लेख. भारतातून तिकडे जायचं म्हटलं, तर केप ऑफ गुड होपला वळसा घालून जावं लागेल, हे त्यांनी अचूक हेरलं. किंवा 'मायापुरचे रंगेल राक्षस'मधे त्यांनी कापलेला भाग. तारेवरची कसरत आहे ही. भारांना ती लीलया साधलेली दिसते.

पण पुस्तकांची निर्मितिमूल्यं? त्या बाबतीत आपण फार मागे आहोत.

आपल्या वाईरकरांनी काढलेल्या फाफेच्या चित्रांचं इतकं कौतुक होतं. नि गैरसमज नको हां, ती आहेतच कौतुक करण्यासारखी, बोलकी. पण त्यापलीकडे? कागदाचा दर्जा म्हणून नका; चित्रांमधली कल्पनेची झेप म्हणू नका; चित्रांना त्रिमित परिणाम देता येण्यासारखा साधा, सरळ कल्पक विचार म्हणू नका. हे सगळं आपल्याला इंग्रजी पुस्तकांत मिळतं. पण माधुरी पुरंदरेंच्या काही पुस्तकांसारखी वा कविता महाजनांच्या 'जोयानाचे रंग' यांसारखी अपवादात्मक पुस्तकं वगळली, तर चित्रांचा स्वतंत्रपणे विचार केलेला कुठेच दिसत नाही. खरं म्हणजे आपल्याकडे किती प्रकारच्या शैली आहेत. मी मध्यंतरी हम्पीला गेले होते. तिथे एक लहानसं पुस्तक मिळालं मला. 'पम्पासूत्र: दी लाइफ ऑफ अ रिव्हर' हम्पीमधल्या तुंगभद्रा नदीची गोष्ट आहे त्यात.

नदीतल्या आळसावलेल्या मगरी, रंगीत चिटुकले मासे, नदीवर पडणारं इंद्रधनुष्य... आणि त्या नदीचं शंकराशी झालेलं लग्न. अशी गोष्ट. नि चित्रं! काय चित्रं आहेत! अगदी भारतीय शैलीतली आणि रसरशीत चित्रं. असं काहीतरी मराठीत का नाही करत आपण? फार लांब कशाला, आपल्याकडे लोककथांचा किती मोठा खजिना आहे. पण त्याचं साधं संकलन तरी कुठे केलं आहे आपण? व्योमकेश बक्षीसारखी व्यक्तिरेखा शरलॉक होम्सला समांतर आहे नि भारतीय मातीतलीही आहे. त्यात बंगालमधलं वातावरण आहे, जुन्या कोलकात्याचं चित्रण आहे. तसं मराठीत काही केल्याचं आठवत नाही. या बाबतीत इंग्रजीतही फार मोठा उजेड पडला आहे असं नव्हे. इंग्रजीत आफ्रिकन, इजिप्शियन, अरबी लोककथा, तसंच 'ग्रिम'मुळे जर्मन, 'पेरो'मुळे (Perrault) फ्रेंच परीकथा सापडतात. सोविएत यूनियनच्या भरभराटीच्या काळामुळे आज रशिया, यूक्रेन, मोल्देविया आदिंच्या लोककथा टिकून आहेत. पण दक्षिण अमेरिकन लोककथा किंवा मूळच्या इंडियन - रेड इंडियन - लोककथा बऱ्याचश्या लुप्तच झालेल्या दिसतात. हे आपल्याकडेही आहे की. आपल्याकडे सांगितल्या जाणाऱ्या शंकर-पार्वतीच्या गोष्टी किंवा आदिवासींच्या कथा, यांच्यात कल्पनाशक्तीला खतपाणी घालण्याची फार मोठी ताकद असते. पण ती आपण एक्स्प्लोअरच केलेली दिसत नाही. 'नॅशनल बुक ट्रस्ट' किंवा 'चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट'ची सहज परवडणारी नि निरनिराळ्या चित्रशैली असलेली पुस्तकं हाच काय तो सुखद अपवाद.







'नॅशनल बुक ट्रस्ट'ची पुस्तके

मराठीतही काही प्रयोग झालेले दिसतात; नाही असं नाही. विंदांच्या 'अजबखाना' आणि 'राणीची बाग'मधल्या कविता आहेत. 'अबब हत्ती'चा इंट्रेस्टिंग प्रयोग मध्यंतरी काही काळ होऊन गेला. 'किशोर' त्या मानानं दीर्घकाळ चालला. आता 'साधने'चा बालकुमार विशेषांक असतो. मध्यंतरी **रशियन पुस्तकांचा एक काळ**[१] होता. काय देखणी पुस्तकं होती ती... एका विशिष्ट वातावरणात घेऊन जाण्याची क्षमता होती त्या पुस्तकांत. चित्रं, पुठ्ठ्याची बांधणी... अहाहा! पण हे सगळं काही काळ चालून मग एखाद्या धूमकेतूसारखं गडप झालेलं आपल्याला दिसतं. त्याचा एक सलग वाहता प्रवाह झाल्याचं कुठे दिसत नाही.

साता समुद्रापारच्या अद्भुत पुस्तकावळीच्या या पार्श्वभूमीवर मला भारांनी केलेलं काम खूप मोठं वाटतं. जेव्हा इंटरनेट नव्हतं, तेव्हा ते परभाषेतल्या पुस्तकांबद्दल माहिती मिळवून ती मराठीत आणायला धडपडत होते. मुलं वेगळ्या प्रकारे विचार करतात, त्यांच्यासाठीचं वाङ्मय निराळं असलं पाहिजे - हा जो सध्या मान्यता मिळालेला विचार आहे, त्याचा कुठे मागमूसही नव्हता; तेव्हा ते मुलांसाठी लिहीत होते, सातत्यानं लिहीत होते. किती उपक्रम... 'पुस्तकहंडी', 'बालमित्र'चा अंक, मुलांसाठीची शिबिरं..



भारांची 'पुस्तकहंडी'

त्यांनी एक चळवळच चालू केली. मोठ्यांच्या वाचनालयात छोट्यांना एक हक्काचा कोपरा मिळवून दिला. एक नवा साहित्यप्रकार प्रस्थापित करणं हे अजिबात सोपं नाही. ते त्यांनी केलं, म्हणून ते मोठे ठरतात.

त्यांच्या या चळवळीचं आपण आज काय करतो आहोत, हा एक मोठा प्रश्न आहे.

***

१. याबद्दल अधिक वाचण्यासाठी 'फाफे आणि सोविएत सद्दी' हा लेख पान क्र. ७१वर पाहावा.

लेखात आलेल्या अनेक लेखक व पुस्तकांच्या तपशिलासाठी संदर्भदुवे पुढील पानावर पाहता येतील.

भारांच्या 'पुस्तकहंडी'चे चित्र आणि 'नॅशनल बुक ट्रस्ट'च्या 'महागिरी' चे चित्र: ऋग्वेदिता पारख यांच्याकडून. स्रोत-उल्लेखाविना असलेली सर्व चित्रे जालावरून साभार.

लेख-संस्करण : मेघना भुस्कुटे व अमुक.

***

साता समुद्रापारची पुस्तकावळ

(आंतरजालीय संदर्भदुवे)

'न्यूबरी ॲन्ड कॅल्डेकॉट मेडल'
(http://www.ala.org/alsc/awardsgrants/bookmedia/caldecottmedal/caldecottmedal)
व्हेअर इज वॉल्डो (http://en.wikipedia.org/wiki/Where%27s_Wally%3F)
'मिस्ट्री ॲट ब्लॅकबेअरईस् कव' (http://audreypenn.com/works/mystery-at-blackbeards-cove-book-1-in-the-blackbeard-series/)
'मॅजिक ट्री हाउस' (http://en.wikipedia.org/wiki/Magic_Tree_House_series)
एरिक कार्लचे संकेतस्थळ (http://www.eric-carle.com/home.html)
चुक ॲन्ड गेक: आर्कादी गैदार (http://en.wikipedia.org/wiki/Chuk_and_Gek)
चिके ॲन्ड दी रिव्हर: चिनुआ अचेबे (http://en.wikipedia.org/wiki/Chike_and_the_River)
नाइट ऑन दी गॅलॅक्टिक रेलरोड ऍन्ड अदर स्टोरीज ऑफ इहातोव: केन्जी मियाझावा
(http://www.amazon.com/Galactic-Railroad-Stories-Japanese-Classics/dp/1935548352)
हरवलेल्या खेळण्यांचे राज्य: सई परांजपे
(http://www.bookganga.com/eBooks/Books/details/55764244218934776 07?BookName=Haravalelya-Khelanyanche-Rajya)
दी हार्डी बॉइज (http://en.wikipedia.org/wiki/The_Hardy_Boys)
एनसायक्लोपिडिया ब्राउन सिरीज (http://en.wikipedia.org/wiki/Encyclopedia_Brown)
डोनाल्ड सोबोल (http://en.wikipedia.org/wiki/Donald_J._Sobol)
नॅन्सी ड्रयू (नॅन्सी ड्रयू मिस्टरी स्टोरीज: एडवर्ड स्ट्रेटमेयर)
(http://en.wikipedia.org/wiki/Nancy_Drew)
दी सीक्रेट सेवन: एनिड ब्लायटन (http://en.wikipedia.org/wiki/The_Secret_Seven)
दी बॉक्सकार चिल्ड्रेन: गर्ट्रूड वॉर्नर (http://en.wikipedia.org/wiki/The_Boxcar_Children)
पर्सी जॅक्सन (पर्सी जॅक्सन ऍन्ड दी ऑलिम्पियन्स सिरीज: रिक रिअर्डन)
(http://en.wikipedia.org/wiki/Percy_Jackson)
दी मिस्टीरियस बेनेडिक्ट सोसायटी
(http://en.wikipedia.org/wiki/The_Mysterious_Benedict_Society)
मॅजिक ट्री हाउस सिरीज: मेरी पोप ऑस्बोर्न
(http://en.wikipedia.org/wiki/Magic_Tree_House_series)
'एन्सायक्लोपिडिया प्रीहिस्टॉरिका - डायनॉसॉर्स'
(http://www.matthewreinhart.com/?portfolio=encyclopedia-prehistorica-dinosaurs)
अमेरिकन म्युजियम ऑफ नॅचरल हिस्टरी यांची डायनॉसॉरबद्दलची पुस्तके - १
(http://www.abebooks.com/ABC-Dinosaurs-American-Museum-Natural-

History/14956030295/bd?cm_mmc=gmc-_-gmc-_-PLA-_-v01)

अमेरिकन म्युजीयम ऑफ नॅचरल हिस्ट्री यांची डायनॉसॉरबद्दलची पुस्तके - २

(http://www.abebooks.com/products/isbn/9781402777226?cm_sp=rec-_-bdp-_-plp)

डायनॉसॉर्स बिफोर डार्क (मॅजिक ट्री हाउस - १)

(http://www.amazon.com/Dinosaurs-Before-Dark-Magic-House/dp/0679824111/ref=pd_sim_14_4?ie=UTF8&refRID=08FH1A1BHMDZ7R01YMX0)

ॲन ऑफ ग्रीन गेबल (http://en.wikipedia.org/wiki/Anne_of_Green_Gables)

अमेरिकन गर्ल सिरीज (http://www.barnesandnoble.com/s/?series_id=254394)

विजर्ड ऑफ ओझ (http://en.wikipedia.org/wiki/The_Wonderful_Wizard_of_Oz)

दि ब्रेव्ह टिन सोल्जर: हॅन्स ॲन्डरसन (http://hca.gilead.org.il/tin_sold.html)

आय लव्ह यू स्टिंकी फेस

(http://www.goodreads.com/book/show/139656.I_Love_You_Stinky_Face)

माधुरी पुरंदरे यांची पुस्तके

(http://www.bookganga.com/eBooks/Books/Index?BookSearchTags=%E0%A4%AE%E0%A4%BE%E0%A4%A7%E0%A5%81%E0%A4%B0%E0%A5%80%20%E0%A4%AA%E0%A5%81%E0%A4%B0%E0%A4%82%E0%A4%A6%E0%A4%B0%E0%A5%87&BookType=4)

जोयानाचे रंग: कविता महाजन

(http://www.bookganga.com/eBooks/Books/details/5740324896262553294?BookName=Joyanache-Rang)

पम्पासूत्र: हम्पीमधून वाहणाऱ्या नदीची कथा

(http://shiloshivsuleman.com/375103/5457561/all-of-me/pampasutra)

ग्रिमच्या परीकथा (http://en.wikipedia.org/wiki/Grimms%27_Fairy_Tales)

पेरोच्या परीकथा (http://www.gutenberg.org/files/29021/29021-h/29021-h.htm)

ॲन्ड्र्यू लॅन्गच्या परीकथा (http://en.wikipedia.org/wiki/Andrew_Lang%27s_Fairy_Books)

राष्ट्रीय पुस्तक न्यास, भारत (नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया) (http://www.nbtindia.gov.in/)

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट (http://www.childrensbooktrust.com/index.htm)

***

बाल'मित्र'

- सुबोध जावडेकर

सुमारे साठ वर्षांपूर्वीची गोष्ट. त्या वेळी मी प्राथमिक शाळेत होतो. एका मराठी मासिकाचा अंक पोस्टानं माझ्या पत्त्यावर आला. अंकाचं नाव होतं 'बालमित्र'. रॅपरवर माझं नाव वाचून झालेला प्रचंड आनंद मला आजही आठवतो. माझ्या वडिलांनी माझ्या नावानं त्या मासिकाची वर्गणी गुपचूप भरली होती. चक्क आपल्या नावावर हा अंक आला याचं मला इतकं अप्रूप वाटलं होतं की त्या दिवशी संध्याकाळी खेळायला न जाता तो अंक वाचून संपवला. तो पुरा झाला तेव्हाच जेवायला उठलो. मग हा नित्यक्रमच झाला. दर महिन्याला 'बालमित्रा'ची वाट पाहायची. अंक आला की रॅपरवरचं आपलं नाव डोळे भरून पाहायचं आणि मग अंकाचा फडशा पाडायचा. त्यातला मजकूर इतका गुंगवून टाकणारा असे, की खेळाचीच काय पण जेवणाचीही शुद्ध राहत नसे.

तसं आमच्या घरात वाचनाचं वातावरण होतं. मुलांसाठी गोष्टीची पुस्तकं आणली जात. आमच्याकडे येणारे बहुतेक पाहुणे माझ्यासाठी साने गुरुजींचं 'श्यामची आई' नाहीतर 'धडपडणारी मुले' घेऊन येत. (त्यामुळे माझ्याकडे 'श्यामच्या आई'च्या सात प्रती जमल्या होत्या आणि 'इसापनीती'च्या तेरा!). 'शालापत्रक' नावाचं, शाळेच्या वेळापत्रकाची कटू आठवण करून देणारं, एक मासिक होतं. 'आनंद' नावाचं एक मासिकही अधूनमधून येत असे. 'चांदोबा'चा अंकही यायचा. बऱ्याचशा वर्तमानपत्रांत रविवारी मुलांसाठी मजकूर असे. 'साधना' नियमित यायचा. त्यात मुलांसाठी एक पान असे. दर वर्षी त्याचा एक कुमार-अंक काढत असत. पण इतकं असलं, तरी 'बालमित्र'ची सर कशालाही नव्हती. असं काय असे 'बालमित्र'मध्ये?

तसं पाहिलं तर 'बालमित्र' अगदी साधा असे. त्यात चित्रं असत. पण ती 'चांदोबा'त असत तशी रंगीत नसत. खेळ, कोडी, विनोद, चुटके हे सगळं जसं 'बालमित्रा'त असे, तसं मुलांसाठी असलेल्या सगळ्याच मासिकांत असे. पण तरीही 'बालमित्र' वेगळा वाटे तो त्यातल्या मजकुरामुळे. त्यातला मजकूर मुलांसाठी असे; पण त्यात मुलांकडे लहान 'पोर' म्हणून पाहिलेलं नसे, तर छोटा 'माणूस' म्हणून पहिलेलं असे. तो वाचताना आपल्याला कुणीतरी बरोबरीच्या नात्यानं वागवतंय, खांद्यावर हात टाकून बोलतंय, असं वाटत असे. त्यांत मुलांना उपदेशाचे डोस पाजलेले नसत. ते वाचल्यानं मुलांवर चांगले संस्कार होत असत; पण ते कळत नकळत. संस्कार करण्याचा अट्टाहास त्यात नसे.

हे सगळं अर्थातच त्या वेळी कळत नव्हतं. ते आज लक्षात येतंय! पण मुलांसाठी असलेल्या सगळ्या पुस्तकांपेक्षा आणि इतर मासिकांपेक्षा 'बालमित्र' निराळा आहे, आपला मित्र आहे, हे कुठंतरी नक्कीच जाणवत असणार. ही सगळी भा. रा. भागवत या व्यक्तीची करामत होती. खऱ्या अर्थानं ते बालमित्र होते.

'बालमित्रा'च्या अंकावर संपादक म्हणून भारांचं नाव असायचं. पण ते तेव्हा आमच्या गावीही नसे. मासिकाला संपादक असतो, तो ते मासिक काढतो, मासिकला रूप देतो, हे समजण्याची अक्कलच त्या वयात नव्हती. खरं सांगायचं तर लेखकाच्या किंवा कवीच्या नावाकडे तेव्हा लक्षही जात नसे. एखादी गोष्ट किंवा कविता आवडायची. ती कुणी लिहिली आहे, त्याला आमच्या लेखी महत्त्व नसेच मुळी!

जगप्रसिद्ध कादंबऱ्यांचे मराठीत केलेले अनुवाद 'बालमित्रा'त क्रमशः प्रसिद्ध होत. भारा स्वतःच त्यांची रूपांतरं करत असत. त्यातली पात्रं मराठी नावं घेऊन, मराठी पेहराव चढवून येत. त्यामुळे ती परकी वाटत नसत. आपल्याच देशात राहणारी, आपल्या संस्कृतीत वाढलेली, आपली भाषा बोलणारी माणसं वाटत.

'बालमित्रा'त अगदी सुरुवातीला वाचलेली कादंबरी म्हणजे 'मायापूरचे रंगेल राक्षस'. त्याआधी कितीतरी गोष्टींमध्ये राक्षस भेटलेले होते. पण ते अक्राळविक्राळ रूपातले. अगडबंब शरीराचे. माणसांना भाजून खाणारे. राजकन्येला पळवून नेऊन तुरुंगात डांबणारे. राजपुत्राचा कुत्रा नाहीतर कावळा करून टाकणारे. मायापूरचे राक्षस मात्र आकारानं अगडबंब असले तरी आधीच्या राक्षसांसारखे दुष्ट नव्हते, प्रेमळ होते - एवढंच आठवतं. बाकी कथानक काही आठवत नाही, पण हे काहीतरी वेगळं आहे, नेहमीच्या पठडीतलं नाही, हे आत कुठंतरी तेव्हाही लक्षात आलं होतं. एका गावातले राक्षस दुसऱ्या गावातल्या राक्षसांकडे पाहुणे म्हणून जेवायला येतात तो त्यातला प्रसंग मात्र चांगलाच आठवणीत आहे. कारण त्या प्रसंगात जेवायला जिलबी, लाडू, श्रीखंड अशी पंचपक्वान्न तर केलेली असतातच पण प्यायला पाण्याऐवजी उसाचा रस ठेवलेला असतो. त्या काळी रस्तोरस्ती उसाच्या रसाची दुकानं नव्हती. क्वचित कधीतरी, सठीसामाशी शेतावरच्या गुऱ्हाळात गेलं, तर रस मिळायचा. अशा काळात प्यायला पाण्याऐवजी उसाचा रस - या कल्पनेनं तोंडाला किती पाणी सुटलं असेल, याची कल्पना आजच्या पिढीला करताच येणार नाही.

त्यानंतर वाचली, ती 'जाईची नवलकहाणी'. लुई कॅरॉलच्या 'ॲलिस इन वंडरलँड'चा हा भावानुवाद. तो भागवतांनी इतका सरस केला आहे की मूळ कादंबरी परकीय आहे याचा पत्ताच लागत नाही. शांता गोखलेंसारख्या काही तज्ज्ञांच्या मते, मूळ कादंबरी दुसऱ्या भाषेत आहे याचा पत्ता न लागणे हे काही चांगल्या अनुवादाचं लक्षण नव्हे. अनुवादात मूळ भाषेचा लहेजा प्रकटला, मूळ वातावरणाचा 'फील' आला, तरच तो चांगला अनुवाद. या व्याख्येनुसार 'जाईची नवलकहाणी' हा काही चांगला अनुवाद ठरत नाही. कारण त्याला 'ॲलिस इन वंडरलँड'चा स्वाद नाही. त्यातली जाई ही 'ॲलिस' न वाटता एक मराठी मुलगी वाटते, असं म्हणून कुणी कितीही नाकं मुरडली तरी बालवाचकांना मात्र त्यात जाईच्या रूपानं शेजारच्या घरात राहणारी मैत्रीण भेटते. 'जाईची नवलकहाणी'मध्ये ससा बोलतो. कासव बोलतं. झाडं बोलतात. पत्त्यातले राजाराणी बोलतात. वस्तुही बोलतात. पण तसं तर सगळ्याच गोष्टींतले पशुपक्षी बोलत असतात. नेहमीच बोलतात. हसतात. रडतात. गातात, नाचतात. इसापनीतीत आणि पंचतंत्रात तर प्राणी युक्तीच्या चार गोष्टीही सांगतात. मग 'जाईची नवलकहाणी'मध्ये असं वेगळं काय आहे, की ती सगळ्या वयाच्या वाचकांना इतकी आवडावी? या प्रश्नाचं उत्तर मला अगदी अलीकडं मिळालं. ते मिळालं 'आशय'च्या या वर्षी प्रसिद्ध झालेल्या विशेषांकातल्या 'वाचनाचेनी आधारे...' या डॉ. आनंद जोशींनी लिहिलेल्या लेखात. एखादी गोष्ट आपल्याला अगदी ठासून, ठामपणे सांगितली तर ती आपल्यापर्यंत पोचत नाही. कानापर्यंत पोचते पण अंतःकरणापर्यंत जात नाही. पण तीच जर सूचकतेनं सांगितली तर मात्र पटते, मनाला भावते. जे सूचक असतं त्याचा आपण आतिथ्यशीलतेनं स्वीकार करतो. तेच जर जोरानं, ओरडून, कंठाळी स्वरात सांगितलं तर आपण त्याचा तिरस्कार करतो. जाईची नवलकहाणीमध्ये लेखकला जे सांगायचं आहे ते अतिशय तरलपणे, सूचकतेनं वाचकासमोर येतं, वाचकांच्या हृदयाला हात घालतं. ही किमया भारांची की लुई कॅरॉलची? सांगता येणार नाही. पण मला वाटतं, त्यातली

जाई ही दूर देशीची ॲलिस न वाटता शेजारी राहणारी आपली मैत्रीण वाटते, त्यामुळे हे घडत असावं. यात भागवतांच्या लेखणीचा वाटा निश्चितपणे अतिशय मोठा आहे.

'बालमित्र'मध्ये 'चंद्रावर स्वारी' या कादंबरीचा पहिला भाग मी वाचला आणि मी थरारूनच गेलो. राजाराण्यांच्या गोष्टी खोट्याखोट्या असतात हे तोपर्यंत कळायला लागलं होतं. प्रेमकथा वाचायचं वय अजून झालं नव्हतं. अशा आडनिड्या वयात दर्जेदार सायन्स-फिक्शन वाचायला मिळणं हा खरोखरच भाग्ययोग होता. 'चंद्रावर स्वारी' हे 'फ्रॉम अर्थ टू द मून' या ज्यूल व्हर्नच्या कादंबरीचं भारतीय रूपडं होतं. नेमका त्याच सुमारास रशियानं अंतराळात पहिला 'स्पुटनिक' उपग्रह सोडला आणि चंद्रप्रवास अचानक शक्यतेच्या कोटीत आला. चंद्रावरच्या स्वारीत एक आगळा वेगळा रंग भरला गेला. भारांनी मला अंतराळयुगात आणून ठेवलं होतं.

'चंद्रावर स्वारी'मध्ये वाचलेला एक प्रसंग मला अजून आठवतो. अंतराळयानातल्या हवेचं शुद्धीकरण करणाऱ्या यंत्रात काहीतरी बिघाड होतो. ऑक्सिजनची पातळी बरीच वाढते. त्याचा परिणाम अंतराळयानातल्या सर्व जणांवर होतो. ते वेड्यासारखे वागायला लागतात. "चंद्रावर जायचंय आम्हांला, माझं मत गामाला" असं काहीबाही बरळायला लागतात. (अल्फा, बीटा आणि गामा ही त्यांच्या कुत्र्यांची नावं. ती त्यांनी बरोबर घेतलेली असतात. तीही वेड्यावाकड्या उड्या मारत भुंकायला लागतात). हे अंतराळप्रवासी आधीच थोडे चक्रम असतात. त्यात ऑक्सिजन प्यायलेले! मग काय विचारता? ऑक्सिजन पिऊन धिंगाणा घालायचा हा प्रसंग भागवतांनी असा काही रंगवलाय की ज्याचं नाव ते!

'चंद्रावर स्वारी' पाठोपाठ 'अदृश्य माणूस' आली. हे एच. जी. वेल्सच्या 'इन्व्हिजिबल मॅन'चं भाषांतर.

आपण अदृश्य होऊन धमाल करावी, हे लहानपणी प्रत्येकाचं स्वप्न असतं. पण अदृश्य होऊन जगताना प्रत्यक्षात किती अडचणी येतात ते 'इन्व्हिजिबल मॅन' वाचताना लक्षात येतं. या खेपेस भागवतांनी वेल्सच्या कादंबरीचं भाषांतरच केलं आहे. रूपांतर नाही. पात्रांची नावं, स्थळं सगळी परकीय. त्यामुळे शंभर वर्षांपूर्वीचं युरोपातलं खेडं, त्यातली खेडवळ माणसं, तिथली खानावळ, सभोवार पसरलेलं धुकं, साठून राहिलेला धूर, सारं काही साक्षात डोळ्यासमोर उभं राहत असे. भागवतांनी या कादंबरीत 'इन्व्हिजिबल मॅन' या मूळ कलाकृतीचा, त्यातल्या वातावरणाचा 'फील' दिला आहे.

मग 'बालमित्रा'त 'झपाटलेला प्रवासी' आणि 'समुद्र-सैतान' या नावानं ज्यूल व्हर्नच्या 'अराउंड द वर्ल्ड इन एटी डेज' व 'ट्वेंटी थाउजंट लीग्स अंडर द सी' ची भाषांतरं एकामागोमाग एक क्रमशः प्रकाशित होऊ लागली. यांतही भागवतांनी पात्रांची मूळ नावं कायम ठेवली आहेत. 'फिलियस फॉग' आणि 'कॅप्टन नेमो'चं 'फाल्गुनराव फुगे' आणि 'कप्तान नेमाडे' केलेलं नाही. ते अर्थातच योग्य आहे, कारण या पात्रांना मराठी साज चढवला असता तर ते फार विनोदी झालं असतं. अलीकडे काही लग्नसभारंभांत सूटबूट घालून डोक्यावर पगडी घालायची फॅशन आली आहे, तसं! या कादंबऱ्या जेव्हा 'बालमित्रा'त प्रसिद्ध होत असत, तेव्हा कथानायकाला एखाद्या बिकट परिस्थितीत सोडून देऊन भागवत 'मग पुढे काय झाले ते पुढील अंकात वाचा' अशी घोषणा करत आणि कथानकावर पडदा टाकत. तेव्हा मात्र मला त्यांचा फार राग येत असे. कारण महिन्यानंतर पुढचा अंक येईपर्यंत माझा जीव टांगणीला लागलेला असे.

भारांनी भाषांतर केलेल्या ज्यूल व्हर्नच्या बाकी कादंबऱ्या ('पाताळलोकची अद्भुत यात्रा', 'सूर्यावर स्वारी' आणि 'मुक्काम शेंडेनक्षत्र') या मात्र 'बालमित्रा'त आल्या नाहीत. कारण तो पर्यंत 'बालमित्र' बंद पडलं होतं. ते चालवताना भागवतांना खूप कर्ज झाल्यामुळे नाईलाजानं त्यांना ते बंद करावं लागलं. पण त्यांची दानत अशी की वर्गणीदारांची उरलेली वर्गणी त्यांनी इमानदारीत परत केली. प्रचंड गाजावाजा करून एखादं नवं मासिक सुरू करत असल्याची घोषणा करायची, लोकांकडून हजारो रुपये वर्गणीच्या रूपानं गोळा करून आपलं 'घरदार' भरून घ्यायचं आणि नंतर काखा वर करून लोकांच्या तोंडाला पानं पुसायची, ही पंधरावीस वर्षांपूर्वी घडलेली हकिगत अजूनही काही जणांना आठवत असेल. या पार्श्वभूमीवर, भागवतांनी स्वतः कर्जात असूनही वर्गणीदारांची उरलेली पैन् पै चक्क मनीऑर्डरनं परत केली होती, ही दंतकथा वाटण्याची शक्यता आहे.

भारांनी अनुवादित केलेल्या एच. जी. वेल्स आणि ज्यूल व्हर्न यांच्या कादंबऱ्यानी मला विज्ञानसाहित्याची ओळख करून दिली. त्याबद्दल मी त्यांचा जन्मभर ऋणी राहीन. 'अपोलो' चांद्रमोहिमेत भाग घेतलेले अंतराळप्रवासी आणि त्या प्रकल्पावर काम करणारे कितीतरी शास्त्रज्ञ 'व्हर्नच्या कादंबऱ्यानी आम्हाला प्रेरणा दिली' असं सांगतात. मला वाटतं, आज 'नासा' आणि 'इस्रो'त काम करणाऱ्या मराठी शास्त्रज्ञांना विचारलं तर 'भारांनी अनुवादित केलेल्या विज्ञानकादंबऱ्यांनी आम्हांला हे क्षेत्र निवडायची प्रेरणा दिली', असं बरेच जण सांगतील. इतकंच नव्हे; तर विज्ञानाच्या इतर क्षेत्रात काम करणारे कितीतरी जणही हेच सांगतील.

मी काही समीक्षक नाही. एक साहित्यिक म्हणून भा. रा. भागवतांचे स्थान, त्यांचे गुणावगुण, त्यांची बलस्थानं, त्यांच्या मर्यादा ह्यांविषयी मला फार काही सांगता येणार नाही. भागवतांचे लेखन मी ज्या वयात वाचलं, त्या वयात हे सगळं जाणण्याइतकी समज नव्हती. (आताही आहे याची खात्री नाही). पण एक विज्ञानकथा लेखक म्हणून भागवतांनी मला खूप काही दिलं. विज्ञानसाहित्याची केवळ ओळख करून दिली असं नाही, तर विज्ञानसाहित्याकडे बघायची एक दृष्टी दिली. विज्ञानसाहित्यातून विज्ञानातला थरार जाणून घ्यायचा असतो, विज्ञान शिकायचं नसतं, हे मला त्यांनी न बोलता सांगितलं. विज्ञानकथा ही माणसांची कथा असते, विज्ञानाची असत नाही, हे त्यांनी अनुवादित केलेल्या कथा-कादंबऱ्या वाचून मी शिकलो.

मीच काय, आमची सगळी पिढीच त्यांची आजन्म ऋणी राहील.

***

'बालमित्र'चे मुखपृष्ठचित्र : भागवत कुटुंबीयांकडून.

'अदृश्य माणूस'चे मुखपृष्ठचित्र : स्नेहल नागोरी यांच्याकडून.

***

भारा: एक स्मरणरंजन

- निरंजन घाटे

मला वाचायची गोडी लागण्यासाठी आणि त्या गोडीचं व्यसनात रूपांतर होण्यासाठी जे दोन महाभाग कारणीभूत ठरले, त्यांतले अेक म्हणजे भा. रा. भागवत. दुसरे म्हणजे बाबूराव अर्नाळकर, ज्यांच्यावर मी आधी लिहिलं होतं. भा. रा. भागवतांच्या निधनानंतर जी शोकसभा झाली तिला जेमतेम दहा-बारा माणसंच अुपस्थित होती, त्याचं मला फार वाअीट वाटलं होतं. त्या वेळी मी त्यांच्यावर अेक लेख लिहिला होता. त्या काळात तो छापून आला; पण तेव्हा त्या लेखावर जागेअभावी जे संस्कार झाले, त्यांमुळे भा. रा. भागवतांवर पुन्हा अेकदा अन्याय झाला.

१९५३ साली लहान मुलांसाठी जी मासिकं होती, त्यांत 'चांदोबा' हे मासिक आघाडीवर होतं. ते जरी मराठीत असलं, तरी त्यातली भाषा मराठी नसे. मूळ तमिळ मासिकातली चित्रं तशीच ठेवून अुरलेल्या जागेत मूळ मजकुराचं भाषांतर कोंबून बसवलं जायचं. त्याचा अेक फायदा असा झाला, की त्यामुळे भा. रा. भागवत अधिकच जवळचे वाटायला लागले. पुण्यात स्थिर झाल्यावर, साधारणपणे १९५४ साली 'आनंद', 'शालापत्रक' आणि 'बालमित्र' ही तीन मासिकं मी वाचनालयातून घरी आणू लागलो. तेव्हा मी चौथीत होतो; पण ज्याला खरोखरच सायकलींचं आणि टांग्यांचं शहर म्हणता येईल, अशा पुण्यामध्ये मी दोन चौक आणि बाजीराव रस्ता ओलांडून किताबमिनार वाचनालयात जाअू शकत होतो.

'बालमित्र'चा अंक भा. रा. भागवत काही वेळा अेकटाकी लिहीत असत. पुढे त्यांना भेटलो, तेव्हा त्यांनी त्यांची काही टोपणनावंही सांगितली होती, ती टिपून ठेवायला हवी होती. त्या वेळी ते सुचलं नाही, हे खरं. 'रॉबिन हुड' हा त्यांनी मिळवून दिलेला पहिला दोस्त. 'शिंग फुंकिता रॉबिन हुडचे, शेरवुड जंगल भंगेल। गडी लोटतील रंगेल।' यांसारखी ठसकेदार वाक्यं अजूनही लक्षात आहेत. ते पुस्तक 'चिरंजीव लविंद्ल भाक्कल भागवत' ह्याला अर्पण केलंय. मी त्यांना त्या अर्पणपत्रिकेची आठवण करून दिली; तेव्हा ते मनापासून हसले. "अहो, तो आता चाळिशीत आहे!" ते म्हणाले.

"तुम्हांला त्या ओळी पाठ आहेत?" त्यांनी विचारलं. हे अर्थात 'शिंग फुंकता'ला अुद्देशून होतं. "माझ्या मुलाच्याही त्या आवडत्या ओळी आहेत," मी म्हणालो. भारांनी आमच्या घरातल्या दोन पिढ्यांमध्ये कधीच दुरावा निर्माण होणार नाही, ह्याची काळजी घेतली होती.

'मायापूरचे रंगेल राक्षस' हा विषय आमच्या घरात काढून बघा. माझ्या आधी माझा मुलगा त्या पुस्तकाबद्दल भरभरून बोलेल. घंटासुराच्या त्या राज्यात तो अजूनही माझ्याअितकाच रमतो. 'मारीचदुर्ग, मारीचदुर्ग' अशी हाळी देत निघालेल्या घंटासुराच्या सैन्यातला अेक जण 'भारीच दूर गं, भारीच दूर गं' असं म्हणतो, तेव्हा वाचकाच्या चेहऱ्यावरती हास्य आलं नाही तर तो खरा वाचकच नाही, असं मी ठामपणे म्हणू शकतो. घंटासुराला पाळणा पुरेना म्हणून अेक पूल आणून अुलटा टांगायची कल्पना किंवा त्या मारीचदुर्गावरून तोफगोळे झाडले जातात, तेव्हा, "कुठला किल्ला कसला हल्ला, ह्या डासांनी जीवच खाल्ला!" म्हणणारा घंटासूर, हा माझ्या दृष्टीनं अमर आहे. लाडवांचें युद्ध, सगळं अुलटं बोलणारे 'कस्तमहामगुरुजी' हे मी विसरूच शकत नाही.

भारांचं वैशिष्ट्य म्हणजे काही गोष्टी ते मूळ गोष्टींपेक्षा रंगवून, भारतीय करून रसाळ शैलीत सांगायचे. 'भुताळी जहाज' आपल्या मानगुटावर बसलं, की पुस्तक वाचून संपलं तरी ते आपल्या मानगुटावरून अुतरत नाही. तर 'ॲलिस अिन वंडरलँड'चं रूपांतर त्यांनी ज्या सहजतेनं 'जाअीची नवलकहाणी'मध्ये केलं, ते वाचून आजही थक्क व्हायला होतं. भारांनी ज्यूल्स व्हर्न आणि अेच्. जी. वेल्स यांच्या विज्ञानकथा मराठीत आणल्या खऱ्या; पण त्यांचे खरे आवडते लेखक लुअी कॅरॉल आणि 'ल मिझराब्ल'चा लेखक व्हिक्टर ह्यूगो हेच असावेत, असं त्यांच्या बोलण्यावरून वाटायचं. त्यांनी 'जे का रंजले गांजले', 'त्यांसी म्हणे जो आपुले', 'तोचि साधु ओळखावा,' 'देव तेथैंचि जाणावा' अशा चार भागांत 'ल मिझराब्ल'चा अनुवाद केला होता. नंतर 'जाँवालजाँची कहाणी' म्हणून त्याचा संक्षेपही प्रसिद्ध झाला.

भारांचं हे लिखाण वाचून मी प्रभावित झालो, हे खरं. पण त्यांना मी मानतो ह्याचं खरं कारण म्हणजे त्यांनी मला विज्ञानकथेचा मार्ग दाखवला. त्यांनी तसं लिहिलं, म्हणून त्यांच्या ह्या विज्ञान कादंबऱ्या अनुवादित आहेत हे कळत असे. 'अिन्व्हिजिबल मॅन' वाचताना तर मी 'पुढंमागं अदृश्य व्हायचं रसायन कसं तयार करायचं आणि कुणाकुणावर सूड कसा अुगवायचा' याची अेक मोठी यादीच तयार केली होती. त्यात अर्थातच शाळेतल्या शिक्षकांचा भरणा अधिक होता. भारांचा (म्हणजे मुळात अेच. जी. वेल्सचा) अदृश्य माणूस मनात अितका घट्ट बसला होता, की त्या काळात लोकप्रिय झालेला 'मि. अेक्स' हा चित्रपट बघून नैराश्य आलं. चांगल्या कथेची हिंदी चित्रपट कशी वाट लावू शकतात, हा विचार तेव्हा प्रथम मनात डोकावला.



मला वाटतं, भारांनी जवळ जवळ सगळा ज्यूल्स व्हर्न पूर्णपणे मराठीत आणला. 'अैंशी दिवसात जगाची चक्कर' (अराअुंड द वर्ल्ड अिन अेटी डेज), 'समुद्रसैतान' (ट्वेंटी थाअुजंड लीग्ज अंडर द सी), 'मुक्काम शेंडे नक्षत्र', 'सूर्यावर स्वारी', 'पाताळलोकची अद्भुत यात्रा' (जर्नी टू द सेंटर ऑफ दी अर्थ), अशा व्हर्नच्या अेकापेक्षा अेक भारी भारी विज्ञान कादंबऱ्या त्यांनी मराठीत आणल्या. कॅप्टन नेमो, फिलिअस फॉग अशी त्यांतल्या प्रमुख पात्रांची नावं अजूनही लक्षात आहेत. अेच. जी. वेल्सच्या 'फर्स्ट मेन ऑन द मून' (चंद्रावर स्वारी), 'इन्विजिबल मॅन' (अदृश्य माणूस) आणि 'आयलंड ऑफ डॉ. मोरॉ' (सैतानी बेट) अशा निवडक कादंबऱ्यांचाच त्यांनी अनुवाद केला.

१९८६ च्या सुमारास 'अुत्कर्ष बुक सर्व्हिसेस्'मध्ये त्यांची नि माझी पहिली भेट झाली. त्याआधी मी त्यांना भेटायचा प्रयत्न केला होता. त्या वेळी ते मुंबअीत 'केनेडी ब्रिज'जवळ राहत होते; पण मी गेलो तेव्हा घरी नव्हते. 'अुत्कर्ष'मध्ये मी त्यांना पहिल्यांदा भेटलो, तेव्हा आमच्या गप्पा अितक्या रंगल्या, की आम्ही 'अुत्कर्ष'च्या सुधाकर जोशींना भेटायला तिथं आलो होतो, हे ते आणि मी, दोघंही विसरूनच गेलो. "हे भा. रा. भागवत," असं जोशींनी सांगताच मी भारांच्या पाया पडलो. त्यांना म्हणालो, "तुम्हांला गुरुस्थानी मानलं खरं. मात्र तुमच्याअितक्या सहजसोप्या भाषेत लिहिणं खरंच अवघड आहे." ते हसले. "'ब्लॅकबीअर्ड्स गोस्ट'चं 'भुताळी जहाजा'त रूपांतर करतांना काही अडचणी आल्या का?" असं मी विचारलं, तेव्हा त्यांनी मला अेक गुरूमंत्र दिला, "आपणच रॉबिन हुड किंवा ब्लॅकबीअर्ड बनायचं. त्या धुंदीत सगळं जमून जातं."

अेकदा 'सिंहगड रस्त्या'वरच्या 'आनंद नगर'मधील त्यांच्या बंगल्यावर थडकलो. त्या काळात दूरध्वनी यंत्रणांचं जाळं अेवढं पसरलेलं नव्हतं. सरळ जाअून दार ठोठावणे, अशीच भेटायची पद्धत होती. भारा व्हरांड्यात अेका आरामखुर्चीत बसलेले होते. बाहेर हिरवळीवर दोन दगडी कासवं हळूहळू अेका कोपऱ्यात ठेवलेल्या गाजराच्या तुकड्यांच्या आणि कोबीच्या पानांच्या दिशेनं सरकत होती. "या!" म्हणून त्यांनी स्वागत केलं. बोलता बोलता त्या कासवांचा विषय निघाला. "ती मला त्रास देत नाहीत, मी त्यांना त्रास देत नाही. त्यांच्याकडे बघता बघता विचारांना दिशा मिळते. लेखनाचा आराखडा तयार होतो. वेळही चांगला जातो."

भारांनी फास्टर फेणेमुळे अमाप लोकप्रियता मिळवली. त्यांच्या बिपिन बुकलवारनेही खपाचे (मराठीपुरते) विक्रम केले. मी त्यांना विचारलं, "ज्यूल्स व्हर्न आणि अेच्. जी. वेल्स सोडून अिकडं कसे वळलात?" त्यांनी सांगायला सुरुवात केली. " 'बालमित्र' ही माझी हौस होती. हौसेला मोल नसतं हे खरं नाही. हौसेपोटी काही हजारांचं कर्ज झालं." ही १९५५ च्या सुमारास घडलेली घटना. आज कुणाची बिलं थकवता येत नाहीत; पण तेव्हा लोक अुधारी चालवून घ्यायचे. अर्थात त्यालाही काही मर्यादा होत्या. राजपत्रित अधिकाऱ्यांनासुद्धा चार आकडी पगार नसे, त्या काळात काही हजारांचं कर्ज ही मोठी आपत्ती होती. तेव्हा 'बालमित्र'मध्ये प्रसिद्ध झालेल्या सर्व कादंबऱ्यांचे हक्क त्यांनी कर्जफेडीच्या बदल्यात अेका प्रकाशकाला विकले आणि सर्व देणी भागवली. मग पुढे काय, हा प्रश्न सोडवायला काही वर्षं जावी लागली. त्यातून फास्टर फेणे जन्माला आला.

भारांनी पूर्ण वेळ लिहिण्याला वाहून घेतलं त्याची हकिगत त्यांच्याच 'भाराभर गवत' ह्या 'सँपलर'मध्ये, म्हणजे त्यांच्या लिखाणाच्या नमुना-पुस्तकात, बघायला मिळते. ते 'ऑल अिंडिया रेडियो'मध्ये निवेदक म्हणून काम करत होते. त्या वेळी स्वातंत्र्याची चळवळ जोरात होती. 'वंदे मातरम्' म्हणणं हा गुन्हा होता. देशभक्तीनं पेटलेल्या भारांनी अेक दिवस निवेदन संपवल्यावर 'वंदे मातरम्! भारत माता की जय' अशी घोषणा दिली आणि केंद्राच्या नोकरीचा राजीनामा दिला. ते चक्क भूमिगत झाले.

बाबूराव अर्नाळकरांच्या बरोबरीने भा. रा. भागवत, द. पां. खांबेटे आणि नारायण धारप हे माझे आवडते लेखक. आपण अमेरिकी वाङ्मयाची अुधार-अुसनवारी केली, हे ह्या चौघांनीही मोकळ्या मनानं मान्य केलं. चौघांच्याही लेखनाचा स्रोत म्हणजे मुंबअीच्या पदपथांवर सहज अुपलब्ध होणारी 'पल्प' (म्हणजे पुनर्चलनात आणलेल्या कागदावर छापलेली) पुस्तकं आणि नियतकालिकं (ह्यांना 'पल्प मॅगेझीन्स' म्हणत असत). त्यावरूनच आपल्या '९ आणे-माला', '४ आणे-माला' सुरू झाल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सैनिकांच्या करमणुकीसाठी जहाजं भरभरून ही पुस्तकं आणि मासिकं भारतात येत असत. त्यांतली काही भारतातल्या शहरांतल्या पदपथांवर येत. आणा-दोन आण्याला हा कच्चा माल बऱ्याच लेखकांना अुपलब्ध होत असे. काही लेखक ते मान्य करत. काही लेखक त्याआधारे लेखकराव बनत असत. हे चौघं मात्र असे लेखकराव नव्हते.

'अुडती छबकडी' ह्या १९६६ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत भारांनी म्हटलंय, "मुंबअीच्या फुटपाथवर 'अस्टाअुंडींग स्टोरीज', 'अस्टाअुंडिंग सायन्स फिक्शन' यांसारखी मासिकं मला अुपलब्ध होत. त्यांतली मध्यवर्ती कल्पना मी अुचलत असे."

पुढं त्यावर हे चौघंही जो भारतीय साज चढवीत असत, ती किमया त्यांच्या लेखणीचीच होती. खांबेटे आणि धारपसुद्धा त्यांच्या कथांबद्दल बोलतांना मूळ कल्पना कुठली हे सांगत असत. अर्नाळकर ते खाजगीत मान्य करत असत. ह्या माझ्या आवडत्या लेखकांपैकी भा. रा. भागवतांवर मात्र बालसाहित्यिक हा शिक्का

अुगीचच बसला होता. आपल्या देशात, का कोण जाणे, विज्ञानकथा-कादंबऱ्या हा प्रांत प्रौढांचा आणि प्रगल्भ वाचकांचा नाही, असा अेक गैरसमज पसरला आहे. असं का, हे खरं तर कोडंच आहे. खरं म्हणजे अमेरिकेत मार्क ट्वेनपासून अनेक महत्त्वाच्या लेखकांनी विज्ञानकथा-कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'हा वाङ्मयप्रकार हाताळायला अवघड आहे' असंही त्याबद्दल म्हटलं आहे. आयझॅक ॲसिमॉव्हला 'राष्ट्रीय ठेवा' म्हणून घोषित केले गेले. रॉबर्ट हाअीनलाअीननं चंद्रप्रवास किमान पंचवीस वर्षे लवकर घडवून आणला, म्हणून 'नासा'नं त्याचा सत्कार केला. अनेक मान्यवर शास्त्रज्ञांनी विज्ञानकथा लिहिल्या. 'नासा'तले ६०% किंवा त्याहून अधिक शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ विज्ञानसाहित्य वाचून अवकाश-संशोधनाकडं वळले. रशियन अवकाशवीरांनी 'अवकाशप्रवासात कुठली पाच पुस्तकं बरोबर घ्याल' ह्या प्रश्नाला जे अुत्तर दिलं, त्यात बहुतेक सर्वांनी दोन तरी विज्ञानकथा-कादंबऱ्या नमूद केल्या. आपण मात्र भारांवर बालसाहित्यिक असा शिक्का मारून त्यांना दुर्लक्षित ठेवलं.

भा. रा. भागवत आम्हांला का आवडले? माझे बरेच समकालीन, तसंच शाळासोबती हे भारांचे चाहते होते आणि आजही ते नातवंडांसाठी भारांची पुस्तकं आणायला प्रदर्शनातून आवर्जून हिंडतात. भारांची सोपी-सुटसुटीत, नादपूर्ण वाक्यं, त्यांच्या लेखनातला तरल विनोद, अेखादा प्रसंग वाचकाच्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा अुभा करण्याची चित्रमयी वर्णनशैली, ह्यांमुळं भारांनी वाचकांना मोहित केलं होतं. पुढंही 'एका चिन्याचा जमालगोटा', 'दुर्मिळ तिकिटाची साहसयात्रा' ह्या पुस्तकांच्या नावांमुळेच आपण त्या पुस्तकांकडे आकृष्ट होतो.

भारांना मी जेव्हा भेटलो, तेव्हा ते सत्तरीच्या पुढे होते. पण त्यांच्या चालण्याबोलण्यातला अुत्साह बघितला की फास्टर फेणे त्यांच्याच लेखणीतून अुतरला हे तर पटत असेच; पण अितर कुणालाही त्यांच्यासारखा फास्टर फेणे लिहिणं जमलं नसतं, हेही पटायचं.

मी भारांना चार-पाच वेळा भेटल्याचं अलीकडेच मी कुणालातरी सांगितलं. तो गृहस्थ म्हणाला, "तू भाग्यवान आहेस, लेका! आधी का सांगितलं नाहीस? मलाही त्यांना भेटावंसं खूप वाटायचं!"

ज्या लेखकांना आपल्याकडे मुख्य साहित्यप्रवाहात स्थान नाही, अशा अनेक लेखकांबद्दल अशा प्रतिक्रिया अैकल्या आहेत. माझ्या आवडत्या भारांना भेटायची अिच्छा असलेले अितरही अनेक जण असतील. त्यांची आणि भारांची भेट घडवून आणण्याची अेक संधी या लेखाच्या निमित्ताने मला मिळते आहे. ३१ मे २०१५ रोजी त्यांची १०५ वी जयंती आहे. या वेळी त्यांचे चाहते 'ऑनलाअीन' अेकत्र येताहेत हे कळलं, त्यांच्यासाठी ही भारांची स्मरणभेट.

***

'चंद्रावर स्वारी'चे चित्रः जालावरून साभार.

'उडती छबकडी'चे चित्रः भागवत कुटुंबीयांकडून.

संपादकीय टिपणः लेखातील स्वरलेखनाची विशिष्ट पद्धत मूळ लेखनाबरहुकूम राखली आहे. तसेच लेखकाच्या इच्छेनुसार 'Jules Verne' या नावाचा उच्चार 'ज्यूल्स व्हर्न' असा ठेवला आहे.

***

भा. रा. भागवत यांचे भाराभर आभार

- जयंत नारळीकर

मला वाचनाची गोडी लागली लहानपणापासूनच. मी आणि माझा धाकटा भाऊ झोपायच्या मार्गावर असताना आमची आई (तिचे घरचे नाव 'ताई') आम्हांला गोष्टी वाचून दाखवीत असे. मूळ गोष्ट इंग्रजी, हिंदी किंवा मराठीत असली तरी आमचे माध्यम होते 'मराठी'. अर्थात ताईचा स्वतःच्या गोष्टींचा साठा अफाट होता. त्यांत पौराणिक गोष्टी आणि परीकथा प्रामुख्याने असत. पण हा साठा संपल्यावर तिने पुस्तके वाचून दाखवण्याचा प्रघात चालू केला. इंग्रजीत वुडहाउस, कॉनन डॉएल, हिंदीत 'चंद्रकांता' आणि 'बेढब बनारसी', तर मराठीत चिमणराव, वीरधवल आदींचा खुराक आम्हांला पुष्कळ दिवस पुरेल असा होता.

पण ह्या गोष्टी एका रात्रीत संपणाऱ्या नसत. 'अरेबियन नाईट्स'मधल्या शाहजादीप्रमाणे ताई गोष्ट अर्धवट सांगून "आता उद्या पुरी करू, झोपा आता!" असे फर्मान सोडे. झोपेचा अंमल वाढत असताना ह्या फर्मानाला विरोध करण्याच्या स्थितीत आम्ही नसू. पण गोष्टीत पुढे काय झाले हे जाणून घ्यायची उत्सुकता तर असे. अखेर त्यावर मला तोडगा मिळाला!

तो तोडगा होता स्वावलंबनाचा. दिवसा शाळा, घरचा अभ्यास, खेळ यांतून वेळ काढत मी स्वत: गोष्टी वाचायला लागलो. आदल्या रात्री ताईने अर्धवट सोडलेली गोष्ट पुरी करण्यापासून ह्या वाचनाची सुरुवात झाली व क्रमशः मी स्वतः निवडलेली पुस्तके वाचू लागलो. त्यासाठी निवडलेली पुस्तके अर्थातच वाचायला सोपी असत.

अशा वेळी मला भा. रा. भागवतांची काही पुस्तके वाचायला मिळाली; ती खास शाळकरी मुलांसाठी लिहिलेली होती. अशा माध्यमाचा मला पुष्कळ फायदा झाला. उदाहरणार्थ इंग्रजीत व्हिक्टोरियन जमान्यात गाजलेले पुस्तक 'King Solomon's Mines' . ते मला त्या वयात वाचायला अवघड वाटले होते. पण भागवतांनी लिहिलेला त्याचा मराठी संक्षिप्त अवतार 'राजा सुलिमानचा खजिना' माझ्या आवाक्यातला होता!

अर्थात अशा एका यशस्वी उदहरणाने प्रश्न संपत नाही.मला भारांच्या इतर पुस्तकांबद्दल उत्सुकता निर्माण झाली. मी पहिल्यांदा वाचलेली पुस्तके ('८० दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा', 'तीन शिलेदार', आदी) मला महाराष्ट्रातून आलेल्या पाहुण्यांकडून भेट म्हणून मिळाली होती. आम्ही राहत होतो बनारसमधे. तिथे मराठी पुस्तके मिळण्याचे ठिकाण नव्हते. अशा वेळी माझे वडील कामानिमित्त मुंबईला गेले, तर स्वतःकरिता पुस्तके घेताना (त्यांचे आवडते दुकान 'न्यू बुक कंपनी', हॉर्न् बी रोड) माझी ऑर्डरपण लक्षात ठेवत. एरवी २/४ वर्षांतून एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत मुंबई - पुणेमार्गे आमची कोल्हापूरला भेट व्हायची. त्या वेळी विकत घेतलेल्या पुस्तकांत भारांचे वाङ्मय हटकून असे.

आज मागे वळून पाहताना 'क्लासिक' समजली जाणारी अनेक पुस्तके सोप्या मराठीत रूपांतरित करून भारांनी ६०-६५ वर्षांपूर्वी माझ्यासारख्या शाळकरी मुलावर जे उपकार केले, त्यासाठी आज त्यांचे भाराभर आभार मानीत आहे. इंग्रजीतील विख्यात वाङ्मय अशा तऱ्हेने माझ्या परिचयाचे झाले आणि पुष्कळ वर्षांनी ते मूळ इंग्रजीत वाचणे सोपे गेले.

वरील वर्णन लिहून झाल्यावर मला भारांचे आणखी लिखाण वाचायला मिळाले. निवडक विज्ञान कादंबऱ्यांचे मराठीत रूपांतर करून भागवतांनी शाळकरी मुलांपुढे ह्या वेगळ्या प्रकारच्या साहित्य मांडले. ही पुस्तके वाचताना मला स्वतःला आपण परत 'टीन एजर' झालो असे वाटले! कारण एच्. जी. वेल्स् आणि ज्यूल व्हर्न यांचे विज्ञानकथाविश्व मी मूळ इंग्रजीमधून अनुभवले असले, तरी भारांच्या खास शैलीतली रूपांतरे वाचताना मी सहजगत्या 'त्या' वयोगटात गेलो आणि तेही नकळत, स्वाभाविकपणे.

उदाहरणार्थ एच्. जी. वेल्सच्या 'अदृश्य माणसा'चे कथानक मूळ इंग्रजीत वाचताना मनोवेधक वाटते, तसेच विचारप्रवर्तकही. शाळकरी वाचकाला त्यातील बरेच भाग 'जड', म्हणजे कळायला - अनुभवायला अवघड, वाटतील. भारांच्या रूपांतरात कथानक सहजगत्या कळण्याजोगे आहे. आणि त्याच वेळी कादंबरीतला वैज्ञानिक पाया मूळ लेखकाला अपेक्षित असाच आहे. शिवाय हुशार, कल्पक वैज्ञानिक संशोधक नीतिमत्ता झुगारून वागायला लागला तर तो समाजकंटक होतो हा संदेश शाळकरी वाचकापर्यंत पोचवण्यात रूपांतरकार यशस्वी होतो. वास्तविक, शालेय वाचकाना कथानकाशी खिळवून ठेवताना आणि संक्षिप्त आवृत्तीची बंधने पाळताना असे यशस्वी लेखन किती अवघड असते ते लेखकच जाणे.

विज्ञानकथांच्या विश्वात आदिपुरुषांत गणले जाणारे ज्यूल व्हर्न यांचे लेखन किशोरवाचकांपर्यंत मराठीतून पोचवण्यात भारांनी लक्ष घातले ही विज्ञानकथासाहित्याच्या दृष्टीने महत्त्वाची घटना होती. अमुक अमुक प्रकारच्या गोष्टीला विज्ञानकथा म्हणायचे हे पाठ्यपुस्तकीय रटाळ परिभाषेत न सांगता ज्यूल व्हर्नच्या लेखनाच्या रूपांतराद्वारे सहजगत्या सांगण्याचे काम भागवतांनी केले, त्याबद्दल मराठी साहित्य त्यांचे सदैव ऋणी राहील. विज्ञानकथा म्हणजे सदैव अंतराळयात्रा नसते हे भागवतांनी रूपांतरित केलेल्या व्हर्नच्या '८० दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा'मधून कळते. एरवी कथानक साहसकथेसारखे वाटले, तरी शेवट अनपेक्षित असून त्यामागे एक वैज्ञानिक तथ्य आहे. हे तथ्य पाठ्यपुस्तकातून सांगितले तर विद्यार्थ्यांना (सध्याच्या शिक्षणपद्धतीतल्या!) कळेल की नाही ही शंकाच आहे. पण ह्या विज्ञानकथेत ते कथानकातील उत्कर्षबिंदू म्हणून येते आणि वाचकांना विचार करायला लावते.

म्हणून गाजलेल्या विज्ञानकथा-कादंबऱ्या मराठीत रूपांतरित करायची किमया करून दाखवणाऱ्या भा. रा. भागवतांना अनेक धन्यवाद - माझ्यासारख्या वाचकाकडून...

***

टिपा:

भारांच्या विज्ञानाधारित लेखनात काही त्रुटी सापडल्या. त्यांची (उदाहरणार्थ) नोंद :-

१. पाताळलोकची अदभुत यात्रा : "अस्ति उत्तरस्यां दिशिदेवतात्मा..." हा श्लोक 'रघुवंशा'तला नाही. तो 'कुमारसंभवा'तला पहिला श्लोक आहे.

२. चंद्रावर स्वारी : गोळा 'दिसला पाहिजे' याकरिता त्याचा व्यास ६० फुटांपेक्षा कमी का चालणार नाही?

३. धूमकेतूच्या शेपटावर / शेंडे नक्षत्र / चंद्रावर स्वारी : यांत weightlessness चा उल्लेख का नाही?

***

चित्रः जालावरून साभार

***

बालसाहित्याचा दीपस्तंभ

- सौ. नीला धडफळे

गेली अनेक वर्षे बालवाचकांना आकर्षित करणाऱ्या मोजक्याच मराठी लेखकांमध्ये भास्कर रामचंद्र भागवत यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. बालसाहित्यातली त्यांची कामगिरी केवळ अनन्यसाधारण अशी आढळते. कथा, कादंबरी, नाटक, विनोदी लेखन, अनुवाद या सर्व साहित्यप्रकारांत भागवतांच्या लेखणीने स्वैर संचार केलेला असला, तरी बालसाहित्यकार म्हणून जनमानसांत त्यांची प्रतिमा सुस्थिर झाल्याचे निदर्शनास येते.

भारांनी अनेक प्रकारचे लेखन केले. साहस, विज्ञान, निर्मळ विनोद त्यांच्या लेखनात डोकावत असे. त्यांचे सुरुवातीचे प्रौढांसाठीचे लेखन ('वैतागवनांतील वाफारे' आणि 'माझा विक्रम' - दोहोंचे प्रकाशनवर्ष १९३९) हे विनोदी आणि विडंबनात्मक होते. शाब्दिक कोट्यांनी युक्त असलेले ते लेखन खुमारीचे असल्याचे जाणवते. त्यांच्या कोट्यांमधून निर्भेळ आनंद सापडतो.





वि. स. खांडेकर, ना. धों. ताम्हनकर, न. चिं. केळकर यांनी भारांच्या पहिल्यावहिल्या पुस्तकाची ('वैतागवनांतील वाफारे') प्रशंसा करताना 'निर्मळ' आणि 'निरागस' अशी विशेषणे वापरली आहेत. प्रौढांसाठीच्या इतर लेखनात (म्हणजे 'संत्रस्त' आणि 'भाराभर गवत' या कथासंग्रहांत) त्यांची विनोदी वृत्ती अधिकच जाणवते.

मराठीतील उत्कृष्ट विनोदी कथासंग्रहात संपादक राम कोलारकर ह्यांनी भा. रा. भागवतांच्या वीस कथांचा समावेश केलेला आहे, ही एकच बाब भारांची विनोदी कथालेखनातील निपुणता सिद्ध करण्यासाठी पुरेशी आहे. पण त्यांच्यावर विनोदी कथालेखकाचा शिक्का मात्र बसला नाही, कारण त्याच एका प्रांतापुरते त्यांनी स्वत:ला बंदिस्त करून घेतले नाही. विविध विषयांवर त्यांचे लेखन झाले.

लहान मुलांसाठी काळजीपूर्वक लेखन करणारे भारा हे प्रौढसाहित्यात मात्र काही वेळा टीकास्त्राचा वापर करत. हिंदुमहासभा आणि सावरकर ह्यांवरचा त्यांचा लेख हे याचे एक उदाहरण.

पोरवयात घरातल्या साहित्यप्रेमी पोषक वातावरणामुळे त्यांनी 'वसंत' नावाचे मासिक काढले होते. एवढेच नव्हे, तर बालपणी त्यांनी त्यांची आतेबहीण दया परांजपे हिच्या मदतीने 'निळे पाकीट' या रहस्यमय कादंबरीचे लेखन केले. सुदैवाने ते छापूनही आले. वयाच्या दहाव्या वर्षी भागवतांची मांजरीवरील कविता 'आनंद' मासिकात छापून आली होती. त्याच सुमारास त्यांनी चित्रावरून लिहिलेली एक गोष्ट 'बालोद्यान' ह्या मासिकात प्रसिद्ध झाली होती.

भारांचे वडील रामचंद्र भास्कर भागवत हे निरीश्वरवादी सुधारक होते. रँग्लर परांजपे यांच्याबरोबर ते वर्षानुवर्षे 'प्राईड अँड प्रेज्युडिसचे' वाचन करीत असत. भारा हे त्यांच्या वडिलांविषयी एके ठिकाणी लिहितात, "मुलींचीही मुंज केली पाहिजे असे ठासून सांगणारे माझे वडील पक्के रॅशनालिस्ट. धार्मिक कर्मकांड त्यांना मान्य नव्हते." या सुधारणावादी वातावरणामुळे भारांच्या लेखनात अंधश्रद्धेला विरोध करणारी व वास्तववादी कथासूत्रं वारंवार येतात.

बालपणीसुद्धा भारा हे भावंडांना गोष्टी सांगत, छोट्याछोट्या गोष्टी लिहीत. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ही उक्ती त्यांच्याबाबतीत चपखल ठरते. लहानपणापासून इंग्रजी पुस्तकांच्या वाचनाची त्यांना आवड होती. शालेय जीवनात 'माय मॅगझिन' हे पुस्तक/नियतकालिक आणि गिबन्स, डिकन्स, थॅकरे तसेच ह. ना. आपटे, विष्णूशास्त्री चिपळूणकर ह्यांचे साहित्य ह्यांमुळे प्रभावित होऊन भारांनी बालवयातच लेखन सुरू केले.

भारांनी इंग्रजी नियतकालिकातूनही विनोदी-कथालेखन केले. तथापि त्यांच्या इंग्रजी कथालेखनाची माहिती फारशी कोणाला नाही. त्यांना जात्याच लहान मुलांची आवड असल्याने त्या आवडीचा ठसा त्यांच्या साहित्यनिर्मितीवर उमटला.

मुलांविषयी प्रेम, आपुलकी व त्यांच्याशी गप्पा मारण्याचा छंद असल्यामुळे त्यांनी 'प्रकाश' ह्या साप्ताहिकात बालसाहित्यासाठी एक पूर्ण स्तंभ राखून ठेवला होता. यातून त्यांना बालसाहित्याच्या क्षेत्रात काही करायची ओढ सुरुवातीपासून होती हे ध्यानात येते. त्यांच्या ह्या अभिनव उपक्रमाला इतर साप्ताहिकांनीही उचलून धरले. आजही अनेक दैनिकांत/नियतकालिकांत बालसाहित्याला वाहिलेली जागा असते. या प्रथेचे जनकत्व भा. रा. भागवतांकडे जाते.

भारा हे उत्तम पत्रकारही होते. दैनिक सकाळ, साप्ताहिक प्रकाश आदींमधून त्यांनी लेखन केले. पण कलंदर स्वभावामुळे पत्रकारितेचा त्याग करून त्यांनी आपला मोहरा 'वहाँ' या चित्रपटाच्या (१९३७) कथालेखनाकडे वळवला. पण दिग्दर्शक के. नारायण काळे यांनी त्या कथेत एवढे बदल केले, की सात्त्विक संतापाने भागवतांनी, "ही कथा माझी नव्हे" असा पुकारा करत प्रभात चित्रपटसंस्थेतून राजीनामा दिला.

मुलांमध्ये रमणारे, मुलांत मूल होऊन राहणारे, मुलांसाठी स्वतंत्र साहित्यविश्वाची उभारणी करणारे भा. रा. भागवत यांच्याविषयी ज्येष्ठ साहित्यिक राजा मंगळवेढेकर खालील उद्गार काढतात: "भारांच्या सगळ्या लेखनात उत्कटतेने जाणवतो तो त्यांच्या ठायी असलेला निर्मळ, निरलस आणि टवटवीत असा सुंदर बालभाव."

भारतातील, महाराष्ट्रातील तत्कालीन घडामोडींचं प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात उमटत असे. त्याची उदाहरणे म्हणजे 'फास्टर फेणेची काश्मिरी करामत', 'गुलमर्गचे गूढ आणि फास्टर फेणे', 'फास्टर फेणेचा रणरंग', इत्यादी.

परकीय साहित्याच्या परिशीलनाने भारांनी मराठीतील बालवाचकांना सकस साहित्य उपलब्ध करून दिले. लहानपणापासून इंग्रजी पुस्तकांचे वाचन असल्याने अनेक इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद त्यांच्या हातून घडले. बालवाचकांप्रमाणेच प्रौढ वाचकांनाही हे अनुवाद आवडत. पाश्चात्त्य रहस्यकथांचेही त्यांनी केलेले अनुवाद उल्लेखनीय आहेत.



'आरसेनगरीत जाई' (मूळः थ्रू द लुकिन्ग ग्लास (Through the looking glass)) हे त्यांच्या रूपांतरकौशल्याचे उत्तम उदाहरण मानता येईल. रूपांतर करताना भारांचा कटाक्ष हा लेखन परिपूर्ण करण्याकडे असे. टॉलस्टॉय, ओ. हेन्री, मोपाँसा अशांच्या कितीतरी कथा भारांनी 'बिपिन बुकलवार सांगतो आहे' या माध्यमातून रूपांतरित केल्या. त्याचप्रमाणे लॉरा इंगल्स वाईल्डर यांच्या 'लिटिल हाउस' मालिकेतील साहित्याचाही अनुवाद केला. मुलांना थोरांची चरित्रे कळावीत या हेतूने त्यांनी जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन, आणि बेन फ्रँकलिन ह्यांची चरित्रे भाषांतरित केली.

भागवतांच्या भाषांतरांवर कायम वैज्ञानिक प्रभाव राहिला. त्यांच्या लेखनातली अद्भुतरम्यता ही कायम विज्ञानाची कास धरून आली. ती गो. ना. दातारांसारखी परीकथांची अद्भुतरम्यता नाही. असं का असावं, याबाबत मनात उत्कंठापूर्ण विचार येतो. भा. रा. भागवतांचा स्वभाव विज्ञाननिष्ठ होता. 'प्रल्हादविजयाच्या गोष्टी मुलांना न सांगता त्यांना तर्कनिष्ठ, बुद्धिवादी बनवणे हे आपले कर्तव्य आहे' असे ते म्हणत. त्यांनी रूपांतरित केलेल्या 'चंद्रावर स्वारी' आणि 'पाताळलोकची अद्भुत यात्रा' या कथांतील शास्त्रीयता वाखाणण्यासारखी आहे. ग्रहांविषयी लेखन करताना भारा हे शंभर वर्षांपूर्वीची पंचांगे अभ्यासत आणि शास्त्रीय माहितीच्या अचूकतेकडे लक्ष देत. जणू काही प्रत्यक्ष पात्रेच आपल्याशी संवाद साधत आहेत, असा भास या लेखनात होतो. भारांना विज्ञानकथांच्या वाचनाची विलक्षण आवड होती. वाचनाला विज्ञानाच्या अभ्यासाची जोड देऊन आणि शास्त्रीय माहिती आत्मसात करून लिहिलेले त्यांचे लेखन वास्तववादी वाटे. कालातीत विषयांमुळे त्या कथा आजच्या वाचकांनाही भावतात.

ज्यूल व्हर्न या फ्रेंच लेखकाच्या अनेक कादंबऱ्यांचे त्यांनी भाषांतर/रूपांतर केलेले आहे. ज्यूल व्हर्नच्या साहित्यातले मुळातले सगळे सौंदर्य अबाधित ठेवून त्यांनी त्यांतला आशाय मराठी मुलांपर्यंत अगदी लीलया पोहोचवला. अनुवादांतले विस्मयकारक प्रसंग, अद्भुतरम्यता या गोष्टी लहानांनाच नव्हे; तर मोठ्यांनाही वेड लावणाऱ्या आहेत.

आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे 'बालमित्र' ह्या मासिकाची निर्मिती. या मासिकाने बालमित्रांची साहित्यिक भूक भागवली. उत्कृष्ट दर्जा, उत्तमोत्तम चित्रे, साहसकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा, माहिती आदींचा खजिनाच या मासिकात सापडायचा. वैविध्याने नटलेला बालमित्रचा अंक दर महिन्याला मुलांना मिळायचा. या दर्जेदार मासिकाच्या निर्मितीमध्ये भागवतांच्या पत्नी लीलावती भागवत ह्यांचेही मोलाचे योगदान होते. वेळप्रसंगी आपले दागिने मोडून त्यांनी 'बालमित्र'ला बाळलेणी घातली होती. भारांचे लेखन क्वचितप्रसंगी 'चंदन गुप्ते' या टोपणनावानेही प्रसिद्ध होत असे. 'बालमित्र'चे संपादनही अर्थात भारांचेच असे.

भा. रा. भागवतांच्या सर्व साहित्यनिर्मितीत त्यांचा मानसपुत्र 'फास्टर फेणे' ह्याला एक वेगळे स्थान आहे. फास्टर फेणेची पहिली कादंबरी त्यांनी १९६५मध्ये लिहिली. पुढे १९८६पर्यंत फास्टर फेणेचे वीस भाग लिहिले. फास्टर फेणे इतका लोकप्रिय झाला की पुढे अनेक वर्षे तो कुठे कुठे हजेरी लावत असे. 'कुमार', 'किशोर', 'बालवाडी', 'टॉनिक', इ. मासिकांतून तो दिमाखाने झळकत असे. अनेक वृत्तपत्रांतून अर्कचित्रांच्या माध्यमातून, दूरदर्शनवरच्या मालिकेतून आणि आकाशवाणीवरूनही फास्टर फेणे बालवाचकांपर्यंत पोचला. सचित्र पुस्तके प्रसिद्ध करणाऱ्या 'अमर चित्रकथा' या संस्थेने फास्टर फेणेला मराठीबरोबरच गुजराती, कानडी, तेलुगू, तमिळ, हिंदी आणि इंग्रजी या भाषांतल्या बालवाचकांपर्यंत पोचवले. ललिता पै यांनी 'रंगरेखा' नामक चित्रपट्टयांतून फास्टर फेणे मुलांच्या भेटीला आणला. अलीकडच्या काळात तेजस मोडक या तरुणाने 'प्रतापगडावर फास्टर फेणे' या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर केले आहे.

भारांच्या म्हणण्यानुसार माहिती-तंत्रज्ञानयुगात मुलांची दुनिया बदलली आहे. बदलत्या काळात मुलांची भूक वेगळी असणार, ती जाणून घेऊन लेखक लिहिता असावा. पिढी चांगली घडावी यासाठी वाचनासारखा चांगला मित्र त्यांना मिळाला पाहिजे.

'बालसाहित्याचे सर्जक' म्हणून भा. रा. भागवतांची सर्वदूर ओळख आहे. गेल्या शतकातील सातव्या आणि आठव्या दशकात जन्मलेली पिढी आज प्रौढावस्थेतही फास्टर फेणेच्या जनकाविषयी आदर बाळगून आहे. एवढेच नव्हे; तर आज मेहतांची अनुवादित पुस्तके वाचणारा वाचकवर्गही भागवतांच्या अनुवादाच्या खुराकावर वाढला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

एकूणच भा. रा. भागवतांचे समग्र बालसाहित्य बालवाचकांबरोबरच अभ्यासकांनाही मार्गदर्शक ठरते; नव्हे दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरते, यात शंकाच नाही.

***

'माझा विक्रम' व 'वैतागवनातील वाफारे' यांची मुखपृष्ठचित्रे: भागवत कुटुंबीयांकडून.
स्रोतोल्लेखरहित चित्र: जालावरून साभार.

***

बालवाचक, पण सत्तरीतले!

- मीना वैद्य

हा माझा अनुभव, म्हणजे इसवी सन १९५०-६० च्या दशकात एका लहान गावात शाळेत शिकणाऱ्या एका मुलीचा अनुभव. आता आठवणींच्या कप्प्यामधून बाहेर काढून कथन करते आहे.

पुस्तकं वाचणं हा त्या काळातील सर्वांत मोठा विरंगुळा असे - मोकळ्या वेळातला आणि मोठ्या सुट्ट्यांमधला. हा वाचनाचा छंद मनोरंजन आणि मनोविकासही साधणारा होता. दूरदर्शनचा तेव्हा पत्ताच नव्हता. रेडिओदेखील तुरळक घरांमध्येच असायचा - सर्वांना परवडणारा नव्हता. नाटक, सिनेमा वर्षाकाठी एखादाच बघायचा. पण याची खंतही नव्हती, पर्वाही नव्हती. मध्यमवर्गी सुशिक्षित कुटुंबामधली आम्ही मुलं वाचनात दंग असायचो. त्या वेळी आमच्या कल्पनाविश्वात रंग भरणाऱ्या मोजक्या मराठी लेखकांमध्ये भा. रा. भागवतांचं स्थान खूप महत्त्वाचं आहे.

'बालमित्र' हे त्यांनी जवळजवळ सात वर्षे चालवलेलं पाक्षिक माझ्या प्राथमिक आणि माध्यमिक यत्तांना समकालीन होतं! आमच्या दृष्टीने ती बौद्धिक करमणुकीची मेजवानीच होती. अतिशय आतुरतेने आम्ही मुलं या अंकाची वाट बघत असू. 'अदृश्य माणूस' आणि चंद्रावर स्वारी' या अद्भुत कथा बालमित्रातून क्रमशः प्रसिद्ध होत. ते एक मोठं आकर्षण होतं. भागवतांच्या अनेक स्वतंत्र साहसकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा - अर्थात कादंबरीच्या स्वरूपात - त्या काळी मुलामुलींना अगदी गुंगवून टाकीत.

त्यांनी लिहिलेली अनुवादित पुस्तकंदेखील इंग्रजी आणि अमेरिकन साहित्यामधील दर्जेदार कादंबऱ्यांचा मराठी वाचकाला समर्थपणे आणि उत्कटतेने आस्वाद देतात. त्या त्या देशांतील तसेच कालखंडातील जीवनशैली आणि व्यक्तिरेखा यांचं परिणामकारक दर्शन त्यामध्ये घडतं. तेही आपल्या मराठी भाषेतून आणि तिकडचं मूळ वातावरण कायम ठेवून! या कादंबऱ्यांमधील व्यक्ती बहुधा मराठीतूनच बोलल्या असाव्यात, असं वाटण्याइतका खरेपणा या साहित्यिक कलाकृतींमध्ये आहे.

शेकडो वर्षांपूर्वी इंग्लिश राजवटीविरुद्ध, विशेषतः त्या राजवटीमधील भ्रष्ट, उद्दाम आणि अन्यायी सरदारांविरूद्ध बंड पुकारणाऱ्या, श्रीमंतांचं धन लुटून, नाडल्या गेलेल्या गरीबांना वाटून टाकणाऱ्या रॉबिन हुड या बहाद्दराची कथा इंग्रजी साहित्यात आख्यायिका (legend) बनून राहिली आहे. अनेक लोकगीत-पोवाड्यांचा विषय झाली आहे. अशा रॉबिन हुडला 'रॉबिन हुड आणि त्याचे रंगेल गडी' या पुस्तकाद्वारे मराठी वाचकांच्या - विशेषतः लहान मुलांच्या - भेटीला आणताना प्रस्तावनेतच लेखक जाहीर करतो -

शिंग वाजता। रॉबिनकरता॥
शरवूड जंगल भंगेल।
गडी लोटतील रंगेल॥

आणि कादंबरीच्या सुरुवातीला पुकारा होतो तो असा -

ऐका ऐका सज्जनहो
सैनिकहो स्वातंत्र्याचे

पोवाडे वनवीराचे
शरवुडच्या रॉबिन हुडचे॥

या भाषांतरातल्या काही गंमती विशेष पाहण्यासारख्या आहेत. 'मेरी मेन' मराठीत येतात, ते 'रंगेल गडी' होऊन. 'लिटिल जॉन'चे भाषांतर होते 'धाकला जॉन', तर 'वुईल् स्कार्लेट'चे भाषांतर होते 'तांबडा वुईल'. 'फ्रायऽर टक' होतो 'टक बुवा'. इथे 'बुवा'मधला मराठी संन्यासीपणा टकच्या गळ्यात अचूक जाऊन पडतो. रॉबिनला पकडून आणण्यासाठी इंग्लंडच्या राजाने गिसबोर्नच्या 'गाय' नामक सरदाराला (Guy of Gisborne) पाचारण केलेले असते. त्याचे वर्णन करताना लेखक म्हणतो, "तो नावाने गाय असला तरी शक्तीने बैल होता!"

अशा रॉबिनची कथा मराठी मुलांना आपलीशी वाटल्यावाचून कशी राहील? रॉबिन आणि त्याचे सवंगडी यांच्या रोमहर्षक साहसकथांमध्ये लहानथोर सर्वच रमतात.

तीच गोष्ट लॉरा इंगल्स वाईल्डर या पहिल्या पिढीतील (pioneer settler) अमेरिकन कुटुंबामधील मुलीच्या आत्मकथेची. या कुटुंबाचा खडतर, संघर्षमय जीवनप्रवास, त्यातूनही त्यांनी जपलेली संस्कृती, कलासक्त आणि उमदी वृत्ती, हे सगळं मराठी वाचकांच्या भेटीला लेखकाने आणलं, अत्यंत प्रभावीपणे; या चार पुस्तकांच्या रूपात -

मोठ्या रानातलं छोटं घर, एक होतं सरोवर, उमलती कळी आणि आनंदी आनंद गडे ही ती चार पुस्तकं.





इथेही तोच अनुभव. अमेरिकन जीवनशैलीचा मराठीतून आस्वाद! या पुस्तकांमध्ये जागजागी येणाऱ्या काव्यपंक्ती, वाक्प्रचार, अर्थात अमेरिकन-इंग्लिशमधील, यांचं समर्पक आणि रसाळ रूपांतर लेखक करतो. त्यांतलं हे एक उदाहरण पाहा -

लॉराच्या विवाहसोहळ्यासाठी तिची आई (मा) तिला तयार करते आहे, आर्थिक चणचणीच्या परिस्थितीमध्ये. वधूचा पेहराव कसा सजवावा याबाबत मा आपल्या लेकीला एक पारंपरिक वाक्प्रचार सांगते -

Something old
And something new
Something borrowed
Something blue!

मराठीमध्ये लेखक लिहितो -

थोडे जुने
थोडे नवे
थोडे उसने
मागून घ्यावे!

हे रूपांतर आहे हे जाणवूही नये अशी सहज मराठी भाषा! मूळच्या 'old-new-borrowed-blue'चे भाषांतर करताना 'निळा' रंग कुठेच येत नाही. भाषांतरात तो उपरा वाटेल हे जाणून, तो लुप्त होतो. त्याऐवजी 'जुने-नवे-उसने' असं यमक योजून लेखक त्यातलं परकेपण घालवून टाकतो.

या पुस्तकांमधली तेव्हाही विशेष आवडणारी बाब म्हणजे अमेरिकन खाद्यसंस्कृतीचे मोठ्या रसाळपणे केलेले वर्णन. निरनिराळ्या प्रकारची फळे पाकवण्याच्या पद्धती, चीज बनवण्यासाठी, टिकवण्यासाठी व सजवण्यासाठी करण्याच्या युक्त्या, मांसखंड तयार करण्याची प्रक्रिया, ते खारवून-वाळवून-साठवून ठेवण्यासाठी पडणारे श्रम या सगळ्याचं मोठं रोचक आणि चविष्ट वर्णन या पुस्तकांतून येतं. वानगीदाखल चीजबद्दलचा हा उतारा पाहा -

हिवाळ्यात मलईला उन्हाळ्यातलासारखा पिवळा रंग काही केल्या चढत नसे. लोण्याचे गोळे पांढरे निघत, तितकेसे सुरेख नसत. माला आपल्या मेजावर सर्व काही सुरेख असावे असे वाटे; म्हणून ती हिवाळ्याच्या दिवसांत लोण्याला रंग देत असे. सगळी साय गोळा करून चिनी मातीच्या बरणीत भरली अन् शेगडीजवळ तापायला ठेवली, की मग मा काय करी- नारिंगी रंगाचे एखादे सुंदर लांबट गाजर घेऊन ती ते स्वच्छ धुवी, त्याची साल खरवडून काढी, मग किसणीच्या तळावर ते किसून काढी... शेवटी सगळा कीस काढून झाला, की ती किसणी वर उचली आणि खाली गाजराच्या किसाचा मऊ रसरशीत लगदा पडलेला असे. हा लगदा उचलून एका लहानशा पसरट दुधाच्या भांड्यात ती घाली. आणि भांडे शेगडीवर ठेवी. दूध चांगले गरम झाले, की दुधाचे नि गाजराचे ते मिश्रण ती एका कापडी पिशवीत ओती. मग ते चकचकीत पिवळे दूध बरणीत पिळून काढी. बरणीतल्या सायीला त्यामुळे रंग चढे. आता लोण्याला कसा पिवळाजर्द रंग येई...साय तयार झाली म्हणजे मा आपली ती लांबलचक लाकडी रवी घेऊन ती अगोदर उकळत्या पाण्यात बुडवी आणि मग बरणीत उभी करी. नंतर रवीच्या टोकावरून ते लाकडी झाकण सरकवून देई. लाकडी झाकणाला मध्यवर्ती एक लहानसे भोक होते. आणि या भोकातूनच मा रवी वरखाली आपटीत असे...पहिल्यापहिल्याने जी साय उडे, तिचे त्या लहानशा भोकाला लागून साचलेले थर जाडसर बुळबुळीत वाटत. मग मा जास्त सावकाश घुसळू लागे आणि रवीवर पिवळ्या लोण्याचे चिमुकले कण जमू लागलेले दिसत.माने बरणीचे झाकण काढले की आत पिवळाजर्द सोनेरी लोण्याचा गोळा ताकात बुडत असलेला दिसे. मग मा तो गोळा लाकडी कलथ्याने काढून एका लाकडी वाडग्यात ठेवी आणि थंड पाण्याने तो बऱ्याच वेळा धुवी. कलथ्याने तो सारखा खालीवर फिरवून त्यातले पाणी साफ निवळेपर्यंत ती असे करी. मग त्यात मीठ घाली.घुसळपट्टीच्या कार्यक्रमातला सर्वांत उत्तम भाग यापुढेच असे. मा लोण्याच्या वड्या पाडी. लोण्याचा लाकडी साचा असे. त्याच्या सरकत्या तळावर स्ट्रॉबेरी फळांचे नि दोन पानांचे चित्र कोरलेले असे. मा कलथ्याने लोणी उचलून साच्यात दाबून घट्ट भरी. पूर्ण भरले की, एका बशीवर तो साचा उघडा करी. आणि मग ती त्या सरकत्या तळाची मूठ पुढे रेटी. लगेच सोनेरी लोण्याचा छोटासा घट्ट गोळा तयार होई. त्या गोळ्यावर स्ट्रॉबेरीचे फळ नि पाने यांचे सुंदर चित्र उमटलेले असे.

या उताऱ्यात वापरलेले मेज, बरणी, कलथा, साचा, घुसळपट्टी यांसारखे मराठी स्वैपाकघरातील शब्द; भारतीय नजरेला परकं असणारं लोण्याच्या वड्या पाडण्याच्या साच्याचं तंत्र आणि सरतेशेवट त्या देखण्या लोण्याचं रसभरित वर्णन, यांतून एक पूर्ण खाद्यचित्र डोळ्यांसमोर उभं राहतं, तेदेखील अस्सल मराठी भाषेत.

अशा अनेक पाककृतींसोबत येतो तो तत्कालीन अमेरिकन गृहिणींचा दिनक्रम. शिवणकाम, भरतकाम, स्वयंपाक, संगीत ही कौशल्ये; शिक्षिका म्हणून त्यांना उपलब्ध झालेली महत्त्वाची अर्थार्जनाची संधी यांचं चित्र डोळ्यासमोर नेमकेपणानं उभं राहतं. अमेरिकन प्रथा आणि रीतीभाती, शिष्टाचार, आर्थिक आणि सामाजिक फरकांमुळे होणाऱ्या अडचणी आणि गंमती कथानकामधून डोकावत राहतात.

हा मूळ पुस्तकांचा गुण आहे खराच. पण परदेशी साहित्य-संस्कृतीमधील भाव, त्यांची पार्श्वभूमी कायम ठेवून मराठीमधून रंगवतांना लेखकाची संवेदनशीलता आणि ताकद, यांचा आपल्याला प्रत्यय येतो; तसाच रूपांतरासाठी वापरलेली काहीशी जुन्या वळणाची मराठी भाषा वाचताना मराठी भाषेच्या ताकदीचा आणि समृद्धीचादेखील!

या लेखकाने आपल्या भाषांतरामधून अनेक नवीन विश्वांची दारं आम्हां मराठी मुलांसाठी उघडून दिली. शतकापूर्वी जन्मलेल्या या श्रेष्ठ प्रतिभावान लेखकानं आमचं बालपण अगदी 'भा.रा.'वून टाकलं होतं!

***

इतर संदर्भ:

लॉरा इंगाल्स वाइल्डरची मूळ पुस्तके. (http://www.littlehousebooks.com/)
या पुस्तकांवर निघालेली 'लिटिल हाउस ऑन दी प्रायरी' ही टीव्ही मालिका.
(http://littlehousescenery.homestead.com/)

***

चित्रे: जालावरून साभार

***

***

- आदूबाळ

Intelligence Bureau – Docket No. 23016/GTKHC-FST/1991 updated 26/02/2014

***

From: Dr Sharad Shastri [sharad.shastri@iucaa.ernet.in]

Date: Sun, Jan 27, 2013 at 4:13 AM

Subject: Urgent!

To: [redacted] truncated

Banya! See this:

http://www.esakal.com/esakal/20130122/4824005995910158145.htm[१]

What the…! Is this what really happened?!

Regards,

Sharad

***

From: [redacted] truncated

Date: Mon, Jan 28, 2013 at 9:27 AM

Subject: Re: Urgent!

To: Dr Sharad Shastri [sharad.shastri@iucaa.ernet.in]

Meet me at Aniket tomorrow at 10am.

FF

***

---

१ शरदने उल्लेखलेले हे 'सकाळ' वर्तमानपत्रातले छोटे सदर प्रथम वाचावे अशी वाचकांना विनंती. वाचकांच्या सोयीसाठी व कथेचा प्रवाह अबाधित राहवा यासाठी ते कात्रण या कथेच्या शेवटी पान क्र. १२९ वर दिले आहे.

"हुः हुः हुः हुः... बेगीनं आवरा, शास्त्रीबुवा! मेस बंद झाली तर हवा खाऊन झोपावं लागेल आज!"

चौकड्यांच्या शर्टातला किडकिड्या पोरगा आपल्या 'हडकुळीस' सायकलीच्या थंडगार दांड्याला टेकून हुडहुडला.

डिसेंबरातली संध्याकाळ होती. पुण्यात चांगलीच थंडी पडली होती. विद्याभवनच्या वसतीगृहातली पोरं दिवसा लांबवर सायकलच्या ट्रिपा काढायची, पण संध्याकाळ झाली की हॉस्टेलच्या उबदार हॉलमध्ये झब्बू नाहीतर लॅडिस खेळायची. स्काऊटची जांबोरी त्यावर्षी औंधच्या पुढे, काळेवाडीजवळच्या एका मैदानात भरली होती. सुर्वे सरांनी बसची व्यवस्था करायची तयारी दाखवली होती, पण बनेश उर्फ फास्टर फेणे आणि मित्रांनी हडपसरपासून सायकल राईड करायची ठरवली. जांबोरीत या बालचमूने तुफान मजा केली. दिवसभर दमल्यानंतर जांबोरी संपवून परत येताना शरद शास्त्री उर्फ शास्त्रीबुवांच्या पायात आले पेटके. त्याने सगळ्यांना पुढे जायला सांगितलं, पण बन्याला उगाचच अपराधी वाटायला लागलं. बसचा आरामशीर प्रवास सोडून बन्याच्याच आग्रहाने या पुस्तक-पांडूने सायकलचा दांडू धरला होता. शरदबरोबर बन्याही मागे थांबला.

म्हसोबा गेटजवळ शरदने करंगळी वर केली. बन्या थांबला. एका डेरेदार वटवृक्षाच्या अंधाऱ्या छायेत उभा राहून शरद शेतकी कॉलेजच्या कुंपणाला युरिया अर्पण करत असताना बन्यानेही खाली उतरून पाठ मोकळी केली.

"छ्याः! काय सुनसान असतो हा भाग संध्याकाळचा! नायदर अ सिंगल चिट, नॉर अ सिंगल पाखरू!" बन्या स्वतःशीच म्हणाला.

फास्टर फेणेची वाणी जणू खोटी ठरवण्यासाठी एक फिकट निळ्या रंगाची अँबेसेडर भरधाव वेगाने पुणे युनिवर्सिटीच्या बाजूने आली. पेट्रोल पंपासमोर अँबेसेडरचा वेग अचानक कमी झाला, आणि खिडकीतून काहीतरी पडलं! की टाकलं? अँबेसेडर भरधाव निघून गेली!

"ट्रॉक्!"

पडलेल्या चिटस् उचलायला बन्या धावणार इतक्यात समोरून एक पाखरू आलं. समोरच्या पेट्रोल पंपावरून एक अतिशय सुंदर, गोरी तरुणी घाईघाईने आली, आणि तिने ते पुडकं उचलून आपल्या पर्समध्ये टाकलं!

बन्याला राहावेना.

"एक्सक्यूज मी!"

अंधारातून बाहेर आलेल्या बन्याकडे बघून ती तरुणी दचकली.

"ते तुम्ही आत्ता उचललंत ते... ते आत्ता त्या अँबेसेडरमधून पडलं?"

"काय? नाही ... नाही नाही." तरुणी सारवासारव करत म्हणाली. "माझ्या पर्समध्ये माझेच कागद आहेत. माझ्या नोट्स... एमे करतेय मी, त्याच्या..."

बन्याच्या कपाळावर आठ्या चढल्या. "पण आत्ता पाहिलं मी..."

"अं... या अंधारात काहीतरी भास झाला असेल तुला. होतं असं कधीकधी. चल, निघायला हवं मला..."

तरुणीने घाईघाईने रस्ता ओलांडला. त्याच वेळी पेट्रोल पंपावरून एक लुना बाहेर पडत होती. ती घाईघाईने लुनावरच्या तरुणाशी काही बोलली, आणि मागे बसली. लुना युनिवर्सिटीच्या दिशेने निघाली.

"ट्टॉक्!" फास्टर फेणेच्या चेहऱ्यावर आठ्यांचं जाळं पसरलं होतं. भुवया वक्र करून तो लुनाच्या दूरदूर जाणाऱ्या लाल टेल लाईटकडे बघत होता. इतक्यात त्याला मागून कुणीतरी ढोसलं.

"पाहिलं मी सगळं, बन्या." शरद हातात एक कागद फडकावत होता. "हे बघ!"

"हे काय आहे?"

"अरे, ती अँबेसेडर ते पुडकं फेकून गेली. त्या मुलीने ते उचललं. त्या गडबडीत त्या पुडक्यातला एक कागद निसटला, आणि वाऱ्याने उडाला, तो थेट माझ्याकडे." शरदने खुलासा केला.

बन्याने चिमटीत तो कागद धरला, उंदीर धरावा तसा.

"घाबरू नकोस, बन्या. कागद कोरडा आहे! माझी अगस्तीगिरी तोवर संपली होती!"

बन्याने आपल्या पाठपिशवीतून टॉर्च काढला आणि कागद त्या उजेडात धरला.

प्रिंटरवर छापलेल्या कागदाची दुसरी किंवा तिसरी कार्बन प्रत असावी. आकडेच आकडे! आणि काही आकड्यांवर हिरव्या लाल पेनांनी खुणा केल्या होत्या.

"शास्त्रीबुवा, काही प्रकाश पडतोय का?"

"इकडे दे..." कागद आणि टॉर्च शरदने हिसकावून घेतला, आणि कागद पतंगासारखा धरून त्यावर टॉर्चचा झोत फेकला. तीन सिंहांचा वॉटरमार्क उजेडात चमकला.

"ट्टॉक्! हे काय वाट्टेल ते असलं, तरी कॉलेजच्या नोट्स नक्कीच नाहीत."

"फास्टर फेणे, धिस इज समथिंग सीरियस." शरद डोळे तांबारून कागदाकडे पहात होता. "अठरा चौतीस पंचावन्न. त्र्याहात्तर पंचावन्न दहा. आता समजलं का काय आहे?"

"फोन नंबर?" बन्याने लोणकढी ठेवून दिली. "नाही, पण फोन नंबर सहा आकडी असतात."

"पुण्याचे अक्षांश-रेखांश आठवताहेत का?" शरदने विचारलं, आणि उत्तर स्वतःच सांगून टाकलं. "अठरा डिग्री एकतीस मिनिट्स नॉर्थ, आणि त्र्याहात्तर डिग्री पंचावन्न मिनिट्स ईस्ट."

"ट्टॉक्! हे ठिकाणांचे पत्ते आहेत! कोऑर्डिनेट्स!" फास्टर फेणेचं डोकं आता धावायला लागलं होतं. "अठरा चौतीस म्हणजे पुण्याच्या थोडं उत्तरेला, पण त्र्याहात्तर पंचावन्न म्हणजे जवळजवळ पुण्याच्याच रेषेत. याचा अर्थ ... पुण्याच्या डोक्यावरची जागा. ट्टॉक्!" पुणे जिल्ह्याचा नकाशा डोळ्यांसमोर आणत बन्या उद्‌गारला.

शास्त्रीबुवांच्या डोक्यातल्या ॲटलासने ती जागा आधीच शोधली होती.

"बाकीचेही एअर फोर्सचे विमानतळ असणार." शरद म्हणाला. "उदाहरणार्थ हे बघ - नऊ नऊ नऊ, ब्याण्णव एकोणपन्नास अकरा. हे नक्की अंदमान आहे. पोर्ट ब्लेअरचा अक्षांश अकरा डिग्रीज काहीतरी आहे. पण बन्या... ही काही गुप्त माहिती नाही. तुझ्यामाझ्यासारख्या शाळकरी पोरालाही विमानतळ माहीत असतात."

"ते आहेच रे, पण कागद नीट बघ. हे पहिलं पान वाटतंय, कोणत्यातरी लांबलचक रिपोर्टचं. हा कागद गुप्त आहे. टॉप सीक्रेट! नॉट फॉर एव्हरीबडीज आईज." फास्टर फेणे भुवया आक्रसत म्हणाला.

"गुप्त होता म्हण! तुझ्या मैत्रिणीने बाकीचे कागद गडप केलेच की."

"कागद सीमेपलिकडे पोचण्याआधी आपण परत मिळवू ते तिच्याकडून!" फास्टर फेणे सायकलीचा स्टँड काढत म्हणाला. "आर यू गेम फॉर इट, ओ वाईज मॅन ऑफ ऑटम?"

शरदने काही न बोलता सायकलीचं तोंड युनिव्हर्सिटीच्या दिशेला फिरवलं. त्याचेही खांदे आता फुरफुरायला लागले होते. त्याच्या चष्म्याच्या काचांत चमकणाऱ्या साहसाच्या तेजाकडे बघून बन्याने त्याला दुखऱ्या पायांची आठवण करून दिली नाही!

"बन्या, काय प्लॅन आहे आता आपला?"

"ती मुलगी म्हणाली की ती एम ए करते आहे. पुणे विद्यापीठात असणार. आणि ती लुनावाल्या बाबाच्या मागे बसून तिकडेच गेली. म्हणजे ती तिकडेच कुठेतरी रहात असणार, बहुतकरून विद्यापीठाच्या हॉस्टेलवर." फास्टर फेणेने डोकं लढवलं.

"काहीही तर्क आहे हां तुझा." विचारवंताला पटेना. "खोटंच सांगितलं असेल तर?"

"शरद, आठव काय झालं ते. मी अचानक तिच्या समोर आलो, आणि ती ते कागद उचलताना मी पाहिलंय असं तिच्या लक्षात आलं. मग तिने काहीतरी बोलून वेळ मारून नेली. अश्या वेळी खोटं काहीतरी सांगायला सुचणं अवघड आहे. आयाम ड्याम शुअर तिचा काही ना काही संबंध विद्यापीठाशी असणारच."

"मग ती लुना पकडायची म्हणतोस?"

"प्रयत्न करायला काय हरकत आहे? अगदी काही नाही, तर विद्यापीठाच्या दारात, कारंज्यासमोर एक पोलीस चौकी आहे. तिथेच नेऊन देऊ आपला - एक्झिबिट ए!"

सायकलींवर टांगा पडल्या, आणि बन्याची "हडकुळी" आणि शरदची "हिंद" लुनाच्या पाठलागावर निघाल्या!

***

लुना कधीची दिसेनाशी झाली होती. ती एकप्रकारची सायकलच असली तरी त्याला पन्नास सीसीचं स्वयंचलित एंजिन होतं. नुकतंच पेट्रोल पिऊन तिचं ढेरकंही भरलेलं असावं. त्यातून मध्ये दहाएक मिनिटांचा वेळ गेला होता.

सायकल मारता मारता बन्याला अचानक तडकलं.

"शरद!"

शास्त्रीबुवा किंचित मागे पडले होते. फास्टर फेणेच्या, आणि त्याच्या सुप्रसिद्ध हडकुळीच्या, बरोबरीने वेग राखणं त्या पुस्तकी किड्याला जड जात होतं.

"काय रे?" शरदने धापा टाकत विचारलं.

"ती अँबेसेडर! ती होती नक्कीच लष्करी कोट्यातली, पण लष्कराची नव्हती." बन्या म्हणाला.

"कशावरून?"

"लष्कराच्या गाड्यांच्या नंबरप्लेट वेगळ्या असतात रे. सुरुवातीला एक उभा बाण असतो, पुढचे दोन नंबर गाडी कोणत्या वर्षी घेतली त्याचे असतात, पुढे एक मोठा नंबर असतो, आणि शेवटी एक अक्षर असतं. मी गाडीचा नंबर नीट पाहिला नाही, पण बाण नव्हता एवढं नक्की!" बन्या म्हणाला.

"मी पाहिला ना!" शरद म्हणाला. "साधाच होता - तीन अक्षरं, आणि २२७."

"मला समजलं तुझ्या लक्षात का राहिला ते! बावीस सप्तमांश!" बन्या हसला.

फास्टर फेणेच्या डोक्यात चक्रं फिरत होती. अँबेसेडरचा शोध फारसा अवघड जाणार नव्हता. फरासखान्यातले एसीपी बखले बन्याचे चाहते होते - ते झटक्यात शोधून काढतील त्या अस्तनीतल्या सापाला. ते कागद हस्तगत करणं महत्त्वाचं होतं. त्यासाठी लुनावाला आणि त्याने लिफ्ट दिलेली तरुणी सापडायला हवे होते.

आणि पंधरा मिनिटं भरवेगाने पायडंलं हापसूनही तेच नेमके मिळत नव्हते!

आपल्या प्लॅनबद्दल आता खुद्द फास्टर फेणेलाच शंका येऊ लागली. कशावरून लुना सरळ विद्यापीठाकडेच गेली असेल? मॉडेल कॉलनीतून सेनापती बापट रस्त्याला लागून पसार झाली असेल तर? किंवा रेंजहिल्सवरून पुणे-मुंबई रस्त्याला लागली असेल तर? वाटेतल्या कुठल्या बारक्या गल्लीबोळात वळली असेल तर? लुनावालाच तिचा साथीदार असेल तर?

पण त्याचं मन त्याला सांगत होतं की असं काही नसावं. लुनावाल्याला त्याने एक क्षणभरच पाहिलं होतं, पण तो काही वाकडा वाटत नव्हता - 'क्रूक'! तो नेमका त्या वेळी तिथे होता, आणि त्या तरुणीने त्याचा वापर करून घेतला. तिला घेऊन जाण्यासाठी वेगळ्या वाहनाची व्यवस्था केली असेल, पण ते यायच्या आधीच आपण तिथे कडमडलो! तो लुनावरचा राजकुमार आपल्या वाटेला जात होता, तेवढ्यांत ही संकटातली राजकन्या भेटली! छे:! राजकन्या कसली? चेटकीच म्हणायची, राजकन्येचं रूप घेऊन आलेली! "जस्ट यू वेट, मिस क्रूक, जस्ट यू वेट! यू विल बी सॉरी, ॲण्ड युवर टीयर्स विल बी टू लेट!" बन्या गुणगुणला आणि पायडलवरचा पाय जोरात दाबला.

रिझर्व बँक, गवर्मेंट पॉलिटेक्निक मागे पडलं होतं, भोसलेनगरमधल्या बंगल्यांचे दिवे दिसायला लागले होते. आणि तरीही लुना काही दिसत नव्हती.

आणि दिसली!

म्हणजे फक्त लुनाच दिसली. लुनावरचा राजबिंडा आणि राजबिंडी गायब होते.

नजर उचलून बन्याने झगमगती अक्षरं मोठ्याने वाचली. "हॉटेल अशोका - पुरे व्हेज."

"पुरे पुरे." मागून शरद म्हणाला. "चल आत जाऊ. मी दमलोय आणि भूक लागलीय."

हळूच, दबकत दबकत ही जोडगोळी हॉटेलात शिरली. त्यांना हवी होती ती जोडगोळी पलिकडेच एका टेबलावर बसून कॉफी पीत होती. एवढ्या उशीरा, थंडीचं हॉटेलमध्ये कोणीच नव्हतं. तिची हॉटेलच्या दरवाजाकडे पाठ होती - कदाचित ती आता निश्चिंत झाली असावी. एका चोंबड्या पोराला किती ते घाबरायचं?

तरीही बन्याने शरदला फॅमिली रूममध्ये ओढलं. तिथून कॉफी पिणारे दोघं स्पष्ट दिसत होते, पण फडफडत्या दारामुळे हे दोघं बाहेरून दिसत नव्हते.

दोन टोणग्यांना फॅमिली रूममध्ये बघून काळसर गिड्ड्या वेटरने डोळे तांबारले. "ए रूम काली पॅमिली के लिए है..."

"रेहने दो ना अंकल..." बन्याने गूळ लावला. फुरसुंगीला त्यांच्या घरी गुळाच्या काहिलीच असत म्हणा! "पिताजी को पसंद नहीं हम हॉटेल में जाते है. वह देखेंगे तो बहुत बदडेंगे. इसलिये इधर बैठे."

"और तुम्हारे हॉटेल में और हैहिच कौन?" शरदनेही एक ठेवून दिली. "कालीच क्या... गोरी, पिवली, निल्ली कौनसिच फॅमिली नहीं है..."

या माऱ्याखाली चेचलेल्या वेटरने काढता पाय घेतला. बन्या शरदकडे पाहून हसला.

"पेपर लिहिण्यापेक्षा खरंखुरं हिंदी बोलणं अवघड असतं रे!" शरदने कबुली दिली.

लुनावाला तरुण कावराबावरा दिसत होता. कागदचोर तरुणी आता शांत वाटत असली, तरी तिची नजर भिरभिरत होती.

"तिची पर्स उचलून पसार होऊ या का रे?" फास्टर फेणे म्हणाला.

"काय वेडा आहेस का?" शरदचा श्वास अडकला. "ती चोर चोर म्हणून ओरडा करेल. बाहेरचा वॉचमन आपल्याला धरेल. प्रकरण पोलिसांपर्यंत जायच्या आधीच ती पर्स हस्तगत करून उडून जाईल. आपल्याला तिची चोरी सिद्ध करायची आहे, स्वतःला चोर म्हणून बळी नाही द्यायचं!"

"ऑर्डर?" वेटरबाबा पुन्हा प्रकटले.

"एक व्हेज सँडविच, एक इडली सांबार, एक दहीवडा, एक फिंगर चिप्स, उसके बाद चाय." शरदने ऐटीत ऑर्डर सोडली. "बन्या, तू काय घेणार?"

फास्टर फेणेचा आ वासला होता.

"भूक लागलीय रे..." शरदने इवलुसं तोंड करून खुलासा केला.

"इतना तो लाओ, बाकी बाद में देखेंगे." बन्या वेटरला म्हणाला.

"शास्त्रीबुवा, पैसे आहेत ना? माझ्याकडे चार-पाच रुपयांपेक्षा जास्त नसावेत."

"आहेत रे. बाबांनी इमर्जन्सीसाठी म्हणून पन्नास रुपये हनुमानचड्डीच्या खिशात ठेवायची सवय लावली आहे. देशाचे गुप्त कागद चोरीला जाणं हे इमर्जन्सीत मोडेल बहुतेक."

"बरं, शरद, मी आता हॉटेलच्या गल्ल्यावरून फोन लावतो एसीपी बखल्यांना. त्यांना..." फास्टर फेणेचं हे वाक्य तोंडातच जिरलं, कारण त्या तरुणीने वेटरला खूण केली होती. वेटरने बिल नेऊन दिलं. तरुणीने बिल दिलं, आणि ते दोघंही उठून निघाले.

त्यांचं पाऊल बाहेर पडताच वेटरने फडके, पोछा आणि बादली घेऊन रिकाम्या झालेल्या टेबलकडे धाव घेतली. फॅमिली रुमच्या दिशेने एक चोरटा कटाक्ष टाकला. ढापण्या पोराचं डोकं दिसत होतं. समोर बसलेल्या चौकड्यांच्या शर्टातल्या किडकिड्या पोराशी बोलत असावा. त्यांचं लक्ष नाहीसं बघून खुर्चीवर पडलेली एक प्लॅस्टिकची पिशवी त्याने चटकन बादलीत टाकली, आणि पार्टिशनआड गेला.
पण चौकड्यांच्या शर्टातला किडकिड्या पोरगा ढापण्याच्या समोर नव्हताच. त्याच्या ढेंगेखालून, रांगत रांगत शेजारच्या रिकाम्या फॅमिली रुममध्ये गेला होता. तिथून त्याला ते प्लॅस्टिकच्या पिशवीतलं पार्सल स्पष्ट दिसलं होतं. त्याचा आकार त्याने ओळखला होता आणि काळ्या गिड्ड्या वेटरची त्याने "क्रूक नंबर टू" अशी ओळख पक्की करुन टाकली होती!

रांगत रांगत फास्टर फेणे परत शरदसमोर आला. पण आता त्याच्या डोक्यात प्लॅन पक्का झाला होता.

"शरद, तो वेटर दिसतोय? ही इज अवर मॅन! ते गुप्त कागदांचं पुडकं त्याच्याकडे आहे. तू इथे थांब, एसीपी बखल्यांना फोन कर - चारशे सव्वीस दोनशे बत्तीस. ते येतील आणि याला चतुर्भुज करतील. मी त्या मुलीच्या मागे जातो."

"बन्या, पण मिळाले ना कागद! झालं तर!"

"मिळाले नाहीत अजून, पण मिळतील. ते ठीक आहे रे. ही सगळी साखळीच पकडायला हवी. आपल्या वायुदलातला कोणता ऑफिसर फितूर आहे तेही कळायला हवं. त्यासाठी या मुलीला मोकळं सोडून चालणार नाही."

बन्या वायुवेगाने निघाला. हडकुळीवर टांग टाकून बाहेर आला तेव्हा लुनाचे दिवे दूर गेले होते, पण नजरेच्या टप्प्यात होते. बन्या मागून सुरक्षित अंतर ठेवून निघाला. लुना वेगात जात होती. फास्टर फेणेही फास्ट जात होता, पण त्याच्या हडकुळ्या पायांतली ताकद संपत होती. डोळ्यांसमोर ध्येय होतं, पण पोटात भूक होती.

बन्याच्या अपेक्षेविरुद्ध लुना विद्यापीठात जाण्यासाठी उजवीकडे न वळता भरधाव औंधच्या दिशेने निघाली.

राजभवनपाशी लुनाचा वेग मंदावला आणि लुना थांबली. फास्टर फेणेही सुरक्षित अंतर ठेवून धापा टाकत थांबला. दोन मिनिटांनी लुना परत भरवेगाने निघाली. एका गल्लीत लुना वळली, आणि एका बंगल्यासमोर थांबली. तरुणी आणि राजकुमार बंगल्याच्या आऊटहाऊसच्या दिशेने गेले.

फास्टर फेणे धापा टाकत थांबला. सायकलला कुलूप घालून तो बंगल्याच्या दिशेने जायला लागला, तोच...

...त्याच्या खांद्यावर एक दणकट हात पडला.



"किधर जारा, मुन्ने?"

अर्धवट उजेडात फास्टर फेणेने त्या व्यक्तीकडे निरखून पाहिलं. उभट चिंचोळा चेहेरा, सिगरेटने काळपटलेले ओठ. किरकोळ शरीरयष्टीच्या, बन्याहून थोड्याशाच उंच असलेल्या या माणसाच्या पंज्याची पकड मात्र जबरदस्त होती. अजूनही त्याने बन्याच्या खांद्यावरचा हात काढला नव्हता.

"किधरभी नहीं. पानी... पानी चाहिये था, वोही मांगने जा रहा था. आप कौन हो?"

"अभी समझ में आएगा मैं कौन हूँ..." असं म्हणत त्याने अस्पष्टशी शीळ घातली. अंधारातून आणखी तीन माणसं आली, आणि त्यांनी फास्टर फेणेला धरून गल्लीबाहेर, स्ट्रीटलाईटच्या उजेडात नेलं.

"ट्रॉक्!" त्यातल्या एकाला फास्टर फेणेने ओळखलं होतं. "हवालदारदादा! आपलं ... जमादारदादा! ओळखलं का मला? आपण कँपात भेटलो होतो, सित्तरशेठला आणि त्या पळालेल्या कैद्याला धरलं होतंत..."

काही महिन्यांपूर्वी तुरुंगातून पळालेला एक कैदी फास्टर फेणेला अचानक दिसला होता. त्याचा पाठलाग करत फास्टर फेणे कँपातल्या सित्तरशेठच्या दुकानी पोचला होता. तिथे या हवालदारसाहेबांच्या मदतीने त्याने तो कैदी आणि साथीदार सित्तर यांची गजाआड पाठवणी केली होती.

पण हे हवालदारदादा इथे... म्हणजे... हा खांदा पकडणारा बुटक्या माणूस...

इकडे हवालदारदादांचा एक एक डोळा भोकराएवढा झाला होता!

"तू!!" ते कुजबुजले. "सर..." असं म्हणून बुटकुल्याच्या कानाशी लागले.

बुटकुल्या सरांच्या आठ्या जिरल्या. त्यांनी थंड डोळ्यांनी फास्टर फेणेकडे पाहिलं.

"होशियार मालूम पडते हो. ये मोरे क्या बता रहा है..." खांद्यावरचा पंजा खाली आला - हस्तांदोलनासाठी. "खान. ब्यूरो."

"म्हणजे इंटलिजन्स ब्यूरो. आयबी." हवालदार मोरेदादा बन्याच्या कानात कुजबुजले. "मी सध्या इकडे डेप्युटेशनवर आहे."

"फास्टर फेणे. विद्याभवन." बन्याने आपला वाळकुडा पंजा त्यांच्या हातात दिला.

"छोटासा हाथ है, पर पकड अच्छी है. पसंद आया." पसंती खानसाहेबांच्या चेहेऱ्यावर मात्र दिसत नव्हती. तो तसाच निर्विकार होता. "ये बंगले तक कैसे पहुंचे?"

बन्याने सगळी कहाणी त्यांना आपल्या दिव्य हिंदीत ऐकवली. ती ऐकून खानसाहेबांच्या भुवयाही पाव इंच वर सरकल्या. म्हणजे हिंदी ऐकून नव्हे, कहाणी ऐकून!

"बहादूर."

बन्याला पहिल्यांदा वाटलं की उरलेल्या दोघांपैकी कोणाचंतरी नाव बहादूर आहे. मग त्याच्या लक्षात आलं की खानसाहेब त्याचं कौतुक करत होते!

"सर, आप लोग इधर कैसे?" बन्याने त्याला पडलेला प्रश्न विचारला. "मेरा दोस्त शरद उधर अशोका हॉटेल की आघाडी संभाळ रहा है, उसने तो नहीं भेजा आपको?"

"सरद? नहीं." खानसाहेबांनी मान हलवली. "हम यहाँ उन्नीस दिनों से हैं..."

"एकोणीस दिवस चोवीस तास बंगल्यावर लक्ष ठेवून आहोत." मोरेदादांनी माहिती पुरवली. "आज तू आमचा संशय खरा ठरवलास!"

"बाब्बौ!" बन्याचे डोळे विस्फारले. "कंटाळ नहीं जाते क्या?"

"बेटा, मेरे पिछले असाईन्मेंट की बात है. एक रुम में बिजली जलनेकी राह मैं तीन महीनों से देख रहा था! बाहर फुटपाथ पे मोची का काम करता था." खानसाहेब म्हणाले. "खैर! अभी कुछ करने का वक्त आ गया है...."

***

लेखकाचं निवेदनः

तर आपल्यासाठी ही कहाणी इथेच संपली.

खानसाहेब, मोरे हवालदार आणि त्यांच्या चमूने फितूर ऑफिसर, काळसर गिड्डा वेटर आणि ती तरुणी यांच्या तिहेरी नाड्या कशा आवळल्या आणि वायुसेनेतली गोपनीय कागदपत्रं शत्रूपर्यंत पोहोचवण्याचं कारस्थान कसं उध्वस्त केलं ही कथा इंटलिजन्स ब्यूरोच्या एका फायलीत बंदिस्त आहे. ती फाईल 'द ऑफिशियल सीक्रेट्स ॲक्ट, १९२३' खाली 'क्लासिफाईड' आहे. भारतातल्या कायद्याप्रमाणे अशा फायली कधीच डी-क्लासिफाय होऊन जनतेला वाचायला मिळत नाहीत. त्यामुळे या साहसकथेचा शेवट हा आपल्यासाठी धूसरच रहाणार आहे. हे साधण्यासाठीच शास्त्रीबोवांनीदेखील आपल्या डायरीत सहा वेगवेगळ्या पानांवर काही गोष्टी लिहून ठेवल्या आहेत. त्यातलं खरं पान कुठचं हे त्याला आणि फास्टर फेणेलाच ठाऊक आहे.

हे प्रकरण इतकं गोपनीय असल्यामुळे ना या बालवीरांचे फोटो पेपरात छापून आले, ना त्यांचा सत्कार झाला. मात्र, असं म्हणतात, की कधीतरी मोरे हवालदारांनी फास्टर फेणेची भेट घेतली आणि एक चिठ्ठी त्याला दिली. त्यावर पेन्सिलीने एक टेलिफोन नंबर खरडलेला होता.

***

बावीस वर्षांनंतर

शरद शास्त्रीच्या डायरीतून[१]...

पान १

पान २

पान ३

पान ४

पान ५

पान ६

***

चित्र व शीर्षक सुलेखन : अमुक

---

१ पीडीएफ प्रत वाचकासाठी: डायरीतली पाने वाचण्यासाठी पानांवर क्लिक केल्यास योग्य ते पान उघडेल. छापील प्रत वाचकासाठी: डायरीतील प्रत्येक पान अंकाच्या नव्या एका पृष्ठावर उघडते.
पान १> पृ. ११४, पान २> पृ. ११६, पान ३> पृ. ११८, पान ४> पृ. १२०, पान ५> पृ. १२२, पान ६> १२५.

पान १

सांगितल्याप्रमाणे दहा वाजता मी 'अनिकेत'मध्ये पोचलो. खरं तर रोजच्याप्रमाणेच. मी रोज दहा वाजता 'अनिकेत'मध्ये जातो हे बन्याला कसं कळलं हे त्याला विचारण्यात अर्थ नाही. त्याला लेकाला मी रोज बन-आमलेट खातो हेही माहीत असेल. दूरवरचे तारे काय बोलताहेत ते ऐकणं हा जसा माझा व्यवसाय आहे, तसा लोक कधी कुठे काय करतात हे जाणणं त्याचा व्यवसाय आहे!

बन्या माझ्या रोजच्या टेबलापाशी बसला होता. आम्ही मिठी मारली. त्याच्या फासळ्या माझ्या पोटाला बोचल्या, शाळेत बोचत तशाच! तो सध्या कुठे असतो, काय करतो वगैरे विचारण्यात अर्थ नाही, कारण तो सांगणार नाही. इतर मित्रांची चौकशी करण्यात अर्थ नाही - कारण मी सगळ्यांना वेळोवेळी भेटत असतो, आणि बन्या भेटत नसला, तरी त्याला त्यांची खडान् खडा माहिती असणारच!

टेबलावर दोन बन-आमलेटं आली. तेही काम त्याने करून ठेवलं होतं! मग मी सरळ विषयाला हात घातला, आणि त्या लेखाची प्रिंट बन्यासमोर ठेवली.

"वाचलाय." बन्या आमलेट खाताखाता म्हणाला.

"खरं आहे हे सगळं?" मी विचारलं.

"बास का आता! तू होतासच की तिथे!"

"ते झालं रे, बन्या. पुढचं सगळं. आपल्या अपरोक्ष घडलेलं." मी म्हणालो. "ते चार हजार रुपये. त्या वयस्कर बाई. तुमच्यासारख्या अनेकांना या पोरींनी गंडा घातला आहे वगैरे सांगणाऱ्या? खरं आहे?"

"मला काय माहीत खरं का खोटं ते?"

मला हसू आलं. "नाही तर कोणाला माहीत असणार, बन्या?" मी म्हणालो. "खानसाहेबांची चिट्ठी मिळाली ... तुला. फोन केलास ... तू. पंधराएक वर्षांची सर्व्हिस झाली ... तुझी!"

बन्या काहीच बोलला नाही. बराच वेळ.

"पंधरा वर्षं सर्व्हिस म्हणतोयस तू, शरद, त्यात एक शिकलो. संपूर्ण सत्य - ॲबसोल्यूट ट्रुथ - असं काही नसतं रे. सगळी सत्यं सापेक्ष असतात - रिलेटिव्ह ट्रुथ. ज्याचं त्याचं सत्य. बघणारा बदलतो तसं सत्यही बदलतं - बदललं पाहिजे." बन्या काटाचमचा हलवत म्हणाला. "तुझ्या 'लुनावरच्या राजबिंड्या'ला दिसलेलं सत्य वेगळं. आमच्या फायलीतलं वेगळं."

"उगाच भेंडोळं सोडू नकोस!" माझा वैताग वाढत चालला होता. "त्या लेखाच्या खालच्या कॉमेंट्स वाच. लोकांनी ॲबसोल्यूटली हसं केलंय बिचाऱ्याचं. आणि तू मला रिलेटिव्हिटी शिकव! माझ्या समाधानासाठी सांग - तुला तरी संपूर्ण सत्य माहीत आहे का?"

"तुझ्या समाधानासाठी - हो, मला माहीत आहे."

"कोण होत्या या वयस्कर बाई?"

"असतील कोणी खानसाहेबांच्या सहकारी."

"आणि चार हजार रुपये? त्यांचं काय झालं? ते कुठे गेले?"

बन्या विमनस्क हसला. उरलेला बन-आम्लेटचा घास त्याने न चावताच गिळंकृत केला, आणि माझ्याकडे सूचक नजरेने बघत म्हणाला, "पैसे कुठे जातात? खिशात!"

मी समजलो.

संपूर्ण सत्यही समजलं आणि बन्याचं बोलणंही. पैसे कोणाच्या खिशात गेले ते बन्याने न बोलता माझ्या ध्यानात आणून दिलं होतं. बाहेर पडतापडता मी विचारलं, "बन्या, तू काय करणार आहेस आता?"

कोवळी उन्हं बन्याच्या सावळ्या, हडकुळ्या चेहेऱ्यावर पडत होती. पण चेहेरा उजळून निघण्याच्या ऐवजी चाळिशीच्या उंबरठ्यावरच चेहऱ्यावर पडलेल्या बारीक सुरकुत्या ठळक होत होत्या.

माझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याऐवजी फास्टर फेणे म्हणाला, "शरद, एक करशील माझ्यासाठी? हे सगळं लिहून, नोंदवून ठेव कुठेतरी. उद्या माझं काही झालं, तरी माझं सापेक्ष सत्य तुझ्याकडे राहील."

त्याप्रमाणे मी केलंय. ओझं झालंय ते. बन्याशी काहीच संपर्क नाही नंतर...

***

पान २

सांगितल्याप्रमाणे दहा वाजता मी 'अनिकेत'मध्ये पोचलो. खरं तर रोजच्याप्रमाणेच. मी रोज दहा वाजता 'अनिकेत'मध्ये जातो हे बन्याला कसं कळलं हे त्याला विचारण्यात अर्थ नाही. त्याला लेकाला मी रोज बन-आमलेट खातो हेही माहीत असेल. दूरवरचे तारे काय बोलताहेत ते ऐकणं हा जसा माझा व्यवसाय आहे, तसा लोक कधी कुठे काय करतात हे जाणणं त्याचा व्यवसाय आहे!

बन्या माझ्या रोजच्या टेबलापाशी बसला होता. आम्ही मिठी मारली. त्याच्या फासळ्या माझ्या पोटाला बोचल्या, शाळेत बोचत तशाच! तो सध्या कुठे असतो, काय करतो वगैरे विचारण्यात अर्थ नाही, कारण तो सांगणार नाही. इतर मित्रांची चौकशी करण्यात अर्थ नाही - कारण मी सगळ्यांना वेळोवेळी भेटत असतो, आणि बन्या भेटत नसला, तरी त्याला त्यांची खडान् खडा माहिती असणारच!

टेबलावर दोन बन-आमलेटं आली. तेही काम त्याने करून ठेवलं होतं! मग मी सरळ विषयाला हात घातला, आणि त्या लेखाची प्रिंट बन्यासमोर ठेवली.

"वाचलाय." बन्या आमलेट खाताखाता म्हणाला.

"खरं आहे हे सगळं?" मी विचारलं.

"बास का आता! तू होतासच की तिथे!"

"ते झालं रे, बन्या. पुढचं सगळं. आपल्या अपरोक्ष घडलेलं." मी म्हणालो. "ते चार हजार रुपये. त्या वयस्कर बाई. तुमच्यासारख्या अनेकांना या पोरींनी गंडा घातला आहे वगैरे सांगणाऱ्या? खरं आहे?"

"मला काय माहीत खरं का खोटं ते?"

मला हसू आलं. "नाही तर कोणाला माहीत असणार, बन्या?" मी म्हणालो. "खानसाहेबांची चिठ्ठी मिळाली ... तुला. फोन केलास ... तू. पंधराएक वर्षांची सर्व्हिस झाली ... तुझी!"

बन्या काहीच बोलला नाही. बराच वेळ.

"पंधरा वर्षं सर्व्हिस म्हणतोयस तू, शरद, त्यात एक शिकलो. संपूर्ण सत्य - ॲबसोल्यूट ट्रुथ - असं काही नसतं रे. सगळी सत्यं सापेक्ष असतात - रिलेटिव्ह ट्रुथ. ज्याचं त्याचं सत्य. बघणारा बदलतो तसं सत्यही बदलतं - बदललं पाहिजे." बन्या काटाचमचा हलवत म्हणाला. "तुझ्या 'लुनावरच्या राजबिंड्या'ला दिसलेलं सत्य वेगळं. आमच्या फायलीतलं वेगळं. "

"आणि खानसाहेबांचं वेगळं." मी सहज म्हणालो, पण फास्टर फेणेचा चेहरा पाहून चरकलो. त्याचा हाडकुळा चेहरा तटतटला होता.

"खानसाहेब!" तो तुच्छतेने म्हणाला. "बट येस, त्याचं सत्य नक्कीच वेगळं होतं."

"म्हणजे?" मला काहीच कळेनासं झालं होतं.

"साधा विचार कर, शरद. डेप्युटी डायरेक्टर लेवलचा माणूस - म्हणजे साध्या पोलिसांतली डीआयजी लेवल - दस्तुरखुद्द एका संशयिताच्या बंगल्याबाहेर एकोणीस दिवस गस्त घालत बसेल? फक्त संशय आला म्हणून? बाकी काही उद्योगधंदे नाहीत का त्याला? सगळे जुनियर्स सुट्टीवर गेले का?"

"म्हणजे तुला म्हणायचंय..."

"खानच मेन कव्वा होता रे! ते कागद त्याच्यासाठीच होते. पलीकडे पोचवणारा खानच होता." फास्टर फेणे म्हणाला.

"कायपण फेकू नकोस बन्या. कागद वेटरकडे होते."

"अरे शरद, प्लॅन ए करताना प्लॅन बी, सी आणि डीसुद्धा तयार ठेवावे लागतात." बन्या म्हणाला. "खान तिथे फक्त प्रोटेक्शनसाठी होता. त्याच्या माणसांच्या आणि मुख्य म्हणजे कागदांच्या."

"त्या वयस्कर बाई कोण होत्या?"

"असतील कोणी खानच्या सहकारी."

माझा अजून विश्वास बसत नव्हता. बाहेर पडतापडता मी विचारलं, "बन्या, तुला हे सगळं कधी समजलं?"

"खूप वर्षांनी. चिठ्ठीवरचा नंबर खानच्या बॉसचा होता. त्यांच्यामुळे मी भरती झालो. पण खानबद्दल कोणीच काही बोलेना. खान कुठे दिसेना, भेटेना. बरं, थेट विचारायची सोय नाही. सगळं गुप्त गुप्त रे."

"मग?"

"खूप वर्षांनी एका केसमध्ये ब्यूरोच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या अटकेचा संदर्भ आला. उकरून पाहिलं तर खान! मग सगळी फाईल वाचली." बन्या सांगू लागला. "आपल्या कारनाम्यानंतर दहा दिवसांनी बिहारमधल्या सागौली रेल्वे स्टेशनावर बीएसएफने एकाला पकडलं. आपला मित्र - काळा गिड्डा वेटर! सागौलीपासून नेपाळची सीमा ३० किलोमीटर अंतरावर आहे. खानचे हात तिथे पोचण्याआधी बीएसएफने गिड्ड्याला सोलवटला असावा. तो खानसकट सगळ्यांची नावं ओकला."

"बाप रे! मोठाच गेम होता की! म्हणजे आपले मोरेदादापण त्यात..."

"त्यांचं नाव आलं नाही कधी या प्रकरणात." बन्याने खुलासा केला.

"आणि..." मला थांबवत बन्या हसला.

"चार हजार रुपये ना? गिड्ड्याला पॉकेटमनी म्हणून मिळाले होते!"

***

पान ३

सांगितल्याप्रमाणे दहा वाजता मी 'अनिकेत'मध्ये पोचलो. खरं तर रोजच्याप्रमाणेच. मी रोज दहा वाजता 'अनिकेत'मध्ये जातो हे बन्याला कसं कळलं हे त्याला विचारण्यात अर्थ नाही. त्याला लेकाला मी रोज बन-आमलेट खातो हेही माहीत असेल. दूरवरचे तारे काय बोलताहेत ते ऐकणं हा जसा माझा व्यवसाय आहे, तसा लोक कधी कुठे काय करतात हे जाणणं त्याचा व्यवसाय आहे!

बन्या माझ्या रोजच्या टेबलापाशी बसला होता. आम्ही मिठी मारली. त्याच्या फासळ्या माझ्या पोटाला बोचल्या, शाळेत बोचत तशाच! तो सध्या कुठे असतो, काय करतो वगैरे विचारण्यात अर्थ नाही, कारण तो सांगणार नाही. इतर मित्रांची चौकशी करण्यात अर्थ नाही - कारण मी सगळ्यांना वेळोवेळी भेटत असतो, आणि बन्या भेटत नसला, तरी त्याला त्यांची खडान् खडा माहिती असणारच!

टेबलावर दोन बन-आमलेटं आली. तेही काम त्याने करून ठेवलं होतं! मग मी सरळ विषयाला हात घातला, आणि त्या लेखाची प्रिंट बन्यासमोर ठेवली.

"वाचलाय." बन्या आमलेट खाताखाता म्हणाला.

"खरं आहे हे सगळं?" मी विचारलं.

"बास का आता! तू होतासच की तिथे!"

"ते झालं रे, बन्या. पुढचं सगळं. आपल्या अपरोक्ष घडलेलं." मी म्हणालो. "ते चार हजार रुपये. त्या वयस्कर बाई. तुमच्यासारख्या अनेकांना या पोरींनी गंडा घातला आहे वगैरे सांगणाऱ्या? खरं आहे?"

""खरंच म्हणायचं. त्याच्या दृष्टीने खरं. काय संबोधतोस तू त्याला कथेमध्ये? हां - लुनावरचा राजबिंडा."

"तू उत्तर टाळतोयस बन्या" मी वैतागलो.

"शरद, संपूर्ण सत्य - अॅबसोल्यूट ट्रुथ - असं काही नसतं रे. सगळी सत्यं सापेक्ष असतात - रिलेटिव्ह ट्रुथ. तुझ्यापेक्षा जास्त हे कोणाला कळणार?"

"उगाच भेंडोळं सोडू नकोस!" माझा वैताग वाढत चालला होता. "त्या लेखाच्या खालच्या कॉमेंट्स वाच. लोकांनी अॅबसोल्यूटली हसं केलंय बिचाऱ्याचं. आणि तू मला रिलेटिव्हिटी शिकव! माझ्या समाधानासाठी सांग - तुला तरी संपूर्ण सत्य माहीत आहे का?"

"तुझ्या समाधानासाठी - हो, मला माहीत आहे."

"कोण होत्या या वयस्कर बाई?"

"असतील कोणी खानसाहेबांच्या सहकारी."

"आणि चार हजार रुपये? त्यांचं काय झालं? ते कुठे गेले?"

"रीतसर रेड वगैरे घालायची असेल तर असं सलमान खानसारखं दबंगाईने घुसता येत नाही रे. अंगाशी येतं." बन्या म्हणाला. "खानसाहेब फोर्स जमवून तिथे पोचेपर्यंत त्या पोरी कटल्या होत्या तिथून. पैशांसकट."

"आणि कागद?"

"वेटर सापडला. कागदपण. तितकंच. आख्खी साखळी कधी कवेत आलीच नाही." बन्या मान हलवत म्हणाला.

"हे डेंजरस आहे, बन्या."

"म्हणजे काय, आहेच! ब्युरोच्या नव्वद टक्के केसेस अशाच असतात रे. एवढा मोठा देश आहे, हजारो किलोमीटर्सच्या बॉर्डर्स, दोन बाजूंना दोन भोचक शेजारी... चालायचंच. ब्यूरोचं मुख्य काम आगी विझवायचं रे."

असंच काहीबाही बोलून आम्ही निरोप घेतला. फास्टर फेणेच्या कुमारवयीन कारकिर्दीला चिक्कार प्रसिद्धी मिळाली. पण ऐन उमेदीच्या वयातले त्याचे कारनामे अजूनही मळक्या धुळकट फायलींत बंद आहेत. लुनावरच्या राजबिंड्याचा लेख जिथे छापून आला होता ते सदर मात्र मी नेमाने वाचतो. न जाणो, कधीतरी बन्या तिथून परत दर्शन द्यायचा!

***

पान ४

सांगितल्याप्रमाणे दहा वाजता मी 'अनिकेत'मध्ये पोचलो. खरं तर रोजच्याप्रमाणेच. मी रोज दहा वाजता 'अनिकेत'मध्ये जातो हे बन्याला कसं कळलं हे त्याला विचारण्यात अर्थ नाही. त्याला लेकाला मी रोज बन-आमलेट खातो हेही माहीत असेल. दूरवरचे तारे काय बोलताहेत ते ऐकणं हा जसा माझा व्यवसाय आहे, तसा लोक कधी कुठे काय करतात हे जाणणं त्याचा व्यवसाय आहे!

बन्या माझ्या रोजच्या टेबलापाशी बसला होता. आम्ही मिठी मारली. त्याच्या फासळ्या माझ्या पोटाला बोचल्या, शाळेत बोचत तशाच! तो सध्या कुठे असतो, काय करतो वगैरे विचारण्यात अर्थ नाही, कारण तो सांगणार नाही. इतर मित्रांची चौकशी करण्यात अर्थ नाही - कारण मी सगळ्यांना वेळोवेळी भेटत असतो, आणि बन्या भेटत नसला, तरी त्याला त्यांची खडान् खडा माहिती असणारच!

टेबलावर दोन बन-आमलेटं आली. तेही काम त्याने करून ठेवलं होतं! मग मी सरळ विषयाला हात घातला, आणि त्या लेखाची प्रिंट बन्यासमोर ठेवली.

"वाचलाय." बन्या आमलेट खाताखाता म्हणाला.

"खरं आहे हे सगळं?" मी विचारलं.

"बास का आता! तू होतासच की तिथे!"

"ते झालं रे, बन्या. पुढचं सगळं. आपल्या अपरोक्ष घडलेलं." मी म्हणालो. "ते चार हजार रुपये. त्या वयस्कर बाई. तुमच्यासारख्या अनेकांना या पोरींनी गंडा घातला आहे वगैरे सांगणाऱ्या? खरं आहे?"

"मला काय माहीत खरं का खोटं ते?"

मला हसू आलं. "नाही तर कोणाला माहीत असणार, बन्या?" मी म्हणालो. "खानसाहेबांची चिठ्ठी मिळाली ... तुला. फोन केलास ... तू. पंधराएक वर्षांची सर्व्हिस झाली ... तुझी!"

बन्या काहीच बोलला नाही. बराच वेळ.

"पंधरा वर्षं सर्व्हिस म्हणतोयस तू, शरद, त्यात एक शिकलो. संपूर्ण सत्य - ॲबसोल्यूट ट्रुथ - असं काही नसतं रे. सगळी सत्यं सापेक्ष असतात - रिलेटिव्ह ट्रुथ. ज्याचं त्याचं सत्य. बघणारा बदलतो तसं सत्यही बदलतं - बदललं पाहिजे." बन्या काटाचमचा हलवत म्हणाला. "तुझ्या 'लुनावरच्या राजबिंड्या'ला दिसलेलं सत्य वेगळं. आमच्या फायलीतलं वेगळं. "

"आणि खानसाहेबांचं वेगळं." मी सहज म्हणालो, पण फास्टर फेणेचा चेहरा पाहून चरकलो. त्याचा हाडकुळा चेहरा तटतटला होता.

"खानसाहेब!" तो तुच्छतेने म्हणाला. "बट येस, त्याचं सत्य नक्कीच वेगळं होतं."

"म्हणजे?" मला काहीच कळेनासं झालं होतं.

"ही लेट देम गो!" बन्या विषादाने म्हणाला. "जस्ट लाईक दॅट..."

"पण का म्हणून? कशाच्या बदल्यात?"

"कनक किंवा कांता! तो एक विकाऊ माणूस होता, शरद."

माझा अजून विश्वास बसत नव्हता. बाहेर पडतापडता मी विचारलं, "बन्या, तुला हे सगळं कधी समजलं?"

"खूप वर्षांनी. त्याच्या पापाचे घडे शेवटी भरले, आणि त्याला रंगेहाथ पकडला. मी जुनियर होतो तेव्हा, पण काही कारणाने त्याच्या डिपार्टमेंटल इन्क्वायरीला उपस्थित होतो. तेव्हा या प्रकरणाचा उल्लेख झाला होता."

"त्या वयस्कर बाई कोण होत्या?"

"असतील कोणी खानच्या सहकारी. ते महत्त्वाचं नाही. पुढचं ऐक." बन्या म्हणाला. “त्या मुलींचं काय झालं ते मात्र मला त्या इन्क्वायरीत समजलं. खानने त्या पोरींना खडकी स्टेशनवरून मध्यरात्रीच्या नेत्रावती एक्सप्रेसमध्ये बसवून दिलं."

"पण कोणालाच संशय आला नाही? मोरे हवालदार? इतर सहकारी? का ते पण..."

"नसावेत. पण आपल्या वरिष्ठाच्या कामाबाबत संशय घेणं त्यांना योग्य वाटलं नसेल. विचार कर, शरद. डेप्युटी डायरेक्टर लेवलचा माणूस - म्हणजे साध्या पोलिसांतली डीआयजी लेवल. मोरेदादा हवालदार. त्यातून हे साहेब गुप्त-पोलीस पडले ना. गुप्ततेच्या बुरख्याखाली बरीच पापं दडवता येतात."

"आणि खान?" मी अधीरतेने विचारलं. "इन्क्वायरीनंतर त्याचं काय झालं?"

"लुका ब्रासी स्लीप्स विथ द फिशेस." बन्याने समस्यापूर्ती केली.

***

पान ५

सांगितल्याप्रमाणे दहा वाजता मी 'अनिकेत'मध्ये पोचलो. खरं तर रोजच्याप्रमाणेच. मी रोज दहा वाजता 'अनिकेत'मध्ये जातो हे बन्याला कसं कळलं हे त्याला विचारण्यात अर्थ नाही. त्याला लेकाला मी रोज बन-आमलेट खातो हेही माहीत असेल. दूरवरचे तारे काय बोलताहेत ते ऐकणं हा जसा माझा व्यवसाय आहे, तसा लोक कधी कुठे काय करतात हे जाणणं त्याचा व्यवसाय आहे!

सव्वादहा वाजले तरी बन्याचा पत्ता नव्हता. हल्ली फास्टर फेणे मोठा साहेब झाला आहे. या शिळोप्याच्या गप्पा मारण्यापेक्षा महत्त्वाचं काही काम असेल.

साडेदहा वाजले. जरा बाहेर उभं राहावं म्हणून मी दाराकडे निघालो, तर वाटेत काऊंटरपाशी शेट्टीने अडवलं.

"सर, वो मॅडम आप को बुला री..."

दोन टेबलं पलीकडून एक चाळिशीतली मध्यमवयीन बाई मला हात करत होती. आधी कधी पाहिलं नव्हतं तिला इथे. मी तिच्याकडे गेलो.

"प्रोफेसर शरद शास्त्री?" तिने विचारलं.

"मीच. आपण?"

ती किंचित हसली. डोळे बारीक करून माझ्याकडे नीट निरखून पाहायला लागली. मला जरा अस्वस्थपणा आला.

"बनेश फेणेने पाठवलंय."

"ओह् अच्छा. तो नंतर येणार आहे का?"

"तो येणार नाहीये. पण तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं माझ्याकडे आहेत." ती म्हणाली.

मला काहीच समजेना. कोण आहे ही?

"बाहेर बसू या का आपण?" ती म्हणाली. 'अनिकेत' पहिल्यापासूनच अंधारं आहे."

आम्ही पायऱ्या उतरून मराठी विभागाच्या दिशेने चालायला लागलो.

"ओळखलं नाहीस ना मला, शरद?" ती अचानक एकेरीवर येऊन म्हणाली. "पुष्कळ वर्षं झाली. मीही ओळखलं नसतं."

मला कळेना. "आपण आधी भेटलोय का कुठे?"

ती हसली. "हो. डिसेंबरातल्या संध्याकाळी. इथून चार किलोमीटरवर."

खाड्कन माझ्या डोक्यात ट्यूब पेटली! पण...पण...

अभावितपणे मी अंग चोरून घेतलं. "तुम्ही... तू... तुला फास्टर फेणे कसा काय माहीत? नक्की त्यानेच पाठवलंय ना? की...? पण माझी मेल..." मला काही दगाफटका करायचा तर बेत नव्हता? घाबरून मी आजूबाजूला पाहिलं. आम्ही चालत चालत 'खेर वाङ्मय भवना'जवळ पोचलो होतो. आसपास तरुणाईची वर्दळ फुलली होती.

माझी तारांबळ पाहून ती मनसोक्त हसत होती. चाळिशीतही सौंदर्य ओसरलेलं नव्हतं.

"सगळी कथा ऐकायचीय?" तिने विचारलं. मंत्राने भारल्यासारखी मी मान डोलावली. तिने पुढच्या अर्ध्या तासात सांगितलेली अद्भुतरम्य कथा आठवेल तशी लिहितो आहे. काही तपशील सांडलेही असतील.

"ब्लॅकमेल कसं करतात, माहीताहे तुला, शरद? आपलं एखादं गुपित ब्लॅकमेलरला माहीत होतं. ते गुपित फारसं महत्त्वाचं किंवा बेकायदेशीर वगैरे नसतंच, काहीतरी फालतूच असतं. पण आपल्याला भीती असते - ते गुपित जगाला कळलं तर आपली छीथू होईल, लोक काय म्हणतील? ते जगाला न सांगण्याच्या बदल्यात ब्लॅकमेलर आपल्याकडून दुसरं कृत्य घडवतो. ते जाहीर करण्याची भीती घालून तिसरं. अशी साखळी पुढे चालू राहते. ब्लॅकमेल होणारा त्यात अडकत जातो. ब्लॅकमेलरच्या तालावर माकडासारखा नाचत राहतो. स्वतःला दुर्बळ दोषी ठरवत घुमत राहतो.

"त्या खानच्या जाळ्यात मी अशीच अडकले होते. त्याने माझ्याकडून काय काय करवून घेतलं हे आज आठवायला नको वाटतं. स्वतःची घृणा येते. त्यातून मला कळत होतं, की खानचा बॉस कोण आहे, कुठे बसलाय. उद्या कुठल्या शहरात काही वेडंवाकडं घडलं असतं, तर त्याला एका अर्थाने मी जबाबदार असणार होते.

"संरक्षणखात्याचा तो रिपोर्ट मिळवायचा खानचा कट अनेक दिवस शिजत होता. त्यासाठीच्या देवाण-घेवाणीत खानने माझा अनेक वेळेला चलनासारखा वापर केला. डिसेंबरातल्या त्या संध्याकाळी रिपोर्ट अखेर हस्तगत व्हायचा होता. तो ताब्यात घेऊन दरभंगा एक्सप्रेस पकडायची होती. पुढच्या सूचना तिथे मिळणार होत्या.

"खानचा डाव बघ - रिपोर्ट मिळवला माझा वापर करून. तो योग्य व्यक्तीच्या हातात जाणारही माझ्याच हातून. मध्ये काही गडबड झाली तर बळी माझाच जाणार. मी खानचं भांडं फोडलं तरी माझ्यावर विश्वास कोणावर ठेवणार? पुरावा काय होता माझ्याकडे?

"त्या संध्याकाळी रिपोर्ट तर मिळाला. पण तुम्ही दोघं नेमके तिथे कडमडलात, त्यामुळे घाईघाईने मला त्या लुनावाल्याची मदत घ्यावी लागली. हॉटेलमध्ये त्याच्याशी गप्पा झाल्या. बोलण्याच्या नादात त्या भाबड्याने आपल्याकडे मोठी रक्कम रोख असल्याचं सांगितलं. माझ्या डोक्यात दिवे झगमगले! या सगळ्यातून सुटायचा मार्ग दिसला!

"काहीतरी करून त्याच्याकडून ते पैसे मिळवायचे. पळून जायचं. ओळख पुसायची. देशाच्या कोणत्यातरी कोपऱ्यात जाऊन नवी ओळख घ्यायची. नवी सुरुवात करायची. खानपासून दूर.

"त्या भाबड्या तरुणाला फसवणं जिवावर आलं होतं. पण अशी संधी परत आली नसती. कधीतरी भविष्यात त्याचे पैसे परत करू अशी मनाची समजूत घातली, आणि मी माझा डाव टाकला. त्याच्याकडून चार हजार रुपये कसे मिळवले हे तर तू वाचलंच आहेस.

"पण खान बाहेर होताच. त्याला चुकवून सूंबाल्या कशा करायच्या याच्या विचारात असतानाच सुदैवाने नेमका बनेश तिथे पोचला. त्या वेळी त्याला नावाने ओळखत नसले, तरी रस्त्यात आपल्याला हटकणारा पोरगा हाच हे लक्षात आलं. खानला संकेत दिला. खान बनेशला कटवण्यात मग्न असल्याचा फायदा घेऊन मी तिथून पळाले. भूतकाळ मागे सोडून, पण चार हजार रुपये पर्समध्ये घेऊन.

खडकी रेल्वे स्टेशनवर पोचले तेव्हा नेत्रावती एक्सप्रेस स्टेशनात येत होती. खडकी स्टेशनात गाड्या तीन मिनिटांपेक्षा जास्त थांबत नाहीत. एका डब्यात चढले, आणि दोनेक मिनिटांत गाडी सुटलीच. खडकी, रिपोर्ट, खान, लुना सगळं मागे पडत गेलं. आता मी स्वतंत्र होते, मुक्त होते. चार हजार रुपयांत मला स्वतःला नव्याने घडवायला सज्ज होते."

सगळं ऐकूनही माझ्या मनात एक प्रश्न राहिलाच होता.

"तू फास्टर फेणेला कशी काय ओळखतेस?"

"शरद, ते मी तुला सांगू शकत नाही." ती म्हणाली. "बनेशनेच सांगितलं आहे तसं. वाटलं तर तू त्यालाच विचार."

मी मान हलवली. हे असलं काहीतरी मला अपेक्षितच होतं.

"आणि खान? त्याचं काय झालं पुढे?"

"सांगितलं ना बनेशला विचार." ती निर्णायकपणे म्हणाली. "सगळं गुंतलेलं आहे एकात एक."

मी बन्याला एकदोनदा मेल केली. काही उत्तर आलं नाही. परत कधी भेटला, तर याही प्रश्नांची उत्तरं मिळतील अशी आशा आहे.

***

पान ६

सांगितल्याप्रमाणे दहा वाजता मी 'अनिकेत'मध्ये पोचलो. खरं तर रोजच्याप्रमाणेच. मी रोज दहा वाजता 'अनिकेत'मध्ये जातो हे बन्याला कसं कळलं हे त्याला विचारण्यात अर्थ नाही. त्याला लेकाला मी रोज बन-आमलेट खातो हेही माहीत असेल. दूरवरचे तारे काय बोलताहेत ते ऐकणं हा जसा माझा व्यवसाय आहे, तसा लोक कधी कुठे काय करतात हे जाणणं त्याचा व्यवसाय आहे!

सव्वादहा वाजले तरी बन्याचा पत्ता नव्हता. हल्ली फास्टर फेणे मोठा साहेब झाला आहे. या शिळोप्याच्या गप्पा मारण्यापेक्षा महत्त्वाचं काही काम असेल.

साडेदहा वाजले. जरा बाहेर उभं रहावं म्हणून मी दाराकडे निघालो, तर वाटेत काऊंटरपाशी शेट्टीने अडवलं.

"सर, वो मॅडम आप को बुला री..."

दोन टेबलं पलिकडून एक चाळिशीतली मध्यमवयीन बाई मला हात करत होती. आधी कधी पाहिलं नव्हतं तिला इथे. मी तिच्याकडे गेलो.

"प्रोफेसर शरद शास्त्री?" तिने विचारलं.

"मीच. आपण?"

ती किंचित हसली. डोळे बारीक करून माझ्याकडे नीट निरखून पाहायला लागली. मला जरा अस्वस्थपणा आला.

"बनेश फेणेने पाठवलंय."

"ओह् अच्छा. तो नंतर येणार आहे का?"

"तो येणार नाहीये. पण तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं माझ्याकडे आहेत." ती म्हणाली.

मला काहीच समजेना. कोण आहे ही?

"बाहेर बसू या का आपण?" ती म्हणाली. 'अनिकेत' पहिल्यापासूनच अंधारं आहे."

आम्ही पायऱ्या उतरून मराठी विभागाच्या दिशेने चालायला लागलो.

"ओळखलं नाहीस ना मला, शरद?" ती अचानक एकेरीवर येऊन म्हणाली. "पुष्कळ वर्षं झाली. मीही ओळखलं नसतं."

मला कळेना. "आपण आधी भेटलोय का कुठे?"

ती हसली. "हो. डिसेंबरातल्या संध्याकाळी. इथून चार किलोमीटरवर."

खाड्कन माझ्या डोक्यात ट्यूब पेटली! पण...पण...

अभावितपणे मी अंग चोरून घेतलं. "तुम्ही... तू... तुला फास्टर फेणे कसा काय माहीत? नक्की त्यानेच पाठवलंय ना? की...? पण माझी मेल..." मला काही दगाफटका करायचा तर बेत नव्हता? घाबरून मी आजूबाजूला पाहिलं. आम्ही चालत चालत 'खेर वाड्मय भवना'जवळ पोचलो होतो. आसपास तरुणाईची वर्दळ फुलली होती.

माझी तारांबळ पाहून ती मनसोक्त हसत होती. चाळिशीतही सौंदर्य ओसरलेलं नव्हतं.

"सगळी कथा ऐकायचीय?" तिने विचारलं. मंत्राने भारल्यासारखी मी मान डोलावली. तिने पुढच्या अर्ध्या तासात सांगितलेली अद्भुतरम्य कथा आठवेल तशी लिहितो आहे. काही तपशील सांडलेही असतील.

"ब्लॅकमेल कसं करतात, माहीताहे तुला, शरद? आपलं एखादं गुपित ब्लॅकमेलरला माहीत होतं. ते गुपित फारसं महत्त्वाचं किंवा बेकायदेशीर वगैरे नसतंच, काहीतरी फालतूच असतं. पण आपल्याला भीती असते - ते गुपित जगाला कळलं तर आपली छीथू होईल, लोक काय म्हणतील? ते जगाला न सांगण्याच्या बदल्यात ब्लॅकमेलर आपल्याकडून दुसरं कृत्य घडवतो. ते जाहीर करण्याची भीती घालून तिसरं. अशी साखळी पुढे चालू रहाते. ब्लॅकमेल होणारा त्यात अडकत जातो. ब्लॅकमेलरच्या तालावर माकडासारखा नाचत रहातो. स्वतःला दुर्बळ दोषी ठरवत घुमत रहातो.

"त्या खानच्या जाळ्यात मी अशीच अडकले होते. त्याने माझ्याकडून काय काय करवून घेतलं हे आज आठवायला नको वाटतं. स्वतःची घृणा येते. त्यातून मला कळत होतं, की खानचा बॉस कोण आहे, कुठे बसलाय. उद्या कुठल्या शहरात काही वेडंवाकडं घडलं असतं, तर त्याला एका अर्थाने मी जबाबदार असणार होते.

"संरक्षणखात्याचा तो रिपोर्ट मिळवायचा खानचा कट अनेक दिवस शिजत होता. त्यासाठीच्या देवाण-घेवाणीत खानने माझा अनेक वेळेला चलनासारखा वापर केला. डिसेंबरातल्या त्या संध्याकाळी रिपोर्ट अखेर हस्तगत व्हायचा होता. तो ताब्यात घेऊन दरभंगा एक्सप्रेस पकडायची होती. पुढच्या सूचना तिथे मिळणार होत्या.

"खानचा डाव बघ - रिपोर्ट मिळवला माझा वापर करून. तो योग्य व्यक्तीच्या हातात जाणारही माझ्याच हातून. मध्ये काही गडबड झाली तर बळी माझाच जाणार. मी खानचं भांडं फोडलं तरी माझ्यावर विश्वास कोणावर ठेवणार? पुरावा काय होता माझ्याकडे?

"त्या संध्याकाळी रिपोर्ट तर मिळाला. पण तुम्ही दोघं नेमके तिथे कडमडलात, त्यामुळे घाईघाईने मला त्या लुनावाल्याची मदत घ्यावी लागली. हॉटेलमध्ये त्याच्याशी गप्पा झाल्या. बोलण्याच्या नादात त्या भाबड्याने आपल्याकडे मोठी रक्कम रोख असल्याचं सांगितलं. माझ्या डोक्यात दिवे झगमगले! या सगळ्यातून सुटायचा मार्ग दिसला!

"काहीतरी करून त्याच्याकडून ते पैसे मिळवायचे. पळून जायचं. ओळख पुसायची. देशाच्या कोणत्यातरी कोपऱ्यात जाऊन नवी ओळख घ्यायची. नवी सुरुवात करायची. खानपासून दूर.

"त्या भाबड्या तरुणाला फसवणं जिवावर आलं होतं. पण अशी संधी परत आली नसती. कधीतरी भविष्यात त्याचे पैसे परत करू अशी मनाची समजूत घातली, आणि माझा डाव टाकला. त्याच्याकडून चार हजार रुपये कसे मिळवले हे तर तू वाचलंच आहेस.

"पण खान बाहेर होताच. त्याला चुकवणं काही जमलं नाही. रिपोर्ट आणि चार हजार रुपये, दोन्ही खान गिळंकृत करून बसला!"

"मग पुढे?" मी विचारलं. "कशी सुटलीस खानच्या कचाट्यातून?"

"ती वेगळी कथा आहे. याच्याशी त्याचा संबंध नाही." ती बोलताना जरा अडखळली. बोलावं की न बोलावं असा क्षणभर विचार करून म्हणाली, "त्या कथेतही फास्टर फेणे आहे."

"तू फास्टर फेणेला कशी काय ओळखतेस?"

"शरद, ते मी तुला सांगू शकत नाही." ती म्हणाली. "बनेशनेच सांगितलं आहे तसं. वाटलं तर तू त्यालाच विचार."

मी मान हलवली. हे असलं काहीतरी मला अपेक्षितच होतं.

"आणि खान? त्याचं काय झालं पुढे?"

"सांगितलं ना बनेशला विचार." ती निर्णायकपणे म्हणाली. "सगळं गुंतलेलं आहे एकात एक."

मी बन्याला एकदोनदा मेल केली. काही उत्तर आलं नाही. परत कधी भेटला, तर याही प्रश्नांची उत्तरं मिळतील अशी आशा आहे.

***

http://www.esakal.com/esakal/20130122/4824005995910158145.htm येथले 'सकाळ'मधले कात्रण.

सकाळ | eSakal.com
Update: Wednesday, August 21, 2013 1:05:52 PM IST
वाचकांचा पत्रव्यवहार | ई-पेपर | Bookmark | Download Font | लॉग-इन
शोधा
मुख्य पान | संपादकीय | सप्तरंग | फॅमिली डॉक्टर | क्रीडा | मनोरंजन | मुक्तपीठ | पैलतीर | अर्थविश्व | मधुरांगण | तनिष्का | अन्नाट | ब्लॉग
Youth Beats | फास्टट्रॅक | फुल टू स्मार्ट | पुणे | मुंबई | पश्चिम महाराष्ट्र | उत्तर महाराष्ट्र | मराठवाडा | विदर्भ | कोकण | महाराष्ट्र | देश | विदेश | N.I.E.
मुख्य पान >> मुक्तपीठ >> बातम्या

महागात पडलेलं स्त्रीदाक्षिण्य (मुक्तपीठ)

-

Tuesday, January 22, 2013 AT 06:00 AM (IST)
Tags: muktpeeth, s. v. brahme

Like Share 840 people like this.

पेट्रोल पंपावरून पेट्रोल भरून बाहेर पडलो, तर एक अतिशय सुंदर, गोरी तरुणी समोर उभी राहिली. तिनं शेजारच्या हॉटेलमध्ये कॉफी दिली. बाहेर पडताच. तिनं, 'ज, औंधला सोडता का?' अशी विनंती केली. थंडीच्या त्या दिवसांत रात्री आठ-साडेआठच्या सुमारास तिला तिकडं सोडण्यासाठी गेलो. तिनं पैशांचीही गळ घातली. पैसेही दिले अन्...
- एस. व्ही. ब्रह्मे

या घटनेला अंदाजे 22 वर्षे झाली. पुणे विद्यापीठात बागेच्या ऑफिसात होतो. नुकतीच नवीन लुना घेतली होती. रोज जाणे असल्यानं बहुतेक मुली परिचयाच्या झाल्या होत्या; पण मला मुलींच्या मागे जाणं, गप्पा मारणं या गोष्टी जमायच्या नाहीत व तशी वेळच कधी आली नाही. कारण मुलीच माझ्याशी आपणहून बोलायच्या, चेष्टा करायच्या. ऑफिसमध्ये जाता-येताना मुली लिफ्ट मागायच्या व मी त्यांना लुनावर सोडत असे, त्यामुळे परिचय व्हायचा.

असाच एकदा सुट्टीच्या दिवशी म्हसोबा गेटसमोरील पेट्रोल पंपावर पेट्रोल भरून बाहेर पडलो, तर काय एक अतिशय सुंदर, गोरी तरुणी समोर उभी. 'विद्यापीठ गेटपर्यंत सोडता का?" माझ्या उत्तराची वाट न पाहता ती माझ्या मागे बसली. पुढे कॉर्नरला अशोका हॉटेलमध्ये तिने कॉफी दिली व बाहेर आलो.

मग ती म्हणाली, 'प्लीज, जरा औंधला रुमवर सोडता का? उशीर झाला आहे." रात्रीचे साडेआठ वाजले होते. स्त्रीदाक्षिण्य म्हणून आम्ही निघालो. ते दिवस थंडीचे होते. गार वारं व थंडी, राजभवनच्या पुढे गेल्यावर तिला खूप थंडी वाजू लागली. माझा जर्किन तिला घालायला दिला व आम्ही पुढं निघालो. थोड्या वेळानं तिनं अंगचटीला येण्याचा प्रयत्न केला. मी गोंधळून गेलो. तसेच लुना जोरात चालवत होतो. मला असा अनुभव नवीनच होता. केव्हा एकदा तिला रूमवर सोडतो, असं झालं होतं. शिक्षकनगरच्या पुढे कॉर्नरवर तिच्या रूमवर सोडले. ती व तिच्या मैत्रीणींनी आत बोलावून गरम चहा दिला. गप्पा मारताना तिने 4-5 हजार रुपये आहेत का, मला फी भरायची आहे. मी उद्याच तुम्हाला तुमच्या ऑफिसात पैसे परत आणून देते. मी तुम्हाला रोज पाहते. नक्की तुमचे पैसे देईन. विश्वास ठेवा, असं सांगितलं. ती नाव, आडनावावरून चांगल्या घराण्यातील वाटली म्हणून माझ्याकडे होते, ते चार हजार रुपये दिले. घरी जायला अजून खूप उशीर होईल म्हणून मी जोरातच घरी आलो.

इतर कामाच्या गडबडीत दुसऱ्या दिवशी ती येणार हे विसरून गेलो. मित्राच्या घरी लग्नाचा कार्यक्रम होता. त्या गडबडीत व कामामुळे ती गोष्ट पूर्ण विसरलो. आठ दिवस झाले, एकदम मला पैशाची व त्या तरुणीची आठवण झाली म्हणून लगेचच ऑफिस सुटल्यावर तिच्या रूमवर गेलो. बेल वाजल्यावर एक वयस्कर बाईनी दरवाजा उघडला. मी त्यांना आठ दिवसांपूर्वीची सगळी हकिकत सांगितली. त्यांनी सांगितलेली माहिती ऐकून मला तर चक्करच येते की काय असं झालं. त्या म्हणाल्या, की त्या दोन-तीन जणी भाड्यानं राहात होत्या. त्या परवाच त्यांच्या गावी गेल्या. तुझ्यासारख्या दोन-तीन जणांना त्यांनी फसविले आहे. त्या पुढे म्हणाल्या, की नशीब चार हजार गेले. इतर दोन-तीन जणांना तर त्या तिघींनी बराच गंडा घातला आहे. स्त्रीदाक्षिण्य दाखवून मी फसलो गेलो होतो, तेव्हापासून कोणाही अनोळखी तरुणीला लिफ्ट न देण्याचा निश्चयच केला.

At least 18 killed as a truck runs into bus

ताज्या घडामोडी
- मुष्टियुद्ध खेळाडू महंमद अली यांची मृत्यूशी झुंज
- दिल्लीत नाष्टा,लंच हेरातमध्ये आणि दोहात डिनर
- मॉन्सून मंगळवारपर्यंत केरळमध्ये
- इंटरनेटच्या प्रसारात भारतच 'ब्राईट स्पॉट'
- मथुरेतील हिंसाचारात 24 ठार
- भाजपमध्ये नाथाभाऊ एकाकी

***

गेला कुठे श्रीरंग?

- भा. रा. भागवत

भारांनी लिहिलेली ही शेवटची कथा. 'विज्ञानयुग' या नियतकालिकाच्या १९९९ सालच्या दिवाळी अंकात ती प्रकाशित झाली होती. भारांनी आजारपणात घेतलेल्या काही अनुभवांवर ती आधारित आहे.

***

श्रीरंगाची अलीकडची अवस्था पाहून त्याच्या आईवडिलांना विलक्षण काळजी वाटत होती. तो कोणाशी काही बोलायचा नाही. एकटाच कुठेतरी बसून राहायचा. आपल्या अभ्यासाच्या खोलीत किंवा बागेत. खेळायलासुद्धा कधी जायचा नाही. मित्र बोलवायला आले तरी त्यांच्याकडे पाठ फिरवायचा. क्रिकेटची एवढी आवड असूनही, टीव्हीवर चाललेली मॅचदेखील बघायचा नाही. त्याला झालंय तरी काय? की 'सोळावं वरीस धोक्याचं' हे विद्यार्थिजीवनातही खरं आहे?

"श्रीरंग, बेटा, मला सांगणार नाहीस का तुला काय होतंय ते?" एक दिवस आईने कळवळून विचारले. पण त्याने "काही नाही आई." एवढेच उत्तर दिलं आणि मग आईचा खिन्न चेहरा पाहून त्याला राहवेना. "अगं आई! माझ्या मनात काहीतरी विचार येत असतात. ते काय असतात, हे माझं मलाही समजत नाही. सगळा गोंधळ उडालाय!"

आणि मग एक दिवस "मुंग्या डसताहेत... माझ्या मेंदूला मुंग्या डसताहेत, आई....!" असं श्रीरंग कळवळून ओरडला. आईने घाबऱ्या घाबऱ्या बाबांना बोलावले.

"हा बघा काय बडबडतोय ते! मुंग्या डसताहेत म्हणे मेंदूला."

बाबा चिंतातुर झाले. त्यांना आता अशी भीती वाटू लागली की या पोराला वेडबीड तर असणार नाहीय ना?.... याला सायकिॲट्रिस्टकडे न्यावं की काय?

डॉ. कामत या कुटंबाचे फॅमिली डॉक्टर. त्यांना बोलावून त्यांनी त्यांचा सल्ला विचारला. डॉक्टरांनी त्याची तपासणी केली. त्याला काही प्रश्न विचारले. त्यांना मिळालेली उत्तरे तुटक होती. पण मुद्द्याला धरून, ते म्हणाले, "सध्या तरी एवढी सीरियस स्टेप घेऊ नका. एखादा आठवडा जाऊ द्या. मी सध्या त्याला मनःशांती देणाऱ्या काही गोळ्या देतो. ट्रॅन्क्विलायझर. कदाचित त्याला तेवढ्याने बरं वाटेल. अतिहुशार मुलांचं या वयात असं होतं कधी कधी."

त्याप्रमाणे गोळ्या देऊन झाल्या. एक आठवडा का? चांगला तीन आठवडे श्रीरंगवर गोळ्यांचा मारा होत होता.

तो जरा सुधारल्यासारखा वाटत होता खरा. पण केवळ वर वर. कसं काय कोण जाणे, पण 'मनःशांती' हा शब्द त्याने आईच्या तोंडून ऐकला होता आणि तो स्वतःशी पुटपुटला होता, "मनःशांती म्हणे! कशी मिळणार मला मनःशांती? या जन्मी तरी ते शक्य नाही. यांना कळायचं नाही मला काय होतंय ते."

"माझा आतला आवाज काहीतरी गुणगुणतो आहे. पण.. पण... माझं जाऊ दे. आईबाबांना तरी बरं वाटावं म्हणून मला जपलंच पाहिजे....."

आणि एक दिवस बाबांनी त्याच्या मित्रांना हट्टाने बोलावून आणले.

"आज तर मोठा सामना आहे ना? तुमचा सचिन तेंडुलकर प्रकृती बरी होऊन आला आहे अन् मॅच खेळणार आहे. साऱ्या जगात त्याचं नाव गाजतंय. श्रीरंगला ओढून बसवा टीव्हीपुढे, कदाचित तो पुन्हा माणसात येईल."

श्रीरंग बसला. सचिनने अन् सौरभने मारलेल्या फटक्यांच्या खेळावर खूश होऊन मित्र टाळ्या वाजवत होते अन् उड्या मारून आपला आनंद व्यक्त करत होते. पण श्रीरंग आपला गप्पच. तो हसल्यासारखे दाखवी. पण ते केवळ त्यांना बरं वाटावं म्हणून.

"काय रे! सचिनने एवढा पराक्रम केला त्याचं तुला काहीच वाटत नाही?" मधूच्या ह्या प्रश्नालाही त्याने उघड उत्तर दिले नाही. त्याने स्वतःशी केलेली पुटपुट कुणालाही ऐकू गेली नाही. तो स्वतःलाच सांगत होता, "मी तरी काय करू? सचिनने मारलेल्या प्रत्येक टोल्याने आकाश फाटल्यासारखं वाटतंय. बॉल अंतराळात कुठेतरी भरकटत गेला, तारांगणात पडला, त्याचा ग्रहगोल बनला. आपला तेंडुलकर पृथ्वीवरच नाही, तर साऱ्या विश्वात कीर्ती मिळवतोय आणि तरी तो मला मनःशांती देत नाही."

आता करावं तरी काय हे त्याच्या आईवडिलांना कळेना. कामतांची ट्रीटमेंट संपली. तरी श्रीरंग एकलकोंडाच राहिला. खिन्न, उदास, चिंतनमग्न. त्याला मानसोपचार तज्ज्ञांकडे न्यायला हवे हा बाबासाहेबांचा विचार पुन्हा बळावला. आणि मग एक विशेष काहीतरी घडले.

श्रीरंगची आई, जुन्या वळणाची असली तरी भगत, महंत वगैरेंचा सल्ला घेण्याइतकी ती अंधश्रद्ध नव्हती. देवावर मात्र तिचा विश्वास होता. 'माझ्या मुलाला तूच तार', असा ती देवाचा धावा करीत होती. एक दिवस तर तिने श्रीरंगला आपल्याबरोबर मुरलीधराच्या देवळात नेले. मोठ्या प्रयत्नपूर्वक. तिथे भगिनी मंडळाचे गीता पठण चालू होते. पण त्याला ते अर्थ न कळता केलेले पाठांतर आवडल्यासारखे वाटले नाही.

एक दिवस श्रीरंगने आपण होऊनच तक्रार केली. "बाबा, माझ्या छातीत दुखतंय... इथे... इथे टाचण्या टोचताहेत.॥
बाबांनी बघितले तर तो घामाने डबडबला होता आणि छातीतली बोच म्हणजे तर घाबरण्याचाच प्रकार होता. बाप रे! हृदयविकार तर नाही ना?

बाबासाहेबांनी हृद्रोग तज्ज्ञ डॉ. बेलसऱ्यांना फोन करून अपॉइंटमेंट घेतली. मोटारीतून त्याला क्लिनिकमध्ये नेलं. सर्व प्रकारच्या चिकित्सा करून झाल्या. शेवटी - छातीचा इ. सी. जी. घेण्यात आला.[१] तो घेत असतानाच डॉक्टरांनी मान हलवली.

"काय झालं डॉक्टर?"

तपासणी पूर्ण झाली आणि पेशंटला विश्रांतिकक्षात नेऊन झोपवण्यात आले. तेव्हा बाबासाहेब विचारीत होते.

"आय एम सॉरी टू टेल यू - इट्स ए सीरियस केस." डॉक्टरांनी गंभीरपणे उत्तर दिले. ते ऐकून बाबासाहेबांना धक्काच बसला.

"सीरियस? पण डॉक्टर तुम्ही इ. सी. जी घेतलात तेव्हा मी जवळ होतो. इ. सी. जी. वर चांगली सरळ रेषा होती की ती!"[२]

यावर डॉक्टर हसले. पण म्लानपणे म्हणाले, "मिस्टर फाटक, मला तुमचं नवल वाटतंय. तुमच्यासारख्या उच्चविद्याविभूषित रँग्लरला एवढंसुद्धा माहीत नाही की, इ. सी. जी.ची सरळ रेषा चांगलं सुचवत नसते.[३] इन मॅथेमॅटिक्स इट्स दी शॉर्टेस्ट डिस्टन्स बिटवीन टू पॉइंट्स एवढंच जाणता तुम्ही! इन मेडिकल सायन्स, ए स्ट्रेट लाईन इज दी शॉर्टेस्ट डिस्टन्स बिटवीन लाईफ अँड डेथ. हृदयाचे स्पंदन ठीक होत नाही अशी सरळ सरळ सूचना आहे ही!"

क्षणभर बाबासाहेब शरमल्यासारखे झाले. इ. सी. जी.च्या संदर्भात[४] हे मौलिक सत्य आपल्याला माहीत नव्हतं असं नाही; आणि तरी आपण भलता प्रश्न कसा विचारला हे त्यांना समजेना.

मुलाबद्दलच्या दीर्घकालीन काळजीने त्या क्षणी आपल्याला बुद्धिभ्रंश तर झाला नव्हता? पण ते जाऊ दे. त्या 'डेथ' शब्दाने त्यांना आता भयग्रस्त केले. "इतक्या लहान वयात हार्ट अॅटॅक येतो असं तर ऐकलं नव्हतं."

"अशा गोष्टी घडल्या आहेत फाटक साहेब. कधी दहा वर्षांच्या मुलाला कॅन्सर होऊ शकतो. कधी शंभर वर्षं जगूनही एखादा माणूस उत्तम काम करू शकतो."

बाबासाहेबांनी कापऱ्या स्वरात विचारले, "काय करायला हवं, डॉक्टर?"

"ऑपरेशन! इमिजीएट ऑपरेशन... याच्या इतर चाचण्यांवरून माझी खात्री झाली आहे की इट वुइल हॅव टू बी ॲन ओपन-हार्ट सर्जरी."

तो दिवस श्रीरंगला अतिदक्षता विभागात घालवावा लागला. डॉक्टर पुन्हा पुन्हा येऊन त्याचे ब्लड प्रेशर पाहत होते. थर्मोमीटर लावत होते. या सर्व बाबतीत समाधान झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता शस्त्रक्रिया करणार असं त्यांनी जाहीर केले. श्रीरंगची आई पहाटे उठून इस्पितळात आली होती. तिला या वेळी काय वाटत असेल याची कल्पना ज्याला आई आहे अशा कोणत्याही मुलाला येऊ शकेल. पहिल्याने तर तिला रडूच फुटले होते. पण मग तिने स्वतःला आवरले. भारतीय स्त्री जितकी देवभोळी असते, तितकीच धैर्यवतीही असते, याची अनेक उदाहरणे आढळतात. स्वतःचे दुःख विसरून तिने साऱ्या कुटुंबाला धीर दिलेला आहे. श्रीरंगची आईदेखील याला अपवाद नव्हती. ती जरा वेळ श्रीरंगजवळ बसली. त्याच्या अंगावरून हात फिरवत तिने त्याला धीर दिला.

"भिऊ नकोस राजा, सारं काही ठीक होईल." असे जेव्हा त्याच्या कपाळाचा मुका घेत तिने म्हटले तेव्हा मात्र श्रीरंगच्या डोळ्यालाही पाणी आले.

"आई, मी मुळीच भीत नाही, तूच भितेस. देवावर विश्वास आहे ना तुझा? मग तो तुझी भीती दूर करील." असे म्हणत त्याने डोळे मिटले. कारण डॉक्टरांनी दिलेल्या 'सेडेटीव्ह'मुळे त्याला गुंगी येत होती.

आईला रात्री त्याच्याजवळ सोबत म्हणून राहण्याची इच्छा होती. पण डॉक्टरांनी तशी परवानगी दिली नाही आणि बाबासाहेबांबरोबर तिला घरी जावे लागले.

***

रात्री एकचा सुमार होता. श्रीरंग एकदम जागा झाला. त्याने पाहिले तर नर्सला डुलकी लागली होती. तो पटकन उठला. त्याने पांघरूण झुगारून दिले. दरवाजा उघडून तो झपाट्याने बाहेर पडला.

पुढचे त्याला आठवेना. आपण टॅक्सी केली का? विमानतळ गाठला का? कसं केलं आपण हे? खिशात पैसे होते का? होते. ती पुरचुंडी आपण बिछान्याखाली लपवली होती, तीत असतील. ते काही असो. पुढचे त्याला आठवेना.

श्रीहरीकोटा गाठले, एवढे त्याला कळत होते. कदाचित असं असेल आपण सुपरमॅन किंवा शक्तिमान असू. ते इन्सॅट किती नंबर? ते उडण्याच्या तयारीत लाँचिंग पॅडवर उभे होते. डाऊन काउंट चालू असतानाच तो यानात जाऊन बसला. लपून!... थ्री-टू-वन.... आणि जेटचे भपकारे सोडीत यानाने अंतराळात झेप घेतली. वातावरण धूम्रमय होऊन गेले.

एका कोपऱ्यात चुपचाप बसून श्रीरंग यानातल्या कंट्रोल सिस्टीमकडे पाहत होता. तिथे कुणीच चालक नाही हे पाहून त्याला जितके आश्चर्य वाटले तितकाच आनंदही झाला. हे यान निर्मनुष्य आहे तर!

केवळ पृथ्वीवरच्या कंट्रोल रूममधून याचं नियंत्रण होत आहे तर! म्हणजे आपण बरंच काही साधू शकतो. तरी पण... जपूनच राहायला हवं. खालून संदेश येत असतील. येताहेत की! आणि काहीतरी सूं सूं सुस्कारे येत आहेत. अरेच्या! हां हां म्हणता आपण पृथ्वीची कक्षा गाठली.. आणि गुड गॉड! असं काय होतंय? बरोबर. गुरुत्वाकर्षण संपलं. आपण वजनरहित होऊन तरंगतो आहोत. मोठ्या प्रयत्नाने त्याने बाजूची एक दांडी पकडली आणि तो स्थिर झाला. कारण असे फार काल तरंगत राहिल्याने त्याला भ्रमिष्टासारखे झाले असते.

पण बाप रे! हे काय झालं? पृथ्वीची कक्षा सोडून आपण पलीकडे गेलो की काय? यानाची गती वाढली असावी, पण ती किती गाठली गेली असेल याचा काहीच अंदाज श्रीरंगला येईना. त्याने बाहेर बघितले.... तिथे सर्वत्र अंधार होता. मधूनच तेजाचे बिंदू दिसत होते, झपाट्याने मागे पडत होते. स्वीच बोर्ड काहीच सांगत नव्हता. एकंदरीत नियंत्रण कक्षाचा यानावरचा ताबा सुटला असून ते भरकटत कुठे तरी चाललं असावं. पृथ्वी? ती केव्हाच अंतर्धान पावली. आता हा ग्रह कोणता असेल? 'का जे द्यौर्लोक आणि पाताळ। पृथिवी आणि अंतराळ। अथवा दशदिशा समाकुळ। दिशाचक्र॥'[५] अगदी योग्य ओळी आठवल्या की आपल्याला! कारण यान भलतंच चकरा खातंय, ते कुठं चाललंय तेच मुळी कळत नाही. बाहेर जाऊनच पाहिलं पाहिजे.

आपण केव्हा स्पेस सूट चढवला ते श्रीरंगला आठवेना. पण आता तो मनाशी काहीतरी निर्धार करून एअर-कॉक उघडून बाहेर पडला. चक्क अंतराळात पोहू लागला आणि काय दिसलं त्याला?

शुक्र, बुध नि मंगळ हे सूर्याजवळचे ग्रह केव्हाच मागे पडले. इतकंच नाही तर आपण वाचलेली माहिती नक्की आठवत असेल तर आकाशगंगेचा काठ ओलांडून आपण बाह्य अवकाशात प्रवेश केला आहे - "हें असो स्वर्ग पाताळ! की भूमी दिशा अंतराळ! हे विवक्षा ठेली सकळ! मूर्तिमय देखतसें"[६]

....आता किती वेळ ही भ्रमंती सहन होणार... ही इथे रांगोळी कसली घातली आहे? हा मध्येच चमकणारा चुरा कसला?
पण नाही! ही भ्रमंती खरोखरीच त्याला असह्य झाली होती. डोके गरगरत होते. परत यानात शिरावे तर ते दृष्टीआड झाले होते. कदाचित ते पुन्हा पृथ्वीच्या कक्षेत जाऊन आपल्या मायभूमीकडे वळलेही असेल. अन् मातेची भेट होण्यापूर्वीच त्याला मरण आलं असेल, किंवा एक चिमुरडा खडा बनून ते मातेच्या कुशीत गेले असेल? अन् काय वाटत असेल भूमातेला आणि तिच्या त्या बुद्धिवंत कन्या-पुत्रांना? पण...पण... नक्षत्रांच्या अनेक गंगा-यमुना ओलांडून झाल्या आणि एका अनोळखी तारांगणात प्रवेश करतानाच श्रीरंगला गुंगी आली.

भोवताली हवा नाही, प्रकाश नाही, ध्वनी नाही, अशा अवस्थेत तो निद्राधीन झाला. किती क्षण, किती मिनिटं, किती तास, किंबहुना किती वर्षं....

किती प्रकाशवर्षं.. ते आम्ही सांगू शकत नाही. पण जागा झाल्यावर त्याला पुन्हा काही तेजःपुंज तारे दिसू लागले. त्या ताऱ्यांनी मानवरूप धारण केलं की काय तरी?.... ती पाहा एक ऋषितुल्य व्यक्ती! कोण असेल ती? ध्रुवबाळ नक्कीच नाही. आर्यभट्ट आहे की वराहमिहीर? हातात एक नळी धरणारा तो गॅलिलिओ तर नसेल? की केपलर?.. आणि हा? प्लेटो की ॲरिस्टॉटल? पाणिनी की पतंजली? आणि हा? बाप रे! न्यूटनपासून थेट आईन्स्टाईनपर्यंत पोचलो की आपण! 'वर्षत सकळ मंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी, अनवरत भूमंडळी, भेटतु भूतां!!' भूमंडळ आता राहिलंच नाही.[७] भुतं बनून म्हणा किंवा तारे बनून म्हणा, आपणच त्यांना अंतराळात भेटतो आहो. तो ईश्वर म्हणतात, तो.... त्याच्या भवतीच त्यांनी फेर धरला आहे. 'नाहं वसामि वैकुंठे, योगिना हृदये रवौ... मद्भक्ता यत्र गायन्ति। तत्र तिष्ठामि नारद॥'[८] पण तिथे तरी कुठे तो तिष्ठत उभा आहे? आणि तरी अंतराळ ध्वनिशून्य असूनही मला सूर ऐकू येत आहेत.

ते त्या भक्तांच्या गायनाचे तर नसतील? अजब आहे! आणि या साऱ्यातून अजब असं काही तरी समोर दिसतं आहे. कारण या भूतमात्रात सारेच काही ईश्वरनिष्ठ आहेत असं नाही. तो चार्वाक... तो उमरखय्याम... तो ओशो... त्यानं तर "गॉड हॅज फायनली डाईड" असं जाहीर करून टाकलं. छी! छी! यातून अर्थ तरी काय काढावा म्या पामराने? जाऊ द्या. त्या भानगडीत आपण पडूच नये, हेच चांगलं.

आपला स्पेस सूट शाबूत आहे की नाही हे पाहण्यासाठी श्रीरंगने अंग चाचपले. पण हाताला काहीच लागेना. सूट नाही, त्यात सामावलेले आपण स्वतः नाही. सारं संपलं की काय? होय. तसंच असावं... डोळ्यांना खूप ताण देऊन त्याने आसपास पाहिले. अंधार... सतत वाढत चाललेला अंधार...

त्याला जाणवले की आपण या अवाढव्य पोकळीच्या एका अज्ञात भागात आलो आहोत. खड्डा... पुढ्यात खड्डा दिसतो आहे. ब्लॅक होल! आता मागे फिरणे नाही. आता कसलीही आशा नाही वा कसलीही भीती नाही.

आणि श्रीरंग त्या ब्लॅक होलमध्ये पडला. त्याचे पुढे काय झाले ते जाणण्याचे सामर्थ्य लेखणीत कुठून असणार?
आम्ही आपले हीन-दीन-लीन होऊन पृथ्वीकडे वळलो.

***

डॉ. बेलसरे बरोबर ६ वाजता इस्पितळात येऊन दाखल झाले. त्यांनी पेशंटचा चार्ट पाहिला. शेजारी उभ्या असलेल्या डॉक्टरांकडे पाहून त्यांनी विचारले, "ओके?"

"येस् सर, ओ. के." त्यांना उत्तर मिळाले. तो आवाज अपेक्षित नव्हता, म्हणून त्यांनी वळून डॉक्टरांकडे पाहिले.

"डॉक्टर मोझेस - तुम्ही? डॉ. चिंतामणी येणार होते ना माझ्याबरोबर?"

यावर डॉ. मोझेसनी काहीतरी पुटपुट केली. डॉ. चिंतामणींबद्दल ते काहीतरी सबब सांगतील असे वाटून ते म्हणाले, "इट्स ऑल राईट. यू नो दि केस... गेट रेडी प्लीज."

पेशंटला 'ऑपरेशन थिएटर'मध्ये नेण्यात आले. डॉ. मोझेस आणि त्यांच्याबरोबर आणखी दोन डॉक्टर असा तांडाही पांढऱ्या पोशाखात थिएटरात शिरला. तीन परिचारिकाही अगोदरच तिथे हजर होत्या. त्यांनी संपूर्ण तयारी केली होती.

सर्व डॉक्टरांनी बेसिनजवळ उभे राहून स्क्रबिंग केले. स्वच्छ जंतुरहित टॉवेलला हात पुशीत ते टेबलापाशी आले. पेशंटला भूल देणारे ॲनास्थेटिस्ट डॉक्टर जवळच उभे होते. त्यांच्याकडे डॉ. बेलसरे यांनी पाहिले. त्यांनी मान डोलावून अनुमती दर्शवली. कारण त्यांचे काम त्यांनी केव्हाच उरकले होते. रोगी पूर्णपणे निष्क्रियावस्थेत होता.

एका नर्सने पेशंटच्या छातीवरचा कपडा बाजूला सारला. डॉ. बेलसऱ्यांनी पुन्हा एकदा त्याची नीट पाहणी केली व सर्व ठीक असल्याची खात्री होताच कामाला सुरुवात केली.

"स्काल्पेल - ट्विझर्स्[९] - सिझर्स् -"

भराभर मागण्या झाल्या. त्याप्रमाणे डॉक्टरसाहेबांना शस्त्रे पुरवण्यात आली. शस्त्रक्रिया पूर्ण होऊन टाके घालण्यात आले.[१०] पेशंटला त्याच्या खोलीकडे नेऊन निजवण्यात आले. सर्व काही यथासांग यशस्वीपणे पार पडले होते. उर्वरित उष्टेखरकटे काढण्याचे काम परिचारिकांवर सोपवून डॉक्टर मंडळी हात धुवून स्वच्छ झाली. आपला बुरखा नि झगा प्रत्येकाने उतरवून ठेवला. हे चालू असतानाच डॉ. बेलसरे पुटपुटले, "मला एका गोष्टीचं नवल वाटतं, डॉक्टर."

"ते काय?" डॉ. मोझेसनी चमकून त्यांच्याकडे पाहिले.

"या यूथफुल पेशंटला मिसरुडं होती असं मला आठवत नाही. रातोरात फुटली की काय? हो?"

"सर," डॉ. मोझेस म्हणाले, "मला आपल्याला काहीतरी सांगायचंय."

आता चमकण्याची पाळी डॉ. बेलसऱ्यांची होती.

"सांगा ना काय ते. असे भिता काय?"

"चार्टबरहुकूम पेशंटला पाहून आपण ऑपरेशन केलं आणि ते यशस्वी झालं हे खरं असलं, तरी तो पेशंट तुम्ही समजता तो नव्हता."

"म्हणजे काय?"

"म्हणजे असं की श्रीरंग फाटकला आय. सी. यू. नं. दोनमध्ये ठेवलं होतं आणि आपण केलं ते ऑपरेशन नं. तीनमधल्या पेशंटच होतं."

"व्हॉट दि ब्लडी हेल!" डॉ. बेलसरे थरथर कापत ओरडले.

"सर, यू नीड नॉट बी सो ॲन्क्शस. मी थोडक्यात सारं सांगतो. आज ही दोन ऑपरेशन्स करायची असं शेड्यूल ठरलेलंच होतं. लागोपाठ. पण..."

"पण काय?"

"आय. सी. यू. नंबर दोनमधल्या पेशंटला आम्ही आणू शकलो नाही..."

"व्हाय? डॉ. चिंतामणी....."

"डॉ. चिंतामणी चिंतेत आहेत. ते भ्याले आहेत. तुम्हांला फेस करायची छाती त्यांना झाली नाही... आणि त्या खोलीतली नर्स - ती तर बेशुद्ध पडली आहे."

"व्हाय? व्हॉट हॅपन्ड?"

"पेशंट श्रीरंग फाटक इज डेड... ही डाईड इन् कोमा. डॉ. चिंतामणी सेज ही मस्ट हॅव पास्ड अवे ॲट अबाऊट मिडनाईट!"
डॉ. बेलसरे आ वासून पाहतच राहिले.

कॉरिडॉरमधून जाताना तिथे बाकावर हुंदके देत बसलेल्या फाटक कुटुंबीयांकडे नुसती नजर टाकण्याचे धैर्यही त्यांना झाले नाही. पांढऱ्या चादरीखाली झाकलेला श्रीरंगचा मृतदेह घेऊन एक स्ट्रेचर नुकताच अतिदक्षता विभागातून बाहेर आला होता. त्याकडे ते डोळे फाडून पाहत होते!

***

(पूर्वप्रकाशन: विज्ञानयुग - दीपावली, १९९९, पृष्ठ क्रमांक ११३ - १२०)

संपादकीय टिपण:

ही कथा भारांनी त्यांच्या अगदी शेवटच्या काही दिवसांमध्ये लिहिली. त्यामुळे कथेतील वैद्यकीय व तांत्रिक तपशिलांची खातरजमा करणे राहून गेले असावे. त्या तपशिलांमध्ये दुरुस्त्या केल्या आहेत. कथेत येणारी 'ज्ञानेश्वरी' व 'दासबोधा'तील काही उद्धृतेही मूळच्या मजकुराहून थोडी निराळी होती. ती नायकाच्या - श्रीरंगाच्या - स्मरणाला अनुसरून मुद्दाम तशी लिहिली आहेत की त्या वेळच्या संपादकांकडून त्याबाबत पुनर्शोधन करणे राहून गेले, ते आता तपासणे शक्य नाही. म्हणून संदर्भ पाहून ती उद्धृते व त्यानुसार काही ठिकाणचा मजकूर दुरुस्त केला आहे. कथेतील उद्धृते व मूळ मजकूर खालीलप्रमाणे:

[१] क्ष किरणांनी छातीचा इ. सी. जी. फोटो घेण्यात आला..
[२] एक्स-रे घेतलात तेव्हा मी जवळ होतो. इ. सी. जी. वर चांगली सरळ रेषा होती की ती!
[३] एक्स-रेची सरळ रेषा चांगलं सुचवत नसते.
[४] हृदयाच्या क्ष किरणाच्या संदर्भात
[५] का जे द्यौर्लोक आणि पाताळ! पृथ्वी आणि अंतराळ! अथवा दशदिशा समाकुळ! दिशाचक्र!
[६] हे असो स्वर्ग पाताळ! की दिशा अंतराळ!
[७] ईश्वरनिष्ठांची मांदियाळी, अनवरत भूतळी, भेटो तया भूतळी। भूतळ आता राहिलाच नाही.
[८] नाही वसामि वैकुंठे, योगिनां हृदये... मद्भक्ताः यत्र गायन्ति तत्र...
[९] ट्रीझर्स
[१०] रक्तबंबाळ हार्ट बाहेर काढण्यात आले. त्यावरची शस्त्रक्रिया पूर्ण होऊन टाके घालण्यात आले. काळीज पुन्हा आपल्या जागेवर जाऊन बसले.

***

"ट्रॉक्!" बनेश ऊर्फ फास्टर फेणे उद्‌गारला.

"माझ्या चिठ्ठीत बघ काय आलंय?" बन्याने उलगडलेल्या चिठ्ठीत लिहिले होते : "हडपसरच्या वाटेवर डावीकडे शिंदोळीचे बन आहे. तिकडे तू जायचेस. तिथे एक सर्वांहून वेगळा असा अपूर्व वृक्ष आहे - गोरखचिंचेचे झाड. तुला हे झाड माहीत असेल. प्रचंड घेराचा वृक्ष. नसेल ठाऊक तर माहिती करून घे. त्या झाडाची पश्चिमेकडे लोंबणारी फांदी सर्वात लंबाडी आहे. तिला घेऊन वर जा. ढोली दिसेल. तीत उतर. तुझा खजिना तिथे ठेवलेला आहे, तो घे!"

"हडपसरचं शिंदीचं बन म्हणजे इंद्रू इनामदाराचं राज्य की!" सुभाष उद्‌गारला. "त्याला आवडणार नाही तू तिथे गेलेला."

"आवडो न आवडो. मी माझा खजिना लुटायला जाणार. इनामदाराचं राज्य म्हणे! इनामदार संपले सगळे. हे महाराष्ट्राचं लोकराज्य आहे." बन्याने ऐटीत सांगितले.

विद्‌याभवनमध्ये 'ट्रेझर हन्ट' किंवा खजिना-शोधाचा खेळ चालू होता. सर्व मुलांना आवडणारी स्पर्धा होती ती आणि तीत भाग घेत होती शाळेतली तीस-चाळीस मुले.

सुरुवातीला दहा बौद्धिक चढाओढी झाल्या. त्यात पहिला नंबर पटकावणारी दहा मुले आपापले बक्षीस न्यायला सज्ज झाली होती. पण त्यांना हे बक्षीस सहजासहजी मिळणार नव्हते. त्यासाठीच ही खजिना-शोधाची स्पर्धा आयोजित केलेली होती. सुर्वे सरांनी काही चिठ्ठ्या तयार करून एका हंड्यात टाकल्या होत्या. त्यातून या दहा जणांनी एकेक चिठ्ठी उचलायची आणि तीत लिहिलेल्या सूचना अमलात आणून आपला खजिना हुडकायचा.

आणि चिठ्ठ्या जेव्हा बाहेर निघाल्या तेव्हा त्यांतून फार गमतीजमतीचे संदेश बाहेर पडले. शरद शास्त्रीच्या चिठ्ठीत होते : "तू बागेतल्या विहिरीत उतर. तिथल्या खबदाडीत तुझा खजिना आहे." आता आमचा चष्मेवाला शास्त्री कितीही काटक असला तरी त्याचा जीव घोटाळत असे रसाळ पुस्तकात - खडकाळ खबदाडीत नाही. पण आता त्याच बिकट वाटेने जाणे त्याला भाग होते. त्याच्या चिठ्ठीतला मजकूर कळल्यावर चकोर देशमुखाने त्याला हिणवले." शास्त्रीबुवा, आडाचं पानी लई खोल हाये बरं! जपून उतरा. खेकडे आहेत खबदाडीत."

"खेकडेच काय? विरोळेपण आहेत. म्हणजे पाणसाप."

"अस्तु-अस्तु." चष्मा सारखा करीत शरद शास्त्री म्हणाला, "तुम्ही काळजी करू नका. मी बरोबर उतरेन - आणि काय रे चकोर, मला एवढा हिणवतो आहेस, पण तुला सासवडची वाट तरी माहीत आहे का?"

"हात्तिच्या! या सुभाषबरोबर मी चिकार वेळा गेलोय त्याच्या बंगल्यात. एकदा तर आम्ही पुरंदरला गेलो होतो - व्हाया सासवड."

"ते ठीक आहे. पण ही इलेक्ट्रिक सोंगट्यांची फॅक्टरी माहीत आहे का तुला? नाहीतर राहशील सासवड नि पुरंदर यांच्या दरम्यान घोटाळत. गड-सास्वडयोर्मध्ये चकोरो लुडबुडायते!"

"आम्हांलाही डोकं आहे म्हटलं. आम्ही काढू शोधीन ती सोंगट्यांची फॅक्टरी." चकोर म्हणाला. "सोंगट्या म्हणजे ती तारेच्या खांबावर पांढरी 'उदबत्तीची घरं' असतात ना, ती! त्यांचा एक कारखानाच आहे म्हणे.

एका मुलाला फारच मजेशीर संदेश मिळाला होता. त्याने दक्षिणेकडे तोंड करून कोलांटी उडी घ्यायची होती. उडी मारल्यावर त्याची डावी तंगडी ज्या बाजूला पडेल तिकडे शंभर यार्ड जायचे. त्या ठिकाणी मातीचा लहानसा ढीग दिसेल तो उकरायचा. आत सापडेल व्यवस्थित बांधलेले त्याचे बक्षीस.

"आपल्याला कोलांट्या मारायच्या नाहीत एवढं बरं आहे." फास्टर फेणे म्हणाला.

"हो ना! सायकलवर टांग मारली की निघालो आपण." चकोर म्हणाला. "फा.फे. मला तुझ्याच बाजूला यायचंय. वाटेत फुरसुंगीचा फाटा लागला की मी वळवीन माझं हँडल. काय मजा आहे, नाही?"

"कसली मजा?" फास्टर फेणेने आपल्या सायकलीकडे जाताना विचारले.

"नाही. म्हणजे एकेकाचं नशीब बघ कसं असतं! तू फुरसुंगीचा, तर तुला पिटाळलंय तुझ्या शत्रूच्या राज्यात - आय मीन - राज्यात नाही, परिसरात आणि मी खुद्द पुण्याच्या रास्ता पेठेतला, तर मला जावं लागणार सासवडला - जो आपल्या सुभाष देसाईचा गाव आहे."

"चांगलंच आहे." बन्या म्हणाला, "सुभाषला सोमवार पेठेतला वाडा मिळालाय."

"वाड्यातला एक कोनाडा."

"बरं, बरं गप्पा पुरेत. मार सायकलवर टांग."

चकोर नि बन्या आपापल्या सायकलीवर स्वार झाले अन् त्यांनी सोलापूर रोडवर स्वारी केली.

एका तासात आपली मोहीम उरकून परत आले पाहिजे अशी सरांची त्यांना आज्ञा होती.

फुरसुंगीच्या काठ्यावर चकोरला 'टा-टा' करून बन्या ऊर्फ फास्टर फेणेने सरळ पुढे सायकल हाणली. थोड्याच वेळात तो डावीकडच्या शिंदीबनात पोचला.

हे शिंदीबन फास्टर फेणेप्रमाणे तुमच्याही कदाचित ओळखीचे झाले असेल. आज तो इथे स्वतःचा हक्काचा खजिना शोधण्यासाठी आलेला असला, तरी पूर्वी एकदा इथेच त्याने तंट्या भिल्लाचा खजिना शोधून काढला होता आणि याच बनात इंद्रू इनामदारच्या गुंडांनी त्याला कैद करून ठेवले होते - सायकल शर्यतीत त्याला भाग घेता येऊ नये म्हणून. इंद्रूला फास्टर फेणेचा उत्कर्ष बघवत नसे. त्यामुळे तो नेहमीच त्याच्या वाटेत अडथळे आणण्याचा प्रयत्न करी. पण इंद्रू विद्याभवनचा विद्यार्थी नव्हता. तो शिकत असे टोळे हायस्कूलमध्ये. त्यामुळे आज तरी फा. फे. ला मोकळे रान मिळाले होते. त्याच्या नाकात काड्या घालायला आज इं. इ. नव्हता.

इंद्रूचे घर होते या शिंदीबनाला लागूनच. पण इंद्रू शाळेत अडकलेला असला तरी बन्याला आजची कामगिरी जरा अवघड वाटत होती. बनातून तो हिंडलेला असला तरी इथे कुठेही गोरखचिंचेचे झाड त्याने पाहिलेले नव्हते. खरे म्हणजे गोरखचिंचेचे झाड तसे विरळ आढळते. पण ते लपण्यासारखे मुळीच नाही. बन्याने तसले झाड एम्प्रेस गार्डनमध्ये पाहिलेले होते. त्याचे खोड चांगले गलेलठ्ठ असते. अन् पाने जरी शेवरीसारखी कत्री असली तरी त्याला फळे लागतात ती चांगली भोपळ्यासारखी ढेबरी. त्यांना चिंचा कशासाठी म्हणायचे हे बन्याला नेहमीच कोडे वाटे!

'मी ते झाड या बनात कसं पाहयलं नाही - नवलच आहे हे एक. कारण इंद्रू त्या गोरखचिंचेबद्दल नेहमी बोलतो खरा. आमच्या घराशेजारी गोरखचिंच आहे. आमच्या बाबांचं ते लाडकं झाड आहे. त्यांचं पोट कधी साफ नसतं. ते सारखे आंबट ढेकरा देत असतात. गोरखचिंचेचा काढा प्याल्यावर त्यांना बरं वाटतं.'

शिंदीबन पूर्णपणे निर्जन होते. तिथल्या चिंचोळ्या वाटेने सायकल रेटीत असताना बन्याच्या मनात या आठवणी घोळत होत्या. पुढे वाट अगदीच अडचणीची झाली तेव्हा खाली उतरला आणि सायकल एका झाडाला टेकून ठेवून पायीच चालू लागला.

आज बराच शोध केल्यानंतर त्याला सापडला तो राक्षसी चिंचांचा वृक्ष. कालव्याच्या काठावर ते प्रचंड झाड उभे होते. फा. फे. त्या झाडाजवळ गेला तोच मुळी दक्षिण बाजूकडून. त्यामुळे त्याला समोरच ती लांबलचक फांदी दिसली. झाडावर लोंबणारी तपकिरी रंगाची ती ढेबरी फळे पाहून तर त्याला झाडाची पुरती ओळख पटली. लगेच ती फांदी पकडून बन्या वर वेंघला.

त्या भक्कम फांदीवर उभे राहून त्याने हातांनी वरची फांदी पकडली अन् तो चालत झाडाच्या मध्याकडे गेला. तिथे पाहतो तर खरोखरीच एक मोठी पोकळी होती. इतकी मोठी अन् खोल की त्याला आत सहज उतरता आले. तिथे वर्तमानपत्रात बांधलेले एक पार्सल त्याची वाटच पाहत होते. ते उचलून तो पुन्हा वर आला. आडव्या फांदीवर उभे राहून त्याने पुन्हा वरची फांदी पकडली. आणि साहजिकच त्याची नजर त्या लठ्ठ गोरखफळांकडे गेली. त्यातल्या एका जाडजूड फळाने त्याचे लक्ष विशेष वेधून घेतले. कारण त्या फळात खरोखरीच एक वैशिष्ट्य होते, जे आतापर्यंत त्याला दिसले नव्हते.

चिंचफळाच्या गरगरीत पोटाभोवती एक पिवळी रेघ होती. रेघ नव्हे - दोरा! त्याला एक दोरा गुंडाळलेला होता. प...* गोरखनाथजींचा करगोटा!

फास्टर फेणेचे कुतूहल चांगलेच जागृत झाले. तो आणखी जरा वर चढला अन् हात लांबवून त्याने ते फळ पकडले, ओढले अन तोडले.

मग ते पार्सल अन् तो भोपळा घेऊन स्वारी आता खाली उतरणार होती...

आपल्याला बक्षीस मिळालेल्या पार्सलबद्दल त्याला उत्सुकता होतीच. पण त्यात पुस्तके असणार हे त्याला माहीत होते. त्याहीपेक्षा त्याला घाई झाली होती तो भोपळा फोडण्याची!

पण भोपळा फोडावा लागलाच नाही. ढेरीभोवती गुंडाळलेला दोरा ओढताच त्याची दोन शकले झाली आणि आतून बाहेर पडले एक कागदाचे भेंडोळे.

कागद साधे नव्हते. फार भारी होते. चलनी नोटांची गुंडाळी होती ती. शंभर-शंभराच्या दोनशे नोटा त्यात होत्या.

"ट्टॉक्!" असे म्हणत बन्या ते भेंडोळे परत गोरखफळात ठेवतो आहे तोच खालून साद आली, "अलख निरंजन!"

अंगावर भस्माचे पट्टे नि लाल कुंकवाचे पट्टे, गळ्यात रुद्राक्षांच्या माळा, डोळ्यात लालभडक नशा चढलेली, कंबरेला कटोरा नि हातात त्रिशूळ असा तो एक बैरागी होता.

"क्या हैं? कौन हो तुम?" फा. फे. गुरगुरला.

"जय मछिंद्रनाथजी की! जय गोरखनाथजी की! जय कानिफ...."

"पुरे हो ती यादी!" फा. फे. म्हणाला. "तुम्ही माझ्याकडे असे डोळे वटारून का बघताय ते सांगा."

हे बोलत असतानाच दोन्ही बोजे घेऊन त्याने खाली उडी टाकली आणि तो आपल्या सायकलीकडे पळणार होता. पण बैराग्याने त्याचा दंड पकडून त्याला उभा केला, अन् तो हळू आवाजात पण दरडावून म्हणाला, "कहाँ भागते हो? खडा हो जाव! चोर कहीं का!"

"मी चोर नाही." फा. फे. पण जोरात म्हणाला. "मी हे पोलीसला देणार आहे. सोडा मला!"

"पोलीस में क्यों देते हो, लौंडे?" बैरागीबुवांनी इकडे तिकडे चोरट्यासारखे पाहिले अन् खालावून ते म्हणाले, "आधा तुम लो - आधा हमको दो. मिट गया जंजाल! जया अलखनिरंजन!"

"एक कवडी मिळायची नाही तुला!" फास्टर फेणे ओरडला. "तू साधू आहेस की बदमाष भोंदू?"

"यह पैसा भगवान की माया हैं! भगवान को दे दो!" बैरागी दात विचकीत म्हणाला.

"कुछ नहीं मिलेगा!" फास्टर फेणेही दातओठ चावून म्हणाला आणि मग त्याने केले, "ओऽऽय!"

कारण साधूबुवांचा क्रोध आता अनावर झाला होता. बन्याच्या हातातले नोटांचे बंडल त्याने हिसकावून घेतले

आणि हातातला त्रिशूळ त्याच्यावर उगारला. दुसऱ्याच क्षणी बन्याच्या छातीत किंवा पोटात तो भोसकून त्याला जबर जखमी करून तिथून पळण्याचा त्याचा इरादा होता. पण तेवढ्यात एक चमत्कार झाला -

त्रिशुळाचा दांडा मागच्या मागे कुणीतरी जोराने खेचला अन् दूर फेकून दिला.

"चकोर!" बन्याच्या तोंडून आश्चर्याने उद्‌गार निघाला. इकडे चकोरने उडी मारून त्याला हातांनी अन् पायांनी असे गच्च कवटाळाले, की बैरागीबुवांचा गळा घुसमटून त्यांना एका सेकंदात नऊ नाथ आठवले. अर्थात त्यांची खरी भक्ती कोणत्याच नाथावर नसल्यामुळे त्यांना कोणी तारू शकला नसता.

बैरागी आता हिरवानिळा पडला होता. फास्टर फेणेच्या दंडावरची त्याची पकड केव्हाच ढिली पडली होती. फास्टर फेणे मागे हटला, अन् हाताची मूठ वळून त्याने बैराग्याच्या नाकावर एक जोरदार ठोसा लगावला. मागूनपुढून दोन्हीकडून हल्ला होताच बैरागीबुवा नरम पडले. त्यांच्या हातातले बंडल बन्याने केव्हाच हिसकावून घेतले होते.

"त्याचा त्रिशूळ उचल. सोडू नकोस तसा." फास्टर फेणे म्हणाला.

खाली पडलेला त्रिशूळ चकोरने उचलला अन् त्याचे दोन-चार रट्टे बैराग्याच्या पोटरीवर हाणले. "ओऽय-ओऽय!" म्हणून ओरडत महाराज जमिनीवर आडवे झाले. त्यांच्या तंगड्या तात्पुरत्या तरी निकामी बनल्या होत्या.

"नाऊ लेट्‌स् हरी!" बन्या म्हणाला अन् सायकलकडे धावला.

"हरी तर कायमचाच पुजलेला आहेस तू, फास्टर फेण्या!" चकोरने त्याला दात दाखवीत उत्तर दिले आणि तो आपल्या सायकलीवर स्वार झाला तो त्रिशूलासकट!

"हा नोटांचा गड्डा कुठे मिळाला तुला?" पुण्याकडे परतीचा मोर्चा निघाल्यावर चकोरने विचारले. फास्टर फेणेने तो चित्तथरारक प्रसंग आमूलाग्र सांगितला आणि म्हटले, "बरं झालं, तू अगदी वेळेवर आलास. नाहीतर माझी अगदी चटणी उडवली असती त्या गोरखगुरुजीने!"

"गुरुजी कसला? सैतान साला!" चकोर म्हणाला, "आपले लोक मूर्ख म्हणून असल्या सोंगाढोंगांना भीक घालतात. पण काय रे बन्या, हे पैसे त्याचेच तर नसतील ना? म्हणजे त्याने कुणाचे तरी लुंगवलेले?"

"मला नाही तसं वाटत." फा. फे. म्हणाला. "कारण त्याने माझ्याकडे पाहिलं तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर नुसतं नवल दिसत होतं. त्याचं द्रव्य असतं तर तो रागावला असता. राग नंतर आला."

"म्हणजे दुसऱ्या कुणीतरी ही मोटली तिथे लटकवली होती."

"अर्थात बँकेचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट तळघरात असतो, याचा झाडाच्या फांदीवर होता. आपले शास्त्रीबुवा असते तर म्हणाले असते - भिन्न रुचिर्हि लोकः!"

"म्हणजे तुला डबल बक्षीस मिळालं की!" चकोर म्हणाला. "कितीचं घबाड आहे?"

"शंभराच्या दोनशे नोटा म्हणजे किती झाले?"

"वीस हजार! आयला!"

"पण ते आपले नाहीत, चकोर. आपण ते सरांजवळ देऊ. ते ठरवतील पुढे काय करायचं ते! पण ते राहू दे. तुला मिळालं तुझं बक्षीस?"

"ओ येस्! त्या फॅक्टरीच्या आवारात त्या पांढऱ्या सोंगट्यांची एक रास पडलेली होती. त्या राशीत लपवलेलं होतं माझं पुस्तकांचं पार्सल." चकोरने कॅरियरकडे बोट दाखवीत म्हटले. नाथमाधवांच्या स्वराज्याच्या कादंबऱ्यांचा सेट आहे."

"माझं बहुधा बाबासाहेब पुरंदऱ्यांचं 'राजा शिवछत्रपती' असावं." बन्या म्हणाला. मघाशी सायकलवर चढण्यापूर्वी मी पार्सलचा कोपरा फाडून पाहिला."

'ट्रेझर हंट'चा खेळ संपला. प्रत्येक जण आपापले बक्षीस घेऊन घरी गेला. पण - पण - त्या नोटांच्या बंडलाचे काय झाले? कुणाचे होते ते घबाड? ते घबाड एका लबाड माणसाचे होते. त्याचे नाव होते रंभाजीराव इनामदार!

हे सद्गृहस्थ नुकतेच जे अचानक बाहेरगावी गेले होते, ते उगाच नाही. त्यांनी पळ काढला होता, पळ.

कारण विचारता? कारण त्यांच्या घरावर अकस्मात पोलीसची धाड आली होती. त्यांनी दडवलेला काळा पैसा जप्त करण्यासाठी. पण समोर घर धुंडाळूनही पोलिसांना तो सापडला नाही. कारण -

आता हे तुम्हांला माहीत झाले आहेच की! त्याची मोटली बांधून त्यांनी शिंदीबनातल्या एका गोरखफळात ठेवली होती. सर्व सामसूम झाल्यावर परत येऊन ते हळूच ती मोटली काढून घेणार होते. केवढी अजब युक्ती ही! पण अशा कितीतरी अजब युक्त्या रंभाजीरावांजवळ असत. त्यांचे डोके म्हणजे अशा युक्त्या नित्य शिजवणारा एक प्रेशर कुकर होता! कधी कधी त्या कुकरमधले अन्न त्यांना पचे. पण तात्पुरते. अशा लांड्यालबाड्या, चोऱ्या कायम कधीच पचत नाहीत. केव्हा ना केव्हा हे पाप ओकावेच लागते. याही खेपेस असेच झाले. रंभाजीरावांवर पोलिसांनी खटला भरला आणि त्यांच्यावरचा आरोप सिद्ध होऊन त्यांना खडी फोडायला जावे लागले.

पण तो काळ्या बाजारचा पांढरा लोण्याचा गोळा मधल्यामधे गट्ट करण्यासाठी जो बं-भोलानाथ 'गोरख-शिष्य' उपटला होता, त्याच्या तंगड्या फार लवकर बऱ्या झाल्या असाव्यात. कारण तो जो नाहीसा झाला तो अजून बेपत्ताच आहे. या प्रसंगाची आठवण म्हणून फा. फे. ने तो त्रिशूळ मात्र जपून ठेवला आहे.

दुसरीही एक गोष्ट त्याने जपून ठेवली आहे, ती म्हणजे पुण्याच्या पोलीस सुपरिंटेंडेंटनी शाळेच्या पत्त्यावर धाडलेले शाबासकीचे पत्र!

***

संपादकीय टिपण:

ही कुठल्याही पुस्तकात नसलेली 'फाफे'कथा आहे. पूर्वप्रकाशन: 'नवलाई' दिवाळी अंक १९८२, पृष्ठ क्र. ३८. मूळ प्रतीच्या छायाचित्राधारे या कथेचे टंकन केले आहे.

* छायाचित्रात हा शब्द स्पष्ट दिसत नाही. 'प'पासून सुरू होणारा शब्द असावा, इतकाच अंदाज करता येणे शक्य आहे.

***

रेखाटने आणि सुलेखन: मूळ प्रतीतून साभार;
चित्रसंस्करण : अमुक.

***

फास्टर फेणे रिटर्न्स - फेसबुकवरून ब्लॅकमेलिंग!

फ्रेंक उर्फ फ्रेंडली कवडे

संपादक/परीक्षक - भा. रा. भागवतांच्या १०५ व्या जन्मदिनानिमित्त 'ऐसी अक्षरे'वर आयोजित केलेल्या कथा-स्पर्धेतील विजेती कथा इथे समाविष्ट करत आहोत.

परवा - म्हणजे दिनांक ३१ मेला मोठी गंमतच झाली! पण गंमत सांगण्याआधी मी तुम्हांला माझी ओळख करून देते.

माझं नाव आरोही. आरोही आबेकर. मी पुण्यातल्या 'अक्षरनंदन' या शाळेत सहावीत शिकते. मला सगळे जण 'टॉमबॉय' असं म्हणतात. कारण मी मुळ्ळीच मुलींसारखी वागत नाही. मला नटणंथटणं आवडत नाही की छान छान गुलाबी रंगाचे कपडे आवडत नाहीत. तर मला आवडतो, हॅरी पॉटर, शरलॉक होम्स, फेलूदा आणि हो, एक महत्त्वाचं नाव राहिलंच - फास्टर फेणे. मी त्याची जबरदस्त फॅन आहे. इतकी की, मीही त्याच्यासारखाच चौकड्या-चौकड्यांचा शर्ट आणि हाफ पँट घालते. मी माझ्या केसांचाही मुद्दामहून बॉयकटच करते आणि त्याच्यासारखेच मुद्दामहून माझे केस थोडे विसकटलेलेच ठेवते. वर्गातले मित्रमैत्रिणी मला 'आ.आ.' असं म्हणतात. म्हणजे मी वर्गात गेले रे गेले की, मुलं - 'आला आला आ.आ. आला!' असंच म्हणू लागतात मोठ्याने. खरंतर मला ते चिडवत असतात, पण मला त्याचं फार काही वाटत नाही. उलट, मस्त हसू येतं 'आआआआआ'ने! कारण मी फास्टर फेणेसारखीच काडीपैलवान असले आणि मुलींसारखी अजिबातच वागत नसले, तरी डोक्याने एकदम भारीये!

माझ्या बाबाचंही तेच म्हणणंय, पण आईला मात्र जरा काळजी वाटते माझी. बाबा म्हणतो, "तू काळजी नको करूस गं, अश्विनी. ही पोरगी एक दिवशी नाव काढेल बघ आपलं!"

तर ३१ मे हा दिवस आमच्या फाफे म्हणजे फास्टर फेणेच्या भा. रा. भागवतांचा बर्थ डे. फास्टरच्या फास्ट ब्रेनचा ब्रेन म्हणजे भा.रा.भा.! त्यांच्या वाढदिवसानिमित्त आमच्या सोसायटीच्या लायब्ररीत आम्ही भा.रा.भां.च्या गोष्टी वाचून दाखवण्याचा कार्यक्रम करणार होतो आणि त्यात मी फास्टर फेणेची एक कथा वाचून दाखवणार होते. संध्याकाळी बरोब्बर सहा वाजता कार्यक्रम सुरू होणार होता. म्हणून दुपारी मी हॉलमधल्या बुकशेल्फमधून फाफेची सगळी पुस्तकं काढली आणि विचार करू लागले, 'कोणती गोष्ट वाचायची बरं, त्याच्या जन्माची वाचायची की चिनी गुप्तहेरांची की आणखी कुठली तरी?'

समोर सोफ्यावर ताई बसली होती. ती दोन्ही हातात मोबाइल धरून काहीतरी टाइपत होती. ती आयटीत, म्हणजे बाबाच्या भाषेत 'काचेच्या गारेगार बंदिस्त कपाटात', काम करते! मी तिला हाक मारली, तरी तिचं डोकं त्या मोबाइलमध्येच खुपसलेलं. ती त्रासल्यासारखी वाटत होती आणि थोडीशी घाबरल्यासारखीही. मी उठून तिच्याशेजारी बसले. तशी ती चिडून ओरडलीच - "काय गं, काय पाहतेयस? डोन्ट बी नोझी, कळलं ना!" मला जरा आश्चर्यच वाटलं. कारण सहसा माझी ताई माझ्या अंगावर अशी डाफरत नाही. तरी मी म्हणाले, "आज मी फाफेची एक गोष्ट वाचून दाखवणार आहे ना सोसायटीत. कोणती वाचू? मला काही समजतच नाहीये. सगळ्याच भारी वाटताहेत. प्लीज, मला मदत करशील का गोष्ट निवडायला?" खरंतर माझ्यावर उगाच ओरडली असूनही मी तिला फारच सभ्यपणे विचारलं होतं, तरी ती तिरसटपणे म्हणाली, "मदतबिदत काही

करणार नाही तुला. ऑलरेडी डोक्याला ताप झालाय तो काय कमीये!" मग ती सरळ निघूनच गेली तिच्या खोलीत. ताईचं काहीतरी बिनसलं होतं हे नक्की. हां, आलं आता लक्षात. आईबाबा तिच्या लग्नाचं बघताहेत नं आता. बरोबर, त्याचमुळे वैतागली असेल ती.

मी समोर असताना आई बाबाशी ताईच्या लग्नाबद्दल मुद्दाम कोड्यात बोलते. तिला वाटतं, मला कळत नाही, पण मला सगळं कळतं. पण यात लपवण्यासारखं काये? आणि अशीही मोठी झालेय आता मी!

तर ताईचा फणकारा पाहून मी सगळी पुस्तकं घेऊन सरळ माझ्या खोलीत गेले. माझ्या खोलीला दोन खिडक्या आहेत. एक मोठी - चार स्लायडिंग विंडोज् असलेली. आणि दुसरी खिडकी ही छोटीच आहे, म्हणजे दोन स्लायडिंग विंडोज् असलेली. ती जमिनीकडे मुद्दाम वाढवली आहे. आणि खालच्या बाजूला मस्तपैकी जाड, ज्यावर ऐसपैस बसता येईल असा काळा ओटा बांधला आहे. या खिडकीतून बाहेर हात काढला, की हाताला सोनचाफ्याचं झाड लागतं. त्यामुळे मला इथे बसून वाचायला खूप आवडतं.

फुलांचा सीझन असल्याने खोलीभर सोनचाफ्याचा गंध दरवळत होता. मी मस्तपैकी ओट्यावर बसून फाफेच्या गोष्टी वाचत बसले. आणि काय आश्चर्य! - मला तो ओळखीचा, टाळूला जीभ लावून काढलेला 'ट्टॉक्क' असा आवाज आला! मी लगेच समोर पाहिलं, तर साठीच्या आसपासचा एक माणूस माझ्यासमोर उभा होता. त्यानेही माझ्यासारखाच चौकड्या-चौकड्यांचा शर्ट घातला होता, बर्म्युडा पँट घातली होती. त्याचे हातपाय काटकुळे होते. त्याचं नाक बांकदार होतं, आणि चंदेरी-काळे केस विसकटल्यासारखे दिसत होते. डोळ्यांत हुशारीची चमक होती. हा दुसरा-तिसरा कोणी असणं शक्यच नाही!

मी डोळे विस्फारून विचारलं, "तू? म्हणजे तुम्ही... फाफे - फास्टर फेणे?"

तो म्हातारा म्हणाला, "अगदी बरोब्बर ओळखलंस माझ्या शिष्योत्तमे!"

मी विचारलं, "मला तर वाटलं की तुम्ही कायमचे निघून गेलात - फुरसुंगीला!"

त्याने पुन्हा 'ट्टॉक्क' असा आवाज काढला आणि म्हणाला, "पहिली गोष्ट - मी जरी म्हातारा झालो असलो तरी पूर्वीच्यासारखाच तुझा मित्र फाफे आहे, कळलं? तेव्हा मला उगाच अहोजाहो करू नकोस. मी शरीराने आजोबा झालोय, पण डोक्याने नव्हे; आणि मनाने तर नव्हेच नव्हे!"

मलाही त्याला 'अहोजाहो' म्हणायला नकोच होतं. पण मोठ्या माणसांना 'अरेतुरे' करायचं नाही, असं आईने बजावलं असल्याने मी तसं म्हणाले होते. पण आता फाफे स्वतःच मला तसं म्हणायला सांगत होता. त्यामुळे मी चटकन म्हणाले, "ओके बॉस!"

मग तो म्हणाला, "असा कसा जाईन कायमचा? पण भा.रा.भा. गेल्यानंतर पुण्यात जीव रमेना माझा. इथे असलं की त्यांची सारखी आठवण यायची मला. म्हणून मग काही दिवस जरा येऊन-जाऊन करत होतो. पण आता मात्र तुझ्यासारख्या हुशार मित्र-मैत्रिणींना भेटायला नेहमी येणार बरं का आपण!"

"एक, एक मिनिट थांब हा..." असं म्हणून मी माझ्या खिशातला मोबाइल काढला. खरंतर माझ्या शाळेत मोबाइल अलाउड नव्हता. पण क्लासेसला सायकलवरून लांब जावं लागत असल्याने मला बाबांनी एक स्मार्टफोन घेऊन दिला होता.

मी त्याच्या शेजारी उभी राहिले. त्याला थोडं वाकायला सांगितलं. मग आमच्यासमोर मोबाइल धरला.

तोच तो म्हणाला, "हे काय सेल्फी विथ फास्टर फेणे, वाटतं!"

मी म्हणाले, "शप्पथ! तुला सेल्फीबिल्फी सगळं माहितेय?"

"माहिती असणारच, नावातच फास्टर आहे माझ्या. तुमचं ते फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर सगळं माहितेय मला."

"सॉल्लिड! प्लीज, मग एक फोटो काढू दे ना मला. आमचा एक ग्रुप आहे - फा.फे.फॅ. म्हणजे फास्टर फेणे फॅन्स नावाचा. त्यावर टाकेन मी आपला फोटो. ग्रुपवर भाव वाढेल माझा त्याने!" असं म्हणून मी क्लिक केलं आणि लगेच फोटो पाहिला, तर माझा एकटीचाच हसताना फोटो आला होता. फास्टर फेणे गालातल्या गालात हसत होता. माझा रडवेला चेहरा पाहून तो म्हणाला, "मी फक्त तुलाच दिसू शकतो. आणि यानंतरही मी फक्त तुलाच दिसेन, तुलाच भेटायला येईन. पण तेही एकाच अटीवर..."

"कोणती?" मी काकुळतीने विचारलं.

"मी तुला भेटतो हे तू कधीही, कुणालाही सांगायचं नाही. ते आपल्यातच सीक्रेट राहील. आणि जर तू कोणाला सांगितलंस तर मग मी तुला त्यानंतर कधीही भेटणार नाही. कबूल?"

मी रडवेली होत म्हणाले, "ए, असं रे काय करतोस? आमचा स्टार, आवडता फास्टर फेणे इतक्या वर्षांनंतर मला भेटला, तरी मी ते कुणालाच सांगायचं नाही? जरा टू मच होतंय यार हे..."

त्याने मला जवळ घेऊन खिडकीच्या कठड्यावर बसवलं आणि समजावत म्हणाला, "हे बघ, मी आता म्हातारा झालोय. म्हणजे अजूनही मी सपासप चालतो, झपाझप टेकडी चढतो, रपारप सायकल चालवतो, पण आता यानंतर मी तुझ्यासारख्या हुशार मुलांना मदत करायचं ठरवलंय. हां, एके काळी मी होतो हिरो. पण आता तुझ्यासारख्या तल्लख यंगिस्तानचा जमाना आहे हा! आता तुम्हीच धडाडी दाखवली पाहिजे, अॅडव्हेंचर्स केली पाहिजेत. नाही का?"

मी नुस्तंच 'हं' केलं. मला ते अजूनही फारसं पटलं नव्हतं. पण फास्टर फेणे आपल्याला 'तल्लख' म्हणाला याचा आनंद झाला.

तो म्हणाला, "चल, आता मी निघतो."

मी विचारलं, "निघतो म्हणजे?"

"म्हणजे आता इथून जातो आणि तुझ्यासारख्याच दुसऱ्या कुणालातरी भेटतो."

"पण मला तुला भेटायचं असेल किंवा मला तुझी मदत हवी असेल तर? तुला कसं कळणार ते?"

"सोप्पंय, 'आमची झाली फेफे, लवकर ये फाफे!' हे वाक्यं मनातल्या मनात तीनदा म्हटलंस की मी हजर!"

"ओके! हे मस्तंय."

जाता जाता तो म्हणाला, "मला थोडा वेळ तुझा मोबाइल देशील? मला तो 'कँडी क्रश सागा' गेम खेळायचाय. खूप ऐकतोय मी त्याबद्दल."

मी लगेच त्याला मोबाइल दिला. मग उत्साहात त्याला कँडी क्रश कसा भारीये, तो कसा खेळायचा, मी कशा फटाफट लेव्हल्स पार केल्या आहेत, हे सांगू लागले. मग मला आठवलं की, आज आपण त्याचीच गोष्ट सांगणार आहोत. म्हणून मी त्याला पुस्तकं दाखवायला वळले, तर तेवढ्यात तो गायब झाला होता.

***

आमचा कार्यक्रम अगदी झकास झाला. मी फास्टर फेणेच्या जन्माची गोष्ट वाचून दाखवली. त्यात वाचताना मी मस्त ड्रामा आणला. काही ठिकाणी आवाजात मुद्दाम चढउतार केले. फास्टरने मुठी मारून मारून रेडिओ कसा चालू केला, हे सांगितल्यावर तर सगळे जण पोट धरून हसू लागले. 'वन्समोअर'ही मिळाला. सुश्रुत आणि राही, दोघं जण बिपिन बुकलवारच्या गोष्टी वाचणार होते. म्हणून मग मी त्यांच्या अध्येमध्ये दोन-तीन गोष्टी आणखी वाचून दाखवल्या. सहाला सुरू झालेला आमचा कार्यक्रम चांगला आठ वाजेपर्यंत रंगला. मग आमच्यावर खूश होऊन शिंत्रे काकूंनी आम्हांला प्रत्येकाला एकेक कॉर्नेट्टो आइस्क्रीम दिलं. मग काय, आमची स्वारी खूश झाली आणि आनंदात तरंगतच घरी आली.

घरी आले तर ताई कुठेतरी गायब होती आणि आई फोनवर बाबाशी काहीतरी बोलत होती. बाबा कामानिमित्त बाहेरगावी गेला होता. मधूनच, "कुठे गेलीये कुणास ठाऊक? फोनही उचलत नाहीये," असं आई बोलल्याचं माझ्या कानावर आलं.

कार्यक्रम कसा झाला हे सांगण्यासाठी मी माझ्या खोलीत जाऊन मनातल्या मनात फाफेला बोलवायचं वाक्य म्हणणार तोच स्वतः फाफेच माझ्यासमोर हजर!

"आणखी शंभर वर्षं जगशील तू!" मी त्याला म्हणाले, "काय सॉल्लिड सांगितली मी तुझ्या जन्माची गोष्ट माहितेय..." पण त्याने त्यावर काहीही रिप्लाय दिला नाही. उलट त्याचा चेहरा थोडा गंभीरच वाटला. माझ्यात हातात मोबाइल देत तो म्हणाला, "हा व्हिडिओ पाहा."

मोबाइल घेऊन मी स्क्रीनवरच्या आडव्या त्रिकोणावर टच केलं. व्हिडिओ सुरू झाला. त्यात एक कॉम्प्यूटरचा कीबोर्ड दिसत होता. मग एक हात आला. तो एका मुलीचा होता. कारण एका बोटात नाजूक अशी अंगठी घातलेली होती आणि नेलपेंट लावलं होतं. त्या हाताने काहीतरी टाइप केलं आणि मग जोरात एंटरचं बटण दाबलं. मी विचारलं, "हे काये?"

फास्टर फेणे म्हणाला, "काय आहे ते सांगतो नंतर, पण पहिल्यांदा तो हात ओळख."

मी पुन्हा व्हिडिओ पाहिला. ती अंगठी तर मला ओळखीची वाटत होती. शप्पथ, काळं नेलपेंट! "अरे, हा तर ताईचाच हात आहे. परवाच तिने काळं नेलपेंट लावलं, तेव्हा खूप भंकसही केली मी आणि बाबाने तिची. पण तिच्या हातांचा हा व्हिडिओ...?"

"झालं असं की, मी तुझ्याकडून कँडी क्रश खेळण्यासाठी मोबाइल घेऊन निघालो खरा, पण थोड्या वेळातच मला त्या गेमचा कंटाळा आला. सारखं ते आपलं फोडायचं. पॉइंट्स मिळवायचे. बोअर झालं. म्हणून तुझा मोबाइल ठेवून देण्यासाठी मी परत आलो, तर तुझी ताई या खोलीत येऊन कोणाशीतरी फोनवर बोलत होती - "तू इतक्या खालच्या थराला जाशील असं वाटलं नव्हतं मला... मी झालं-गेलं विसरून फ्रेंड म्हणून ॲड केलं, पण तू... काय? हॅलो... बंटी..." मग तिने मोबाइलच्या स्क्रीनकडे पाहिलं. फोन कट झाला असावा. तिने खोलीतला कॉम्प्यूटर सुरू केला आणि मग तोंड धुवायला बाहेर गेली. ती रडत होती. मला जरा शंका आल्याने

मी पटकन तुझ्या मोबाइलमधलं व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरू केलं. कॅमेरा कीबोर्डवरचं शूट करेल अशा पद्धतीने तुझा मोबाइल टेबलाच्या टॉपवरती ठेवला. तेवढ्यात ताई आलीच. आणि मग हे रेकॉर्ड झालं."

"फ्रेंड म्हणून ॲड केलं असं म्हणाली म्हणजे नक्कीच फेसबुक असणार! थांब..." असं म्हणून मी कॉम्प्यूटर सुरू केला. ताईचं काहीतरी बिनसलं होतं, आणि त्याचा नक्कीच फेसबुकशी काहीतरी संबंध असेल असं मला राहून राहून वाटू लागलं. मी व्हिडिओ पॉज करत करत ताईने टाइप केलेली अक्षरं लिहून काढली. ती होती - archana24889.

फाफे म्हणाला, "तुझ्या ताईचा वाढदिवस २४ ऑगस्टला असतो का गं?"

मी त्याच्याकडे आश्चर्याने पाहिलं. "बरोब्बर! मधल्या काळात तुला मॅजिकल पॉवर्सही मिळाल्याहेत की काय फाफे?"

तो म्हणाला, "छे गं आआ, तू आत्ता जे लिहिलंस त्यावरून ओळखलं! नाव-आडनाव-वाढदिवसाच्या तारखा यांचे पासवर्ड ठेवू नयेत, हे तुम्हां मॉडर्न काळातल्या पोरांनाही कळू नये म्हणजे आता काय बोलायचं! पुन्हा त्यात कॅपिटल अक्षरही वापरलेलं नाहीये...!" खरंच फास्टर फेणे डोक्याने अजूनही तितकाच फास्ट होता.

म्हणून मी फेसबुकच्या लॉगइन पेजवर ताईचा इमेल टाकला, जो मला माहिती होता आणि मग पासवर्ड भरला. लॉगइन झालं. पासवर्ड बरोबर होता! मी तिच्या वॉलवर गेले. स्टेटसेस, फोटो, त्यावरच्या कमेंट्स पाहिल्या, पण तिथे काही वेडंवाकडं किंवा संशय यावा असं नव्हतं. मग फास्टर फेणे म्हणाला, "आआ, ते मेसेजेस पाहा बरं जरा."

मी मेसेजेसवर क्लिक केलं. तर पहिलंच कॉन्व्हर्सेशन होतं - 'बनेल बंटी'शी केलेलं. मी सहजच ते वाचत गेले आणि चाटच पडले! आणि सर्वांत शेवटी फोटो पाहिल्यावर तर उडायचीच बाकी होते! आणि हे सगळं चॅटिंग फास्टरने जेव्हा व्हिडिओ रेकॉर्डिंग केलं होतं त्याच वेळात झाल्याचं दिसत होतं.

"शप्पथ!" मी फास्टर फेणेकडे पाहिलं. तो म्हणाला, "आपल्याला झपाझप निघायला हवं." त्याने घड्याळात पाहिलं. नऊला पाच मिनिटं कमी होती. "आपल्याकडे मोजून २० मिनिटं आहेत आणि नळ स्टॉपला जायला आपल्याला तेवढा वेळ तर लागेलच, नाही का?"

मी कसंबसं 'हो' म्हणून लॉगआउट केलं आणि कॉम्प्यूटर बंद करून पळतच बाहेर गेले. की-होल्डरवरची सायकलची चावी घेत आईला म्हणाले, "आई, मी येते लगेच."

आई म्हणाली, "आरू, कुठे निघालीस आत्ता या वेळेला? ताईपण आलेली नाही अजून. जिवाला घोर लावता तुम्ही मुली!"

मी घाईघाईत तिला एव्हढंच म्हटलं, "आई, मी ताईला आणायलाच चाललेय! आल्यावर सगळं सांगते मी तुला." तिने पुढे काही बोलायच्या आतच मी एका वेळी तीन-तीन पायऱ्यांवरून उड्या मारत जिना उतरून खाली गेले. सायकल काढून जोरजोरात पायडल मारू लागले. गिअर टाकू लागले. वेळ खरंच कमी होता. फास्टर फेणे त्याच्या घोडा सायकलवरून माझ्याबरोबर येत होता, माझ्याच स्पीडने!

***

साधारणतः साडेदहाच्या सुमारास ताई आणि मी, आम्ही घरी पोचलो. फाफेही आमच्यासोबत होता, पण तो मलाच दिसत होता.

काळजीने आईचा चेहरा रडवेला झाला होता. घरी पाऊल टाकताच तिने आमच्यावर प्रश्नांचा भडिमार सुरू केला. "कुठे होतात तुम्ही दोघी? केव्हाची फोन करतेय तुम्हाला? पण तुमचा काही पत्ताच नाही. त्यात बाबाही घरी नाहीये, वेड लागायची पाळी आली होती मला..."

ताईने मान खाली घातली होती. मी खुणेनेच आईला शांत राहायला सांगितलं आणि म्हणाले, "सांगते, सगळं सांगते." मी किचनमध्ये जाऊन फ्रिजमधलं गारेगार पाणी घटाघट प्याले आणि मग बाहेर आले तेव्हा ताई मुसुमुसु रडू लागली होती. ती का रडतेय, हे न कळल्याने आईच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्हं होती. तिने रागाने विचारलं, "काय झालं हे सांगाल का नाही मला?" ताईचं रडू आणखीनच वाढलं. ते पाहून मलाही रडू येईल असं वाटलं, पण तोच फास्टरचा हात माझ्या खांद्यावर पडला. त्याने मला थोपटलं. मी त्याच्याकडे पाहिलं तेव्हा त्याने खुणेनेच मला 'सांग आता' असं सांगितलं.

मग मी सांगू लागले, "आई, आज दुपारी मी कार्यक्रमाची तयारी करत होते, तेव्हा ताई मला फारच अस्वस्थ वाटली. तिचं काहीतरी बिनसलंय असं वाटलं. ती रागाने मोबाइलवर सारखं काहीतरी टाइपत होती, चिडली होती. म्हणून मी ताईच्या फेसबुकवर लॉगइन केलं. आणि तिचा मेसेज बॉक्स पाहिला, तर तेव्हा मला कळलं की, एक मुलगा तिला ब्लॅकमेल करता होता..."

"काय?" आईने तर कपाळाला हातच लावला. "अर्चना, हे खरंय? आणि तू मला सांगितलं का नाहीस?"

मग डोळे पुसून ताई बोलू लागली, "हो खरंय, कॉलेजात असताना एका मुलाला मी आवडायचे, त्याचं नाव होतं अभिषेक. पण सगळे त्याला बंटी म्हणायचे. मला तो मुळीच आवडायचा नाही. तसं मी त्याला सांगितलंही होतं. पण तरी तो सारखा माझ्या मागे लागायचा. मग हळूहळू मी त्याच्याकडे दुर्लक्षच करू लागले आणि जास्त झालंच तर कंप्लेंट करायची असं ठरवलं."

"एकदा कँटीनमध्ये आमचा ग्रुप गप्पा मारत बसला होता. तोच कोणीतरी मला हाक मारली. मी पाहिलं तर बंटी गुडघ्यावर बसलेला. त्याच्या हातात हार्ट बलून. मला त्याचा इतका राग आला की, एक सणसणीत कानाखालीच लगावली मी त्याच्या आणि तरातरा निघून गेले. पण नंतर मला कळलं की, त्या दिवशी सगळं कँटीन खूप हसलं त्याच्यावर. त्याच्या मनालाही ते फारच लागलं असावं. कारण नंतर त्याने कॉलेजच सोडून दिलं. मग मध्ये एकदा मला 'बनेल बंटी' या नावाने फ्रेंड रिक्वेस्ट आली फेसबुकवर. बरेच म्युच्युअल फ्रेंड्स होते म्हणून मी ती ॲक्सेप्टही केली. नंतर कळलं की, हा तोच बंटी. त्याने कितीही काही केलं असलं तरी मी तेव्हा त्याला मारलं हे चूक होतं, याचा गिल्टही मनात होता. म्हणून त्याला 'सॉरी'ही म्हणाले मी फेसबुकवर. पण मग एके दिवशी त्याने एक फोटो टाकला माझ्या मेसेज बॉक्समध्ये. त्यात त्याने फोटोशॉप करून माझा साडीतला फोटो वापरून त्यात त्याचा फोटो टाकून दोघांनाही मुंडावळ्या लावल्या होत्या. जणू आमचं लग्न झालंय असा हुबेहूब भास निर्माण केला होता त्याने आणि मग तो ब्लॅकमेल करू लागला..." ताईला आता जास्त रडू फुटलं.

आईचं तोंड आश्चर्याने उघडं पडलं होतं. ती रडकुंडीला आली होती, रागावली होती. "काय तुम्हा मुलांचं हल्ली चाल्लेलं असतं त्या इंटरनेटवर रात्रंदिवस... बाप रे..."

मग मी बोलू लागले, "आज ताईला त्या बनेलने नळस्टॉपच्या बीएसएनेलच्या गल्लीत रात्री सव्वानऊला २५ हजार रुपये घेऊन बोलावलं होतं. मी हे सगळं चॅटिंगमध्ये पाहिलं आणि लगेचच तिथे गेले. जाण्याआधी माझा शाळेतला मित्र आहे ना आहान, त्याच्या बाबांना - पाचपुते काकांना फोन केला. मला माहिती होतं की, ते सायबर क्राइम सेक्शनमध्ये पोलीस आहेत म्हणून. घडला प्रकार सांगताच त्यांनी लगेचच येण्याचं वचन दिलं.

"जाताना, 'आयपीएल'मध्ये विराटची टीम जिंकली तर वाजवायच्या फटाक्यांमधली एक डांबरी माळ घेऊन गेले. बंटी चांगलाच बनेल होता. त्याने हुशारीने रात्री बीएसएनेलच्या मागच्या गल्लीत ताईला बोलावलं होतं. कारण संध्याकाळनंतर तिथे फारशी रहदारी नसते आणि अंधारही असतो. पुन्हा काही गडबड झालीच, तर कर्वे रोड लागूनच असल्याने पटकन पळूनही जाता आलं असतं. पण मी पण फास्टर फेणेची शिष्या आहे म्हटलं! मी हॉटेल 'समुद्र'च्या गल्लीतून बीएसएनेलमागच्या गल्लीत गेले. एखाद-दुसरी गाडी येत-जात होती. तिथल्याच एका बोळात मला हे दोघं दिसले. बोळात गाड्या पार्क केल्या होत्या. त्यातलाच एका 'एसयूव्ही'च्या मागे मी लपून राहिले. ताई त्याच्याशी तावातावाने बोलत होती. तो विचित्र हसत म्हणाला, "जर तू मला पैसे दिले नाहीस तर हा फोटो तुझ्या घरी तर पोचेलच, पण थोड्याच दिवसांत तुझ्या होणाऱ्या नवऱ्याकडे जातील, फेसबुकवरून सगळ्या जगापर्यंत पोचतील, कळलं! मला थोबाडीत मारतेस काय सगळ्यांसमोर!"

"मग मी माचीस पेटवून डांबरी माळ पेटवली आणि ती सुरसुरायला लागताच बरोब्बर त्याच्या पायाजवळ फेकली. फाट-फाट-फटाक् असा आवाज येताच तो घाबरला, थयथय नाचू लागला. ताईनेही किंकाळी फोडली. ती माझ्या दिशेने येताच मी तिला धरून गाडीमागे घेतलं. तो बिथरला. काहीतरी गडबड झाल्याचं लक्षात आल्याने तो कर्वे रोडकडे जाणाऱ्याच गल्लीकडे धावत जाऊ लागला. तेवढ्यात तिथून पाचपुतेकाका आले आणि त्यांनी त्याची गचांडी धरली!"

"बाप रे... हे एवढं सारं घडलं आणि तुम्ही मला एक चक्कार शब्दानेही सांगितलं नाहीत... आणि आता या मुलाचा कायमचा ताप झाला की आपल्या डोक्याला... थांब, मी बाबालाच फोन करते..."

"आई, शांत हो आधी. माझं ऐकून घे आणि मगच बाबाला फोन कर. त्या मुलाच्या बाबतीत मुळीच काळजी करू नकोस तू. तो बंटी आयुष्यात पुन्हा कधीही बनेलपणा करणार नाही, असा धडाच देतो त्याला, असं पाचपुते काकांनी वचन दिलंय मला. तू हवं तर उद्या त्यांना फोन कर!" मी अगदी मोठ्या माणसासारखं बोलले. आईने लगेच बाबाला फोन लावला आणि त्याला घडलेलं सगळं 'रामायण' सांगू लागली.

आता मान खाली घालून बसलेल्या ताईने हळूच माझ्याकडे पाहिलं. ती रडायची थांबली होती. कान पकडत मला म्हणाली, "सॉरी यार आरू, दुपारी तुझ्यावर उगाच चिडले मी."

मी म्हणाले, "चिडलीस? खेकसलीस म्हण!" मग तिला डिवचत खोचकपणे म्हणालो, "ताई, तू एवढी आयटीत काम करतेस, पण तुला फेसबुकच्या प्रायव्हसी सेटिंग माहिती नाहीत?! आणि त्याहीपेक्षा म्युच्युअल फ्रेंड्स आहेत म्हणून कोणालाही ॲड कसं करता तुम्ही? प्रत्येकालाच वाटतं, हा इतक्या जणांचा म्युच्युअल फ्रेंड आहे, म्हणजे आपण ॲड करायला हरकत नाही याला!" मला हे सगळं फास्टर फेणेने सांगितलं होतं. त्यामुळे मी फक्त पोपटपंची करत होते!

"हो, हो, कळलं हो ढुढ्ढाचारिणे! फा.फे.फॅन!" हसत माझ्या केसांतून हात फिरवत ताई म्हणाली, "चल, भूक लागली असेल ना, आई बोलतेय तोवर मी जेवणाचं पाहते. काळजीने आईपण जेवली नसेलच!"

ती किचनमध्ये जायला निघाली तसं मी तिला म्हणाले, "आणखी एक, पासवर्डमध्ये स्वतःची बर्थडेट आणि नाव टाकण्यापेक्षा स्पेशल कॅरेक्टर घालत जा आणि हो, एक कॅपिटल लेटरपण!"

ताईने चमकून पाहत विचारलं, "होय गं, कारटे, तुला माझा पासवर्ड कसा काय कळला? पाहिलास ना चोरून...?"

मी ऐटीत मोठ्या माणसासारखं म्हणाले, "ए, ढ असतात ते चोरूनबिरून पाहतात, पण बुद्धिमान माणसं सत्य शोधून काढतात कळलं!" फास्टर फेणेकडे पाहून डोळा मारत मी म्हटलं, "तुझा पासवर्ड मी कसा शोधला ते मुळीच सांगणार नाही. कारण ते सीक्रेट आहे माझं!" फास्टर फेणेनेही माझ्या खांद्यावर हात ठेवून थम्सअप केला.

ताई खोटं खोटं रागवत म्हणाली, "वाजवू का एक फटाका त्या डांबरी माळेसारखा!" पण तिने लगेच मला जवळ घेतलं. माझ्या शेजारी असलेला फास्टर फेणे आता गायब झाला होता, पण त्याचा हात आपल्या खांद्यावर असल्याचं मला बराच वेळ जाणवत राहिलं.

***

स्पर्धापरीक्षक - राजेश घासकडवी.

***

बिपिनवरचे सिनेमे लोकांपर्यंत पोचलेच नाहीत!

- रघुवीर कूल



श्री. रघुवीर कुलकर्णी उर्फ 'रघुवीर कूल' हे एक चतुरस्र व्यक्तिमत्त्व. त्यांनी 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स'मधून (१९७५) शिक्षण घेतलं. पटकथाकार, कथाकार, स्तंभलेखक व कवी म्हणून त्यांनी विपुल लेखनही केलं आहे, कॉमिक स्ट्रिप्स काढल्या आहेत. त्यांच्या काही नाटकांसाठी व एकांकिकांसाठी त्यांना पुरस्कारही मिळाले आहेत. 'मोहरे' (१९८७) पासून ते चित्रपटसृष्टीत शिरले व आजवर त्यांनी अनेक चित्रपटांचे दिग्दर्शन केले. त्यांच्या विविध चित्रपटांपैकी '**लगी शर्त**' आणि '**रॉंग मॉरिशस**' हे दोन चित्रपट भा. रा. भागवत यांच्या 'बिपिन बुकलवार' या पात्रावर आधारित होते. त्यांनी ते 'चिल्ड्रन्स फिल्म सोसायटी ऑफ इंडिया'साठी दिग्दर्शित केले होते. भा. रा. भागवत विशेषांकाच्या निमित्ताने त्यांच्याशी झालेल्या गप्पा इथे देत आहोत.

भा. रा. भागवतांच्या 'बिपिन'वर आधारित चित्रपटांवर व एकूणच बाल-किशोर चित्रपटांवर काही बोलण्याआधी पार्श्वभूमीच्या उद्देशाने माझा तिथवरचा प्रवास इथे मांडणे सुयोग्य ठरेल. मी १९७५ ला 'जे.जे.'मधून शिक्षण घेऊन बाहेर पडलो. त्या वेळी कॉलेजात दामू केंकरे होते. शिवाय कॉलेजमध्ये पुरुषोत्तम बेर्डे, मी व इतर मंडळी मिळून वेगवेगळी नाटके, एकांकिका वगैरे करत असू. याच दरम्यान आमचा एक अभ्यासदौरा कर्नाटकात नेला होता. तिथे बराच प्रवास होत असे. तेव्हाच आम्हांला 'टुरटूर' नावाची एकांकिका सुचली. त्या 'टुरटूर'च्या टूरने आम्हाला बरंच काही दिलं. पुढे 'चौरंग'च्या बॅनरखाली आम्ही 'टुरटूर' व्यावसायिक रंगभूमीवरही केलं. एकूण तब्बल ५५० प्रयोग.

मी कॉलेजात असल्यापासून नाटके लिहीत असे. पुढे आम्ही मंडळी अर्थार्जनासाठी वेगवेगळ्या ठिकाणी लागलो, मात्र केंकऱ्यांनी नाटक न सोडण्याचा सल्ला दिला होता. नाटक सोडणे आम्हांलाही मंजूर नव्हतेच. आम्ही साऱ्यांनी मिळून 'या मंडळी सादर करूया' अशा मोठ्या नावाची एक प्रायोगिक नाट्यसंस्था काढली. या संस्थेच्या बॅनरखाली आम्ही जवळजवळ ८ नाटकं, १२-१५ एकांकिका काढल्या. आमचा हा प्रयोग चांगला १० वर्षे सातत्याने चालू होता.

त्याच दरम्यान मला लक्षात येऊ लागलं की माझा कल सिनेमाकडे अधिक आहे. मी 'कोळिष्टक' म्हणून एक नाटक राज्य नाट्य स्पर्धेसाठी केलं होतं, त्यातून संजय मोनेचं पदार्पण झालं होतं. त्यालाही पुरस्कार मिळाला होता. त्यामुळे सुरुवातीला त्याच नाटकावर बेतलेली पटकथा लिहिली. मला एक वर्ष सीनियर असलेला नाना, सदाशिव अमरापूरकर व सविता प्रभुणे हे मित्र. सविताचे शिक्षक म्हणून अनुपम खेर, नाना आणि सदाशिव अमरापूरकर, यांच्यासोबत माधुरी दीक्षित अशा कलाकारांना घेऊन १९८७ मध्ये 'मोहरे' बनवला. त्यानंतर मात्र फिल्मचा किडा चावला. एकदा फिल्मचा किडा चावल्यावर माणूस दुसरं काही करू शकत नाही याची प्रचिती येऊ लागली.

दरम्यान भा. रा. भागवतांच्या लेखनापैकी 'बिपिन बुकलवार' या नायकाच्या मालिकेमधील एका गोष्टीवर चित्रपट करण्याचं प्रपोजल मी 'चिल्ड्रन्स फिल्म सोसायटी ऑफ इंडिया' (CFSI)ला दिलं. सरकारदरबारी गेलेल्या अनेक प्रपोजल्सपैकी याचंही अपेक्षेप्रमाणे काहीच झालं नाही. पुढे साधारण वर्षानंतर सई परांजपे एका फ्रेंच कॉन्सुलेटच्या कार्यक्रमाला भेटली. तिची नि माझी जुनी ओळख. तेव्हा सई 'CFSI'ची अध्यक्ष होती. तिने "तू लहान मुलांसाठी चित्रपट का काढत नाहीस?", असं विचारताच मी तिला, "मी केव्हाच तुमच्याकडे एक प्रपोजल दिलेलं आहे. मात्र त्याचं पुढे काहीच झालं नाही" हे सांगितलं. अर्थात तेव्हा CFSI मध्ये दिवसाला १०-१२ प्रपोजल्स येत असत. येणारं प्रत्येक प्रपोजल अध्यक्षांपर्यंत पोचत नसे, हे मला माहीत होतं; त्यामुळे मी ते ताणलं नाही.

सई परांजपे म्हणाली, "तुझं प्रपोजल नंतर बघू. माझ्याकडे एक 'मंजुरी मिळालेलं प्रपोजल' आहे. मला ऑफीसमध्ये येऊन भेट". तिथे ती कथा मला दाखवण्यात आली आणि योगायोगाने ती कथासुद्धा भारांची आणि त्यातही 'बिपिन बुकलवार'चीच होती. मला सई परांजपे म्हणाली होती, "भारा हे मला माझ्या काकांसारखे आहेत. त्यांना मी शब्द दिलाय की तुमच्या एका तरी व्यक्तिरेखेवर मी चित्रपट काढेन." भारांचं एकूणच बाल-किशोर साहित्यातील योगदान लक्षात घेता खरं तर कितीतरी चित्रपट काढणं शक्य होतं.

भारांच्या कथांवर चित्रपट बनवताना बिपिनच का निवडला, किंवा 'फास्टर फेणे'सारखा यशस्वी नायक का निवडला नाही, असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. एक तर त्याचं मूळ माझ्या वाचनाच्या आवडीत असावं. मला वाचायची प्रचंड आवड. त्यामुळे सतत पुस्तकांत डोकं खुपसून काहीतरी शोधणाऱ्या बिपिनशी मी अधिक रिलेट झालो, ही शक्यता मोठी आहे. सईलाही बिपिनचं पात्र खूप आवडत होतं. शिवाय 'फास्टर फेणे'वरची मालिका सुलभा देशपांडेंनी आधीच केली होती - त्यात बहुधा फास्टर फेणेचं काम 'सुमित राघवन'ने केलं होतं. तेव्हा 'फाफे'वर थोडं तरी काम आधीच झालं होतं. मात्र 'बिपिन'कडे अजून कोणी वळलं नव्हतं. तेव्हा अशा प्रकारे 'बिपिन बुकलवार' या नायकाच्या पहिल्यावहिल्या 'लगी शर्त' या चित्रपटाचे काम करायचं ठरलं.



'बिपिन'वर काम करू लागलो तसा तो मला अधिकाधिक आवडू लागला होता. पूर्वी दिलेल्या प्रपोजलच्या निमित्ताने मी त्याच्यावर थोडं कामही केलेलं होतं. मात्र ही नवी कथा पूर्ण वेगळी होती आणि आहे त्या रूपात नीटशी उभी राहत नव्हती. एखाद्या कथेचं चित्रपटात रूपांतर दर वेळी तसंच जमतं असं नाही. तेव्हा मी चित्रपटासाठी कथेत बदल करायचे ठरवले. सई परांजपेंनी "चैंजेस करायचेत ते भारांच्या परवानगीने कर." अशी मंजुरी दिली होतीच. मी स्वतः भारांना दोन-तीनदा जाऊन भेटलो. तेव्हा ते पुण्यात बावधनला राहत. भागवतही मोठा उमदा माणूस. त्यांच्या होकारानंतर आम्ही कथेत बदल केले. आता तेव्हाचं खूप काही आठवत नाही, पण त्यांचं बावधनमधील घर आणि त्यांच्याकडची दोन उंच, मोठाली कुत्री तेव्हढी आठवताहेत.

सईला हा चित्रपट 'बाल-किशोर चित्रपट महोत्सवां'साठी बनवायचा होता, हे आधीच ठरलेलं होतं. तुर्कस्तान, रशिया, युरोप इत्यादी ठिकाणच्या मुलांना मुंबई काय आहे, ते समजावं; असा

चित्रपट बनवण्यामागचा विचार होता. त्यासाठी सईच्या मते भागवतांची ही कथा सुयोग्य होती. 'लगी शर्त'मध्ये वेगवेगळी कोडी सोडवत बिपिन मुंबईभर फिरणार होता. बक्षीस म्हणून त्याला विश्वकोशाचे म्हणजे 'एन्सायक्लोपीडिया'चे सर्व खंड मिळणार होते. मुंबईतल्या वेगवेगळ्या ठिकाणी एकेक खंड ठेवलेला होता, तिथे पोचल्यावर पुढलं कोडं (क्लू) मिळणार, अश्या प्रकारची कथावस्तू होती. 'गेट वे ऑफ इंडिया'पासून त्याचा प्रवास सुरू झाला, तो क्लायमॅक्स पुन्हा 'गेट वे'लाच झाला. या कथांचं रूपांतरण नि बदल मी स्वतःच केले होते. शिवाय सोबतीला सुषमा बक्षी ही लेखिकाही होती. ती आता मालिका लिहिते, नाटकांवरही काम करते. ती अतिशय गुणी लेखिका आहे. तिच्या मदतीने भागवतांच्या कथांवर काम करून नवी पटकथा लिहिण्याचे काम मी केलं. पटकथालेखनामध्ये जरा कला-कारी किंवा कारागिरी असते. ती करावी लागतेच; तेव्हा दर वेळी मूळ लेखनाशी प्रामाणिक राहता येईलच, असं सांगता येत नाही.

'लगी शर्त'मधील दृश्य

या चित्रपटात आणखी एक बदल केला होता - तो म्हणजे बिपिन, विजू आणि मोना या तिघांच्याही वयाचा. खरंतर बिपिनच्या भूमिकेसाठी माझ्या डोळ्यासमोर अनिकेत विश्वासराव होता. तेव्हा तो साधारण १६-१७ वर्षांचा असेल. अनिकेत आणि मुख्यतः त्याचे वडील माझ्या परिचयाचे. मी त्याला घेऊन सईकडे गेलो होतो; पण तिच्या डोक्यातला बिपिन अजून लहान होता. मूळ कथेतील बिपिन याच वयाचा आहे, हे मी तिला सांगितलं; पण या कथेला लहान बिपिनच साजेसा आहे, असेच तिचे मत होते. शेवटी तिच्या (म्हणजे संस्थेच्या) मर्जीनुसार पात्र लहान वयाचे झाले व त्याच प्रमाणात विजू व मोनाही लहान झाले. बिपिन म्हणून आम्हांला नचिकेत दिघे हा छान मुलगा मिळाला. या लहानग्यांना घेऊन चित्रपट पूर्ण केला.

त्यानंतर सई निवृत्त झाली. तिच्या जागी रविना टंडन आली. तिने माझं आधीचं काम बघून, अश्याच धाटणीचा अजून एक चित्रपट करण्याची ऑफर दिली. हे त्या संस्थेलाही नवं होतं. कारण तोपर्यंत त्या संस्थेत तीन वर्षांच्या आत पुन्हा त्याच दिग्दर्शकाला काम द्यायचे नाही, असा दंडक होता; माझ्या निमित्ताने तो मोडला गेला. तिनं "कोणत्या कथेवर हे काम करायचं?", असं विचारताच माझं उत्तर तयार होतं. मागे दुर्लक्षित राहिलेल्या माझ्या मूळच्या पहिल्या चित्रपटावर मी काम करणं पसंत केलं. एकतर मला भारांच्या बिपिनवरील लेखनापैकी हे 'तिकिटाचे रहस्य' अतिशय आवडतं. दुसरं असं, की गेल्या वेळी मी त्यावर आधीच थोडं काम केलं होतं. अखेरीस त्याच कथेवर आधारित चित्रपट करायला मला परवानगी मिळाली. 'रॉंग मॉरिशस' या नावाने या दुसऱ्या चित्रपटाचं काम सुरूही झालं. या चित्रपटाचं स्वरूप मनोरंजनासोबत एखाद्या एज्युकेशनल फिल्मप्रमाणे असावं, असं मला वाटत होते. मुंबईतलं जी.पी.ओ., तिथे चालणारं काम, पत्रांचा प्रवास आदी माहिती मुलांना कथेच्या अनुषंगाने मिळणार होती.

या वेळी पात्रयोजनेचा प्रश्न नव्हता. दरम्यानच्या वर्षांत तिघेही मोठे झाले होते व पुस्तकाप्रमाणे बऱ्यापैकी सुयोग्य वयाला आले होते. त्यामुळेच बिपिन तोच ठेवला, फक्त विजू बदलला- कारण आधीचा

आमचा 'विजू' कोल्हापुरला शिकायला गेला होता. 'मोना'सुद्धा तीच राहिली (गौरी वैद्य). पुढे जाऊन 'दे धक्का'मध्ये गौरीने चांगलं काम केलेलं आपण बघतो आहोतच. इतर पात्रयोजनेपैकी चोराची भूमिका नंदू माधवने केली होती, तिकिटांचं कलेक्शन करणारा निखिल रत्नपारखी होता (हा त्याचा पहिलाच चित्रपट). सेक्रेटरीचं काम अतिशा नाईकने केलं होतं, सिद्धार्थ जाधवनेही एका पिझ्झा डिलीवरी बॉयची छोटेखानी भूमिका यात केली होती.

'रॉंग मॉरिशस'मधील दृश्य

आधी म्हटलं तसं, मी खूप पुस्तकं वाचत असे. 'कॉमिक स्ट्रिप्स' वाचायचीही खूप आवड होती. भारांची शैलीही तितकीच चित्रमय होती. १९६२च्या आसपास हे 'तिकिटाचे रहस्य' पुस्तक लिहिलं गेलं असेल. त्या वेळी 'रॉंग मॉरिशस'सारख्या नवख्या व अनोख्या विषयाबद्दल, मुलांसाठी इतक्या रसाळ शब्दांत लिहिणं हेच मुळात ग्रेट होतं. आता इंटरनेटच्या काळात अधिक माहिती मिळवणं सोपं आहे, पण तेव्हा अशा एखाद्या गोष्टीवर इतकं तपशीलवार लेखन करणं, ते कथानकात गुंफणं किती अवघड असेल व त्याला किती व्यासंग व वाचन लागत असेल याची मला हा चित्रपट करताना चांगलीच कल्पना आली. या निमित्ताने मी नेटवर शोधलं तर सध्या 'ते' तिकीट 'रेमंड वेल'कडे आहे. त्याचाही वापर मग चित्रपटात केला.

भागवतांच्या नायकांचे चित्रपट करताना आव्हानात्मक काही असेल तर, त्यांतली विविध लोकेशन्स - स्थळं - चित्रपटांत आणणे. त्यांनी आपल्या बहुतांश कथांमध्ये प्रत्यक्षात अस्तित्वात असणारी स्थळं घेतली आहेत. त्या स्थळांची तपशिलात वर्णने आहेतच, शिवाय कथासूत्रही स्थळांशीच जोडलेलं आहे. त्यामुळे वाचक कथेसोबत अधिक जोडला जात असला, तरी त्यामुळे चित्रपट बनवणे प्रचंड धावपळीचे बनते. 'लगी शर्त'मध्ये अशी खूपच स्थळं होती. एका जागेवरचा शॉट संपवून दुसरीकडे एखादा शॉट घ्यायचा म्हटलं, तर मध्ये अख्खं युनिट तिथे घेऊन जाणं, सर्व सेटिंग करणं यातच किमान २-२:३० तास जात. त्याव्यतिरिक्त इतरही सव्यापसव्यं असतंच. उदाहरणार्थ, आम्हांला या कथेसाठी 'गेट वे'सारख्या ठिकाणाची गरज होती. अशा वेळी सर्वांत तापदायक काही असेल तर अनेक विभागांतून परवानगी मिळवणं. 'गेट वे' पुरातत्त्व विभागाच्या अधीन आहे, तेव्हा आधी त्यांची परवानगी, मग महानगरपालिका, पोलिस, टूरिस्ट पोलिस, स्थानिक चौकी, फायर ब्रिगेड वगैरे, अशा जवळजवळ ७-८ ठिकाणांहून परवानगी घ्यायची, त्यांची (म्हणे रिफंडेबल!) भाडी द्यायची,

तेव्हा कुठे तिथे शूटिंग करता येतं. या चित्रपटाच्या वेळी तर आम्ही २-३ माणसं केवळ परवानगी काढायला ठेवली होती.

लहान मुलांना घेऊन असे चित्रपट बनवणं अधिकच आव्हानात्मक होतं. त्यांच्या कलानं बरंच घ्यावं लागे. 'लगी शर्त'मध्येच आम्हांला बऱ्याच प्रयत्नांनंतर 'गेट वे'वरच्या शूटिंगची परवानगी एका विशिष्ट तारखेपुरती मिळाली. तर नेमकी त्याच दिवशी 'विजू'चं काम करणाऱ्या मुलाची परीक्षा होती. पण बिचाऱ्याने आदल्या रात्री अभ्यास उरकला. त्याला घ्यायला गाडी पाठवली. त्यानं गाडीत लहानशी झोप काढली. तो राहायचा ठाण्याला. पहाटे 'गेटवे'ला आला, आपले शॉट्स दिले आणि ११ च्या परीक्षेला त्याला पुन्हा केंद्रावर सोडून आलो. त्याची परीक्षाही महत्त्वाची नि आम्हांला नेमकी त्याच दिवसाची परवानगी मिळालेली. त्याच 'गेट वे'च्या शूटिंगची दुसरी गंमत अशी की, आम्हांला शूटिंगसाठी करावे लागणारे लायटिंग पूर्ण होईस्तोवर रात्रीचे दोन वाजले. तोवर ही सगळी चिमुरडी नायक मंडळी झोपून गेली होती. त्यांना मग त्यांच्या कलानं घेऊन उठवा, गोड गोड बोलून जागे करा, हवी असल्यास कॉफी पाजा, वगैरे बाबापुता करून शॉट्स पूर्ण करून घेतले.

लहान मुलांच्या कलानं घेऊन चित्रपट बनवले की मुलंही छान सहकार्य देतात. केवळ अभिनयच नाही, तर अन्य अनेक ठिकाणी ते आश्चर्यकारक रिझल्ट्स देतात. उदाहरणार्थ डबिंग. प्रत्यक्षात ते अतिशय टेक्निकल काम. मात्र डब करताना पोरं अतिशय सहजपणे करतात - अगदी फर्स्ट क्लास! मोठमोठ्या स्टुडियोज्मध्ये कित्येक कुशल तंत्रज्ञ आहेत, तेही पोरांची सफाई बघून अतिशय चकित झाले होते. प्रथितयश कलाकारांनाही डबिंग करताना कित्येक टेक घ्यावे लागतात, नि त्याउलट लहान मुलं मात्र कितीतरी पटापट डबिंग करतात. त्यांना कोणतंही टेन्शन नसतं, हे मूळ कारण असावं.

भारांच्या कथांवर हे दोन चित्रपट बनवले खरे; पण खरी खंत अशी की आपल्याच लोकांपर्यंत ते म्हणावे तसे पोचले नाहीत. परदेशात ते फिल्म फेस्टिव्हल्सना दाखवले गेले, मात्र भारतातल्या चित्रपटगृहांत रिलीज होऊ शकले नाहीत. आपल्या सरकारी संस्थांकडे चित्रपट बनवायचं बजेट असतं, पण ते वितरित करण्यासाठी त्यांच्याकडे पैसा नसतो. काही शाळांमध्ये हे दोन्ही चित्रपट दाखवले गेले. तिथून मुलांनी दिलेल्या प्रतिक्रिया मात्र अतिशय उत्साहवर्धक होत्या. सई होती तोवर तिच्या प्रयत्नाने 'लगी शर्त' 'सोनी गोल्ड'ला विकला होता. त्यावर तो एक-दोनदा दाखवलाही गेला होता. तेव्हाही अनेकांनी मला फोन करून आपले अभिप्राय नोंदवले. पण तितकंच. पुढे काही नाही. खरंतर सई होती म्हणून इतकं तरी झालं. कित्येक बालचित्रपटांच्या नशिबी इतकंही येत नाही. आता हे चित्रपट यूट्यूबवरही दिसत आहेत, असंही काही लोक मला कळवतात. मात्र तिथे काय प्रतिक्रिया असते ते मी पाहिलेलं नाही.

मी स्वतः एक लेखक असल्याने भागवतांकडे मी अतिशय आदराने बघतो. काळाच्या पुढे असणारा तो बालसाहित्यकार होता. हल्ली मुलं वाचत नाहीत हे मुलांचं दुर्दैव आहे. १९६२ मध्ये 'राँग मॉरिशस' सारखा नवा विषय घेऊन, कुमारसाहित्यात तो पेलून दाखवण्याची ताकद असणारा हा लेखक 'सिंपली ग्रेट' होता. लहान मुलांसाठी इतक्या वेगवेगळ्या विषयांवर इतकं लिहिणं, हा विनोद नाही. त्यांनी कित्येक मुलांच्या माहितीच्या आवाका वाढवला आहे. त्यांचं स्वतःचं वाचन जबरदस्त होतं नि त्यातील उत्तम गोष्टी मराठी वाचकांपर्यंत पोचवायची ओढही त्यांना होती!

माझ्या मते, 'फास्टर फेणे'ला मिळाली, त्याहूनही अधिक प्रसिद्धी व त्यायोगे भागवतांना कितीतरी अधिक मान मिळणं आवश्यक होतं. त्यांच्या लिखाणाची पातळी त्यांच्यानंतर अजूनही कोणी गाठू शकलेले नाही.

हे खरं आहे की आता मुलांना पुस्तकांसोबत उत्तमोत्तम चित्रपटही पहायला मिळतात. त्यामुळे जर समोर हालतं-बोलतं काही सहज बघायला असेल तर प्रत्येकाला पुस्तक वाचावंसं वाटेलच, असं नाही. मात्र परदेशात जसा 'लॉर्ड ऑफ द रिंग्ज' बनतो किंवा 'हॅरी पॉटर' बनतो, तसं आपल्याकडे काही उल्लेखनीय व दर्जेदार बनत नाही. 'फास्टर फेणे', अनेक वर्षांनी 'बोक्या सातबंडे', तर अलीकडे कॉमिक स्ट्रिपमधून चित्रपटांपर्यंत पोचलेला 'चिंटू' हे तीनच 'हीरोज' म्हणता येतील. अशी पात्रं वगळता, मराठी साहित्यात आणि चित्रपटसृष्टीतही फारसे मराठमोळे बाल-हिरो आले नाहीत. याचं कारण आपल्याकडे यात पैसे गुंतवायला कोणी तयार होत नाही.

यावरून आठवलं, १९७५मध्ये अनंत पै कॉमिक्स करायचे. मीही तिथे जायचो, तिथेच आबिद सुरतीची ओळख झाली. तो 'अमर चित्रकथे'मध्ये काम करायचा. मीही तिथे जाऊ लागलो. तिथे एकदा फँटमचा निर्माता 'ली फाक' आला होता. तो म्हणाला, "आमच्या अमेरिकन लोकांसमोर मोठा प्रॉब्लेम असतो. आम्हांला सुपरहिरो तयार करावे लागतात, सुपरमॅन तयार करावा लागतो, कॅप्टन अमेरिका तयार करावा लागतो. तुमच्याकडे महाभारतात-रामायणात ते तयार आहे." आज जेव्हा मी 'छोटा भीम' डिस्नेच्या लोकप्रियतेला टक्कर देताना पाहतो, तेव्हा मला तेच आठवतं.

मुलं काय नि किती वाचतील, हे मला ठाऊक नाही. त्यांनी भागवत वाचावे असं मात्र जरूर वाटतं. वाचन होणार नसेल, तर मुलांना भागवत पाहायला तरी मिळावेत, असं वाटतं. नवे बालसाहित्यकार आता फारसे नाहीत; मात्र लहान मुलांसाठी चांगले चित्रपट करण्याला अजुनी मोठा वाव आहे. आता तंत्रज्ञानातही क्रांती झाली आहे. नुसतं सादरीकरणच नाही; तर कॅमेरा, डबिंग, एडिटिंग इत्यादी सर्वच अंगं अता प्रचंड बदलली आहेत. चित्रपटांद्वारे भारतात, मराठीत मुलांसाठी काही कसदार निर्माण झालं, तरच भागवतांचा वारसा आपण अल्पांशाने तरी पुढे नेला असं म्हणता येईल.

***

चित्रपटांचे 'यू ट्यूब'वरील दुवे -
'लगी शर्त' (https://www.youtube.com/watch?v=rV5BRmN40uU)
'रॉंग मॉरिशस' (https://www.youtube.com/watch?v=jjqs_DNcOg4)

***

शब्दांकन ऋषिकेश
लेखातील चित्रपटांच्या स्थिरदृश्यांचा स्रोत - 'बाल चित्र समिती, भारत' (http://cfsindia.org/).
लेखातील इतर चित्रे: जालावरून साभार.

***

कुटुंबातले भारा - भाग १

शब्दांकन : मेघना भुस्कुटे, स्नेहल नागोरी

या मुलाखती एका लोकप्रिय आणि गोड लेखकाबद्दलच्या आहेत. त्या लेखकाचे कुटुंबीयही तसेच. या अंकाच्या काळात त्यांच्याकडून झालेली ही मदत :

"पुस्तकं मिळत नाहीयेत? मी देते की."
"फोटो? जरूर."
"हो, कधीही फोन करा, चालेल!"
"इथल्या इथे कॉपी करून आणता येईल, जरा जुनी प्रत आहे म्हणून फक्त..."
"अच्छा, 'त्या भाषणाचा संदर्भ... उद्या सांगू?"
"छे छे... अजिबात त्रास नाही गं..."
"उलट तुमचा उत्साह बघून आम्हांला मजाच वाटते!

असले मस्त लोक.
एरवी गोडगोड आदर्श भासणाऱ्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या अप्रिय बाजू त्याच्या खाजगी नात्यांच्या तपशिलांतून उघड व्हाव्यात आणि मनातलं चित्र भंगावं, असा आजवरच्या अनुभवांचा एकंदर पॅटर्न. पण भा. रा. भागवतांच्या कुटुंबीयांशी बोलताना लेखक नि माणूस यांच्यातल्या विसंगती मजेशीर प्रकारे उलट्यापालट्या होऊन गेल्या. खाजगी आयुष्यातही कमालीच्या अनाग्रही, गोड, गंमतीदार असलेल्या भा. रा. भागवतांबद्दल - ऊर्फ दादांबद्दल - आणि लीलाताई भागवतांबद्दल त्यांच्या कुटुंबीयांनी दिलखुलास गप्पा मारल्या.



भागवत कुटुंबीय

डावीकडून : रवी (रवीन्द्र: थोरले चिरंजीव), विद्या (विद्युत: थोरल्या सूनबाई), चंदर (धाकटे चिरंजीव), भारा, चिनू (सरिता: रवी-विद्युत यांची कन्या), रेवती (धाकट्या सूनबाई), लीलाताई (लीलावती: भारांच्या पत्नी)

आम्ही या मंडळींना एकत्र भेटलो नाही. त्यामुळे एकेका प्रश्नाच्या छत्रीखाली त्यांची प्रकटनं गोळा करून एकत्र गप्पा मारल्याचा आभास निर्माण करण्याची गुळगुळीत झालेली मुलाखतीय क्लृप्ती इथे टाळली आहे. त्यांची प्रकटनं तेवढी देतो आहोत. प्रयत्न करूनही काही गोष्टींची पुनरावृत्ती टाळता आलेली नाही, म्हणजे ती आवश्यकच म्हणायला हवी!

***

रवीन्द्र भागवत, *भारांचे थोरले चिरंजीव. हे 'व्हर्नीश पंथातले. रॉबिन हुडचं भाषांतरही त्यांचं लाडकं. गृहस्थ काहीसे अबोल.*

'निळे पाकीट', 'माझा विक्रम', 'वैतागवनातील वाफारे' ही दादांची अगदी सुरुवातीच्या काळातली पुस्तकं. विनोदी लेखनानं त्यांनी लेखनाला सुरुवात केली. त्या काळात ती पुस्तकं किती गाजली याचे तपशील मला माहीत नाहीत. मी तेव्हा फारच लहान होतो. मला त्यांचं आवडलेलं पहिलं पुस्तक आठवतं ते 'रॉबिन हुड आणि त्याचे रंगेल गडी'. (त्याचं कारण, ते मला अर्पण केलेलं आहे.) नंतर मला ज्यूल व्हर्नच्या वैज्ञानिक कादंबऱ्यांचं वेड लागलं. खरं म्हणजे दादा विज्ञानाचे विद्यार्थी नव्हते, ते इंग्रजी साहित्य शिकलेले. झेविअर्स कॉलेजमधून. पण ते सायन्स फिक्शन खूप वाचत असत. त्यांचाही ज्यूल व्हर्न हा आवडता लेखक. त्याची जवळजवळ सगळी पुस्तकं त्यांनी मराठीत आणली आहेत. '**दी बेगम्स मिलियन्स**'[१] नावाचं एक पुस्तक इथे मिळत नव्हतं. मी इंग्लंडला चाललो असताना 'तिथे नक्की मिळेल, काही करून शोधून आण.' असं मला त्यांनी बजावलं होतं. शेवटी त्यांना ते इथेच रद्दीवाल्याकडे मिळालं.

रद्दीवाल्याकडून पुस्तकं मिळवणं हा त्यांचा हातखंडाच. ते एक वेगळंच प्रकरण होतं. असंच रद्दीवाल्यांकडे पुस्तकं हुडकताना त्यांना एकदा त्यांनीच भाषांतर केलेलं पुस्तक दिसलं, त्याचाही एक किस्सा आहे. पुस्तक बघून त्यांनी रद्दीवाल्याला विचारलं, "केवढ्याला देणार?" म्हणाला, "बारा रुपये." तर म्हणे, "चल, काहीही काय! त्यावर फक्त दोन रुपये किंमत लिहिली आहे." तर रद्दीवाला उलटा त्यांना पटवायला लागला, "नाही, ते गाजलेलं पुस्तक आहे चिकार. किंमतीवर जाऊ नका..."

शेवटी घेतलं ते पुस्तक!

एकदा तर मला बरोबर घेऊन बाहेर पडले. पण पुस्तकांच्या नादात मला विसरून घरी गेले. असले एकेक किस्से. बिपिन बुकलवार म्हणजे त्यांच्या कल्पनेतली व्यक्तिरेखा नव्हती. ते स्वत:च बिपिन बुकलवार होते, असं मला कायम वाटायचं.

तर - मी भरकटलो. कुठे होतो आपण? हां, तर उत्तमोत्तम पुस्तकं वाचायची नि ती मुलांसाठी मराठीत आणायची, याचं वेडच त्यांना. इंग्रजी फिक्शनचं वाचन प्रचंड आणि गोष्ट खुलवून खुलवून सांगायची आवडही. रोज रात्री झोपताना आम्हांलाही गोष्ट सांगायचे. रतीबच असायचा. त्याचंच एक्स्टेंशन त्यांच्या पुस्तकांत झालं. पण वाचली गोष्ट - केलं भाषांतर इतकं साधंसरळ नव्हतं. ज्यूल व्हर्नच्या कादंबऱ्यांची रूपांतरंच घ्या, त्यात चंद्राच्या कला आहेत, ताऱ्यांच्या पोझिशन्स, अक्षांश-रेखांशांचे तपशील आहेत. त्याचं मराठीकरण - भारतीयीकरण करायचं, तर त्यातही स्थलानुरूप बदल करायला हवेत. मग त्यासाठी संदर्भ हुडकून ते बरंच वाचन करत. मीही कितीतरी वेळा त्यांच्यासोबत नोट्स काढायला लायब्ररीत गेल्याची स्पष्ट आठवण आहे. संदर्भ शोधून पुरेशी माहिती मिळवल्याशिवाय लिहिणे नाही. ५० सालापासून ५७ सालापर्यंत

त्यांनी 'बालमित्र' मासिक चालवलं, त्यात ज्यूल व्हर्नची एक कादंबरी दर अंकात प्रसिद्ध होत असे. त्या गोष्टींना खास अनुप्रासातली नावंबिवं शोधण्यात त्यांचा हातखंडाच होता.

'बालमित्र'च्या नंतरचा काळ फास्टर फेणेचा. अजूनही तुमच्या पिढीतली पोरं फास्टर फेणेवर फार प्रेम करतात. त्यांच्या बोलण्यातून त्यांचं प्रेम लक्षात येतं. पण मी फास्टर फेणेमध्ये फार गुंतलेला नाही. दादांनी ती मालिका लिहिली, तोवर माझं वय ती पुस्तकं वाचण्याचं राहिलं नव्हतं. शिवाय पुढे त्यांनी फास्टर फेणे फार घाईनं लिहून बाजारात आणला असंही माझं मत. त्यांची सर्जनक्षमता त्यात म्हणावी तितकी कसाला लागली नाही. त्यात ज्यूल व्हर्नच्या सायन्स फिक्शनची गंमत नाही. सगळी स्थानिक साहसं. त्यामुळे माझं खरं प्रेम ज्यूल व्हर्नच्या त्या कादंबऱ्यांवरच.

दादांना सिनेमे बघायला खूप आवडायचं. पण ते थेटरात! टीव्हीवर हिंदी सिनेमे सोडून बाकी सगळं काही बघायचे. कितीतरी वेळा आम्ही थेटरातच भेटलो आहोत. तेही चोरून सिनेमाला गेलेले आणि मीही चोरून सिनेमाला गेलेला!

मी इंजिनिअरिंग होस्टेलमध्ये राहत असतानाची गोष्ट. तेव्हा मी नि विद्युतनी लग्न जमवलं होतं. मी २० वर्षांचा नि ती १७ वर्षांची. तेव्हा दादा सकाळी माझ्या होस्टेलला आले. दिवसभर माझ्यासोबत घालवला. आम्ही सायकलवरून इकडेतिकडे भटकलो. इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. संध्याकाळी अगदी घरी निघता निघता मला दादांचा निसटता प्रश्न, "काय रे, तुझं नि विद्याचं सिरियस आहे ना?" मी काय बोलणार? "हो," म्हणालो. घरी जाऊन दादांनी जोरात सांगितलं, "चांगली डिटेल्ड चर्चा केली रवीशी. ही सीम्स टु बी क्वाइट सिरियस अबाउट धिस!"

आमचं लग्न होण्यापूर्वीच त्यांनी विद्युतला 'उडती छबकडी' हे पुस्तक अर्पण केलं होतं. नि त्या अर्पणपत्रिकेवर काय असेल? ती मला पहिल्यापासून 'ए रवी' अशीच हाक मारत असे. त्यावर लोकांच्यात चर्चा होई. पण दादांना ते आवडे. त्यांनी अर्पणपत्रिकेत लिहिलं होतं, 'चि. विद्याला, 'ए रवी'चा!'



'उडती छबकडी'ची अर्पणपत्रिका

***

***विद्युत भागवत**, भारांच्या थोरल्या सूनबाई. भारांची एक विनोदी कथा (दत्ता दडेकरचे मंगळसूत्र) सोडली, तर लग्नापूर्वी त्यांनी भारांचं काहीही वाचलेलं नव्हतं.*

माझे बाबा पोलिसात. त्यांच्या अनेकदा बदल्या व्हायच्या. त्यामुळे कधी म्युन्सिपाल्टीची शाळा, तर कधी सेवासदन. मुलांना वाचायला आमच्याकडे एक तर नाथमाधवांच्या कादंबऱ्या, 'चांदोबा', नाही तर मग 'श्यामची आई'. "मी तुमचं काहीसुद्धा वाचलेलं नाही" असं लग्नापूर्वी दादांना सांगितलं, तेव्हा त्यांना खूप राग आला होता! पण खरंच होतं ते. माझी पार्श्वभूमी रवीसारखी नाही. आमच्यासारख्या परीघावर राहणाऱ्या मराठी मुलांपर्यंत 'बालमित्र' कधी पोचलाच नाही. खेडेगावात तर नाहीच. शहरी, आणि आपण ज्याला 'ब्राह्मणी' म्हणतो अशा, घरांमध्ये दादांची पुस्तकं तीन-तीन पिढ्यांमध्ये वाचली गेली. पण कुठे? दादर, गिरगाव इथला शिक्षित मराठी मध्यमवर्ग, पुण्यातला मराठी मध्यमवर्ग, इथवरच.

माझ्या घरातलं वातावरण निराळं. "होऊन 'टाक' गं बीए. मग चपात्या करायला शीक. मग लग्न करून टाकू." असं आई म्हणायची. तेव्हा सर्वमान्य रीतच तशी होती. संस्कृत नाहीतर मराठी घेऊन बीए व्हायचं, आपली संस्कृती जपायची आणि इंग्लंड अमेरिकेत स्थायिक झालेल्या मुलाशी लग्न करायचं, असलं काहीतरी ध्येय. म्हणून मी यांच्या घरी गेले, तेव्हा मला मजाच वाटली. कुणीच कुणाला वळण म्हणून लावत नसे! लीलाताई आकाशवाणीत नोकरी करायच्या. रवी, रवीचा धाकटा भाऊ चंदर आणि त्या दोघांच्या मधली मी. आम्ही तिघे मिळून जो दंगा करायचो! पण दादा कधीच रागावले नाहीत. त्यांना पसारा चालायचा, वेडेपणा केलेला चालायचा. लीलाताई यायची वेळ झाली, की मात्र सगळं भरभर कॉटखाली ढकलून देऊन आवरल्यासारखं दाखवायची तारांबळ! खूप मजा यायची. चाळीतलं घर, घरात टीव्ही-फ्रीज-फोन नाही. पण घरात पुस्तकं भरपूर. आणि चुका करायचं भरपूर स्वातंत्र्य. अहोरात्र वाचत बसलं तरी कुण्णी काही म्हणत नसे. ते मला अतिशय मानवलं. मी एम. ए. ला नाव घातलं. मग मला इथे काहीच शिकायला मिळत नाही असं वाटून, मूल हवं, असं म्हणून मी गरोदर राहिले. मधे दोन वर्षांची गॅप घेतली. मग एम. ए. केल्यावर एका मुस्लीम कॉलेजात मी अर्धवेळ शिकवायला जात असे. पैसे मिळण्याच्या दृष्टीनं आनंदच होता. पण दादा कधीही कशाबद्दलही कुत्सितपणे एक वाक्यही बोलले नाहीत. दादा नाहीत, आणि लीलाताईही नाही. उलट मला दादा म्हणायचे, "तू काय काळजी करतेस? मीपण चिक्कार नोकऱ्या सोडल्या गं!" मी भाषाशास्त्र शिकायचं म्हटलं, तर मला लगेच त्याचे कोश आणून दिले. जुनी पुस्तकं जमवायची आहेत? चल जमवू. मग मी पुढे कायम असलेली नोकरी सोडून अनौपचारिक शिक्षणशास्त्रातल्या प्रयोगात शिरले. चिनूला - माझ्या लेकीला - काखोटीला मारून मी बरीच हिंडतही असे. पण गुणात्मक पद्धतीनं आमच्या जगण्यावर त्यांनी कधीही टीका केली नाही. नोकऱ्या बदला, प्रवासाला जा, मित्रांबरोबर गप्पाटप्पा करा, ते कधीही कशाच्याही मधे आले नाहीत. मुळात कुणाबद्दल जजमेंट देणंच त्यांच्या स्वभावात नव्हतं. जीवनातलं सत्य काय ते मलाच कळलेलं आहे, असा ढुढ्ढाचार्यी अहंकार नव्हता. रवी रहस्यकथा नाहीतर विज्ञानकथा वाचायचा. चंदरला खुनाखुनीच्या गोष्टींत मोठा रस. पण त्या प्रकारच्या वाचनाबद्दल त्यांचं काही म्हणणं नसे. आम्ही फार मोकळे वाढलो त्यांच्यासोबत, ते त्यामुळेच. कधी कशाची झाडाझडती देणं हे आम्हांला करावं लागलं नाही. स्त्रीमुक्ती, स्त्रीवाद, युवक क्रांती दल, दलित चळवळ... अशा अनेक चळवळींत मी पडले. त्यामुळे आमच्याबद्दल गॉसिप करणारी पत्रंही एकदा कुणीतरी लीलाताईंना लिहिली, तरी लीलाताईंनी नि दादांनीही, कधीही त्याकडे लक्ष दिलं नाही. आपले निर्णय आणि आपली जबाबदारी - आपली जगण्याची रीत आपण शोधायची, असं आम्ही आपोआप शिकत गेलो त्यातून. हे किती लोकांना मिळतं?

अर्थात म्हणून आमच्यात वाद होत नसत असं मात्र नाही. एकदा मी एका प्रसिद्ध अभ्यासक बाईंना घरी जेवायला बोलावलं होतं. दादांच्या कानावर घालायला विसरले होते. तर त्या पाहुण्या येऊन जेवून गेल्यावर कंबरेवर हात ठेवून मला म्हणाले, "घरात कोण येतंऽ, कोण जातंऽ... आम्हांला कुणी सांगत नाही." मी रडूबाई. लागले रडायला. मग दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्या टेबलावर चिठ्ठी, "सॉरी. मी अगदी टिपिकल सासऱ्यासारखा वागलो!" अशा माणसावर कसा राग धरणार!

एकदा बरं का, मी जेवायला बोलावलं होतं त्या दोघांना. तेव्हा प्रभात रोडला आमचं स्वतंत्र घर नुकतंच झालं होतं. हुरळल्यासारखंच झालं होतं. दुपारी दादा नि लीलाताई आले. मी तंद्रीत कुठेतरी बाहेर चालले होते. मी मारे विचारलं, "दादा, तुम्ही इकडे कुठे?" तर ते दोघंही जण मला इतके हसले! म्हणाले, "बघ, विसरलीस ना? 'जेवायला या' म्हणाली होतीस की नाही?" वर हा किस्सा हसून हसून सगळ्यांना सांगायचे.

भारा आणि लीलाताई, 'बालमित्र'मध्ये

कोरडी पुस्तकी विद्वत्ता पाजळणे, या एका गोष्टीचा त्यांना राग होता. चिनू लहान असताना ती त्यांच्याकडे असायची नि आम्ही आमच्या व्यापात, तेव्हा ते चिडायचे. तिच्यासाठी कविता केली होती त्यांनी, 'बाबा ऑफीस, आई कॉलेज, वैताग दोघे आणि त्यांचं नॉलेज'!

माझ्या स्त्रीवादी भूमिकेचा मात्र त्यांना राग येत असे. सारखं काय 'अरे'ला 'कारे' करायचं, असं काहीतरी त्यांना वाटत असे. पण मी खूप वाद घालायची. तेव्हाच 'सिमॉन दी बोव्हा' वाचली होती, त्यामुळे डोक्यात ती हवा होती. त्यांना माझ्या स्त्रीवादी भूमिकेनं अगदी वैताग यायचा! त्यांच्या डोक्यात बाईचं रूप हे आईसारखं, खाऊपिऊ घालणारं, प्रेमळ असं होतं; त्याला कारण होतं. त्यांची आई लवकर गेली. ते स्वातंत्र्यलढ्यात विसापूरच्या तुरुंगात असताना त्यांची आई गेली आणि तेव्हाच रवीही झाला. लीलाताईंना फार वाईट वाटत असे त्याचं. दिल्लीला चांगला थाटलेला संसारही सोडून त्यांना परत यावं लागलं. दादा तेव्हा दिल्लीला 'आकाशवाणी'मध्ये बातमीदार होते. गांधींच्या अटकेची बातमी तेव्हा प्रसारित करायची नव्हती, पण दादांनी ती केली. त्यामुळे आपल्याला अटक होणार याचा त्यांना अंदाज होता. त्यांनी ताबडतोब राजीनामा दिला आणि मग ते भूमिगत झाले. पुढच्या नोकरीच्या दृष्टीनं त्यांनी आवश्यक ती शिफारसपत्रं मिळवण्याचीही खबरदारी घेतली होती. तेव्हा रवी लीलाताईंच्या पोटात होता. लीलाताई लपतछपत बुरखा घेऊन आगगाडीनं परतल्या आणि दादा भूमिगत झाले. पुढे पकडले गेल्यावर ते एस. एम. जोशींच्या बरोबर विसापूरच्या तुरुंगात गेले. पुढे सत्तेच्या राजकारणात सामील होण्याचा मात्र कंटाळाच आला, असं दादा सांगत असत.

आपण टीन एजसाठीच लिहायचं असं त्यांनी मनाशी ठरवलं असावं. '**गेला कुठे श्रीरंग?**'[२] अशी त्यांनी अगदी शेवटी शेवटी लिहिलेली जी गोष्ट आहे, तीही एका टीन एजर मुलावरच लिहिलेली आहे. त्या मुलाला अगदी किशोर वयात काहीतरी भीषण आजार झाला आहे. तो मृत्यूच्या विवरात जातो, पण ते 'कृष्णविवर' नाही. आत प्रकाश आहे, अशी दादांची कल्पना होती. मृत्यू हा शेवट नाही, सुरुवात आहे असं त्यांना त्यात म्हणायचं असावं. पाणी, उंची, प्रकाश अशा वेगवेगळ्या प्रकारच्या अनुभूती त्यांनी शेवटच्या आजारात घेतल्या. त्याचं चित्रण त्या गोष्टीत आहे. त्या गोष्टीतून एका प्रकारे त्यांनी मृत्यूचं भय जिंकलं.

ते मनानं कायम टीन एजरच राहिले. माणूस वयानं वाढल्यावर जी लबाडी येते, जबाबदारीची जाणीव येते, किंवा मानमरातबाचा हव्यास येतो, त्याचा त्यांना स्पर्शही झालेला नव्हता. त्यामुळे लीलाताईंवर जबाबदारीचा खूप भार पडला हे आहेच. पण दादांना खरंच ॲडल्टहूड मनापासून आवडत नसे. मुलांच्यात रमावं. साहसं, स्वप्नं, रोमांचकारी पराक्रम, अशा गोष्टींबद्दल मुलांत मूल होऊन गप्पा माराव्यात, हेच त्यांना अखेरपर्यंत प्रिय होतं. जे जे अशक्य ते शक्य करून दाखवण्याची एक ताकद मुलांमध्ये असते, अशी त्यांची धारणा होती. ते त्याच प्रकारे जगले. त्यांच्या वडिलांनी - आप्पांनीही - एका विशिष्ट वयानंतर त्यात हस्तक्षेप केला नाही. सगळ्यांनी आपापले निर्णय घ्यावेत, अशी एक धारणा त्यांच्या घरात पहिल्यापासूनच आहे. मी आप्पांची नातसून. पण त्यांच्यासाठी कधी मी केक केला, तर त्या शिध्याचा हिशेब विचारून ते त्याहून थोडे जास्त पैसे मला देत. काही बोललं, तर स्पष्टपणे सांगत, "एक पदवीधर व्यक्ती माझ्यासाठी दोन तास राबली, तर तिला त्याचा मोबदला मिळायला नको? हवाच." हा दादांना मिळालेला तर्कशुद्ध वारसा. विज्ञानानं माणसाच्या जन्ममृत्यूचं कोडं नक्की उलगडणार, अशी खातरी असलेली दादांची आशावादी वैज्ञानिकता त्यातून घडत गेलेली असणार.

पण या बरोबरीनं एक गंमतीदार तिढाही होता. त्यांच्या लिखाणात नायिका अजिबात नाहीत. तसं टीन एजर मुलांचं विश्व असूनही भिन्नलिंगी आकर्षणाबद्दल संपूर्ण मौन. बायकांनी बायकांबद्दल लिहावं, पुरुषांनी पुरुषांबद्दल लिहावं, असं काहीतरी त्यांच्या मनात होतं. "दादा, तुमची 'फ्रॅक्चर्ड मॉडर्निटी' आहे!" असं म्हणायचीही मी त्यांना. ते हसून मान्य करत. हे असं त्यांच्याशी विनासंकोच बोलता यावं, अशी मोकळीक आणि पात्रता त्यांच्यामुळेच मिळाली, ही त्या नाण्याची दुसरी बाजू.

अगदी शेवटच्या टप्प्यात ते बरेच आजारी होते. लीलाताईंना जागरणं झेपत नसत. तेव्हा रात्रीची ड्यूटी करायला काही बायका येत. बुरूड, मातंग, मांग जातींच्या त्या कष्टकरी बायका. दादांना झोप येत नसे. ते त्यांच्याशी गप्पा मारत. त्यांचे अनुभव, नवऱ्याचा मार खाणं, खंबीरपणे मुलांची शिक्षणं करणं या सगळ्याबद्दलच्या त्या गप्पा असत. स्वत:च्या शरीराबद्दल आत्मविश्वास बाळगून कणखरपणे उभ्या असणाऱ्या स्त्रीचं रूप त्यांना त्या दिवसांत प्रकर्षानं जाणवलं असावं. "तू काय म्हणत होतीस, त्याचा अर्थ मला आता कळला!" असं त्यांनी अगदी मोकळेपणानं मला सांगितलं होतं.

***

१ 'दी बेगम्स मिलियन्स' (http://en.wikipedia.org/wiki/The_Begum%27s_Fortune)

२ 'गेला कुठे श्रीरंग?' ही कथा या अंकात पान क्र. १३१वर वाचता येईल.

चित्रस्रोतः भागवत कुटुंबीय

शब्दांकन: स्नेहल नागोरी, मेघना भुस्कुटे

***

कुटुंबातले भारा - भाग २

अमुक, मेघना भुस्कुटे

__चंदर भागवत__, भारांचे धाकटे चिरंजीव. फास्टर फेणेचा जन्म ज्यांच्या उपद्व्यापांमुळे झाला, तेच हे गृहस्थ. यांच्या क्रिकेटवेडामुळेच 'भाग्यशाली सिक्सर' हे भारांचं पुस्तक त्यांना अर्पण केलेलं आहे.

मी फास्टर फेणेसारखाच तुडतुडीत, बारकुडा आणि उपद्व्यापी मुलगा होतो, म्हणूनच बहुतेक मला फास्टर फेणे अतिशय आवडतो. दादांनी अनेक प्रकारचं लेखन केलेलं आहे. विज्ञानकथांची भाषांतरं, साहसकथा, 'जाईची नवलकहाणी'सारखी फॅन्टसी, विनोदी लेखन... पण या सगळ्या लेखनामध्ये फास्टर फेणेचं स्थान अढळ आहे. कारण एका प्रकारे दादा आणि फास्टर फेणे अभिन्नजीव होते. नाहीतर मला उपद्व्यापांची आवड कुठून लागायला? त्याला कारणीभूत दादाच. ते स्वत: हौसेनं ट्रेकिंग करत असत. अगदी अलीकडे-अलीकडेपर्यंत. मला ट्रेकिंगला नेणारे तेच. त्यांच्याबरोबर मी भटकायला जायला सुरुवात केली, ती केलीच.

त्यांच्याकडे गोष्टी सांगायची वेगळीच शैली होती. रंगवून रंगवून गोष्टी सांगायचे. गोष्टीत असं असेल, 'त्यानं त्याला मारलं.'; तर ते तेवढ्यावरच थांबायचे नाहीत. त्यांचे स्वत:चे खास साउन्ड इफेक्ट्स असायचे. "त्यानं त्याला मारलं... ढिश्क्यांव! मग तो ओरडला, "आई गं!" असं. हे सगळं साभिनय. हातवारे वगैरे करून. ते एका प्रकारे नाट्यरूपांतरच असायचं.

नातू वरुणला गोष्ट सांगताना भारा

मी त्यांना नोकरी करताना कधीच पाहिलेलं नाही. आमच्याकडे आई नोकरी करायची नि दादा लिहायचे. त्यांचा दिनक्रम ठरलेला असे. सकाळी उठून, आंघोळ करून, दत्ताच्या तसबिरीला हार घालणे. पूजाअर्चा काही नाही. तसं धार्मिक वगैरे आमच्यापैकी कुणीच नाही. पण ते त्यांचं एक कर्मकांड असल्यासारखं होतं. ते झालं, की मग लिहायला बसायचे. कधी दिवस-दिवस लिहीत बसायचे, कधी रात्रभरही बसायचे. रिकामे असे ते कधी नसतच. पण कुठलीही बंधनं त्यांनी स्वत:वर कधी घालून घेतली नाहीत. तसं आम्हांलाही कधी

'अमुक कर' वा 'तमुक कर' अशा आज्ञा सोडल्या नाहीत. त्यांना वाचनाची इतकी आवड, पण - अमुक एक वाच - असं कधी त्यांनी सांगितलं नाही. कॉमिक्स आणून द्यायचे. अंकल स्क्रूज, मिकी माउस यांची कॉमिक्स तेव्हा चिकार मिळायची. ती मी आधी वाचायला लागलो. त्यांतली डिज्नीच्या कल्पनाशक्तीची झेप त्यांना अतिशय आवडत असे. त्यासाठी लायब्रऱ्या धुंडाळायचे. रस्त्यावरच्या रद्दीवाल्यांकडे दोन-दोन तास पुस्तकांत रमलेले असायचे. कधी दुकानात जाऊन महागडी पुस्तकं आणायचे नाहीत. पण रद्दीवाल्यांकडच्या पुस्तकांत रस मोठा. एकदा तर असेच भाजी आणायला म्हणून गेले. दोन तासांनी आले, नि मागून एक माणूस. डोक्यावर एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाचे २४ हेऽ एवढाले खंड. आई म्हणाली, "आता हे ठेवायचं कुठे?!" ते घरही अगदी लहान होतं. जेमतेम अडीच-तीनशे स्क्वेअर फुटांचं घर. त्या घरात जिकडे तिकडे पुस्तकंच पुस्तकं असायची. आमच्यासाठी ते तेव्हा चिकार कॉमिक्स आणत असत.

अमर चित्रकथा'साठी दादांनी खूप कॉमिक्स स्वत:ही केली आहेत. चित्रं दादांची नसत. मजकूर - संवाद दादांचे असत. अनंत पै दादांचे चांगले मित्र. ते दादांना वडिलांच्या ठिकाणीच मानत असत. 'अमर चित्रकथे'चे मीरचंदानीही दादांचे स्नेही. त्यांच्यासाठी दादांनी पुष्कळ काम केलं. मुद्दामहून 'आता बालसाहित्य लिहिलं गेलं पाहिजे, म्हणून मी बालसाहित्य लिहितो' अशी त्यांची भूमिका नव्हती. पण पिंडच मुळी तो.

फाफेच्या एका चित्रकथेतला काही भाग

'बालमित्र' हे मासिक सुरू केलं, तेही चक्क पदरचे पैसे घालून. ते ५-६ वर्षं चालवलं. तेव्हा आम्ही सोमण बिल्डिंगमध्ये राहत असू. आजूबाजूची मुलंही त्या कामात मदत करत असत. पॅकिंगपासून, गठ्ठ्यांवर पत्ते लिहिण्यापर्यंत आणि अंकाचे गठ्ठे पोस्ट करण्यापर्यंत सगळ्या कामांत मुलं सामील व्हायची. पण त्या अंकाची म्हणावी तितकी विक्री झाली नाही. तितकं मार्केटिंगही करता येत नसे. पण तोटा सोसूनही दादांनी

आणि आईनी ते चालवलं. आईचे दागिने विकले. घरातली भांडीकुंडीही विकून त्यांनी 'बालमित्र' चालवायचा प्रयत्न केला. पण शेवटी कुठेतरी थांबणं भाग होतं. पैशाचं सोंग कुठून आणणार? आता आपल्याला हे जमत नाही, असं पैशाकडून नक्की झालं, तेव्हा 'बालमित्र' बंद करावं लागलं.

त्यांच्यापूर्वीचे श्री. बा. रानडे, ना. धों. ताम्हनकर हे त्यांचे आवडते बालसाहित्यकार. वाईरकरांची चित्रंही लाडकी. ते आमच्या घरचेच असल्यासारखे झाले होते. त्यातून फाफे आणि वाईरकरांच्या फाफेचं चित्र यांचं मेतकूट जमलं असावं. त्यांनी रेखाटलेला फास्टर फेणे अगदी सही सही उतरलेला आहे, तो त्यामुळेच. दादांना नेमकं काय अपेक्षित आहे ते वाईरकरांना बरोब्बर कळत असे.

अलीकडचा हॅरी पॉटर मात्र त्यांना आवडला नव्हता. त्यांच्या कुठल्याही गोष्टीतली साहसं मुलं सहज करू शकतील अशीच असत. वास्तवाच्या जवळचं, रोमांचक साहस त्यांना आवडे. एकदा जादू आणली की आव्हान संपलं, असं म्हणत.

त्यांना क्रिकेट मात्र प्रचंड आवडे. मधे एकदा आगरकरनं कुठल्याशा सामन्यात एकावर एक चिकार सिक्सर्स मारल्या होत्या, तर खूश होऊन त्यांनी आगरकरला स्वत: होऊन पत्र लिहिलं होतं! अगदी लहान मुलासारखं समरसून क्रिकेट बघायचे वरुणबरोबर. वरुण आणि चिनूच्यात - चिनू त्याची चुलत बहीण - १७ वर्षांचं अंतर आहे. चिनूनंतर १७ वर्षांनी आमच्या घरात वरुण आला. त्यालाही दादांनी खूप गोष्टी सांगितल्या. त्याच्याबरोबर क्रिकेट बघायचे. त्याच्या मित्रांशी गप्पा मारायचे. त्यांना गोष्टी सांगायचे. वरुणला बुद्धिबळ खेळायलाही त्यांनी शिकवलं. पण गंमत म्हणजे, एकदा वरुणनं त्यांना हरवलं होतं, तेव्हा केवढे चिडले होते!

दादांना स्वैपाक वगैरे करता येत नसे. पण प्रयोग करून बघायची हौस मात्र होती. "फक्त कांद्याबटाट्याचीच भजी काय म्हणून? आपण आंब्याची भजी करून बघू." असं म्हणून त्यांनी एकदा आंब्याची भजी करायचा प्रयत्न केला होता. त्या आंब्याचं जे काही झालं, ते झालं! पण हे आई घरात नसताना! एरवी आई घरात असेल, तेव्हा जेमतेम चहा करत. मात्र कितीही वेळा चहा देऊ केला, तरी त्यांना मनापासून आवडे. घरी आलेल्या कोणत्याही माणसाला, मग तो कुरियरवाला असेल, गॅस सिलिंडर घेऊन आलेला माणूस असेल, ते चहा विचारत. त्या प्रकारे आपण क्लास कॉन्शस न राहता माणसांशी जोडून घेऊ शकतो, असं काहीसं त्यांना वाटे.

त्यांना स्वातंत्र्यसैनिक म्हणून पेन्शन मिळत असे. पण सुरुवातीला तेही घ्यायला ते तयार नव्हते. स्वच्छ म्हणाले, "मी जे केलं ते मी माझ्या मर्जीनं माझ्या देशासाठी केलं. हे लोक कोण मला त्याबद्दल पेन्शन देणारे? मला गरज नाही." पूर्णविराम. आम्ही सगळ्यांनी त्यांना सांगून पाहिलं. तुम्ही नाही घेतलंत, म्हणून ते काही सरकारदरबारी जमा होणार नाही. कुणीतरी पुढे होऊन घेईलच. तुम्ही काही मागायला ते गेला नव्हतात. आता सरकारातून स्वत:हून विचारणा झालीय. मग मानधन म्हणून ते घ्यायला हरकत काय आहे? नाना प्रकारे सांगितलं, तेव्हा कुठे त्यांनी माघार घेतली.

त्यांची विनोदबुद्धी विलक्षण होती. अगदी शेवटपर्यंत. त्यांचं मोतीबिंदूचं ऑपरेशन झाल्यावर त्यांना बाहेर आणलं तेव्हाची गोष्ट. त्यांचे केस तेव्हा पुरते पिकले होते. आईनस्टाईनसारखे होते त्यांचे केस. ते पांढरे केस तेवढे बघून एक वॉर्डबॉय त्यांना म्हणाला, "आता शांत झोपा बरं का आजीबाई. काळजी करू नका." तर त्याही अवस्थेत दादा तत्काळ म्हणाले, "अहो डॉक्टर, तुम्ही माझं नक्की कसलं ऑपरेशन केलंत?!"

***

***रेवती भागवत**, भारांच्या धाकट्या सूनबाई. त्या मात्र लहानपणापासूनच भारांच्या पुस्तकांच्या फॅन होत्या.*

रेवती, भारा, लीलाताई आणि नातवंडे

माझ्यात नि दादांच्यात वयाचं अंतर खूप होतं. पण त्याचं दडपण तर येत नसेच, पण ते आपले सासरे आहेत असंही मला वाटत नसे. कारण त्यांचं प्रेमळ वागणं. वरुण होईपर्यंत मीच दादांच्या विठ्ठलवाडीच्या घरी अनेक वेळा जात असे. चंदर असतानाही आणि तो नसतानाही. मी माझ्या मित्रमैत्रिणींना घेऊन जात असे तिकडे. फार आवडायचं मला त्यांचं घर आणि तिथलं वातावरण.

दादांशी ओळख लग्नाच्या आधीचीच. ते माझे हीरो होते. मी खूप वाचत असे आणि स्पर्धांबिर्धांमध्येही भाग घेत असे. तर अशाच एका वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला होता मी. नि परीक्षक कोण असतील? भा. रा. भागवत! मला जो काही आनंद झालेला होता, की त्या आनंदात मी माझं भाषण विसरले! पण दादांनी नंतर मला थांबवून विचारलं, "तुला पुन्हा संधी हवी आहे का? मगाशी काहीतरी गडबड झाली. आता पुन्हा कर भाषण." मग मी पुन्हा भाषण केलं नि त्यांनी मला उत्तेजनार्थ बक्षीस दिलं. मला इतकं कौतुक वाटलं होतं त्यांचं! भाषण विसरूनही मला बक्षीस! माझा दादांशी आलेला संपर्क इतकाच. पण पुढे चंदरशी लग्नाचं नक्की झाल्यावर मी चंदरला एकदा म्हटलं होतं, "तुला हो म्हणण्याचं कारण भा. रा. भागवत हेच आहे बरं का! उगाच हुरळून जाऊ नकोस! तू त्यांचा मुलगा नसतास तर मी अजून दहा वेळा विचार केला असता."

किती लाड करायचे ते, बाप रे! मी जाणार असले, की मुद्दामहून सायकलवरून जाऊन माझ्या आवडीचा काहीतरी खाऊ आणून ठेवायचे. बेकरी प्रॉडक्ट्स खूप मनापासून आवडायची त्यांना. दादांनाच नाही. या तिघाही जणांना. रवीदादा, चंदर आणि दादा, तिघांनाही. जे काही नवं बेकरीत येईल, ते प्रत्येक नवीन प्रॉडक्ट ते आणायचे. नानकटाई, खारी, बिस्किटं... घरात खाऊ कायम भरलेला.

त्यांच्याइतका साधा, ज्याला खऱ्या अर्थानं अजातशत्रू म्हणता येईल, असा दुसरा माणूस मी पाहिलेला नाही. त्यांच्या लोकप्रियतेची त्यांना गंधवार्ताही नसे; गर्व तर सोडाच. आपली सर्जनक्षमता काहीतरी विशेष आहे असं मिरवणं त्यांच्यात नावालाही नव्हतं. एकदा इकडे राहायला आले होते. त्या वेळी त्यांना तो रेल्वेचा पहिल्या वर्गाचा पास मिळत असे. त्याचं त्यांना अतिशय अप्रूप होतं. सरकारनं आपल्यासाठी किती केलं आहे, असं काहीतरी त्यांना वाटत असे! तर तेव्हा इकडून परतीचं रिजर्वेशन करायला जायचं होतं. त्यांचा हट्ट असा की ते इथून - माटुंगा रोडहून दादरला जाणार. तिथून गाडी बदलून व्हीटीला जाणार आणि मग तिकीट काढणार. तेव्हा त्यांचं वय किती असेल? पंच्याऐंशी वगैरे सहज. तरी आम्ही एजन्टला वगैरे तिकीट काढायला सांगितलेलं त्यांना अजिबात आवडायचं नाही. दुसरा छंद चालण्याचा. भरपूर चालायचे. इकडे आले की कायम हरिनिवासपासून राजा प्रकाशनपर्यंत, तिथून रानडे रस्ता, सेनाभवन... चालत. सगळीकडे चालत. एकदा सेनाभवनापाशी त्यांना एका ॲम्बेसेडर गाडीनं धक्का दिला. दोन्ही हात मोडले. त्या माणसानं दादांना उचलून गाडीत घातलं नि घराखाली आणून सोडलं. वर सोडायला काही तो आला नाही. "त्यानं वर तरी आणून सोडायला नको होतं का?" असं आम्ही विचारतो आहोत. पण दादांना काही त्या माणसाचा राग आला नाही. 'खालपर्यंत सोडून गेला' याचंच कौतुक.

किती मनापासून, दिलखुलास, लहान मुलासारखं निर्व्याज हसत असत! पुढे दातांचं ऑपरेशन झाल्यावर त्यांचे सगळे दात काढावे लागले होते. पण त्यांना त्याची लाजबीज वाटत नसे. मजेत असायचे. कवळी नीट बसायची नाही. खालची कवळी बसे. पण वरची कवळी बसत नसे. मग म्हणायचे, "खालची कवळी आहे, पण वरची 'टवळी' आहे!" विनोदबुद्धी शेवटपर्यंत जागी होती. पण एक मात्र होतं. रोजच्या व्यवहारात त्यांना कुणी मदत केलेली आवडायची नाही. अगदी रस्ता ओलांडतानासुद्धा नाही! कधीही हात धरू द्यायचे नाहीत. मग मी म्हणायची, "दादा, तुम्हांला नाही, मला भीती वाटते म्हणून मी तुमचा हात धरते. प्लीज मला धरू द्या." तेव्हा कुठे त्यांना ते पटायचं. नाहीतर त्यांना ते अगदी अपमानास्पद वाटत असे.

ते लीलाताईंच्या इतके बोलघेवडे नव्हते, पण त्यांना माणसं अतिशय आवडत असत. त्यांनी आनंदनगरमधे मुलांसाठी पेटी ग्रंथालय सुरू केलं होतं. भरपूर पुस्तकं. आजूबाजूची मुलंच मिळून ती लायब्ररी चालवत असत. मागे एक लहान मैदान होतं. दोघांनी - लीलाताई नि दादा - भांडून-आटापिटा करून ती जागा मुलांसाठी मिळवली होती. त्या घराचं नावही 'बालमित्र' असं होतं. तिथे त्यांनी मुलांसाठी बरीच शिबिरं वगैरे घेतली. त्यांत लीलाताईंचा सहभाग जास्त असायचा. त्या आउटगोइंग होत्या स्वभावानं. नंतर वयोपरत्वे दादा दमत. त्यांना कलकलाटाचा त्रास होई. पण लिहिणं मात्र शेवटपर्यंत चालू होतं. ते गेल्यानंतर त्यांनी करून ठेवलेली गोष्टींची अनेक लहानमोठी टिपणं सापडत होती. एक पूर्ण कादंबरी लिहून ठेवलेली सापडली. त्यांनी करून ठेवलेलं अपुरं-पूर्ण लेखन नीटपणे आवरण्याचं कामच आम्हांला तीनेक वर्षं पुरलं.

स्ट्रक्चर्ड, प्लान्ड या शब्दांचा नि दादांचा दुरूनही संबंध नव्हता. खऱ्या अर्थानं मोकळंढाकळं, स्वत:च्या मनासारखं आयुष्य ते जगले. मुलांसाठी तरतुदी करणं, त्यासाठी तत्त्वांशी तडजोड करणं, चिंता करणं, टेन्शन घेणं.. या सगळ्या मटिरिअलिस्टिक गोष्टींपासून ते फार दूर असायचे. त्यामुळे ती जबाबदारी लीलाताईंवर पडली, हा त्यातला तोटा. पण त्या दोघांमधे मात्र त्यावरून कोणताही वाद झाल्याचं मी कधीही पाहिलेलं नाही. लीलाताईंबद्दलची आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट आहे ही. किती नाही म्हटलं, तरी मूळचा स्वभाव म्हणा, घेतल्या - न घेतलेल्या जबाबदाऱ्या नि भूमिका म्हणा, दादा आमच्या कुटुंबात लीलाताईंपेक्षा जास्त लोकप्रिय होते. लीलाताई काही स्वभावानं वाईट होत्या अशातला भाग नाही. पण दादा जास्त पॉप्युलर होते खरे. पण त्या कधीही तसं बोलून दाखवत नसत. त्याची त्यांना खंतबिंत तर बिलकूलच नसे. त्या काळातल्या

जोडप्यांमध्ये इतकं आधुनिक असलेलं हेच एक जोडपं मी बघितलं. चंदरला म्हणू दे असं, की त्याला आईचं नोकरी करणं नि वडलांचं नोकरी न करता लेखन करणं - यांत अजिबात वेगळं काही जाणवलेलं नाही. पण त्या काळात ते विलक्षण आधुनिक असंच होतं.

लीलाताई आणि भारा

त्यांच्या आधुनिकतेचा दुसरा पैलू म्हणजे रक्ताच्या नात्यापेक्षाही आपण दिलेल्या शब्दाला किंमत देणं. एक साधं उदाहरण. चंदरचा एक चिनी मित्र आहे - चँग. तो दादांच्या मुंबईच्या जागेत राहत होता. तेव्हाच चंदरची चुलत बहीण चिंगी फ्रान्सहून आली होती, तिलाही राहायला जागा हवी होती. बरं, त्या दोघांचीही चांगली मैत्री होती. पण त्यांनी एकत्र राहणं काही दादांना पटण्यासारखं नव्हतं! मग आता बाहेर कोण राहणार? सख्खं चुलत नातं; परत चिंगी पडली मुलगी. पण दादांची कमाल म्हणजे, त्यांनी चँगला बाहेर जाऊ दिलं नाही. एकदा एखाद्या माणसाला एक गोष्ट कबूल केली की केली. मग रक्ताची नाती, हितसंबंध, स्वार्थ जपायसाठी शब्द फिरवणं वगैरे त्यांच्या स्वभावातच नव्हतं. चिंगीला इतकं सुंदर पत्र लिहिलं त्यांनी, की तिच्या मनातही याबद्दल काही कटुता आली नाही. हीदेखील एक प्रकारची आधुनिकताच म्हणायला हवी.

***

शब्दांकन: मेघना भुस्कुटे.
चित्रस्रोतः भागवत कुटुंबीय.

***

बोक्याचे बाबा आणि रॉबिन हुड

- दिलीप प्रभावळकर

तुम्हांला आश्चर्य वाटेल- नि मला सांगायलाही बरं नाही वाटत! - पण मी फास्टर फेणे वाचलाच नाहीय. फास्टर फेणे आला, तोपर्यंत माझं लहान मुलांची पुस्तकं वाचायचं वय उलटलं होतं. मला भागवत ठाऊक आहेत ते 'रॉबिन हुड'वाले, ज्यूल व्हर्न आणि एच्. जी. वेल्सच्या पुस्तकांची भाषांतरं करणारे. त्यांची मात्र मी असंख्य पारायणं केली आहेत.



आमच्या लहानपणी मराठी माध्यमाच्या शाळेत वाचनाचं महत्त्व फार असे. तेव्हा मी भागवतांचा 'रॉबिन हुड' वाचला. ते पुस्तक मला स्पष्ट आठवतं. त्यातल्या चित्रांसकट आठवतं. मला वाटतं, त्यात वाईरकरांची चित्रं होती. अजूनही घरात ते पुस्तक असेल, उत्खनन करून पाहिलं पाहिजे. त्या पुस्तकाचा माझ्यावर प्रचंड प्रभाव आहे. मी ते जगलो आहे, असं म्हणायला हरकत नाही. मुंबईतल्या हाउसिंग कॉलनीत मी वाढलो. तिथे आम्ही 'रॉबिन हुड'मधले प्रसंगच्या प्रसंग 'खेळत' असू. तिरंदाजीची स्पर्धा, त्यांच्यातली चुरस... त्यातला धाकला जॉन, टक, मच, लट्ठंभारती, विली... ही पात्रं अगदी जवळची-ओळखीची वाटत. ते भाषांतर आहे, हे कळल्यावर खरंच वाटलं नव्हतं - इतकं त्याचं भागवतांनी सहज रूपांतर केलं आहे. 'Little John' हे त्या पात्राचं नाव. त्याचं 'धाकला जॉन' हे किती अस्सल मराठी रूपांतर आहे!

तसं मी बरंच वाचत असे. साने गुरुजी, ना. धों. ताम्हनकर, श्री. शं. खानविलकर आणि भा. रा. भागवत. साने गुरुजींचं साहित्य, ताम्हनकरांचा गोट्या, चिंगी आणि खानविलकरांचा चंदू, गाडगीळांनी केलेलं टॉम सॉयरचं भाषांतर, भागवतांचा 'रॉबिन हुड', ज्यूल व्हर्नचं त्यांनी भाषांतर केलेलं 'चंद्रावर स्वारी' नि 'पाताळलोकची अद्भुत यात्रा', 'झपाटलेला प्रवासी', एच. जी. वेल्सचं 'अदृश्य माणूस'... या पुस्तकांची माझ्यावर छाप आहे.

भागवतांबद्दल कृतज्ञता अशासाठी, की त्यांनी किती मुबलक लिहिलं आहे! आणि भाषेचा दर्जा कुठेही न सोडता. इतकं सकस आणि इतकं मुबलक लिहिणं - मला वाटतं, ते अगदी शेवटपर्यंत लिहीत होते - फार अवघड असतं. मला त्यांची तुलना पी. जी. वुडहाउसशी करावीशी वाटते. पी. जी. वुडहाउसनंही असंच मुबलक लिहिलं आणि तरी शेवटपर्यंत त्यातला विनोद तसाच्या तसा ताजातवाना होता. भागवतांनीही तसंच ताजं, तितकंच मुबलक लिहिलं. त्यांच्या लेखनातला ह्यूमरही तसाच मजेशीर आणि चिरतरुण आहे. दुसरं म्हणजे त्यांची वाचकांच्या कल्पनाशक्तीला, कुतूहलाला आवाहन करण्याची क्षमता. ती क्षमता फार कमी जणांच्यात दिसते. विशेष करून बालसाहित्य लिहिणाऱ्या लेखकाचा हा मोठाच गुण. त्यांच्या गोष्टी मुलांना विचार करायला, दुसऱ्या जगाचं कल्पनाचित्र रंगवायला प्रवृत्त करतात.

बालसाहित्यातून त्यांनी तीन-चार पिढ्यांची वाचनाची अभिरुची घडवली. त्यांच्यामुळेच मला - आणि माझ्यासारख्या अनेकांना - वाचनाची गोडी लागली, असं म्हणायला पाहिजे.

पुढे मी जो बोक्या सातबंडे लिहिला, त्याचं मूळ कुठेतरी या वाचनात आहे, असं मला वाटतं. भागवतांचे सगळे नायक कुतूहल असलेले असतात, कुठल्यातरी साहसावर जातात, त्यांच्यात जाणून घेण्याचं कुतूहल असतं. त्याचा संस्कार माझ्यावर कुठेतरी असणार. तसं बोक्या आणि फास्टर फेणे यांच्यात काही साम्य नाही. प्रभाव असण्याची शक्यता नाही, कारण मी म्हणालो तसं, मी मुळात 'फास्टर फेणे' वाचलेलाच नाही. फास्टर फेणे मला वाटतं, १३-१४ वर्षांचा आहे. तर बोक्या ८-९ वर्षांचा मुलगा आहे. शिवाय फाफे होस्टेल लाइफमध्ये घडतो; बोक्या मुंबईतल्या हाउसिंग सोसायटीच्या संस्कृतीतला आहे. पण मला मुळात तो लिहावासा वाटला, त्याचं मूळ भागवतांच्या पुस्तकांमध्ये कुठेतरी असणार.

माधव कुलकर्णींच्या 'बाल दरबार'साठी मी बोक्याच्या श्रुतिका लिहिल्या. मला वाटलं नव्हतं, तो इतका यशस्वी होईल असं. त्यांनी मला तसं सुचवल्यावर मी त्यांना शिष्टपणे म्हटलं, "टीव्हीच्या जमान्यात कुठली आलीयेत मुलं श्रुतिका ऐकायला?" माझा अंदाज मी कुलकर्णींना बोलून दाखवला नि मोकळा झालो. पण त्यांनी फार आग्रह केला, म्हणून त्या लिहिल्या. त्या इतक्या चालल्या! नि गंमत म्हणजे, टीव्ही न पोचलेल्या भागातल्या मुलांपर्यंत रेडिओवरच्या श्रुतिका पोचतील नि त्यांना आवडतील, असा माझा अंदाज होता. पण तसं नाही झालं. शहरी भागांत - जिथे टीव्ही आहे, तिथेच - त्या खूप ऐकल्या गेल्या. हीऽ पत्रं आली. गठ्ठेच्या गठ्ठे. मग 'राजहंस'च्या माजगावकरांनी मला आग्रह केला, 'श्रुतिकांची पुस्तकं घेऊन कोण वाचणार हो? तुम्ही संवादप्रधान कथा लिहा. आपण प्रसिद्ध करू.' मग मी त्या कथा लिहिल्या नि त्या चालल्या. पण मजा म्हणजे, त्यावर आलेली मालिका मी पाहिलेली नाही. काही ना काही निमित्तं येत गेली नि ते राहिलं ते राहिलंच.

तसा फास्टर फेणे आणि रॉबिन हुडसुद्धा दृश्य माध्यमात बघायला मिळावा असं माझ्या डोक्यात कधी आलेलं नाही. रॉबिनवर आधीच इंग्रजी सिनेमे बनलेले होते, म्हणूनही असेल. कुणास ठाऊक. पण माझ्या डोक्यात ती पुस्तकातलीच पात्रं आहेत.

आता विचार करताना वाटतं, बोक्या सातबंडेचा फास्टर फेणेशी तसा थेट संबंध नाही, पण मुळात तो माझ्या डोक्यातून जन्माला आला त्याच्या मुळाशी भागवतच असणार!

***

शब्दांकन: मेघना भुस्कुटे.
चित्रे: जालावरून साभार.

***

भागवत आजोबांची पगडी घातलेला इंग्लिश फाफे

- मेघना भुस्कुटे, स्नेहल नागोरी

तेजस मोडक *आणि* ***प्रसन्न धांदरफळे.*** *बन्याच्या इंग्रजीतल्या आणि 'अपडेटेड् ' अवताराचे जनक.*

त्या दोघांच्या व्यावसायिक कामांचा तपशील पाहिलात, तर चित्रपटांसाठी गीतलेखन करण्यापासून ते ग्राफिक नॉवेलपर्यंत आणि कॅरेक्टर डिजायनिंगपासून कलाविभागापर्यंत अनेक 'सुरस आणि झगमगीत ' क्षेत्रांतली कामगिरी दिसेल. पण ते आहेत मात्र फास्टर फेणेचे - आणि पर्यायानं भा. रा. भागवतांचे - हाडाचे चाहते. 'प्रतापगडावर फास्टर फेणे ' या कादंबरीचा तेजसनं इंग्रजीत कालानुवाद केला आहे आणि त्यासाठी प्रसन्ननं चित्रं रेखाटली आहेत. त्यांच्याशी त्याबद्दल गप्पा मारायला म्हणून आम्ही बसलो आणि फाफेपासून सुरुवात करून 'गेम ऑफ थ्रोन्स ', 'शरलॉक ', 'हार्डी बॉईज ', फाफेवर लिहिता येतीलश्या फॅनफिक्स, हॅरी पॉटर, भागवतांच्या व्यक्तिरेखा आणि सिनेमा यांच्यातल्या रंगीन शक्यता... अशा गप्पा वाहत गेल्या. त्यांतला, तूर्तास आपल्याला ज्या भाषांतराबद्दल बोलायचं आहे, त्याबद्दलचा हा तुकडा -

***

फास्टर फेणे इंग्रजीत का न्यावासा वाटला?

तेजस: 'फीबस' (Phoebus media) नावाची कंपनी आहे. त्यात आम्ही काम करत होतो. प्रसन्न आणि मी दोघेही. 'फीबस'ला भारतीय भाषांमधल्या बालसाहित्यामध्ये रस आहे. फक्त मराठीच नाही, इतरही. तर त्यांनी फास्टर फेणेवर केलेल्या दृश्य माध्यमातल्या कामाचे कॉपीराइट्स विकत घेतले. त्यासाठी त्यांना फास्टर फेणेचं इंग्रजीत भाषांतर करणारं कुणीतरी हवं होतं. त्यांनी मला विचारलं. फास्टर फेणेबद्दल प्रेम तर काय, होतंच ना! तू फास्टर फेणेची पुस्तकं बघितलीस, तर त्या सगळ्या पुस्तकांत फाफेच्या साहसांच्या लहान-लहान गोष्टी आहेत. पूर्ण लांबीच्या कादंबऱ्या अशा ४ आहेत फक्त. त्यातली 'गुलमर्गचे गूढ' -

प्रसन्न: 'गुलमर्गचे गूढ'! त्यावर तर आजही सिनेमा होऊ शकतो. अजूनही ती सिच्युएशन व्हॅलिड आहे की!

तेजस: होय, होय. करू आपण कधीतरी! तर ती आणि 'प्रतापगडावर फास्टर फेणे' या दोन कादंबऱ्या माझ्या फार आवडत्या. त्यात 'प्रतापगड'ला किल्ल्याची पार्श्वभूमीही आहे. अगदी थोड्या कालावधीत ती गोष्ट घडते. मस्त वेग आहे तिला. म्हणून ती निवडली.

यात प्रसन्नच्या चित्रांचा समावेश कसा झाला?

प्रसन्न: खरं तर त्यांना फास्टर फेणेवर ॲनिमेशन फिल्म करायची होती - अजूनही करायची आहे. त्या फिल्मसाठी मी फास्टर फेणेची स्केचेस् करत होतो. त्यामुळे माझा त्या प्रोजेक्टमध्ये सहज शिरकाव झाला!

राम वाईरकरांच्या चित्रांना हात घालताना भीती नाही वाटली?

प्रसन्न: *(हसतो.)* नाही. भीती नाही वाटली. कारण आपलेपणा होता. फाफेचं ते सुप्रसिद्ध स्केच इतकं ओळखीचं आहे... की भीती नाही वाटली.

नि भाषांतर करताना? स्वत: भारा निष्णात भाषांतरकार. त्यांच्याच पुस्तकाचं भाषांतर करायचं म्हणजे...

तेजस: नाही गं... भागवतांबद्दल तसं नाही वाटत. लहान मूल अगदी सहज आजोबांची पगडी खेळायला घेईल. त्या आजोबांनी ती पगडी घालून किती प्रचंड महत्त्वाचं, थोर काम केलंय, हे त्या मुलाला माहीत असेलही कदाचित. पण त्याला काही त्याचं दडपण यायचं नाही. त्याच्याकरता ती 'त्याच्या आजोबांची पगडी' असेल

फक्त. तसंच आहे ते. भागवतांच्या सगळ्या लिखाणाचाच तो गुण आहे. ते एकदम असे गळ्यात हात टाकून 'ऐक ना.. मी काय म्हणतो-' असं दोस्तासारखं काहीतरी सांगताहेत, असंच वाटतं. त्यांची भीती नाही वाटत!

प्रसन्न: एक्झॅक्टली! तसंच बन्याच्या चित्रांचं. ती चित्रं एस्टॅब्लिश झालेली आहेत. ज्यांनी फाफे वाचलेला नसतो, असे लोकही त्याचं चित्र बघून अचूक ओळखतात, 'हा तर फास्टर फेणे!', अशी त्या चित्रांची पुण्याई आहे. त्यामुळे वाईरकरांच्या चित्रांशी माझ्या चित्रांची तुलना वगैरे मी करणार नाही. कारण ती होऊच शकत नाही. ते गुरुस्थानी आहेत नि राहतील. पण मला फास्टर फेणेला माझ्या पद्धतीत चितारून बघायला मात्र खूपच आवडलं असतं. मग मी विचार करायला लागलो, आज-आत्ताचा बन्या कसा असेल? आता हे रेखाटनकाराच्या कामाशी परिचय नसलेल्या साध्या वाचकाला कदाचित कळणार नाही. पण अशा काही गोष्टी असतात, ज्या एकदा नक्की केल्या, की त्या त्या व्यक्तिरेखेचा एक ढाचा तयार होतो. मग तो वापरून सगळी टीम त्या कॅरेक्टरला सजवू शकते. कॅरेक्टर तेच राहतं, पण तिला तिच्या अश्या वेगवेगळ्या हालचाली, हावभाव देणं सोपं होतं.

त्यासाठी मी बन्याचे डिफायनिंग फीचर्स शोधायला लागलो. एक तर त्याचे ते केस. त्यांचा भांग वगैरे पडणं शक्यच नाही. त्या मुलाला त्याच्यासाठी वेळ कुठला आलाय! तो सारखा कुठेतरी पळत निघालेला असतो. त्यामुळे काही केस डोळ्यांवर आलेले आणि काही केस उभे. त्याचं ते धारदार नाक. हुशार आहे तो. ते दाखवायचं, तर नाक धारदार हवंच. 'तुडतुडीत आणि किडकिडीत तंगड्या' हे विशेषण तर भागवतांनी अनेकवार वापरलेलं आहे. त्यामुळे त्याच्या त्या तंगड्या. आणि लुकलुकते डोळे. 'भोकरासारखी नजर' असं भागवत म्हणतात. फास्टर फेणे आहे तो! त्याला आपल्या सगळ्यांच्या आधी तपशील टिपायचे असतात, नो वंडर, त्याचे डोळे असे भोकरासारखे आहेत!

हे सगळं हळूहळू तयार होत गेलं. मग त्याचा तो चौकड्यांचा शर्ट. तो तर बदलायचा नाही. कारण फाफे म्हणजे चौकड्यांचा शर्ट हे समीकरण ठरलेलं. बरं, पण इन शर्ट आणि हाफ पँट आत्ताचा मुलगा घालेल? नाही घालणार. बरं, त्यातून त्याची ती कायम कशाच्या तरी मागे पळत सुटायची घाई आणि वेगही नाही दिसणार. मग काय करायचं? मग त्याला एक टीशर्ट दिला. आणि त्यावर चढवला चौकड्यांचा शर्ट. म्हणजे इन करायचा प्रश्न नाही. ते दिसेलही मॉडर्न. आणि बन्या पळताना त्याचा शर्ट असा मस्त मागे उडेल, म्हणजे त्याचा वेगही दिसेल. ते ठरलं. मग त्याला कॅन्व्हासचे शूज दिले आणि थ्रीफोर्थ जीन्स दिल्या. मग बन्या 'सापडला' मला!

तशीच माली. ती 'प्रतापगडा'च्या गोष्टीत नाहीये. पण मी माली रेखाटली होती. कितीतरी गोष्टींमध्ये आहे ती. कितीतरी गोष्टींतली रहस्य तिच्यामुळे सुटलेली आहेत. स्मार्ट मुलगी आहे ती. बन्याला झापायला कमी करायची नाही! ती तर हवीच होती. तिच्या वेण्या ठेवल्या मी. पण त्या मॉडर्न केल्या. भागवतांची माली स्कर्ट घालायची. तिला मी डंगरीज दिल्या. मग ती बरोब्बर दिसायला लागली! तसंच सुभाषचं कॅरेक्टर करायचं होतं.

आधीच तो गुटगुटीत बाळ आहे. पण मी त्याला अजून थोऽडं बाळसं दिलं! त्याला गोलमटोल केलं. कारण त्याच्यातला नि बन्यामधला कॉन्ट्रास्ट ठळक दिसायला हवा होता. मस्त झाली होती या कॅरेक्टर्सची ॲनिमेशन फिल्म. काळा घोडा फेस्टिवलला पुस्तकाचं प्रकाशन झालं, तेव्हा ती दाखवली होती. तेव्हा मुलांचा आणि मोठ्यांचाही मस्त प्रतिसाद मिळाला होता.

पेंग्विननं केलं आहे ना भाषांतरित पुस्तकाचं प्रकाशन? कसा प्रतिसाद मिळाला त्याला?

तेजस: मस्त - मस्त प्रतिसाद मिळाला. शमीन पदम्सी म्हणून समीक्षिका आहेत. इंग्रजीतलं बालसाहित्य हा त्यांचा विषय. त्यांनी फार **कौतुक**[१] केलं पुस्तकाचं. इंटरनेटवर **इतरत्रही**[२] लिहून आलं इंग्रजीत. मराठी माध्यमांनी मात्र फार काही भाव नाही दिला! खरं म्हणजे पेंग्विननं केलंय प्रकाशन. असंच कुण्या साध्यासुध्या प्रकाशकानं नाही केलेलं. पण 'सकाळ'मध्ये एक छोटी सिंगल कॉलम बातमी काय ती आली! पण वाचकांचा प्रतिसाद मात्र मस्त मिळाला.

भाषांतरकार म्हणूनही भागवत थोर आहेत. तुला खरंच दडपण नाही आलं?

तेजस: नाही, तुला म्हटलं ना, भागवत म्हणजे एकदम दोस्तच आहेत. त्यांचं दडपण नाही येत. त्यांचा फोटो बघितलायस तू? तस्सेच लुकलुकते डोळे, मिश्किल हसू, अस्ताव्यस्त केस. ते स्वत:च बन्या आहेत. *(प्रसन्न खूश होऊन मान डोलावतो.)* त्यांची भीतीबिती नाही वाटली. आणि हे नुसतं भाषांतर नाही. हा फाफेचा कालानुवाद आहे. आजच्या काळात तीच गोष्ट घडली तर काय होईल, असं डोक्यात ठेवून केलेलं भाषांतर आहे. बीबीसीचं 'शरलॉक' पाहिलंयस का तू? त्यातला शरलॉक कसा एकविसाव्या शतकात अवतरलाय, तसं मला फाफेचं करायचं होतं. त्यामुळे ते अवघड. त्यात भाषांतर. ते कधीही ट्रिकीच असतं. शब्दाला अचूक प्रतिशब्द मिळतोच असं नाही. तसंच वाक्यरचना, वाक्प्रचार - हे सगळं एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेताना त्यातलं काहीतरी निसटून जातंच. याचं मला भान होतं. माझा आग्रह इतकाच होता, की 'हे भाषांतर आहे' असं वाचणाऱ्याला वाटता कामा नये. त्या आग्रहाला दाद मिळाली. 'आपण भाषांतर वाचतो आहोत, असं वाटतच नाही' असा प्रतिसाद मला अनेक जणांनी दिला.

तू मराठी माध्यमात शिकला आहेस का?

तेजस: अं, नाही. *(चेहऱ्यावर गंमतीदार अपराधी भाव!)* मी कॉन्वेंटमध्ये शिकलो. अगदी पारंपरिक पद्धतीचं कॉन्वेंट. ज्या शाळेत आपापसांत मराठीत बोलायलाही बंदी असते, असं कॉन्वेंट. पण माझा मराठीशी संबंध नव्हता असं मात्र नाही. मी इंग्रजी बालसाहित्यही भरपूर वाचलं आहे आणि भागवतांचा फास्टर फेणेही फार आवडीनं, मनापासून वाचला आहे.

काही संकल्पना असतात किंवा वातावरण असतं, ज्यांचं भाषांतर शक्य नसतं. भाषांतर होईलही कदाचित, पण त्यानं वाचकाच्या मनात तयार होणारे लागेबांधे? उदाहरणार्थ 'प्रतापगडावर...'मध्ये शिवाजी महाराजांचे उल्लेख आहेत. 'शिवाजी' म्हटलं की वाचणारा माणूस मराठी असेल, तर त्याच्या डोक्यात आपोआप एक आदर, आपलेपणा, भारावलेपणा येतोच. तो काही इंग्रजी वाचकाच्या डोक्यात येणार नाही. अशा अडचणींचं काय केलंस?

तेजस: अशा गोष्टींकरता मी चक्क पार्श्वभूमी तयार करणारा मजकूर लिहिला. तू इंग्रजी आणि मराठी दोन्ही पुस्तकं शेजारी ठेवून वाचली असशील तर तुझ्या लक्षात आलं असेल, मी तसे बदल खूप केले आहेत. नुसता फास्टर फेणेचा काळ बदलणं, इतकंच नाही केलेलं. काही तपशील बदलले. काही मजकूर घातला. मूळच्या गोष्टीत सुर्वे सरांच्या लक्षात येतं की अशी अशी गडबड झालीय. पण मला फास्टर फेणेचं हीरोपण एस्टॅब्लिश व्हायला हवं होतं. आपली गोष्ट वेगळी. 'बन्या...' असं म्हटलं की आपण लग्गेच गोष्टीत खेचलो जातो. आपल्याकरता बन्याचं कॅरेक्टर एस्टॅब्लिश झालेलं आहे. हा पोरगा भारी आहे, हा आता काहीतरी बघणार आणि कशाच्या तरी मागे धावणार, हे आपल्याला माहीत असतं. पण हे अमराठी वाचकाला कुठून कळेल? त्याच्याकरता मला बन्यानं लगेचच्या लगेच हीरो व्हायला हवं होतं. म्हणून मी तसा बदल केला. शेवटही मी थोडा वाढवला आहे.

याला कुणी हरकत नाही घेतली?

तेजस: एकतर कॉपीराइट्स घेतले होते, त्यामुळे तो प्रश्न नव्हता. शिवाय हे थेट, जसंच्या तसं भाषांतर नाही, हेही एक आहे. काही लोक असे होते, ज्यांनी म्हटलं की काळ तोच ठेवणार असाल, तर आणि तरच या प्रोजेक्टमध्ये काम करायला आवडेल. *(हा प्रोजेक्ट म्हणजे, 'फीबस'कडून येऊ घातलेली ॲनिमेशन सिरीज. काळा घोडा फेस्टिवलमध्ये ज्यातला थोडा भाग दाखवला गेला, ती. ती अजूनही अडकूनच आहे.)* त्यांना फाफेचा काळ बदलणं मान्य नव्हतं. त्यांना फाफे म्हणजे तोच सायकलवाला, तुडतुडीत मुलगा - ७० च्या दशकातला, असंच हवं होतं. ते बदलणं म्हणजे काहीतरी अब्रह्मण्यम् असं त्यांना वाटत होतं. पण मजा म्हणजे, खुद्द भागवतांच्या कुटुंबीयांकडून मला - आम्हांला फार छान प्रतिसाद मिळाला.

स्वत: लीलाताई - लीलावती भागवत - प्रकाशन समारंभाला तर आल्याच होत्या. त्यांनी खूप कौतुक केलं. शिवाय रवीन्द्र भागवत - भा. रा. भागवतांचे चिरंजीव - त्यांनाही हे रूपांतर फार आवडलं.

त्यांनी सांगितलेली एक आठवण फार मजेशीर आहे. भागवतांना त्यांच्या तरुणपणी म्हणे कुण्या ज्योतिषानं सांगितलं होतं, 'तुम्हांला प्रसिद्धी मिळेल, लोकांचं प्रेम मिळेल. पण तुमच्या हयातीत जितकं मिळेल, त्याहून जास्त प्रेम तुम्ही गेल्यानंतर मिळेल.' आता पेंग्विनसारख्या प्रकाशकांनी नव्या युगातला फास्टर फेणे इंग्रजी भाषेतून आणल्यामुळे तो महाराष्ट्राच्या बाहेर, अगदी परदेशातही गेला. ॲनिमेशन सिरीज आणि सिनेमा अशा दोन्ही गोष्टीही फीबसकडे प्रस्तावाधीन आहेत. या सगळ्यामुळे त्या भाकिताची आठवण होऊन त्यांना मजा वाटली.

कथेत अजून काही फेरफार करायच्या सूचना आल्या प्रकाशकांकडून?

प्रसन्न: अगं, मूळचा प्रस्ताव ॲनिमेशन फिल्मचा होता. तिथून सुरुवात झाली. तर त्या सिरीजसाठी फास्टर फेणेला काहीतरी सुपर पॉवर द्यावी असा कंपनीचा आग्रह होता! ॲनिमेशन करायचं तर असं काहीतरी हवंच म्हणे. नाहीतर तुम्ही सरळ शूट करून फिल्मच करा. त्यात जे दाखवता येणार नाही, ते दाखवायचं असेल तर ॲनिमेशन करायचं, असं एक म्हणणं असतं. पण आम्ही उडालोच. फास्टर फेणे आणि सुपर पॉवर? शक्यच नाही.

तेजस: हो ना! तो अगदी तुमच्या-आमच्यासारखा मुलगा आहे. तो काही थोरबिर नाही. तो स्मार्ट आहे. पण अभ्यासू वगैरे नाही. सुपरपॉवर असलेला तर अजिबात नाही. वाचकाला तो लग्गेच 'आपला' वाटतो, त्याच्यातच त्याचं अपील आहे. सुपरपॉवर देऊन कसं चालेल! सांगायला काय, लोक काहीही सांगतात. त्याला म्हणे 'एक सायकल द्या. आपल्याकडे त्या अमुक सायकलवाल्यांची स्पॉन्सरशिप आहे. तर आपण मग त्यांची सायकल त्याला देऊ.' आता बन्या झाला, तरी त्याच्या सायकलचा ब्रॅण्ड आधीच एस्टॅब्लिश्ड आहे. बरं, ब्रॅण्ड बदलला समजू आपण. पण शाळेच्या ट्रिपसोबत सायकल? तीही प्रतापगडावर! अरे, अशी कशी देऊ प्रतापगडावर सायकल? तिची गरज नको का?

हे अगदी जातिवंत लेखकाला सिनेमावाले 'दोन गाणी घाला, एक बागेतला सीन...' असं सांगतात, तसं वाटतंय!

तेजस: *(हसतो.)* हो, अगदी - अगदी तस्संच आहे हे!

तुला तुझ्या लहानपणीचे वाचक आणि हल्लीचे वाचक यांच्यात काही फरक जाणवतो?

तेजस: नाही गं. वाचणारे लोक अजूनही तसेच वाचतात. 'हल्ली लोक वाचत नाहीत' वगैरे रडगाण्यात काही अर्थ नाही. आता हॅरी पॉटर काय लहान पुस्तक आहे का? हे एवढाल्ले खंड आहेत. पण पोरं वाचतात की. प्रकाशनाच्या वेळी तर रात्री जागून, रांगा लावून ती पुस्तक त्यांनी हौसेनं खरेदी केली नि वाचली. मुलांना आवडणाऱ्या गोष्टी दिल्या, तर ती वाचतातच.

अजून काय भाषांतरित करायला आवडेल तुला इंग्रजीतून मराठीत?

तेजस: मला 'हार्डी बॉइज' खूप आवडतं. मला त्याचं भाषांतर करायला आवडेल. पण भाषांतराची प्रक्रिया खूप वेळखाऊ असते. त्याला पूर्ण अटेन्शन द्यावं लागतं. मी सध्या एका ग्राफिक नॉव्हेलवर काम करतो आहे. स्वतंत्र प्रोजेक्ट आहे तो.

प्रसन्नही आहे का त्यात?

प्रसन्न: नाही, तो त्याचा स्वतंत्र प्रोजेक्ट आहे. तो शिक्षणानंही रेखाटनकार आहे! भाषांतर, गाणी लिहिणं हे त्याचे छंद. त्याचं खरं काम रेखाटनाचं आहे.

या भाषांतरात नेमक्या कोणत्या प्रसंगांसाठी चित्रं काढावीत, हे तुम्ही कसं ठरवलंत?

प्रसन्न: एक तर अमुक एका पानानंतर एक चित्र यायला हवं, असं एक मुख्य तांत्रिक बंधन असतं, होतं. आणि दुसरं म्हणजे भागवतांची भाषा. काय बोलकी भाषा आहे त्यांची. याच पुस्तकात 'ती फट बोलली' असं एक वाक्य आहे. त्या भाषेच्या तर प्रेमात होतो मी. तेजस त्याचं भाषांतर कसं करेल अशी उत्सुकता होती. त्यानं ते मस्त केलंच आहे; पण त्या प्रसंगाभोवती चित्र असायलाच हवं, असं मला वाटत होतं. अंधारातला तो साधू मला काढायचाच होता.

मस्त झालं आहे ते चित्र. भविष्यात काय करायचे प्लॅन्स आहेत?

प्रसन्न: फास्टर फेणेवर तर इतकं काम करता येईल... 'गुलमर्गचे गूढ' मला फार आवडणारी गोष्ट आहे. नि अजूनही गुलमर्गमधलं वातावरण शांत कुठे आहे? ती गोष्ट वर्तमानात आणणं अगदी सोपं आहे. त्यांच्या छोट्या गोष्टीही मस्त आहेत. आम्हीच त्यांच्या छोट्या गोष्टींवर एक कॉमिक स्ट्रिपही केली होती. लहान मुलांचं पान असतं ना वर्तमानपत्रातलं, त्या एका पानावर एक पूर्ण गोष्ट. अशा ४-५ गोष्टी केल्या होत्या. तशा कितीतरी करायच्या आहेत. खरं तर ती ॲनिमेशन सिरीज बाहेर यायला हवी आहे. फार मस्त काम झालं आहे ते. ते लोकांपर्यंत पोचायला पाहिजे खरं तर.

तेजस: मला कुतूहल आहे ते असं, की फास्टर फेणे मोठा झाल्यावर काय करत असेल? साधारण तिशी-बत्तिशीतला फास्टर फेणे कसा असेल, त्याबद्दल मला जाम उत्सुकता आहे. त्याचे ट्रेट्स तर तसेच असतील. कुठलं तरी ॲडव्हेंचर खुणावत असेलच त्याला. मला त्याची गोष्ट लिहायला आवडेल खूप. बघू...

गप्पा झाल्यापासून अंक निघेपर्यंतच्या काळात या फॅनफिकसाठी तेजसला बराच मस्का लावला. त्याच्या भावी ग्राफिक नॉवेलच्या कामात बुडालेला असल्यामुळे त्यानं अजिबात आग्रहाला दाद दिली नाही, ते सोडा. पण त्याच्या डोक्यात तरुण फाफेनं मूळ धरावं, इतका आग्रह करण्याची खबरदारी मी माझ्याकडून घेतलीय. कुणास ठाऊक, त्याची पुढची कादंबरी तरुण फाफेच्या साहसावर बेतलेली असायची नि त्यात प्रसन्नची रेखाटनं दिसायची... आशा सोडू नये!

***

१. कौतुक (http://youngindiabooks.com/bookrev/faster-fenay-pratapgad)
२. इतरत्रही (http://harimohanparuvu.blogspot.in/2013/04/faster-fenay-at-fort-pratapgad-br.html)

***

शब्दांकन : मेघना भुस्कुटे.
सर्व चित्रे: प्रसन्न धांदरफळे; संस्करण : अमुक.
सर्व छायाचित्रे: जालावरून साभार.

***

माझं आणि फाफेचं नातं अजून संपलेलं नाही

- सुमीत राघवन

इतकी वर्षं काम करत असूनही फास्टर फेणेच्या नावानं मला ओळखणारे लोक अजूनही भेटतात. 'फास्टर फेणे' ही मालिका १९८८ साली 'दूरदर्शन'वरून प्रदर्शित झाली; म्हणजे जवळजवळ २७ वर्षांपूर्वी. तरीही ती ओळख अजून कायम आहेच.



फाफे'च्या रूपात सुमीत

परवाच मला कुणीतरी विचारलं, "चिडचिड नाही होत? तीसेक वर्षांपूर्वीच्या कामात अडकून बसल्यासारखं नाही वाटत?" मला काय उत्तर द्यावं कळेना. कशी होईल चिडचिड? उलट सुखद धक्का बसतो. एखाद्या अजरामर व्यक्तिरेखेशी असं जोडलं जाणं, ही किती मजेची, सन्मानाची, आनंदाची गोष्ट आहे! लेखकानं निर्माण केलेल्या व्यक्तिरेखेची ती ताकद आहे. त्यात बाकी कुणाचाही मोठेपणा नाही, वा कमीपणाही नाही. ती भारांच्या लेखणीची जादू आहे.

फास्टर फेणे म्हणून माझी निवड झाली, तेव्हा मी फाफेचं काहीच वाचलं नव्हतं. ते नंतर तयारीसाठी म्हणून वाचलं. पण उत्साह मात्र जाम होता. तेव्हा फार काही कळतही नव्हतं. आपण काहीतरी भारी करणार आहोत, इतकंच वाटायचं.

मस्त वातावरण असायचं सेटवर. तेव्हा तिथे भा. रा. भागवत आणि लीलाताई, हे आजीआजोबाही यायचे. त्यांचा फाफे रूपेरी पडद्यावर जाणार, याचं त्यांना अतिशय कौतुक होतं. ते सेटवर यायचे खरे, पण कधीही कशातही लुडबुड नसे. ते शांतपणे बाजूला बसून सगळ्या गोष्टी निरखत असत. त्यांचा धाक कसा तो वाटत नसे. एक विलक्षण शांत गोडवा होता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात. फास्टर फेणेमध्येही तोच गोडवा उतरलेला आहे, असं मला वाटतं. तो धडपड्या मुलगा आहे, पण त्याचा निरागसपणा - त्याच्यातला गोडवा हरवलेला नाही. हा गोडवा जपणं, हे त्या मालिकेपुढचं मुख्य आव्हान होतं, मला वाटतं. एकतर मूळ कथा मराठीत - आणि फास्टर फेणे केला हिंदीत. अर्थात त्याची मजा वेगळी होती. मराठीचं किती नाही म्हटलं, तरी सीमित वर्तुळ असतं. हिंदीची पातळीच निराळी असते. तुम्ही थेट राष्ट्रीय पातळीवरून निरखले जात असता. त्यात मूळ कथेची खुमारी जपायची, राष्ट्रीय प्रेक्षकांना - महाराष्ट्राबाहेरच्या लोकांनाही - तो आवडेल याची काळजी घ्यायची आणि गोष्ट म्हणून रंजकता राखायची - असं ते तिहेरी आव्हान होतं. ते त्या मालिकेनं पेललं असं मला वाटतं. नाहीतर इतक्या वर्षांनंतरही मला फास्टर फेणेबद्दल प्रश्न का बरं विचारले गेले असते?!

अगदी सुरुवातीच्या भागात उसाचं गुऱ्हाळ, रस उकळणारी चुलाणं, गुळाच्या ढेपी... असलं काय काय होतं. ते सगळं मी तेव्हाच प्रथम पाहिलं. त्याच भागात मी चक्क एका गाईसोबत काम केलं.

तेव्हाची घाबरगुंडी काय सांगू! माझी हालत मला माहीत! मला आठवतं, त्यानुसार सुरुवातीच्या भागांमध्ये फार गुंतागुंत नव्हती. साध्या-सरळ एकरेषीय गोष्टी होत्या.

व्यक्तिरेखांची ओळख करून देण्यासाठी म्हणून कथानकात तो साधेपणा आपोआपच राखला गेला असावा. पण पुढे पुढे कथानकं थोडी क्लिष्ट, गुंतागुंतीची होत गेल्याचं मला आठवतं. त्यात पात्रंही थोडी जास्त होती, कथानकात थोडे बदलही होते. पण ते भारांच्या गोष्टीला धरून असेल, याची काळजी सुलभामावशी - म्हणजे सुलभा देशपांडे, 'फास्टर फेणे'च्या दिग्दर्शिका - घेत असत.

भारांच्या फास्टर फेणेमध्ये थोडी सुपरहिरोची छटा आहे. त्याला पाहताना आपल्याला ते खटकत नाही, कारण भारांची लेखणी. ते आपल्याला विश्वास ठेवायला भाग पाडतात. पण एरवी तो काही साध्यासुध्या मुलांसारखा नाही. 'अशक्य ते शक्य' करून दाखवणारी एक किमया त्याला अवगत आहे. हा भाग सुलभामावशीला थोडा कमी करायचा होता. कुठल्याही मुलाला शक्य होतील अशी त्या मालिकेतल्या मुलांची साहसं असावीत, 'फार फेच्ड्' वाटू नयेत, यासाठी ती प्रयत्न करत असे. तसाच तेव्हाच्या महत्त्वाच्या घडामोडींचाही अंतर्भाव गोष्टींमध्ये करत असे. कर्जतला चित्रित झालेला फास्टर फेणेचा भाग मला अजून स्पष्ट आठवतो. त्या भागातली गोष्ट तेव्हा ऐन भरात असलेल्या चिपको आंदोलनाशी संबंधित होती. तेव्हा खूप मुलांसोबत काम केल्याची मला आठवण आहे.

फाफे आणि कंपू

माझ्या पहिलेपणाच्या खूप आठवणी त्या मालिकेशी निगडित आहेत. पण दुर्दैवाचा भाग असा की, त्याची कोणतीही दृश्य आठवण माझ्यापाशी आज शिल्लक नाही. खरे म्हणजे, माझ्याकडे मालिकेचे काही भाग होते. पण २६ जुलैचा 'तो' पाऊस झाला, त्या वर्षी माझ्याही घरात पाणी शिरलं. त्यात त्या टेप्सही गेल्या. आता त्या मिळवायचा प्रयत्न मी करतो आहे.

फास्टर फेणेचं काम करून झालं, पुढे माझ्या कारकिर्दीत बऱ्याच निरनिराळ्या गोष्टी घडल्या. पण माझं आणि फाफेचं नातं अजून संपलेलं नाही. भागवतांचे चाहते फाफेला विसरलेले नाहीत, हे कारण तर आहेच. पण निराळं, गंमतीदार आणि मला अभिमान वाटेल असंही एक कारण आहे. शाळेत असताना, माझ्या मुलानं, नीरदनं, शाळेच्या वार्षिकोत्सवात फास्टर फेणेची भूमिका केली होती. आता बोला!

***

शब्दांकनः मेघना भुस्कुटे.

सर्व छायाचित्रे: जालावरून साभार

***

पहिल्या 'मराठी बालकुमार साहित्य संमेलना'त भारांनी केलेले अध्यक्षीय भाषण

अखिल भारतीय साहित्य महामंडळातर्फे 'संत साहित्य संमेलना'पासून ते 'आदिवासी साहित्य संमेलना'पर्यंत अनेक प्रकारच्या साहित्याची संमेलने भरतात. बहुतेक संमेलने ही त्या त्या प्रकारच्या साहित्याची उपेक्षा टाळणे, त्यांचे वेगळे वैशिष्ट्य जोपासणे, त्याबाबत चर्चा घडवून आणणे, साहित्याच्या मुख्य धारेत दखल घ्यायला लावणे, जनसामान्यांना त्या साहित्याची उद्दिष्टे स्पष्ट करून सांगणे, इत्यादी अनेकविध कारणांनी स्वतंत्ररीत्या संपन्न होत असतात. बालवाङ्मय वा बालसाहित्यही त्यास अपवाद नाही.

अश्याच भूमिकेतून 'भारतीय बालकुमार साहित्य संमेलन समिती'चे पहिले अधिवेशन १९७५ साली पुणे येथे झाले. त्याच्या अध्यक्षपदाचा मान श्री. भा. रा. भागवत यांना मिळाला. त्या काळात भारा हे बाल/कुमार साहित्यलेखक व भाषांतरकार म्हणून वाचकांत प्रसिद्ध होतेच. परंतु एक अध्यक्ष म्हणून बालसाहित्याविषयीचे त्यांचे विचार व भूमिका एकत्रितरीत्या इतर लेखकांसमोर व वाचकांसमोर बहुधा प्रथमच जाहीर प्रकट झाली.

'भा. रा. भागवत व त्यांचे साहित्य' या विषयीचा प्रकल्प हाती घेतल्यावर, भारा लिहिते होण्यापूर्वी महाराष्ट्रात बालसाहित्याची अवस्था काय होती; मुळात असा साहित्यप्रकार वेगळा म्हणून रुजला होता का; तो तसा कधीपासून रुजला व त्यास कारणे कोणती; पुढे ते साहित्य कसे फोफावत गेले; त्यात कोणी, कोणत्या स्वरूपाचे प्रयत्न केले; प्रकाशक, छपाईतंत्र, चित्रकार व लेखक यांचा त्या काळात समन्वय कसा साधत असे; बदलत्या काळानुसार व नव्या पिढीच्या रुंदावणाऱ्या आकलनाच्या कसोटीस त्या त्या काळचे बालसाहित्य उतरत होते का, अश्या प्रश्नांच्या अनुषंगाने येणाऱ्या बालवाङ्मयाच्या इतिहासाचा मागोवा घेणारा लेख या अंकात असावा असा मानस होता. याचे कारण, त्या पार्श्वभूमीवर भारांच्या साहित्याची ओळख होण्यास व त्याचे मूल्यमापन करण्यास, त्यांच्या लेखनातल्या वेगळेपणाच्या प्रेरणा जाणून घेण्यास वाव मिळणार होता. शोध घेता घेता, खुद्द भारांचेच एक भाषण आम्हांला मिळाले व त्यातला पूर्वार्ध हा खरोखरीच एक समर्पक असा मराठी बालसाहित्याचा ऐतिहासिक आढावा घेणारा आहे असे दिसले. इतिहास केवळ कालानुक्रमानेच नाही तर कथा, कविता, चरित्रे, विज्ञानकथा/कादंबऱ्या, नाट्य अश्या वर्गवारीनुसारही रचलेला दिसतो. ते करतानाच कोणत्या लेखकाने काय लिहिले आहे याची जंत्री व त्यावरचे मार्मिक, सूचक नि विनोदी शेरे हे त्यांच्या प्रचंड वाचनासोबतच त्यांचा स्वभावही दाखवून जातात.

भाषणाच्या उत्तरार्धात, बालसाहित्यकारांकडून काय अपेक्षा आहेत, हे ते स्पष्ट करतात. त्यातच त्यांच्या स्वत:च्या लेखनामागची प्रेरणा व भूमिका दिसून येतात. भारतीय पुराणांतल्या गोष्टी मागे सारताना त्यातले मनोरंजक मूल्य कायम ठेवून विज्ञानाभिमुख भूमिकेतून लेखन करण्याचे आवाहन ते करतात. तसेच परकीय बालवाङ्मय मराठीत आणताना ते भाषांतर असावे की रूपांतर याविषयीचेही त्यांचे विचार हे सुस्पष्ट आहेत.

एकूण, भारांआधीची लेखन परंपरा आणि भारांची लेखनाविषयीची भूमिका व आव्हाने, याचे सांगोपांग आकलन करून देणारे असे हे भाषण ठरले. ते इथल्या वाचकांच्या भारांविषयीच्या असलेल्या प्रश्नांना व कुतूहलाला काही प्रमाणात तरी शमवणारे ठरेल असे वाटते. तसेच, ४० वर्षांपूर्वीचे हे विचार आत्ताच्या काळातल्या लेखकांसाठी कितपत लागू आहेत वा मुलांच्या विस्तारलेल्या भवतालात ते आज कालबाह्य झाले आहेत का; असल्यास कुठली नवी आव्हाने वा धारणा आजच्या बालसाहित्यकारांसाठी महत्त्वाची आहेत, इत्यादी गोष्टींवर ऊहापोह घडवून आणणे हे आम्हांला महत्त्वाचे वाटले. यासाठीच आम्ही ते वाचकांपुढे - पूर्वार्ध आणि उत्तरार्ध - अश्या दोन भागांत ठेवत आहोत.

- अमुक

'मराठी बालकुमार साहित्य संमेलन - अधिवेशन पहिले', पुणे, १९७५ येथील भाषणाच्या प्रकाशनाचे तपशील -

पुस्तिकेचे नाव - 'दहा अध्यक्षीय भाषणे'.
संपादक - शंकर सारडा.
प्रकाशन वर्ष - १९९३
© / प्रकाशक - मराठी बालकुमार साहित्य संमेलन, पुणे - ४११०४०

हे भाषण उपलब्ध करून दिल्याबद्दल व पुनर्प्रकाशित करण्यास अनुमती दिल्याबद्दल श्री. शंकर सारडा यांचे आम्ही ऋणी आहोत. त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात श्री. राजीव तांबे व 'ऐसीअक्षरे'च्या सदस्या 'राधिका' यांची मदत झाली. तसेच लेखाच्या सुरुवातीला वापरलेले छायाचित्र भागवत कुटुंबीयांकडून मिळाले आहे. या सर्वांचे अनेक आभार.

.-------

भा. रा. भागवत

अध्यक्षीय भाषण - पूर्वार्ध

आजवरच्या मराठी बाल-कुमार साहित्याचे विहंगमावलोकन:

बाल-साहित्य संमेलन येथे पहिल्यानेच भरत आहे असे मी म्हणणार नाही. मोठ्या साहित्य संमेलनांतून बालांकडे दुर्लक्ष होते असे आपण 'बाल'-लेखक नेहेमी म्हणत असतो. ही तक्रार खरी असली तरी अनिवार्य आहे असे मोठ्या साहित्यिकांच्या दृष्टिकोनातून म्हणता येईल. कारण प्रौढांच्या वाङ्मयाहून बालवाङ्मयाचे - निदान छोट्यांच्या वाङ्मयाचे - क्षेत्र अजिबात निराळे आहे. त्याला संमेलनातला एक श्रोतृवर्ग एका निराळ्याच 'मूड'मध्ये असावा लागतो. एकंदर वातावरण वेगळे असावे लागते, मुलांनाही जिथे अधूनमधून फेरफटका मारता येईल, तिथली पुस्तकांची प्रदर्शने बघता येतील, एखाद-दुसऱ्या स्पर्धेत भाग घेता येईल असे वातावरण असावे लागते. हे सगळे दोन किंवा तीन दिवसांच्या संमेलनात मोठ्या साहित्यिकांना साधणे अशक्य आहे. तेवढा सर्वांना वेळही नसतो आणि तशी त्यांची मन:स्थितीही नसते. ती उचापत करायला तुमच्या-आमच्यासारखे मुलांमध्ये ऊठबस करणारे लोकच हवेत. इ. व्ही. ल्यूकसने एकोणिसाव्या शतकातल्या एका निसर्गप्रेमी साहसकथा लेखकाच्या कादंबरीवर अभिप्राय देताना म्हटले होते की, "This is a book for boys who are still boys, and also for boys who are masquerading as boys!" माझी खात्री आहे की, आपल्यापैकी बहुतेकांनी प्रौढ प्रतापी पुरुष म्हणून मुखवटे घातलेले असले तरी मनाने आपण अजून बाल आहोत. कोणत्याही बालिश अर्थाने मी हे म्हणत नाही, तर आपल्याला गौरवार्थाने 'बाल' म्हणत आहे. ही बाल्यसुलभ टवटवी आपण टिकवली नसती तर आज एवढ्या मोठ्या संख्येने इथे जमण्याची बालबुद्धी आपल्याला झाली नसती.

१९४४ च्या अशांत काळात वीरेंद्र अढियांनी आपल्या कुमार चळवळीतून याच पुण्यामध्ये एक 'कुमार साहित्य संमेलन' भरवले होते. त्यानंतर गोपीनाथ तळवलकरांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा पुण्यात एक 'बाल-साहित्य संमेलन' भरले. मग बरीच वर्षे सुनी गेली आणि यंदाच्या 'नूतन बाल शिक्षण संघा'च्या विद्यमाने अनुताई वाघ आणि शेष नामले यांच्या प्रयत्नांनी कोसबाड गावी असेच एक संमेलन भरवण्यात आले. त्याला संयोजकांनी प्रथम 'बाल-साहित्य संमेलन' नाव दिले होते ते कोणत्याही ईर्षेने नसून, यापूर्वी जी बाल-साहित्य संमेलने झाली ती जरा विस्कळीत आणि संपूर्ण महाराष्ट्राला नागरी तसेच ग्रामीण भागालाही साथ देऊ शकतील अशी नव्हती, या विचाराने असावे. तसा एक खास प्रयत्न आपण करीत आहोत अशी संयोजकांची कल्पना होती. पण तोही प्रयत्न तसा अपुराच राहिला. कोसबाड हे एकीकडचे गाव पडले आणि मंडळी फारशी जमली नाहीत. पण जे लोक जमले त्यांनी तळमळीने, धडपडीने विचारांची पुष्कळ देवाणघेवाण केली. पण कोसबाडचे पडसाद महाराष्ट्रात फारसे उमटले नाहीत. मला त्याचे नवल किंवा दु:खही वाटत नाही. आपले हे क्षेत्र उपेक्षितच आहे. त्यात प्रगती टप्प्याटप्प्यानेच होणार आहे. या कामाला लागतील तेवढे हात हवेच आहेत.

हे खरे की गेल्या पंचवीस तीस वर्षांत बाल-साहित्याची अमाप निर्मिती झालेली आहे. पालक मुलाला घेऊन पुस्तकांच्या दुकानात गेला - खरं म्हणजे हा कपिलाषष्ठीचाच योग! पण गेला - तर विचारतो, "मुलांसाठी पुस्तकं आहेत का हो?" आणि त्याच्या पुढ्यात बारक्या बारक्या पुस्तकांचा ढीग येऊन पडतो. "घ्या तुम्हाला यातलं कोणतं हवं ते!" आणि पालक बिचारा त्या भूलभुलैयात गुरफटल्यासारखा होतो. 'काय निवडावं निवडणारानं?' असे त्याला होते.

खरंच कसं निवडावं बाल-साहित्य? दुकानात गेल्यावर कसं निवडावं? पण त्याच्याही अगोदर छापण्यापूर्वी ते कसं निवडावं? बालकांच्या काही आवडीनिवडी आहेत. पुस्तकं काढताना त्या आपण सांभाळतो का? त्यांच्या काही गरजा आहेत, त्या आपण पुरवतो का?

फार फार वर्षांपूर्वी

आपल्या पूर्वजांनी असा विचार कधी केला होता का? आपण कधी केला का? आज करतोय का?

फार फार वर्षांपूर्वी बालवाङ्मय किंवा बाल-साहित्य असा शब्दही नव्हता. मुलांसाठी लिहिण्याचे काही वेगळे तंत्र असते हा विचारही कुणाच्या मनाला शिवलेला नव्हता. इतेकच काय, मुलांसाठी काही वेगळी पुस्तके असावीत असेही कुणाच्या डोक्यात आले नव्हते. कृष्णाच्या अद्भुत बाललीलांनी थरारलेला, कुश-लवांच्या बालवयीन पराक्रमांनी मंतरलेला आपला भारत, बालशिवबाच्या बहादुरीने हादरलेला आपला महाराष्ट्र; पण या स्फूर्तिदायक गोष्टी मुलांना सांगण्यासाठी एखादे पुस्तक लिहावे अशी बुद्धी आपल्याला शेकडो वर्षे झाली नाही. माकड तर मुलांचा आवडता प्राणी ना? पण एका शूर वानराने रावणाची लंका कशी पेटवून दिली आणि हजारो माकडांची 'सुइसाइड स्क्वाड' कुंभकर्णासारख्या पर्वतपुरुषावर कशी चालून गेली आणि तिने त्याची कशी भंबेरी उडवली, हा सर्व मसाला वाल्मिकींनी तयार ठेवला असूनही, खास मुलांना गोष्टीरूपाने सांगण्याचा कुणी कधी प्रयत्न केला नाही. जी पुराणे रचली गेली, ज्या कहाण्या सांगितल्या गेल्या, त्यादेखील कितीही रंजक असल्या तरी त्याचे आकर्षण प्रौढांना असे. त्यात खास मुलांना रिझवणारे असे काही नसे. विनोद जिथे असे तिथे तो खेळकर असण्यापेक्षा बाष्कळ अधिक असे. बखरकारांखेरीज गद्यलेखन आपल्याकडे फारसे कुणी करत नसे आणि पद्यलेखकांचा बहुतेक भर वैराग्यावर असायचा. आणि वैराग्य - निदान बालवयात तरी नसावे! पुराणांवर आधारित पद्ये ज्यांनी रचली, त्या वामन पंडितांच्या मधुर काव्यात मुलांना चुचकारल्यासारखे वाटते ते 'बनी खेळती बाळ ते बल्लवांचे'मध्ये. पण तेवढ्यापुरतेच. मोरोपंतांचा गरीब ब्राह्मण बाळ राक्षसाला मारण्याच्या मजेदार बढाया मारतो तेव्हा तो बोबडे बोलतानासुद्धा 'लाल्लिंचल' म्हणतो. 'लाक्सस' म्हणत नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे मुलांना जवळ करण्याचा, त्यांना गोंजारण्याचा आमच्या पंडित कवींचा बाणाच नव्हता. कीर्तनकारांनी आख्याने वाचताना थोडेफार ते काम केले. पण अखेरीस वर्षानुवर्षं घराच्या ओट्यावर बसून राहिलेल्या आजीबाईंवरच ती जबाबदारी येऊन पडली. त्यांच्या जिभेवर सरस्वती नाचली - किंवा मुलांचा आवडता गणपती नाचला म्हणा, किंवा मारुतीने उड्या मारल्या म्हणा - आमच्या मुलांचा जो काय निकोपपणा व तजेला होता तो टिकून राहिला. आजीबाईंच्या गोष्टींनी नि दंतकथांनी हे काम केले. अलिखित युद्धात अनेक सेनानी पराक्रम गाजवतात. त्यांना पदके देऊन मग त्यांचा गौरवही होतो. पण सामान्य सैनिकांचा गौरव कोण करणार? त्यांची नावेसुद्धा कुणाला माहिती नसतात. म्हणून मग अज्ञात सैनिकांच्या नावाने एखादा गौरवस्तंभ उभारला जातो. बालसाहित्यात असा स्तंभ हया अज्ञात आजीबाईंच्या नावाने उभारायला हवा.

इंग्रजी अमदानीची कामगिरी

बालवाङ्मयाची ही उणीव दूर व्हायला इंग्रजी अमदानी यावी लागली. आणि कृष्ण, मारुती मागे पडून शेवटी बालसाहित्याचे सूतोऽवाच झाले ते इंग्रजीवरून अनुवादित केलेल्या 'बाळमित्रा'ने १८२८ साली. आणि त्यात पुढाकार घेतला तोही आपण नाही तर इंग्रज विद्वानांनी. त्यांनी सांगितले म्हणून आपण केले. आपण म्हणजे बापू छत्र्यांनी. 'बाळमित्रा'च्या आधीही काही पुस्तके निघाली, नाही असे नाही. पण छापण्याची सोय सगळीकडे नव्हती. बायबल सोसायटीचे काही छापखाने असत. तसल्याच श्रीरामपूर गावच्या एका लाकडी अक्षरांवरून डॉ. केरी नावाच्या खलाशी मिशनऱ्याने प्रथम छापली इसापनीती. नंतर पंचतंत्र, हितोपदेश आणि सिंहासन बत्तिशी.

ही आपल्याकडच्या गोष्टींची पुस्तके छापली तीसुद्धा याच इंग्रज गृहस्थाने. या पुस्तकांना बाल-साहित्य मुळीच म्हणता येणार नाही; आणि तरी ती शाळांमधून नेमली गेली.

पेशवाई बुडाल्यावर माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन हा मुंबईचा गव्हर्नर झाला. इंग्रजी अमलाचे 'गोडवे' तत्कालीन 'नेटिवां'नी जे गायले त्याचे पुष्कळसे श्रेय युद्धनीतीइतकाच राजनीतीतही प्रवीण असलेल्या या इष्टुर फाकड्याला दिले पाहिजे. पूर्वीचा शत्रू आपला मित्र बनला - रसिक, दिलदार आणि विद्याप्रेमी. पुढे आणखी दोन तपांनी दुसऱ्या एका इंग्रजाने मुलांची शालेय पुस्तके सोपी असावीत म्हणून परिश्रम केले, तोही लष्करी माणूस होता - मेजर कँडी. महामहोपाध्याय पोतदारांनी म्हटल्याप्रमाणे 'साखरे'. त्यांनी आपल्या समितीवर घेतले आमच्या रसिकवर्य तात्या गोडबोल्यांना. आणि दोघांनी मिळून महाराष्ट्रातल्या नव्या पिढीसाठी गोड कामगिरी केली. छत्र्यांच्या 'बाळमित्रा'वर आणि 'इसापनीती'वरही पुढे संस्कार झाले आणि त्या पुस्तकांच्या सुधारित आवृत्त्या निघाल्या.

पण प्रारंभ झाला तो अनुवादांनीच. हरि केशवजी पाठारे (शालोपयोगी नीतीकथा) आणि गोपाळशास्त्री बापट (हरि आणि त्रिंबक) हे दोघे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातले नामांकित भाषांतरकार होते. हरि केशवजींची तर इंग्रज अधिकाऱ्यांनी फारच स्तुती केली होती. आणि तरी खालील उतारा आपल्याला कसा काय वाटतो ते पाहा :

"त्वां अझून माझा बिछाना केला नाहीस. बिछाना केल्याचे तुला श्रम होतात असे कदाचित आढळले असेल म्हणून त्याविषयी काही निश्चय केला आहेस असे दिसण्यात येते. पण इतकेही असून ती काही मोठी गोष्ट आहे असे नाही. का तर तो जसा बिछाना आहे त्या तसल्याची मलाही सवयी लागत चालली आहे."

जुन्या काळातली भाषा, तेव्हा तिचा ढंग वेगळा असणार याबद्दल मला काही म्हणायचे नाही. पण त्यातले वाक्प्रयोग आणि वाक्यरचना पाहा. मराठी भाषेवर इंग्रजीची कशी छाप पडली होती त्याचा हा नमुना आहे!! काही असो. अर्वाचीन मराठी साहित्याला ह्या इंग्रजांनी हातभार लावून जी सुरुवात करून दिली, ती बालवाङ्मय काढून, हा एक गमतीदार योग आहे नाही? कदाचित ते इंग्रज आम्हांला सगळ्यांनाच बालबुद्धीचे समजत असतील!

मराठी बालसाहित्याला आजच्या दृष्टीने सरळ, सोपे वळण लागले ते विनायक कोंडदेव ओकांच्या 'बालबोध'च्या काळात. पण विनायक कोंडदेवांची लेखणी जरी सुलभ लेखनात प्रवीण असली आणि 'हिंदुस्थान कथारस'सारखी गोष्टींची सुंदर पुस्तके त्यांनी लिहिली असली तरी त्यांची सहजप्रवृत्ती बालांकडे होती असे वाटत नाही. तशी आवड असलेल्या वासुदेव गोविंद आपट्यांचे सतत साहाय्य त्यांनी घेतले असते, तर दुधात साखर पडली असती, आणि कँडी-गोडबोलेंसारखा आणखी एक गोड सुयोग जुळला असता. पण ते झाले नाही आणि आपट्यांना वेगळेपणी 'आनंद' काढावा लागला. आणि त्यामुळेच महाराष्ट्राच्या बालसृष्टीत खरा आनंद निर्माण झाला. छापखाना हाताशी घेऊन त्यांनी विपुल बालसाहित्य निर्माण केले. आम्ही 'आनंद'च्या छायेत वाढलेली मुले. आम्हांला त्या पुस्तकांची नावे तोंडपाठ आहेत. 'मनी आणि मोत्या', 'एका दिवसाच्या सुट्टीत', 'बालरामायण', 'बालभारत', 'बालभागवत' वगैरे. भाषांतरकारांचे मुकुटमणी कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी आधीच तयार केलेल्या 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टीं'मधून काही कथा त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी संक्षिप्त स्वरूपात छापल्या. ते 'चित्तरंजन' अथवा 'मुलांचे अरेबियन नाईट्स'. मुळातला जाडा ग्रंथ अर्थात मुलांसाठी नव्हता. पण त्याची एक मध्यम आटोपशीर गुळगुळीत कागदावर छापलेली आवृत्ती आम्ही जरा मोठे झाल्यावर रंगून जाऊन वाचीत होतोच. त्यातली ती शिळाप्रेसवर छापलेली चित्रे आणि त्याखालच्या ओळी

अजून आमच्या डोळ्यांसमोर नाचत आहेत. 'तिसऱ्या तीराने घोड्यावरचा पुतळा उडून समुद्रात पडला' किंवा 'त्याने साबण तिला दिले आणि कोंडा डेऱ्यासुद्धा घेऊन गेला.' नुसत्या ह्या वाक्यांवरूनसुद्धा कथनपद्धतीला कशी गती मिळत चालली ते दिसून येईल.

मुलांच्या नियतकालिकांवर धावती नजर

मुलांना दिलेला नैमित्तिक नव्हे; तर नित्याचे मासिक - 'आनंद' हे आपट्यांचे मोठे वैशिष्ट्य असल्यामुळे ह्या निमित्ताने मुलांच्या नियतकालिकांवरून एक धावती नजर फेकण्याचा मोह मला अनावर होतो आहे. आमच्या बालपणी 'आनंद'च्या प्रत्येक अंकाची आम्ही उत्सुकतेने वाट पाहात असू. 'आनंद'चा अंक तसा काही मोठा वजनदार असायचा असे नाही. वाचनहावरी मुले तो केव्हाच संपवून टाकीत. पण छोट्या बत्तीस पानी अंकात मजकुरांची विविधता भरपूर असे. गोष्टींनी, कवितांनी, एखाददुसऱ्या चरित्राने किंवा चरित्रपर लेखाने, प्रवासवर्णनाने, शास्त्रीय माहितीने तो भरलेला असे. कवितांची फुलबाग फुललेली असे. त्याशिवाय आम्हांला मोठे आकर्षण म्हणजे मुलांचे लेख असत आणि कोड्यांची उत्तरे बरोबर देणारांची नावे छापलेली असत, तीसुद्धा श्रेणीवार. म्हणजे दोन्ही कोड्यांची उत्तरे देणारे ठळक टाइपात मिरवीत, तर एका उत्तरवाल्यांना बारीक टाइपावर समाधान मानावे लागे. वासुदेव गोविंद आपट्यांनी होतकरू विद्यार्थ्यांची एक नवी पिढीच तयार केली.

त्यापूर्वी मुलांसाठी मासिके नव्हती असे नाही. विनायक कोंडदेव ओकांच्या 'बालबोध'चा मी ह्यापूर्वीच उल्लेख केला. 'ओकांच्या मृत्यूबरोबर ते बंद पडले' हा 'बालसाहित्याच्या रूपरेखे'त आलेला उल्लेख चुकीचा असावा असे मला वाटते. कारण त्याच्या किरकोळ चढाओढीत मी भाग घेतला होता आणि पोस्टकार्डावर शाईने रंगवून पाठविलेल्या बदकाच्या चित्राबद्दल मला एक पुस्तक बक्षीस मिळाले होते हे मला आठवते. मला वाटते - हिंदू मिशन सोसायटीच्या वैद्यांनी 'बालबोध' चालवायला घेतले. ते पॉकेट साइझमधे निघायचे. आणि थोड्याच काळात त्याचा अवतार संपला.

१८६४ साली आणखी एक मासिक प्रकटले होते, ते म्हणजे 'पाठशालापत्रक'. त्याचे कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी 'शालापत्रक' बनवले. पण शास्त्रीबुवा रसिक भाषाप्रभू असले तरी मासिकाचे उद्दिष्टच मुळी निव्वळ शैक्षणिक किंबहुना अध्यापकीय स्वरूपाचे होते. त्यामुळे त्याला मनोरंजनाची जोड लाभली नाही. 'शालापत्रक' बरोबर शंभर वर्षांपूर्वी म्हणजे १८७५ साली बंद पडले होते. १८९० साली त्याचे पुनरुज्जीवन झाले. कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री हे पितापुत्र त्यात लिहू लागले. त्यांनी काळाची पावले ओळखून मासिकाला आणखी सोपेपणा, रंजकपणा आणला. आणि तरी आपट्यांच्या 'आनंद'ने त्याला हां हां म्हणता मागे टाकले. १९३० साली 'आनंद'चे संपादकत्व गोपीनाथ तळवलकरांकडे आले. त्यांनी 'आनंद'चे क्षेत्र आणखी वाढविले, आणि चालू घडामोडींकडे लक्ष द्यायला विद्यार्थ्यांना उद्युक्त केले. हळूहळू छोट्या मुलांचे 'नाना' हे आवडते मित्र बनले. तिकडे दे. ना. टिळकांच्या संपादकत्वाखाली नाशिकला 'बालबोध मेवा'ही मुलांना अधिकाधिक गोड वाटू लागला होता.

माझ्यावर 'आनंद'ने जितकी छाप पाडली तितकेच, किंबहुना अधिकच, मला 'बालोद्यान' मासिकाने मोहित केले होते. लिथो प्रेसवर छापलेल्या 'बालोद्यान'च्या चालकांचे - सहस्त्रबुद्धे यांचे - आजमितीलाही मला आश्चर्य वाटत असते. संपूर्ण चित्रकथांचे - कार्टून किंवा कॉमिक स्टोरीजचे - 'बालोद्यान'ने मराठी मुलांना पहिले दर्शन घडविले. माझे वडील हायस्कूलचे हेडमास्तर असल्यामुळे इंग्रजीत निघणारी 'आर्थरमी'ची सुप्रसिद्ध Children's Newspaper आणि My Magazine आम्हांला दरमहा वाचायला मिळत. मी तर तो गुळगुळीत आर्टपेपवर

छापलेल्या 'माय मॅगझिन'चा अंक उघडून वाचण्यापूर्वी हुंगून बघायचो. प्रिंटिंग इंकचा व कागदाचा तो ताजा वास किती घेऊ नि किती नाही असे मला व्हायचे.

ह्या 'माय मॅगझिन'मधे 'टायगर टीम'च्या आणि 'हिप्पी बॉईज स्कूल'च्या संपूर्ण चित्रकथाच असत. तशीच 'डोके मास्तरांची शाळा' ही 'बालोद्यान'ने उघडली होती. 'चित्रशाळे'च्या 'अरेबियन नाईट्स'मधल्या चित्रांप्रमाणेच अशी व्यंगचित्रमाला त्या काळात मराठीत बघायला मिळणे हे एक आश्चर्य होते खरे. त्यामागचे गुपित काही असो, पण मराठी मुलांवर ह्या चित्रांनी उपकार केले.

'बालोद्यान'चे ते माझ्याजवळचे अंक नंतर हरवल्यामुळे त्याची खंत मला नेहमी वाटत राहिली. कारण आता ते दुर्मीळ आहेत. या मासिकाने सहाच वर्षांचे आयुष्य भोगून राम म्हटले. त्यानंतर 'आनंद'च्या जोडीला 'खेळगडी' आला - का. रा. पालवणकरांचा. स्वरूप साधारणपणे 'आनंद'सारखेच, पण स्वत:चा छापखाना नसल्यामुळे की काय, ते आकर्षक असूनही फार चालले नाही. १९४८ साली पालवणकरांनी ते बा. ग. ढवळ्यांना चालवायला दिले. सुंदर चित्रे, व्याकरणशुद्ध छपाई, उत्तम कागद या सर्वच बाबतीत ढवळे विलक्षण आग्रही. त्यामुळे प्रत्येक अंक अनियमित निघूनही सुबक व सुरेख असायचा. पण हे महागडे काम ढवळ्यांच्या 'कर्नाटक प्रेस'लाही अखेर झेपेनासे झाले आणि दोन वर्षांनी त्यांनी ते बंद करून टाकले. ह्या दोन वर्षांच्या अवधीत एका वर्षी वा. ल. कुलकर्णींना व दुसऱ्या वर्षी मला 'खेळगडी'चे संपादन करण्याचे भाग्य लाभले होते.

ह्या मधल्या काळात आणखीही काही बालमासिके चालत होती. 'खेळगडी' निघाल्यानंतर दोनच वर्षांनी नागपूरला बा. रा. मोडक यांनी 'मुलांचे मासिक' काढले. आणि ते आजतागायत चिकाटीने चालवले आहे. 'बालक' नावाचे मासिक काही दिवस निघत होते असे मला आठवते. पुण्यात पंडित अनंत कुलकर्णींनी मोठ्या हौसेने काढलेले 'किशोर' आणि वीरेंन्द्र अढियांचा 'कुमार' ही दोनही मासिके दोन-तीन वर्षांतच बंद पडली. १९३८ साली मुंबईत 'असोसिएटेड अॅडव्हर्टायझर्स अँड प्रिंटर्स'नी काढलेल्या 'साप्ताहिक प्रकाश'चे संपादकीय काम माझ्याकडे दिले गेले तेव्हा त्यात एक संपूर्ण पान मी मुलांकरता द्यायला लागलो. साप्ताहिकांच्या सृष्टीत पोरे - मला वाटते - प्रथमच घुसली होती.

मोठ्या शहरातला हा पसारा नजरेआड करून कोकणाकडे जरा पाहा. तिथे मालवणसारख्या खेड्यात ध्येयधुंद झालेला एक फकीर दर पंधरवड्याला मुलांच्या हातात विविध वाक्प्रसादांनी भरलेला एक कटोरा देत असे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून, अनुभवी लेखकांकडून सतत मागणी करून मागवलेले साहित्य 'बालसन्मित्रा'त छापण्याची पारूजी नारायण मिसाळ यांची जिद्द आदरणीय होती. ह्या ऋषितुल्य पुरुषाच्या मृत्यूनंतर एक-दोन वर्षे चालून मग 'बालसन्मित्र'ही बंद पडले. पाटणकर नावाचे गृहस्थ मुलांसाठी 'सुमंत' मासिक पेण येथे काही काळ चालवीत असत.

एक सुसज्ज छापखाना मागे असलेला दाक्षिणात्यांचा रंगदार 'चांदोबा' आणि रसिकांच्या शुभेच्छा आणि अर्थात काही थोड्या वर्गण्या यांखेरीज पाठबळ मागे नसलेला आमचा 'बालमित्र' ही दोन्ही १९५१ साली एकदम सुरू झाली. 'बालमित्रा'च्या बाबतीत आम्ही एक दृष्टिकोन ठेवला होता. तो म्हणजे अंधश्रद्धा जोपासणारे काहीही द्यायचे नाही. मुलांना शक्यतो विज्ञानाभिमुख करायचे. 'खेळगडी' बाललेखांक काढीत असे, तसा 'बालमित्र'ने वर्षातून एक 'बालबगीचा अंक' द्यायला सुरुवात केली. तो सर्वस्वी मुलांनी सजवलेला असे; आणि उत्तम लेखांना व चित्रांना बक्षिसे असत. पुढे 'साधने'ने फार मोठ्या प्रमाणावर आपली 'कुमार' अंकाची प्रथा सुरू केली आणि आज महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातले ते एक भूषण बनले आहे. 'बालमित्रा'ची धन्यता ही की, त्याला दलाल, गोडसे, गोरे, ठाकरे, ज. ना. थत्ते यांसारख्या कल्पक बालप्रिय चित्रकारांचे साहाय्य लाभले.

मराठीतल्या नामवंत बालसाहित्यकारांनी आपण होऊन विनामूल्य लेखनसाहाय्य दिले. 'मौज'सारख्या मुद्रणालयाने 'बालमित्रा'कडे सहानुभूतीने व स्नेहाने पाहिले. 'बालमित्र'चे कव्हर तेवढे दुरंगी असले तरी बाकीची सजावट रंगीबेरंगी करणे आम्हांला अशक्यप्राय होते, त्यामुळे हा प्रयोग साडेसहा वर्षांत आटपावा लागला.

तात्पर्य हे की, आजच्या यंत्रयुगात एकखांबी तंबू कोसळायला वेळ लागत नाही. मग त्या तंबूत कितीही चांगले काम चाललेले असो, त्याचा उपयोग काय? हा काळ सहकाराचा; सहयोगाचा आहे. एकट्या-दुकट्याच्या शक्तीचा नाही. साधनसामग्री हाताशी असलेल्यांचाही धीर खचतो तिथे इतरांची काय कथा? 'बालमित्र'नंतरसुद्धा अशा मित्रांनी व हितचिंतकांनी एखाद्या नवीन बालनियतकालिकासाठी थोड्या का योजना आखल्या होत्या? पण त्यांतल्या किती अंमलात आल्या आणि किती कागदोपत्री राहिल्या हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. अनेक वर्तमानपत्रे आज मुलांसाठी 'सदरे' देतात. पण ते अक्षरश: सदरे असतात! सुरेख फ्रॉक किंवा झबलीसुद्धा नसतात. कुक्कुल्या बाळांचे रांगेने फोटो छापणे म्हणजे मुलांचे पान झाले का? त्या बाळांचे नातेवाईक सोडले तर बाकी कोणी त्या फोटोकडे ढुंकूनही पाहणार नाही. मुलांसाठी पुरवणी देण्यात 'स्त्री'ची 'बालवाडी' आणि 'सह्याद्री'चा बालविभाग यांनी चांगली कामगिरी केली आहे. 'अनुराधे'च्या 'टुणटुण नगरी'चाही उल्लेख करायला हवाच. मुलांसाठी चांगले नियतकालिक असावे असे मुकुंदराव किर्लोस्करांना मनापासून वाटते. त्यांच्याशी माझी अनेकदा जी चर्चा झाली, तीत ही तळमळ दिसून आली. या चर्चेची निष्पत्ती म्हणजेच वर्षभर 'बालवाडी' स्वतंत्र पुरवणीरूपात निघाली. पण अखेरीस त्यांचीही धडाडी, उत्साह अपुरा पडून तो प्रयोग थांबवावा लागला. इतके या क्षेत्रात निराशेचे वातावरण आहे.

पण हिंमत खचलेली नाही.

आणि तरी कित्येक वर्षे मराठीत आणखीही काही मासिके नित्यनेमाने चालू होती. साने गुरुजी कथामालेचा 'मुलांचा श्याम' प्रकाश मोहाडीकरांनी एकनिष्ठेने चालवला. आज अनेक वर्षे बालांच्या जगात समाजोपयोगी कार्य करीत असलेल्या 'आनंदवन' संस्थेचे 'आनंदवन' मासिक चारुशीलाबाई गुप्ते चालवीत आहेत. अमरेंद्र गाडगीळ सांस्कृतिक मूल्य जपण्याच्या एका आस्थेने 'गोकूळ' मासिक चालवीत आहेत. 'प्रेस्टीज प्रकाशना'ने 'बिरबल', 'क्रीडांगण', 'टारझन'सारखी मासिके चालवली आहेत. शिरवाडकरांचा 'कुमार' मुलांना कथासाहित्य, कोडी, छंद पुरवतो आहे. 'गंमतजंमत' नावाचे छोट्यांसाठी चालवलेले मासिक अण्णा फणसे व कृष्णा करवार यांनी वर्ष-दोन वर्षं धडपडत चालवले. सुभाष समेळ यांची 'बालसेना'ही अल्पकाळ लढून गेली. 'शिशुरंजन' नावाचे मराठी साप्ताहिक गुजराती बंधूंनी काही दिवस चालवले. अशोक माहिमकर हे तरूण गृहस्थ सबंध मजकूर हाताने लिहून, पृष्ठांचे ब्लॉक करुन 'फुलबाग' सजवीत असतात. किती कौतुक करावे ह्या मेहनतीचं नि धडपडींचं!

इतके प्रयोग फसताहेत, पण माणसांची हिंमत खचतेय का? नाही. नव्या नव्या लोकांना ह्या फंदात पडण्याची बुद्धी होतच असते. 'खेळगडी' बंद करतेवेळी पालवणकर मला काय म्हणाले असतील? ते म्हणाले, "भागवत, मुलांच्या मासिकाचा काळ आता संपलेला आहे." आणि त्यांच्या या उद्‌गाराला अनुमतिदर्शक असा लांबट चेहेरा मी करतो आहे, तोच त्यांनी पुढचे वाक्य उच्चारले, "आता दिवस आले आहेत मुलांच्या साप्ताहिकांचे." मला वाटतं, महाराष्ट्राला नाटकांचं जितकं वेड आहे असं म्हणतात, तितकंच मासिकं-साप्ताहिकांचं वेड आहे - पुस्तकांचंच आहे म्हणा ना. म्हणजे काहींना ती छापून काढण्याचे आणि बाकीच्यांना ती कुठून तरी घेऊन वाचून काढण्याचे, विकत घेण्याचे मात्र नाही!

बालनियतकालिकांवर मी इतका घोळ घातला आहे याचे कारण त्यात आपल्या बालसाहित्याच्या प्रगती-परागतीचे, यशापयशाचे किंबहुना साऱ्या वैशिष्ट्यांचेच संपूर्ण प्रतिबिंब उमटलेले आहे. आज जे मासिकात तेच उद्‌या पुस्तकात. म्हणजे केवळ या लेखांचे संकलन करून पुस्तके काढली जातात एवढाच अर्थ नव्हे, तर ज्या अनेक बालपुस्तकांच्या योजना आखल्या जातात, त्यांच्यामागेसुद्धा आजपर्यंतची मासिके, त्याचे स्वरूप आणि त्यांना आलेला अनुभव ही उभी असतात. काही प्रकाशक - मुलांची बरीच पुस्तके काढली, आता त्यांना आधाराला किंवा त्यांच्या आधारावर एखादे मुलांचे मासिक काढावे - अशा विचाराने हा उद्‌योग करतात. पण असे चिरस्थायी उदाहरण विरळाच असते. आता पाठ्यपुस्तक मंडळानेच रंगीबेरंगी, भल्या मोठ्या आकाराचे 'किशोर' मासिक काढले आहे. छान असते. साधासुधा 'आनंद'सुद्धा लहानपणी उघडताना आम्हांला कोण आनंद व्हायचा! मग हा भव्य 'किशोर' वर्गणीदार मुले किती हर्षाने उघडीत असतील याची कल्पनाच करावी. पण 'किशोर'मधल्या गोष्टी, कविता, चित्रे छान असली तरी त्यातलेच ते इतर निबंधवजा लेख मुले वाचतात तरी का?

आपट्यांच्या 'आनंद'ने सुबोध सोपेपणाची जी प्रथा आणली तिचा इतरांवरही परिणाम झाला. 'चित्रशाळा', रावजी श्रीधर गोंधळेकर, 'नवीन किताबखाना', नेर्लेकर वगैरे पुण्याच्या प्रकाशकांनी मुलांसाठी सोपी पुस्तके काढायला सुरुवात केली. 'पंचतंत्रा'ची बापूजी मार्तंड आंबेकरांनी केलेली नवी आवृत्ती याच वेळी निघाली. क्रमिक पुस्तकांनाही आणखी सोपेपणा आला आणि त्यात अगदी छोट्या विद्‌यार्थ्यांना 'वाहवा वाहवा चेंडू हा' यासारखी आधुनिक शिशुगीततंत्राला शोभणारी गाणी गायला मिळाली. हा खेळकरपणाही आम्हांला 'मिस मेरी भोर'सारख्या मिशनरी बायकांनी शिकवला. इतक्या सुगम धाटणीची लयबद्ध गाणी रचणारे आपल्याकडे नारायण गंगाधर लिमये निघाले. 'धोबी कपडे रोज कसा - धू धू धूत असे' ही त्यांच्या धोब्याची आपटधोपट आजही माझ्या कानांवर कधीकधी आदळत असते. केमकर मंडळींनी काढलेली ही सोपी गाणी. त्यांच्याही आधी तांबे-लौंढे-लेंभे आणि दत्त कवींनी काही बालकाव्ये रचली होती. 'चिव चिव चिमणी छतात -' ही तांब्यांची कविता प्रसिद्धच आहे. 'चिमुकल्या छकुल्या न रडे उगा' ही चिमुरड्यांवरची कविता जुन्या क्रमिक पुस्तकांमधून झळकलेली आहे. कविवर्य यशवंतही बालगीतांकडे वळले. त्यांच्या वेळोवेळी तुरळकपणे प्रसिद्ध होणाऱ्या कविता 'मोतीबागे'त एकत्र यायला मात्र बेचाळीस साल उगवावे लागले. पण त्याला ढवळ्यांनी साज चढवला तो मात्र अत्यंत आकर्षक. ढवळ्यांनीच पुढे मायदेवांच्या शिशुगीतांची अनेक सुशोभित पुस्तके काढली. मायदेव हे बालकवितांच्या उद्‌यानाचे खरेखुरे माळी. त्यांच्या पूर्वीच्या महान कवींत आणि मायदेवांत फरक हा होता की, मायदेवांच्या कविता म्हणजे खरीखुरी गेय अभिनयगीते असत. ती मुलांच्या तोंडी बसू शकत, आईने मुलाला उद्देशून म्हणण्याची ती वत्सल-कवने नसत. अत्रे, घाटे, खानोलकर यांनी आता क्रमिक पुस्तकांनाही आणखी सोपे व चित्रमय रूप दिले.

५४-५५ चा नवा जमाना

कुसुमाग्रज, गोपीनाथ तळवलकर, भवानीशंकर पंडित, संजीवनी मराठे, शांता शेळके, वि. म. कुलकर्णी, ग. ह. पाटील, ना. गो. शुक्ल, ह. रा. पाटील, शांताराम आठवले आणि श्री. बा. रानडे ही मान्यवर कवी मंडळी वेळोवेळी बालांसाठी कविता रचीत होती. त्यामुळे सरस्वतीचे हे मंदिर कधीच ओस पडले नाही. महाराष्ट्रशारदा ह्या बालकाव्याच्या बाबतीत भाग्यवान आहे, असेच म्हटले पाहिजे. १९५४-५५ च्या सुमाराला आणखी एक नवा जमाना सुरू झाला. स्वतंत्र भारताच्या आणि भारतातील राज्यांच्या शासनांनी उत्कृष्ट साहित्यासाठी स्पर्धा सुरू केल्या. पहिल्या वर्षी मराठीत कुणालाच बक्षीस मिळाले नाही. दुसऱ्या वर्षी 'बालमित्रा'तून आधी प्रकटलेली आणि मग पुस्तकरूपाने बाहेर पडलेली लीलावली भागवतांच्या 'घोड्याची नि बंबवाल्याची जोडी' टप-टप नि

ठण-ठण करीत पहिले बक्षीस पटकावून गेली. आणि तेव्हापासून शिशुगीतांना नुसता बहर आला आहे. मुलांना सहज म्हणता येतील, आवडतील अशी कितीतरी गाणी प्रसिद्ध झाली आहेत. आजची बाले घरातच गोठा थाटावासा वाटला की निर्मला देशपांड्यांची 'मातीची गाय' घेऊन बसतील किंवा शाळेचा कंटाळा आला की मंगेश पाडगावकरांच्या 'भोलानाथ'ला सवाल करतील - 'भोलानाथ भोलानाथ पाऊस पडेल का? शाळा बुडेल का?' ग. दि. माडगूळकरांची 'एका तळ्यात होती' ती मुलांची आवडती बदकांची पिल्ले तर तबकडीवरून सारखी क्वॅक क्वॅक करतातच आहेत. 'नाच पोरी नाच' म्हणून सरिता पदकी मुलींबरोबर - खरं म्हटलं तर - मुलांनाही नाचायला लावताहेत. सरलाताई देवधरांनीसुद्धा छान छान अभिनयगीते म्हणून मुलांना काय थोडे नाचवले आहे? शांता शेळके चिमण्या पाखरांना 'चिमणचारा' देताहेत तर वृंदा लिमये त्यांच्या तोंडात 'लॉलीपॉप' घालताहेत. आणि हा बालिशपणा टाकून देऊन कुठेतरी विचित्र भटकंती करून यावेसे वाटले की, हीच बाले विंदा करंदीकरांचा हात धरून एटू लोकांच्या देशात जाताहेत. शिरीष पै यांनीदेखील या प्रांतात यशस्वीपणे पाऊल टाकले आहे. याशिवाय शं. ल. थोरात, सूर्यकांत खांडेकर, रजनीकांत राजाध्यक्ष, वि. न. गंधे, तारा वैशंपायन, मंदा बोडस, योगेश्वर अभ्यंकर, रा. ना. विगम, ना. मा. तलारवार, सरोजिनी ताम्हणे - किती किती म्हणून नावे घ्यावीत! छोट्या बाळांना संगीताची आवड जात्याच असते हे ओळखून, आमच्या भगिनीवर्गाने तर त्यांना भराभर कितीतरी गाणी पुरवली आहेत.

छोट्या वाचकवर्गासाठी गाण्यांप्रमाणे गोष्टीही आताशा खूप रचल्या जात आहेत. पण सहत स्फुरलेली गाणी जितकी चटकदार असतात, तितक्या ह्या शिशूंसाठी लिहिलेल्या कथा आढळत नाहीत. त्यांना सफाई कमी असते. केवळ टाईप ठळक देऊन आणि चित्रे छापून चालत नाहीत. भाषा ही छोट्यांना सुलभपणे वाचता येईल अशी असावी लागते.

मुलांसाठी अशा अगदी सोप्या शिशुकथांची पुस्तके पहिल्याने ताराबाई मोडक आणि कावेरी कर्वे यांनी लिहिली. आजीबाई सांगत त्याच गोष्टी, तशाच गमतीदार पद्धतीने ताराबाईंनी सांगितल्या. एक होती ऊ, तिला झाली टू - त्या टूचा पादसुद्धा कापण्याचे क्रौर्य त्यांनी दाखवले नाही! मुलांना निरागसपणे हसायला तेवढीच मोकळीक. निदान अगदी लहान मुले स्वत: वाचू शकत नाहीत, सांगितलेल्या गोष्टी ऐकत असतात. तेव्हा Read Aloud प्रकारच्या गोष्टींमध्ये तरी अशा गंमती ठेवायला हरकत नसावी.

मोठ्या मुलांसाठी कथा लिहिण्यापेक्षाही छोट्यांसाठी लिहिणे जास्त कठीण आहे - अर्थात ज्यांना ते उत्स्फूर्तपणे जमत असेल त्यांची गोष्टी निराळी. पण पद्याइतके गद्य थोडेच उत्स्फूर्त असते? आणि तरीदेखील मा. के. काटदरे, का. रा. पालवणकर, दे. ना. टिळक, म. का. कारखानीस, शं. रा. देवळे, आशा गवाणकर, उमाकांत ठोंबरे, सुमती पायगांवकर, मालती दांडेकर, पंढरीनाथ रेगे, आकाशानंद, वि. म. घुले, आशा जोशी ह्या मंडळींची नावे घ्यायला हवीत. यांनी आणि मगाशी उल्लेख केलेल्या काही शिशुगीतकारांनी छोट्यांसाठी कथा लिहिलेल्या आहेत. श्री. बा. रानड्यांचा 'तिंबूनानांचा रेडिओ' तर चांगलाच वाजला गाजला आहे. 'पिटुकले चालले लढाईला' (वि.स.गवाणकर) आणि 'बोकोबा चालले काशीला' (शशिकांत कदम) ही नुसती नावेही किती गंमतीदार!

मुले थोडी मोठी झाली की त्यांना राजाराणीच्या व पऱ्यांच्या गोष्टी आवडू लागतात. अशा मुलांसाठी पाश्चात्त्य परीकथांचे अनुवाद आपल्याकडे पुष्कळच झालेले आहेत. त्यात हान्स ॲन्डरसनच्या कथांचे सुमतीबाई पायगांवकर आणि ललित वालावलकर यांनी केलेले अनुवाद अतिशय सुंदर स्वरूपात 'व्हीनस' आणि 'पॉप्युलर' ह्या प्रकाशकांनी बालवाचकांपुढे ठेवले आहेत. त्याशिवाय मालतीबाई दांडेकरांच्या 'छान गोष्टी' खरोखरीच छान आहेत. लीलाधर हेगडे यांचे 'पाचूचे बेट' आणि उद्धव शेळके यांची 'इंद्रधनूवर स्वारी' ही एका परीने वैशिष्ट्यपूर्ण

आहेत. आतापर्यंत उल्लेख केलेल्या लेखक मंडळींनी केव्हा ना केव्हा परीकथा लिहिलेल्या आहेतच. आणि नवी मंडळी अधिकाधिक लिहीत आहेत. परीकथांची जादू कधीच कमी होत नाही. मग मुलांच्या गोष्टीत परी नसावी असे काही मानसशास्त्रज्ञ खुशाल म्हणेनात का! हो. जादूवरून आठवण झाली. जादूच्या गोष्टींचा तर आपल्याकडे सुकाळ झाला आहे. जादूची अंगठी मुलांच्या बोटात घालण्यापासून त्यांना जादूची बायको बहाल करण्यापर्यंत एका प्रकाशकाने विक्रम केला आहे! अनेक लेखकांनी राजाराणी-परी-राक्षसांच्या गोष्टी लिहिल्या आहेत. त्यात काही उत्कृष्टही आहेत. काही अगदी निकृष्टही आहेत. सर्वांचा नामोल्लेख करणे माझ्या आवाक्याबाहेरचे आहे.

परीकथांप्रमाणे लोककथाही अलीकडे विपुल प्रमाणात सांगितल्या गेल्या आहेत. त्यात देशोदेशींच्या कथा आहेत तसेच प्रांतोप्रांतीच्याही आहेत. या लोककथांच्या बाबतीतही आपल्याकडे प्राथमिक कामगिरी साहेब लोकांनी करावी हे आपल्याला कितपत अभिमानास्पद वाटते? पण तसे ते आहे खरे! 'फ्लोरा ॲन स्टील' ह्या इंग्रज बाईने अशा काही लोककथा जमा केल्या. त्यांची ओळख तसेच जातककथांचा परिचय पहिल्याने लोकसाहित्याच्या प्रमुख भाष्यकार दुर्गा भागवत यांनी मुलांना करून दिला. पंजाबी लोककथांप्रमाणेच बंगाली लोककथांचे स्वरूपही मोठे मजेशीर आहे. अशा प्रांतोप्रांतीच्या लोककथांवर आधारित गोष्टी, कादंबऱ्या प्रथम साने गुरूजींनी आणि वामन चोरघड्यांनी लिहिण्याचा पायंडा पाडला. त्या 'सोनसाखळी'ला आणि 'चंपाराणी'ला आता आणखी कितीतरी राण्यांची नि राजकन्यांची जोड मिळाली आहे. महादेवशास्त्री जोशी, शि. स. शिर्के, बा. मो. कानिटकर, के. नारखेडे, शं. रा. देवळे, राजा मंगळवेढेकर, यदुनाथ थत्ते, सरोजिनी बाबर, शरश्चंद्र टोंगो, मालती दांडेकर, सविता जाजोदिया, श्रीपाद जोशी यांनी लोककथांना आपापल्या पद्धतीने वेगवेगळी खुलावट देऊन, त्या बालवाचकांना सांगितल्या. पुराणकथांमधून चारित्र्यसंवर्धक गोष्टी निवडून सांगण्याचे कार्य तर गेली पन्नास वर्षे कित्येक लेखक आपापल्या परीने करीत आहेत. त्यात भा. द. खेर, राधाबाई आपटे, अमरेंद्र गाडगीळ, शैलजा राजे, वि. के. फडके, योगिनी जोगळेकर, नलिनी सहस्रबुद्धे आदी लेखक नवी भर टाकीत आहेत. गो. नी. दांडेकरांची 'आईची देणगी' आणि श्यामला शिरोळकरांच्या 'आईच्या आठवणी' ह्या संदर्भात उल्लेखनीय कृती आहेत. नी. शं. नवरे यांचा एक वेगळाच पंथ आहे. त्यांनी संस्कृत कवींच्या नाट्यकथा तर सांगितल्या आहेतच; पण शिवाय वेचक सुभाषितांवर गोष्टी रचून सांगणे, इतकेच नाही तर स्वत: सुभाषिते रचणे हा त्यांचा छंद आहे.

कुमारवाचकांची वास्तवाची मागणी

कुमारवयातील मुले अद्भुताकडून वास्तवाकडे वळलेली असतात. त्यांना कर्तृत्व दाखवणारे वीर हवे असतात. जादूचा दिवा घासून श्रीमंत होणाऱ्या 'अल्लाउद्दिना'पेक्षा अनेक संकटात गटांगळ्या खाऊन स्वत:च्या हिमतीवर एखाद्या फळीच्या आधाराने किनारा गाठणारा 'सिंदबाद' जास्त आवडतो. त्याच्याहीपेक्षा श्रेष्ठ 'रॉबिन्सन क्रूसो'. कारण तो एकटाच ओसाड बेटाला लागतो असे नाही, तर उपलब्ध अशा सर्व साधनांचा - म्हणजे झाडेझुडपे, जहाजाचे मोडके भाग, आतली हत्यारे आणि इतर वस्तू यांचा - योजक बुद्धीने वापर करून त्या निर्जन बेटावर स्वत:साठी 'फर्निश्ड' बंगला उभा करतो. कुमारवयाच्या मुलांना समाजात जे जे वाईट आहे त्याचा नि:पात करावा असे वाटते. जुने मोडून नवे बांधावे असे त्यांना वाटते. पण हे काम हिंसेने, हत्येने करू नका, भांडून करू नका. प्रेमाने, सामोपचाराने करा असा संदेश महात्मा गांधी राजकीय जीवनात देत होते. तो साने गुरुजींनी बाल-साहित्यात नव्हे, बालांच्या जीवनातच आणला. एका सबंध पिढीला त्यांनी संस्कारित, सुप्रवृत्त केले, ध्येयवादाची बैठक त्यांना दिली. समाजातले दारिद्र्य व अन्याय दूर करण्यासाठी धडपडणारी मुले बालवाचकांना स्फूर्ती देऊ लागली. श्याम, बेबी सरोजा, तीन मुले.... सारी आदर्शवादाने झपाटलेली मुले होती.

'श्यामची आई' आणि 'श्याम' ही अजरामर पात्रे आहेत आणि तरी 'श्याम'ला मॉडर्न मुले दुरावलीत की काय अशी शंका कधीकधी घेतली जाते. याचे कारण मला वाटते एवढेच की, 'श्याम' जे आयुष्य जगला ते हल्लीच्या मुलांना जवळजवळ माहीतच नाही. आज जीवनाला विलक्षण गती आलेली आहे. कर्तृत्वाचे क्षेत्रही वाढले आहे. आईबद्दल प्रेम आणि आदर असला तरी आईभोवती घोटाळत बसणे त्यांना आवडत नाही. त्यांना दूर जाऊन पराक्रम करावासा वाटतो. आणि म्हणून गतिमान वाङ्मयाकडे त्यांची अधिक ओढ आहे. पण रथ कितीही बेगुमान धावला तरी त्याला वंगण असले तरच तो धावणार. साने गुरुजींनी स्नेहाचे हे वंगण दिले हे आपण विसरता कामा नये. या वंगणाशिवाय नुसत्या बुद्धीच्या व कर्तृत्वाच्या साहसकथा रुक्ष, ओबडधोबड बनतील.

कुमारांना एखादा वीरनायक आवडला की त्याच्याशी त्यांची इतकी दोस्ती जमते की, त्याचे आणखी आणखी किस्से त्यांना हवे असतात. साने गुरुजींच्या 'श्याम'प्रमाणे ना. धों. ताम्हनकराचा 'गोट्या'ही असाच मुलांच्या गळ्यातला तईत बनला. 'श्याम' गंभीर प्रवृत्तीचा तर 'गोट्या' अवखळ - सर्वसामान्य मुलांसारखाच खेळकर, खट्याळ. पण त्यालाही जग सुधारण्याची तळमळ भयंकर. या 'गोट्या'ने महाराष्ट्रीय मुलांच्या हृदयक्रीडांगणावर कितीतरी वर्षे टोले हाणलेले आहेत. त्यानंतर खानविलकरांचा 'चंदू' आला आणि वि. वि. बोकिलांचा 'वसंत'. या आपल्या पूर्वसुरींना वाट पुशीत - किंवा ती वाट पुसून कुठच्या तरी आडवाटेने आज एक असा किडकिडीत पण तुडतुडीत पोर उड्या मारीत चाललेला आहे - डाकूंचा आणि हेरांचा समाचार घेत - फास्टर फेणे. रामतनयांचा 'कॅप्टन प्रताप' आणि आता आनंद घाटुगड्यांचा 'तिरसिंगराव'ही आपापल्या वैशिष्ट्यामुळे मुलांचे आवडते झाले आहेत. चिं. वि. जोशी यांना आपण बालवाङ्मयात घालीत नाही. पण त्यांचा 'चिमणराव' हाही मुलांचा आवडता हिरो आहे. कारण साहसाइतकेच विनोदाचे मुलांच्या मनावर प्रभुत्व असते. दिवाकरांच्या नाट्यछटाही यामुळेच त्यांना आवडतात.

कुमारांच्या क्षेत्रातही पाश्चात्त्य वीर हिरिरीने उतरलेले आहेतच. एकांड्या 'रॉबिन्सन क्रूसो'प्रमाणेच एका बेटावर जाऊन पडलेली रॉबिन्सन मंडळी इथे आहेत. दुष्ट कोतवालाला हैराण करणारा 'रॉबिन हूड' आपल्या रंगेल गड्यांसह इथे हजर आहे. 'लिलिपुट'पासून 'लापुटा'पर्यंत अनेक तऱ्हेवाईक देशांच्या सफरीचे वृत्तांत सांगणारा 'गलिव्हर' इथे आहे. फ्रेंच साहित्याला भूषणभूत ठरलेले तीन शिलेदार आहेत. इंग्रज बाणबहाद्दर 'आयव्हॅन्व्हो' आहे आणि अमेरिकन भटकबहाद्दर 'हकलबेरी फिन' नि 'टॉम सॉयर' आहेत. पाणचक्कीशी दोन हात करणारा चक्रमवीर 'डॉन क्विक्झोट' आहे. दत्त आपटे, उषा आपटे, भा. म. गोरे, अ. वा. मराठे, दि. बा. मोकाशी, मालती दांडेकर, सुशील परभृत, गं. गो. कुंटे, ग. रा. टिकेकर, सुरेश शर्मा, ह. भा. वाघोलीकर, रमेश मुधोळकर, प्रकाश गोळ वगैरेंनी हया विभागात प्रशंसनीय कामगिरी केलेली आहे. आणि अर्थात अनेक अनुवाद-रूपांतरे कुमारांना आवडण्याजोगी करणाऱ्या आणि ज्यूल व्हर्नच्या अनेक कादंबऱ्या मराठी आणणाऱ्या अस्मादिकांनाही याच सदरात ढकलावे लागेल.

या अनुवाद-रूपांतरांच्या बाबतीत पुष्कळदा एक शंका घेतली जाते ती अशी परभाषेतल्या कथा आपल्या भाषेत आणताना त्यांना पोशाख देणे योग्य होईल का? तो मूळ लेखकाचा अधिक्षेप तर नाही? मला तर वाटते की, आपल्या बालवाचकांचे सुबुद्ध रीतीने मनोरंजन करणे आणि त्या मनोरंजनातून त्याला काहीतरी शिकवणे हा आपला मुख्य हेतू आहे. त्या हेतूच्या आड जर सरळ भाषांतरपद्धती येत असेल तर रूपांतरच करणे चांगले. पण जेव्हा तद्देशीय इतिहास, विशिष्ट भूभाग किंवा वातावरण हाच वर्ण्य विषय असेल आणि कथेचा आत्मा त्याच्याशीच निगडित असेल तर सरळ भाषांतरच योग्य होईल. अशा वेळी 'फ्रेंच राज्यक्रांती'ला '१८५७ चे बंड' किंवा '१९४२ चा उठाव' बनवणे योग्य ठरणार नाही. पण अद्भुत किंवा कुठेही घडू शकणारे कथानक असेल आणि निव्वळ करमणूक हे उद्दिष्ट असेल, तर मूळ व्यक्तींचे आणि देशाचेसुद्धा भारतीकरण क्षम्य ठरेल. कधी

कधी तर असे संपूर्ण रूपांतर हे नुसते क्षम्य नाही, तर आवश्यक ठरते. 'Alice in wonderland'च्या बाबतीत हा अनुभव आला. छोट्या ॲलिसच्या तोंडून वेळोवेळी जे असंबद्ध उद्‌गार निघत असतात आणि लहानपणी शाळेत पाठ केलेल्या ज्या कविता तिला विडंबित स्वरूपात आठवतात, त्या जशाच्या तशा इंग्रजीच्या मराठी करून देणे हास्यास्पद ठरले असते. तशीच काहीतरी - समानार्थीसुद्धा नव्हे - दुसरी मराठीत रूढ असलेली बडबडगीते किंवा निरर्थक गीतेच द्‌यायला हवी होती. म्हणजे 'ॲलिस'ला 'जाई' बनवणे आलेच. परभाषेतली कथा आपल्याकडे आणताना सरळ भाषांतर बरे दिसेल की रूपांतर केल्याने तिची शोभा वाढेल, हे अनुवादकाने विचार करून ठरवावे. आनंद दोन्हीत आहे. भाषांतराने मूळ लेखकाला न्याय दिल्याचा आनंद होतो, तर एखादा रूपांतरात रंगल्यावर मूळ लेखक बाजूला पडून आपण एखादी नवनिर्मिती करत आहोत असा आनंद अनुभवतो.

वीरश्रीला आव्हान देणारे वाङ्‌मय

ऐतिहासिक कथा वीरश्रीला आव्हान देणाऱ्या, त्यामुळे कुमारांना प्रिय असतातच. रजपूत-मराठी इतिहासातल्या वीरांचे शौर्यप्रसंग नेहमीच आपल्याला स्फूर्ती देत असतात. र. ल. उपासनींचे 'मेवाडचे वीर' आणि वि. गं. लेले यांच्या 'मराठ्यांच्या वीरकथा', शं. रा. देवळे यांनी लिहिलेल्या अनेक ऐतिहासिक गोष्टी आणि महान रियासतकारांनी लहानांसाठी लिहिलेल्या मराठ्यांच्या राज्यकथा यांनी हे रणांगण तेजस्वी केले आहे. अनेक पारितोषिकांचे मानकरी बनलेल्या सुधाकर प्रभू यांनी 'अमुचा अजिंक्य हिदुस्थान' म्हणून इतर विभागांप्रमाणे इथेही लेखणी गाजवली आहे. तु. ता. सावंतांची 'महाराष्ट्राची हाक'ही अशीच मुलांना ओ द्‌यायला लावणारी आहे. शिवप्रभू हा तर आमच्या मुलांचा देवच. काळ बदलला, साधने बदलली, इतकेच नव्हे तर तत्त्वज्ञानही बदलले, तरी शिवाजीच्या गोष्टींनी आजही आमची मुले रोमांचित होतात. मग अनेक किल्ले पालथे घालणाऱ्या दुर्गदर्शन घडवून आणणाऱ्या दांडेकर-पुरंदऱ्यांची नौबत त्यांच्या कानात घुमते आणि श्री. के. देवधरांचा जरीपटका त्यांच्या डोळ्यांपुढे फडफडला तर नवल नाही. आम्ही मोठी झालेली मुले जितक्या उत्सुकतेने मोठे 'अरेबियन नाइट्स' हातात धरीत असू, तितक्या उत्सुकतेने आजचे कुमार वाचक पुरंदऱ्यांच्या भल्या मोठ्या पण कादंबरीसारख्या रंजक 'राजा शिवछत्रपती'ला चिकटून राहतात ही आनंदाची गोष्ट आहे. शिवाजी महाराजांच्या कार्याला पूरक अशी कामगिरी त्याच काळात आसामात करणाऱ्या 'लछित बड फुकन' याची चरित्रकथा म. वि. गोखले यांनी चटकदार पद्धतीने लिहिलेली आहे.

हरिभाऊ आपट्यांच्या आणि नाथमाधवाच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची संक्षिप्त रूपांतरेही बालप्रिय ठरलेली आहेत याबद्दल संक्षेपकार ग. वि. अकोलकर आणि पटवर्धन यांचे अभिनंदन करायला हवे.

खऱ्याखुऱ्या जीवनातील मुलांची साहसकृत्ये अरुंधती महांबरे आदींनी चांगली रंगवली आहेत. अलीकडच्या जीवनातल्या पण वैशिष्ट्यपूर्ण अशा काही कादंबरीकारांचा उल्लेख करणे अगत्याचे वाटते. त्यात कुठे ग्रामीण दलितवर्गाचे जीवन आहे, स्वतःला व समाजाला सुधारण्याची जिद्द आहे. मंगळवेढेकरांचा 'मुक्या', चारुशीला गुप्ते यांचा 'बनगावचा सद्‌', द्‌वारकानाथ लेले यांचा व शंकर सारडांचा 'गुराख्याचा पोर', व. म. घुले यांची 'कळसू धनगर', तारा पंडित यांचा 'पेट्रोल पंपावरचा पोऱ्या' वगैरे. कोकणातला विद्‌यार्थी देशावर येऊन आदर्श कामे कशी करतो त्याचे चित्र गो. वि. नामजोशी यांनी रंगवले आहे, तर ग. ल. ठोकळांनी आणि पंडित गुरवांनी अशाच काही खेड्‌यांतल्या गोष्टी सांगितल्या आहेत. 'बजरंग' आणि 'उमजापूरचा आनंदराव' हीही अशीच ग्रामीण जीवनावरची खुसखुशीत व्यक्तिचित्रे आहेत. रमा बखले यांची 'कळीच्या डोंगराच्या छायेत' ग्रामसेवा करणाऱ्या विद्‌यार्थिनी गावाला पाणी कसे मिळवून देतात हे सांगणारी कादंबरी किशोर-कथांप्रमाणे, किशोरी-कथांबद्दल आशा निर्माण करणारी आहे. 'विद्‌याभवनातल्या गमतीजमती' ही साधना कामतांची कादंबरी अशीच विद्‌यार्थिनींच्या जीवनावर होती. पूर्वी ताम्हनकरांची 'चिंगी' होतीच. आणि पिरोज आनंदकरांनीही अशीच एक

मुलींच्या साहसाची कादंबरी लिहिली होती असे आठवते. अलीकडे लीलावती भागवतांनी दोन कथा लिहिल्या आहेत. शैलजा राजे यांच्या एक-दोन कथा आहेत. दत्ताराम बारस्करांची 'छोटी मंजू'ही नुकतीच प्रगटली आहे. आशा भाजेकर, दिवाकर बापट, गिरिजा कीर, ल. ग. देव, ग. वि. साळवी, द. वि. परचुरे, सुशीला चिकटे, दत्ता टोळ, श्रीपाद डोंगरे, वसंत गांगल, सुमन गांगल यांनीही अलीकडे किशोर वाङ्मयात नवी भर टाकली आहे. गुन्हेगार प्रवृत्तीच्या मुलांच्या कथा रेचेल गडकर लिहीत आहेत.

चरित्रांचा प्रांत

गोष्टी-गोष्टी-गोष्टी! गोष्टींवरच आपण फार भर देतो की; पण मुलांपुढे मोठ्यांची चरित्रे ठेवली की तीही ती रंगून जाऊन वाचू शकतात. 'असे होते गांधीजी' हे यशवंत जोशींचे, 'थोर शास्त्रज्ञ' हे डॉ. वि. ना गोखले यांचे, 'विज्ञानाचे शिल्पकार' हे शांता पेंडसे यांचे, 'खंडो बल्लाळ' हे वा. अ. देसाईंचे, 'भारतीय वैज्ञानिक' हे यदुनाथ थत्ते यांचे, दत्ताजी कुलकर्णी यांचे 'कलासागरातील मोती' अशी आठवली ती चटकदार पुस्तकांची नावे मी घेत आहे. सुधारक प्रभू यांनीही रंजक चरित्रे लिहिली आहेत. देवळे-सोवनींनी ऐतिहासिक कथा-चरित्रे लिहिली आहेत. गोपीनाथ तळवलकरांचे 'आशियाचे धर्मदीप' गेली अनेक वर्षे प्रकाश देत आहे. दा. न. शिखऱ्यांनी लिहिलेली समाजधुरिणांची चरित्रे बालप्रिय ठरली आहेत. त्यांनीच लिहिलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या चरित्रानंतर बऱ्याच वर्षांनी गोविंद भिड्यांनी 'सागरा प्राण तळमळला' हे गोष्टीरूपाने स्वातंत्र्यवीरांचे चरित्र लिहिले आहे.. प्र. न. जोशी यांनी प्रेरणात्मक चरित्रांची मालाच काढली आहे. के. ना. वाटवे, प्रा. वीरकर व रा. गो. भिडे यांचीही नावे ह्या संदर्भात घेण्यासारखी आहेत. चरित्रे अनेक लिहिली गेली, लिहिली जात आहेत. अलीकडे या लेखनाला गोष्टींचे चटकदार वळण येत चालेल आहे, ही छोट्या मुलांच्या दृष्टीने चांगली गोष्ट आहे. क्रिकेट आणि हॉकीमधल्या क्रीडापटूंची वाचनीय चरित्रे बाळ पंडित, र. गो. सरदेसाई आणि खाडिलकर यांनी लिहिली आहेत.

विज्ञानविषयक लेखन

वैज्ञानिक विषायांवर अलीकडे सुगम लेखन होऊ लागले आहे. अणसृष्टीपासून अंतराळविश्वापर्यंत लेखकांची झेप आहे. प्र. न. जोशी, रा. वि. सोवनी, ना. वा. कोगेकर, चिं. श्री. कर्वे, ज. नी.कर्वे, भालबा केळकर प्रभृती लेखक अशा माहितीच्या सोप्या पुस्तकांचा लाभ बालवाचकांना नेमाने करून देत आहेत. छंद, कोडी वगैरेंवर परचुटण लेखन करणे हा आशा भालेकरांचा उद्योग आहे. मालतीबाई दांडेकरांच्या आधी देवीदास बागुल यांनी ह्या साऱ्या बालवाङ्मयाचा आढावा घेण्याचा एक उपक्रम केलेला आहे.

बालसाहित्याला मागेच एक छोटीशी डहाळी फुटली होती. तिची मोठी शाखा बनली नाही, पण तिला जी पाने म्हणजे पत्रे आली ती फार मनोहारी होती. एक म्हणजे साने गुरुजींची 'सुंदर पत्रे' आणि दुसरी ना. ग. गोऱ्यांची 'करवंदे'.

प्राण्यांविषयीची आणि वनस्पतींविषयीची माहिती अनेक छोट्या मुलांना हसतखेळ समजावून द्यावी तर ती श्री. बा. रानड्यांनी, आणि जरा मोठ्यांना असे शास्त्रीय विषय शिकवावेत प. म. बर्वे, द. क. केळकर, वि. श्री. मोडक, वि. आ. मोडक, म. वि. आपटे, वा. वा. केळकर, ज. श. मेढेकर, ना. ह. फडके प्रभृतींनी. 'व्हीनस' आणि 'वोरा'सारख्या प्रकाशकांनी विज्ञानविषयक पुस्तकांच्या चांगल्या मालाही काढल्या आहेत. महादेव शास्त्रींचा 'नक्षत्रलोक' हा जुन्या 'ज्योतिर्विलास'ची आठवण करून देणारा सुंदर ग्रंथ. मुलांसाठी प्रवासवर्णनेही अलीकडे पुष्कळच चांगली निघत आहेत. तिथेही महादेवशास्त्री जोशींचा 'तीर्थरूप महाराष्ट्र' एक आगळे स्थान मिळवून बसला आहे.

विद्यार्जन व चरित्रघडण ह्या दोन्ही बाबतीत मुलांना शास्त्रीय दृष्टिकोनातून मार्गदर्शन करणारी मोजकी पुस्तके मराठीत निघाली, त्यांत य. गो. निजसुरे यांचे 'कुमारांचा सोबती' खास उल्लेखनीय म्हटले पाहिजे.

भारतातल्या मुलांसाठी चांगली पुस्तके अकरा भाषांत काढून त्यांचा परस्परपरिचय वाढविण्याचे एक मोठेच काम 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने हाती घेतलेले आहे. त्यांच्या 'नेहरू वाचनालया'ची पुस्तके छोटी असतात, सोपी असतात - भारतीय नद्या, प्राणी, पक्षी, धान्य, आगगाड्या, पोस्टाची तिकिटे अशा विविध विषयांपासून ते लोककथांपर्यंतचे क्षेत्र या पुस्तकांनी गाठले आहे. इतकेच नाही तर चित्रकार, संगीततज्ज्ञ अशा कलाकारांचीही चरित्रे त्यांनी प्रकाशित केली आहेत. ही पुस्तके छपाई, चित्रे, विषय व लेखन या सर्व दृष्टींनी उत्तम आहेत, स्वस्तही आहेत आणि तरी मराठीत ती फारशी खपत नाहीत, त्याअर्थी महाराष्ट्रात त्यांना विशेष प्रसिद्धीच मिळाली नसावी अशी एक शंका येते.

नेत्रदीपक बालनाट्य

आणि हो! बालसाहित्याचा सर्वात नेत्रदीपक म्हणता येईल असा विभाग राहिलाच, तो म्हणजे अर्थात बालनाट्याचा. मराठीत बालनाट्याने चांगले बाळसे धरे आहे; पण ते बेटे अजून अद्भुताच्या पलीकडे जात नाही. अद्भुताचा जो पसारा मांडला गेला आहे, निश्चितपणे नयनमनोहर आणि श्रुतिमनोहर असाच आहे आणि त्याचे श्रेय सुधा करमरकर यांच्या बालरंगभूमीलाच द्यायला हवे. आकाशानंद, दिनकर देशपांडे यांचीही कामगिरी उल्लेखनीय आहे. अर्थात भालबा केळकर आधीपासूनच नाटिका लिहीत आहेत, बसवीत आहेत. त्यांच्यानंतर रत्नाकर मतकरी, सई परांजपे, नरेंद्र बल्लाळ, 'मंगळावर स्वारी'चे सोमनाथ समेळ, वंदना विटणकर, विनय सोनाळकर, जयंत तारे, दत्ता टोळ, श्रीधर राजगुरू यांसारखे बालनाट्याचे लेखक आणि दिग्दर्शक पुढे आले आहेत. बाळसृष्टी त्यामुळे खुशीत आहे. आता जरा वास्तव सृष्टीतल्या गडकऱ्यांच्या 'सकाळचा अभ्यास'ने ज्याची नांदी म्हटली असल्या मनोरंजक कथानकांवर आधारित अशी बालनाटकेही पुढे यायला हवीत. 'बेटावरचे बहाद्दर' तशापैकीच होते. आणि आपले खरे वय लपवून बालमनाशी तद्रूप होऊन त्यांच्या बालसृष्टीत किल्ले बांधण्याची विद्या ज्यांना अवगत झाली होती, असे दोन मोठे नाटककारही अशी नाटके घेऊन पुढे आले, ते म्हणजे 'वयम् मोठम् खोटम्'वाले पु. ल. देशपांडे आणि 'चिमणा बांधतो बंगला'वाले विजय तेंडुलकर.

श्याम फडके आणि माधव कुलकर्णी यांनी एखादे नाटक लिहून या क्षेत्रात प्रवेश केला. पण पुढे वाटचाल केली नाही.

चित्रकलेचे साहाय्य आवश्यक

बालवाङ्मय म्हटले की चित्रे हवीतच. आज मुलांसाठी काढलेले एकही पुस्तक चित्राशिवाय आढळायचे नाही. खास मुलांचे चित्रकार म्हणून प्रभाकर गोरे, गोडसे, राम वाईरकर, पद्मा सहस्रबुद्धे, सुभाष अवचट प्रभृतींनी स्वतःचे खास स्थान निर्माण केले आह. भय्यासाहेब ओंकार, हवालदार, सालकर, जोशी, देसाई, परब, कंटक यांनीही आतापर्यंत शेकडो बालपुस्तकांची सजावट केलेली आहे. दलालांचा कुशल कुंचलाही ह्या क्षेत्रात फिरला होता, आणि रघुवीर मुळगावकरांचाही.

मजकुराइतकेच किंबहुना अधिकच जास्त महत्त्व ज्यात चित्रांना आहे, असे चित्रकथांचे नवे दलन आपल्याकडच्या मुलांना अलीकडे खुले झाले आहे. त्यात अनंत पै यांच्या नेतृत्वाखाली 'इंडिया बुक हाऊस'ने जी भारतातल्या पौराणिक व ऐतिहासिक कथांवर आधारित अशी 'अमर चित्रकथां'ची पुस्तके काढली, त्याचा निर्देश प्रामुख्याने केला पाहिजे. यांतल्या बहुतेक पुस्तकांचे मराठी अनुवाद झाले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर

अशा तऱ्हेचा प्रयत्न खरोखर भारतातही अपूर्व असा होता आणि मराठीत त्याला मिळावी तशी साद मिळाली नाही ही खरोखर खेदाची गोष्ट होय. या अमर चित्रकथा चितारणारांत वाईरकर, प्रताप मुळीक, हवालदार, कबाडी यांच्यासारखे नामवंत महाराष्ट्रीय चित्रकार आहेत. अनंत पै हे एक अस्वस्थ गृहस्थ आहेत. त्यांनी पुढे 'रंगरेखा' नावाची चित्रपट-कथा (Comic Strip) देणारी संस्था काढली आणि आपल्यासारख्याच अस्वस्थ मुलाला - फास्टर फेणेला - त्या चित्रसृष्टीवर बसवले.

मराठी बालसाहित्याच्या रोपाचा असा वृक्ष बनत चालला आहे. माझ्या यादीतूनही काही ठळक नावे निसटली असण्याचा संभव आहे. तसे असल्यास संबंधित बंधुभगिनींनी मला क्षमा करावी. प्रत्येकाला त्याचे श्रेय मिळावे अशी मला अंतःकरणापासूनची इच्छा आहे. मी मुद्दामच विस्तारपूर्वक इतका आढावा घेतला, नामोल्लेखही इतके केले त्याचे कारण ह्या मंडळींनी या उपेक्षित, दुर्लक्षित अशा वाङ्मयक्षेत्रावर जे उपकार केलेले आहेत, ते ऋण केव्हातरी कोणीतरी मान्य केले पाहिजे. मी एखाद्याच विभागात ज्यांचा उल्लेख केला त्यांपैकी बऱ्याच जणांनी इतर विभागांतही लेखन केले आहे. इथे 'वॉटर टाइट कंपार्टमेंट' पाडता येणार नाहीत. इथे कीर्तीचा झगमगाट नाही. द्रव्यप्राप्तीही फारशी नाही. आणि तरी जेव्हा एखादा लेखनपटू मुद्दाम बालांसाठी लेखणी उचलतो, तेव्हा त्याच्यामागे खात्रीने काहीतरी सत्प्रेरणा असली पाहिजे. त्याचे लिखाण कितपत यशस्वी होते, त्याचे मूल्यमापन काय होते हा प्रश्नपुढचा आहे. पण त्याची आस्था आणि कळकळ उपेक्षणीय खास नाही.

गौरवास्पद कामगिरी

मला काही नावांचा इथे गौरवाने उल्लेख करावासा वाटतो आहे, की ज्या मंडळींना आपल्या आयुष्यात सातत्याने फक्त मुलांसाठीच लिखाण केले - विपुल केले आणि चांगले केले. एक म्हणजे सुमतीबाई पायगांवकर, दुसरे शं. रा. देवळे आणि तिसरे - आमचा राजाभाऊ मंगळवेढेकर, की ज्यांनी मुलांसाठी गोष्टी लिहिणे आणि त्यांना सांगणे हा आपला धर्मच बनविला आहे. बालसाहित्याचा जो विभागशः आढावा मी घेतला, त्यात खरे म्हणजे प्रत्येक विभागात हे तिघे बसण्यासारखे आहेत. मालतीबाई दांडेकरही अशाच. त्यांनी तर अपार बालसाहित्य लिहून शिवाय 'बाल-साहित्याची रूपरेषा' तयार केली आणि बालवाङ्मय-अभ्यासकांवर उपकार करून ठेवले.

मुलांसाठी पुस्तके नुसती लिहून भागत नाहीत. ती छापून त्यांच्या हाती द्यावी लागतात. बालपुस्तक प्रकाशनाचे कार्य सातत्याने आणि साक्षेपाने करणारे प्रकाशक म्हणजे केशव भिकाजी ढवळे. त्याशिवाय मौज, पॉप्युलर, व्हीनस, वोरा यांनीही आकर्षक स्वरूपात मुलांसाठी पुस्तके काढली. मुलांच्या हातात पुस्तक देताना ते चांगले लिहिले असावे हे पाहणे, ही जशी आपली जबाबदारी आहे, तसेच त्याचे बाह्यस्वरूप आकर्षक असावे, त्यातली चित्रे दर्जेदार असावीत, मुद्रण सफाईदार असावे, बांधणी पक्की असावी हे पाहणेही आपले काम आहे. बालसाहित्याच्या बातीत हा कटाक्ष विशेष ठेवायला हवा, कारण बालकांची सौंदर्यदृष्टी आपण जोपाशीत असतो, त्यांच्या कल्पनांचा परिपोष करीत असतो. चित्रांना तर फार महत्त्व आहे. एक अनुभव सांगतो. एक छोटी मुलगी पुस्तक वाचीत होती. तिला वाचता येत नाही हे मला माहीत होते. म्हटले - "अगं, तुला अजून अक्षर कळत नाही मग तू वाचते आहेस काय?" ती म्हणाली, "मी चित्र वाचते आहे!"

अर्थात मला ही जाणीव आहे, की हे सगळे करणे म्हणजे खर्चाचे काम आहे. पण मी म्हणेन - कुठेतरी काटछाट करा, पण चित्रे विषयानुकूल आणि मुलांना आवडतील अशी द्या. वाटले तर रंगांना छाट द्या; पण प्रसंगचित्रांची सजावट चांगली असू द्या. मुकुट घालून राजा जेवायला बसला आहे असे कृपया दाखवू नका किंवा बागेतल्या झाडांच्या गर्दीत राजपुत्राचा चेहरा गुरफटून तो राक्षस दिसेल अशी गिचमीड दाखवू नका.

आत्यंतिक अडचणीच्या या काळातही आमच्या प्रकाशकांची हौस आणि जिद्द कायम आहे, हे आमच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. मॅजेस्टिक, कॉन्टिनेन्टल, वोरा, नितीन, संजय, जयहिंद, नीलकंठ, लेखनवाचन भांडार, व्हीनस, जोशी-लोखंडे, जगताप-कारले, महाराष्ट्र आणि नागविदर्भ प्रकाशन अमरावती, महाराष्ट्र ग्रंथ भांडार मुंबई, महाराष्ट्र ग्रंथ भांडार कोल्हापूर, नागपूर प्रकाशन यांनी पुष्कळच चांगले साहित्य निर्माण केले आहे. काही नवे प्रकाशक बालपुस्तकांच्या माला किंवा संच काढण्याच्या योजना नित्य हाती घेत आहेत. 'वोरा'च्या गाडगीळांनी योजनाबद्ध प्रकाशन हाती घेऊन नव्या लेखकांना पुढे आणले आहे. 'जोत्स्ना', 'इंद्रायणी'सारखे प्रकाशक खास मुलांसाठी म्हणून छोटी छोटी पुस्तके काढीत असतातच. नव्या दमाचे अरगडे-कुलकर्णी यांनी तर ह्या बाबतीत विक्रमच केला आहे. हौसेला मोल नाही हे अगदी खरे आहे. ह्या सर्व मंडळींनी काढलेली पुस्तके खरोखरीच उत्कृष्ट आहेत. आणि तरी सर्वच प्रकाशकांना माझी नम्र विनंती आहे, की प्रकाशनासाठी आलेले साहित्य एकदा तज्ज्ञांच्या डोळ्यांखालून गेल्यावरच घ्यावे. विषयानुकूल भाषाशैली आहे की नाही; विचार मुलांना रुचतील, पचतील असे आहेत की नाहीत; चित्रेही विषयानुरूप आहेत की नाहीत; हे सर्व तपासून घ्यावे.

असो, आपल्या बालसाहित्यात मला उणीव कशाची भासते आणि त्यात नवीन काय यायला हवे आहे याबद्दल माझे विचार आता थोडक्यात मांडून हे लांबलेले भाषण मी आटोपते घेतो.

(पूर्वार्ध समाप्त)

***

भारांचे रेखाचित्रः भरत जगताप

अध्यक्षीय भाषण - उत्तरार्ध

बालसाहित्यकाराकडून अपेक्षा

बालसाहित्यकाराला पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे थोडीशी मानसशास्त्रीय बैठक. आपण नेहमी म्हणतो, की मुलांच्या मनावर संस्कार होतात ते मुख्यतः घरी आणि शाळेत, म्हणजे पालक आणि शिक्षक यांच्याकडून. आपल्याला जर मुलांवर संस्कार करायचे असतील तर पालक आणि शिक्षक या दोन्ही भूमिका आपल्याला नीट वठवल्या पाहिजेत. ते आपण करतो का? मुलांचे मन आपण समजून घेतो, की त्यांच्यावर सत्ता गाजवतो; की त्यांच्यापुढे उगाच पड खात असतो? बरं, जे काही मुलांना आपण सांगतो, ते प्रेमाने सांगतो का? त्यांच्या मनात उचंबळणाऱ्या आकांक्षा आपण लक्षात घेतो का? की पदोपदी "चूप रे! तुला नाही ते जमायचं!" असे म्हणून त्यांना गप्प बसवतो? मुलांच्या गुणांचे महत्त्व आपण पाहुण्यांसमोर प्रदर्शन करण्यापुरतेच मानतो का? का एरवीसुद्धा त्या गुणांचा परिपोष करीत असतो? कधीकधी एखादी मुलगी कुणी न सांगता आपण होऊन, दोन ओळींचा का होईना, लेख लिहिते. तो आपण वाचतो का? एखादा मुलगा उत्स्फूर्तपणे चित्र काढतो, ते आपण बघतो का? या ठिकाणी मला एकदम यशवंत चौधरींनी मागे मुलांकडून असे उत्स्फूर्त प्रयोग करवले होते, त्याची आठवण होते आहे. किती तऱ्हेतऱ्हेच्या कल्पना छोट्या मुलांनी लढवल्या होत्या!

रस्त्यात पडलेले सिगरेटचे रिकामे पाकीट मुलाने उचलले की रागावून "घाण आहे, टाक ते!" असे आपण म्हणतो का? त्याने सिगरेटची ढीगभर पाकिटे जमवली तरी ते निरर्थक समजू नका. जमविण्याचे तत्त्व त्यामागे आहे. हाच मुलगा पुढे कदाचित दुर्मीळ स्टँप जमवील. मुलांची भीती आपण घालवतो, की नकळत ती वाढवीत असतो? मुलांना अनेक भये भेडसावीत असतात. छोट्यांपुढे समस्या नसतात असे समजू नका. बेबीला वाटते - कायपण माझे कपडे हे! शेजारच्या छबीचे कपडे किती छान आहेत. तर बेबीला सांगितले पाहिजे की "तुझेही कपडे छान आहेत. रोज धुतल्यामुळे किती स्वच्छ असतात बघ. घातल्यावर अंगाला कसं बरं वाटतं!" बनीला वाटते - मनीचा नंबर दुसरा तिसरा असतो. माझा काय, विसावा! - "हो, पण बने, तुला गाणं, नाचणं येतं, ते मनीला येतंय का? खेळात तर तू नेहमी पुढं असतेस!"

मुलांमध्ये प्रेमाची भावना उपजत असते. प्राण्यांवर अन् माणसांवर ती सहजपणे प्रेम करतात. अर्थात स्वार्थ सगळ्यांनाच असतो. आपली वस्तू आपण कवटाळून बसणे ही माणसाची वृत्तीच असते. पण दुसऱ्याबद्दल माया वाटू लागली किंवा दुसरी मुले अडचणीत आहेत असे कळले तर मुले पुढे होतात आणि आपली वस्तू देऊन टाकतात. Twenty and Ten नावाची एक कादंबरी आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात शत्रूने व्यापलेला फ्रांस. वीस फ्रेंच मुले एका गुप्त गुहेत दडलेली असतात. त्यांना असे कळते की, दहा अनोळखी - नुसतीच अनोळखी नाहीत तर ज्यांच्यावर नाझींचा डोळा आहे अशा - ज्यू समाजातली मुले संकटात आहेत, आसरा शोधताहेत. ह्या विसांनी लगेच त्या दहांना आपल्या गुहेत आसरा दिला. आपण स्वतःला संकटात टाकतो आहोत हा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. ही सहानुभूती अन मानवता स्वाभाविक असते. आपल्या जाती-वर्ण-वंश विचारांनी आपण त्यांना पुढे बिघडवतो. 'आपण सारी एकाच देवाची लेकरे आहोत' अशी नुसती पोपटपंची आपण करतो. पण मुलांना खरोखरीच भेदभाव माहीत नसतो. गडी, मोलकरणी आणि कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या धंद्यातले लोक यांच्याशी आपण जी वागणूक करतो, त्यामुळे तो भेदभाव मुलांच्या मनात आपण निर्माण करतो. प्राणी, वनस्पती यांच्यावरही मुले प्रेम करतात. ते प्रेम, ती कोवळीक आपल्या कठोर वागण्याने आपण करपवून टाकतो. मुलांची कोवळीक, त्यांचे कुतूहल आपण कसे कुस्करतो याचा दाखला

अमेरिकेसारख्या प्रगत देशातही मिळालेला आहे. पाच-सहा वर्षे वयाच्या मुलांची पाहणी करणाऱ्या तज्ज्ञांनी सांगितले की दहा-अकरा वर्षे वयाच्या मुलांचे चेहेरे निराश, पडलेले दिसले. अर्थ हा की, मुलांची प्रफुल्लता, पर्युत्सुकता मधल्या चार-पाच वर्षांत मोठ्यांनी मारली. तिकडे ही स्थिती तर आपल्याकडे काय असेल?

याउलट मुलांना आपण बागेतून, पशुपक्ष्यांच्या उद्यानातून हिंडवून प्राण्यांशी नि वनस्पतींशी त्यांची गट्टी करून दिली तर? किंवा ते जमले नाही तर, नेहमी दिसणारी अंगणातली नि रस्त्यावरची झाडे, तिथे उडणारी पाखरे, वावरणारे किडे नि मुंग्या, त्यांची वारुळे यांच्याबद्दल त्यांना सारखी जिज्ञासा असते; ती तरी आपण पुरवतो का? प्रेमाच्या व्यक्तींबद्दल आस्था, कुतूहल वाटावे तशी त्या सृष्टीबद्दल मुलांना उत्सुकता असते, ती आपण पुरवतो का? की त्याने विचारल्यावर 'गप रे! ते तुला कळायचं नाही!' किंवा फार तर 'तसं नाही रे!' म्हणतो. पण तसे नाही, तर कसे? तुम्हाला माहीत नसेल तर त्याला दुसऱ्या कुणाला तरी विचारायला सांगा किंवा त्याची माहिती ज्यात असेल असे एखादे पुस्तक त्याला आणून द्या. तुमच्यातला पालक हे करणार नसेल, तर तुमच्यातल्या लेखकाने लिहिलेल्या पुस्तकांचा उपयोग काय? तेव्हा आपण मुलांशी वागतो कसे यालाही लेखकाच्या निर्मितिक्षमतेत महत्त्वाचे स्थान आहे. मुलांशी चांगले वागणारा लिहायला बसेल तर चांगलेच लिहील. आणि मग आपल्याला जे काय सुचले ते मुलांना सांगितल्याशिवाय त्याला चैनच पडणार नाही.

प्रेम, मानवता ह्या स्वाभाविक प्रवृत्ती जोपासणे हे जसे महत्त्वाचे आहे, तसेच मुलांना बुद्धिनिष्ठ, तर्कवादी बनवणे हेही आपले कर्तव्य आहे. जुन्या अंधश्रद्धा आता फेकून द्या आणि मुलांना सृष्टीच्या व्यवहारातले, सामाजिक जीवनातले कार्यकारणभाव समजावून द्या. मुलांना मार्गदर्शन करा, पण सांभाळून. स्वतः विचार करून शोधण्याची, मार्ग काढण्याची त्यांची उत्सुक वृत्ती घालवू नका. उलट ती वाढवा. नाही तर अडचणीच्या वेळी तुम्ही जवळ नसलात की ती बावरून जातील. एका चित्रपटात असे आहे की, अमेरिकेतल्या रुक्ष वाळवंटात विमान कोसळते. आठ-दहा वर्षांचा बेशुद्ध पडलेला मुलगा शुद्धीवर येतो. पाहतो तर काका ठार झालेले! विमान छोटे, आत हे दोघे नि एक कुत्रा. मुलगा घाबरला का? अर्थात! कोवळा जीव तो! भिणार नाही तर काय? पण भीतीने त्याचे हार्ट फेल होत नाही, तर तो सावरतो आणि कुत्र्याला घेऊन त्या अफाट वाळवंटातून वाट काढतो. हे कसे झाले? त्या बालकाचे मन तयार करणाऱ्या पालक-शिक्षकांना त्याचे श्रेय दिले पाहिजे. 'असेल माझा हरी - किंवा असतील माझे आई-बाबा, तर देतील खाटल्यावरी' अशा वृत्तीचा तो असता तर खलास झाला असता.

ही आमची भारतीय संस्कृती

अंधभक्तीच्या कथा पुष्कळ झाल्या. नव्या प्रकाशकांनी पुन्हा तेच रटाळ भारूड छापण्याची आता जरुरी नाही. प्रल्हाद-चिलयांच्या गोष्टी नकोत. एका गोसाव्याच्या सांगण्यावरून आई उखळात मूल कांडते, चिरते, त्याची भाजी करते हे नको. उलट आईचे मस्तक कुऱ्हाडीने उडवणारा परशुरामही नको. का करतो तो असला अघोरीपणा? तर बाप सांगतो म्हणून. पण असे सांगणाऱ्या बापाचे डोके फिरले असले पाहिजे, हा साधा विचार त्या परशुरामाला सुचला नाही. वाचक-मुलांच्या मनात हा विचार डोकावला असता, पण तुम्ही तो ठेचून टाकलात.

संस्कृतीच्या नावाखाली असले काहीतरी सांगू नका. ही आमची संस्कृती नाही. नचिकेत, एकलव्य, आस्तिक, कृष्ण, सुदामा, भगीरथ ही आमची संस्कृती. सुदाम्याची साधी गोष्ट मुलांना किती आवडते! आमच्या नातीचे 'सुदामा' पुस्तक एकदा फाटले, पुन्हा आणले. असे पाच-सहा वेळा करावे लागले.

ध्रुव-ज्ञानेश्वर हेही केवळ बालवयाचे म्हणून मुलांचे हिरो ठरत नाहीत. कारण ती अनन्यसाधारण उदाहरणे मुलांना पेलणारी नाहीत. मान्य की, ध्रुव हा एकाच विचाराने पेटलेला विजिगीषु मुलगा होता. पण कोणत्या विचाराने? तर देव भेटण्याच्या. आजच्या मुलांना हा आदर्श कसा पटावा किंवा आकलन तरी कसा व्हावा?

आमची पुरातन संस्कृती किती श्रेष्ठ होती हे मुलांना जरूर शिकवा. पण ते त्यांना समजेल अशा शब्दांत आणि उदाहरणे देऊन शिकवा. मोठमोठे तत्त्वज्ञान संस्कृतप्रचुर भाषेत आजच्या मुलांना न पेलणारे परिच्छेद देऊन हा खटाटोप करू जाल तर तो मुलांच्या डोक्यावरून जाईल.

इथे मला हेही स्पष्ट करायचे आहे, की मुलांना नुसते देवदेव करायला लावू नका. याचा अर्थ त्यांना नास्तिक बनवा असा नाही. ईश्वराचे अस्तित्व हे आपल्या समाजाने किंबहुना बहुतेक साऱ्या सुसंस्कृत जगाने स्वीकारलेले एक प्रस्थापित तत्त्व आहे. कदाचित आपल्यापैकी काहींनी ते झुगारून दिले असेल. अशी उदाहरणे थोडीच असली तरी - समजा, तुम्ही त्यातले एक आहा. तुमचा मुलगा शाळेतून येतो, शाळेत प्रार्थना कशी केली त्याचे वर्णन करतो, गणपतीच्या मूर्तीबद्दल प्रेमाने बोलतो, आणि तुम्ही एकदम हेटाळणीने म्हणता, "हॅट! देवबीव काही नसतो!" बिचारे मूल! त्याला धक्काच बसतो. त्याला हे कळत नाही, की ही काय भानगड आहे? तिकडे तसं सांगतात, इकडे असं सांगतात! त्याच्या मनाचा गोंधळ उडतो. तेव्हा तुमचे खास तत्त्वज्ञान हे तुम्ही तुमच्याजवळच ठेवा. मुलाला तूर्त ज्ञानेश्वरापासून आइनस्टाइनपर्यंत नव्याण्णव टक्के विचारवंतांनी मानलेल्या मार्गावरूनच जाऊ द्या. पुढे मोठा झाल्यावर तो ठरवील आपण आस्तिकच राहायचे की नास्तिक बनायचे ते!

मुख्य गोष्ट ही आहे, की देवाधर्मावर जास्ती भर देणे नको. साने गुरुजींच्या 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या मंत्रावर अधिक भर द्या. आणि मुलांना विज्ञानप्रवृत्त करा. ज्यूल व्हर्नने पन्नास वर्षांपूर्वी केले ते आपण आज करू शकत नाही का? त्याच्या लेखणीने पृथ्वी, आकाश, समुद्र, पाताळ, अंतराळ अशा पंचखंडात मुक्त संचार केला आणि तोही आपली चौकस शास्त्रीय दृष्टी उघडी ठेवून. आपल्या मुलांना असे तिन्ही लोकी संचार करणारे नारद बनवा. नारदासारखी सगळे पाहणारी दृष्टी त्यांना द्या. नारदासारखीच ती नजर मिश्कील असू द्या; पण वृत्ती भांडणं लावण्याची नको, भांडणं मिटवण्याची असू दे. अहो, त्रिखंड नि पंचखंडच का? आता संचारासाठी अनंत खंडं मोकळी होत आहेत. नक्षत्रलोक हे जसे एक प्रचंड जग आहे, तसेच अणूंचा अंतर्भाग हे एक सूक्ष्म जग आहे. मानवी प्रगती सांगताना 'मनुष्य चंद्रावर गेला तरी -' हा अलीकडे एक टाळीचा वाक्यार्ध बनला होता; तो आता मागे पडून 'आर्यभट फेऱ्या मारू लागला तरी -' असा नवा प्रयोग रूढ होत आहे. उपग्रहावरून नुसते चंद्रावरच नाही तर अन्य ग्रहांवरही आपल्याला उतरायचे आहे. तिथली सृष्टी कशी असेल, प्राणी कसे असतील, तिथे माणसे असतील का, ती कशी असतील, त्यांच्याशी आपल्या लढाया होतील का.... याच्या नव्या चित्तथरारक गोष्टी आपण सांगायला लागलो आहोत. अंतराळातले नवे सिंदबाद, गलिव्हर अवतीर्ण होत आहेत. त्यात काही कोलंबसही आहेत. कल्पनेला इथे भरपूर वाव असला, तरी यांतल्या पुष्कळशा कल्पना खऱ्याही होणार आहेत. परमेश्वराचे हे अफाट विश्व, लक्षावधी प्रकाशवर्ष प्रवास करीत राहिले तरी संपणारे नाही, हे तर आपल्याला कळून चुकले आहे ना? मग झाले तर? आपण काय पाहिलेय? अजून पुष्कळ पाहायचेय आपल्याला!

पण जाऊ द्या. आपल्या मर्यादा ओळखू या. विज्ञानासाठी ह्या चित्तचक्षुचमत्कारिक गोष्टीच हव्या आहेत असे नाही. साध्या नित्याच्या व्यवहारात आज विज्ञान भरले आहे. अगदी विजेच्या दिव्यापासून -- जो दिवा गरिबातला गरीब माणूससुद्धा बटन दाबून लावतो - अल्लाउद्दीनच्या दिव्यापेक्षा हा नवा दिवा मुलांना दाखवा. (नवा कसला? तोही आता जुना झाला, इतके आपण धावतो आहोत) - पण हा एडिसनचा दिवा प्रगतीचं प्रतीक

आहे. तो मुलांना द्या. ही जादू मुलांना आवडेल असे करा. खेड्यापाड्यातल्या मुलांपर्यंत तुमच्या वाङ्मयाच्या द्वारा ही विज्ञानाची जादू पोचवा. त्यासाठी रेडिओ, टेलिव्हिजनखेरीज आणखीही एक साधन नुकते उपलब्ध झाले आहे. १ ऑगस्टपासून उपग्रहाच्या द्वारा २४०० खेड्यांमधून विद्येचा प्रचार करण्याचा उपक्रम शासनाने हाती घेतला आहे.

व्यावहारिक बाजू

आता थोडी व्यावहारिक बाजू. मुलांची पुस्तके घेतोय कोण? खपतच नाहीत. पुष्कळसे दुकानदार तर बालवाङ्मय ठेवीतच नाहीत. म्हणजे शालेय पुस्तके ठेवतात. अर्थात पुस्तकांच्या किंमती कुणा कुणाला परवडत नाहीत. पण मी म्हणतो - बाकीचं परवडतं वाटतं? महागाईचा राक्षस सगळ्यांनाच भेडसावतो आहे, हे खरं असलं तरी एक ग्राहक म्हणून मी विचार करतो तेव्हा मनात येतं - सगळंच महाग असलं तरी आम्ही घेतो आहोत ना? खादीवरून, सुतीवरून आम्ही टेरिलिनचा स्वर्ग गाठला. पण टेरिलिन म्हणजेच का सारं काही? अर्थात टेरिलिन ही प्रगती आहे हे मान्य; पण आम्ही जेव्हा असा युक्तिवाद करतो, की टेरिलिन जास्ती टिकतं आणि म्हणून अखेरीस तेच स्वस्त पडतं, तेव्हा तो चुकीचा युक्तिवाद असतो. चारी पँटी टेरिलिनच्या शिवण्याऐवजी दोन टेरिलिनच्या आणि दोन कॉटनच्या शिवल्यात तर! शंभर-एक रुपये तरी वाचतील आणि त्यातून पन्नास-एक पुस्तके आम्ही मुलांसाठी घेऊ शकू! हे एक आपले उदाहरण दिले. खरेदीत अत्यावश्यक काय याचा जरा सुबुद्धपणे विचार करू या आणि आपले बजेट आखू या. एखाद्या तरी बालमासिकाची वर्गणी तुम्ही भरता का? निदान दिवाळी अंक विकत घेता किंवा फिरत्या वाचनालयातून आणता, तेव्हा त्यात बालमासिकाचा एक तरी अंक असतो का? नाही. मग तुम्ही आणलेल्या मोठ्यांच्या मासिकांतलेच एखादे उचलून मुले ते वाचीत असतात. आणि मग तक्रार ही की 'अंक लवकर बदलायला मिळाला नाही. बाब्याच बसला होता वाचीत.' खरं म्हणजे त्याला काय हो इंटरेस्ट ह्या प्रेमकथा वाचण्यात?

'वैयक्तिक ग्राहक कमी झाले आहेत, लायब्रऱ्या तेवढ्या पुस्तके घेतात.' असे असेल तर मी म्हणेन, लायब्रऱ्यांनी इतर पुस्तकांबरोबर मुलांचीही पुस्तके ठेवावीत, आणि एखाद्या-दुसऱ्याऐवजी दहा-दहा प्रती ठेवाव्यात. आमच्यासारख्या बालसाहित्यवाल्यांना तेवढीच मदत होईल. आणि जास्त मुले ती वाचतील.

काही इंग्रजी पुस्तके - गोष्टींची काय किंवा माहितीची काय - किती भव्य असतात! रंगीत, उद्बोधक चित्रांनी ती भरलेली असतात. आपण तशी देऊ शकत नाही, खरे आहे. मग आपण रंगीतऐवजी साधी चित्रे देऊ. त्याचाच प्रचार करू. प्रचाराचा एक मार्ग मला सुचतो आहे. टोलेजंग, रंगदार, सर्वांगसुंदर इंग्रजी पुस्तकांसारखी आम्ही काढू शकत नसलो, तरी ती पाहाण्याच्या आनंदापासून मुलांना वंचित ठेवणे बरोबर नाही असे मला वाटते. आपला प्रचारक जेव्हा पुस्तके घेऊन तालुक्यातून-जिल्ह्यातून हिंडतो, तेव्हा मघा सांगितली तशी मोठाली इंग्रजी पुस्तकेही त्याने बरोबर ठेवावीत. शिक्षकांकडून एखादा तास मागावा. ते चित्रमय पुस्तक त्याने मुलांना दाखवावे. चित्रांमुळे मुले खूश होतील. मग तितकीच नसली तरी काही साधी चित्रे आमच्याही पुस्तकात आहेत असे सांगून, मुलांची वाचनजिज्ञासा जागृत करावी. शाळेला तशी पुस्तके नित्य घ्यायला लावावीत. अर्थात हे करायला प्रचारकही सुबुद्ध आणि कल्पक हवा. विचारपूर्वक गोष्टी करणे हा सगळ्यांचा आधार आहे.

शासन, पालक-शिक्षक संस्था, लेखक-प्रकाशक ह्या सर्वांनी सामग्र्याने बाल-साहित्याचा विचार करायला हवा. नुसती बालसाहित्यिकांची शिबिरे भरवून हे सारे होणार नाही. आणि यातली सर्वांना जाचक वाटणारी आर्थिक समस्याही सोडवायला हवी. शक्य ते सारे प्रयत्न करून. तेवढ्यासाठी मुलांचा आनंद कुंठित करणे बरोबर नाही.

सर्वांनी लक्ष देण्याचा विषय

मजकूर आणि चित्र ह्या दोन्हींची निवड चांगली व्हावी यासाठी बालसाहित्य संमेलनाने एखादी समिती नेमली तर? म्हणजे अमुकच छापा किंवा विका अशी काही आमची कुणावर सक्ती नाही. पण निदान आम्ही वाचलेल्यांपैकी हे विशेष चांगले वाटले असा सल्ला प्रकाशनपूर्व किंवा प्रकाशनोत्तर देखील, अशी जाणकारांची समिती देऊ शकेल. Agmark सारखा एखादा शिक्का त्या पुस्तकावर मारता येईल. म्हणजे हा शिक्का नसलेले बाकीचे वाईट असे नाही. पण हे आम्ही पाहिले आणि हे निश्चितपणे चांगले वाटले, ग्राहकांनी निर्धास्तपणे घ्यावे असे तरी सांगता येईल.

बालसाहित्य खूप खपवायला हवे आणि बालकांच्या दृष्टीसमोर ते सारखे नाचवायला हवे. प्रदर्शन भरवून याबाबतीत 'बालसाहित्य जत्रे'च्या लैलाबाई भटकळ आणि कुमठा यांनी खूप काम केले आहे. आजचे हे संमेलन ज्यांच्या हौसेचे व परिश्रमाचे फळ आहे, ते अमरेंद्र गाडगीळही पुस्तकप्रचारासाठी 'लक्ष बालवाचक'सारख्या योजना नित्य आखीत असतात. त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. तळवलकर, रानडे हे दोन ज्येष्ठ-श्रेष्ठ नाना आपल्या जवळपास आहेत. सनाथ बनलेल्या विद्यार्थ्यांचे गुरुजी, डॉ. ग. श्री. खैर आहेत. भाऊ धर्माधिकारी आहेत. सर्वश्री भवानीशंकर पंडित, विठ्ठलराव घाटे, गंधे यांच्यासारख्या बालसाहित्याला आधारभूत झालेल्या ज्ञानवृद्ध व्यक्ती बालवाङ्मय लेखकांना अजूनही स्फूर्ती देत आहेत. गुजरातीतले 'कुमार' हे एक साक्षेपी चोखंदळ बालमासिक आहे. त्याचे आदरणीय वृद्ध संपादक श्री. बचूभाई रावत मुद्दाम इथे आले आहेत; ज्या सर्वांचे आशीर्वाद मागत आहोत.

ह्या संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान देऊन मराठी बालसाहित्याचे सिंहावलोकन करण्याची संधी मला दिल्याबद्दल संयोजकांचे मी आभार मानतो.

(समाप्त)

***

काही शब्द, थोड्या रेषा : भारांचे काही मानसपुत्र (आणि कन्या)

- 'भारा'वलेले

फास्टर फेणे

तेराचौदा वर्षांचा मुलगा. सिंगल फसली म्हणतात तशी अंगयष्टी, तुडतुडीत हातपाय, काटकुळ्या तंगड्या, भोकरासारखे लुकलुकते डोळे. कितीही धावपळीत वा संकटात असला तरी एखादी भाषिक 'फुसकुली' (अर्थात कोटी!) करायचा मोह याला आवरत नाही. चेहऱ्यावर ती मिश्किली हवीच. कधी कशाने चकित झाला तर त्याचे ते सुप्रसिद्ध 'टॉक्क्'. चौकडीचाच शर्ट - कसल्यातरी संकटात उडी घेतल्यानं बरेचदा घामानं पाठीला चिकटलेला. हातात गलोल. खिशात अधूनमधून एखादा खडा, बिल्ला, बोरे असला सटरफटर माल. एक टांग त्याच्या हडकुळ्या सायकलीवर टाकलेली. हा सहसा एकटा सापडायचा नाही. त्याची दोस्त सुभाष देसाई, चश्मिष्ट शरद शास्त्री, किंवा मामेबहीण माली... यांपैकी कुणीतरी त्याच्यासोबत असायचेच.

बैलगाडीपासून विमानापर्यंत, नेफापासून काश्मिरापर्यंत याच्या कारनाम्यांचे ठसे उमटलेले आहेत. याच्याबद्दल असं म्हणतात की तो संकटांना शोधत जात नाही, संकटंच याला शोधत येतात. देशाला धोक्यात घालणाऱ्या दहशतवाद्यांपासून ते देवाला पोत्यात घालणाऱ्या नकली भगतापर्यंत सगळ्या खलनायकांशी सामना फुरसुंगीच्या या काटकुळ्या हिरोने केला आहे. ना त्याला सुपरहिरोचं बलदंड शरीर मिळालंय, ना शास्त्रज्ञाची अफाट बुद्धिमत्ता, ना गुप्तहेराच्या सुविधा. त्याला मिळालीय वाईट काय - चांगलं काय ओळखायची सुबुद्धी, अन्यायाविरुद्ध आवाज उठवायची हिंमत आणि काटकुळ्या शरीरातलं काटकुळंच - पण हळवं - हृदय!

माली



हीच ती फाफेची मामेबहीण. वय त्याच्याच एखाददोन वर्षे मागे. मुलगी अगदी फाफेची बहीण शोभावी अशी स्मार्ट आणि चपळ. तिची नजर फाफेवर आणि साहसात रसही त्याच्याइतकाच. सुरुवातीला ती फाफेला आवरायचा प्रयत्न करते. पण जसजसं रहस्य गहिरं होत जातं, साहस खुणावू लागतं तसतसे मालीचेही बाहू फुरफुरू लागतात आणि ती तनामनाने त्यात सामील होते!

माली उत्तम चित्रं काढते. त्यापायी एकदा एका पाकिस्तानी हेराने तिला पकडून कैदेतही टाकलं होतं. फाफेच्याच नादी लागून हिने एकदा चुकीच्या चिनी हेराला पकडून दिलं होतं! नंतर खरा हेर सापडला म्हणा! बन्याच्या झपाट्यापुढे माली क्वचित फिकी पडत असली तरी ती त्याच्या हो-ला-हो करणारी नाही. प्रसंगी त्यालाही झापायला ही तेज पोरगी कमी करायची नाही!

सुभाष देसाई

हा फाफेचा दोस्त. फाफेसारखा किडकिडीत नव्हे, इंद्रूसारखा बाळसेदार. पण इंद्रूसारखा खुनशी नव्हे. गोंडस गुटगुटीत गंप्या. याचे बाबा मोठे उद्योगपती आहेत, पण पठ्ठ्याला त्याचा गर्वबिर्व नव्हे. इतरांसारखाच विद्याभवनच्या होस्टेलवर राहतो, रॅले सायकल मारतो, प्रसंगी कडमडतो धडपडतो.

हाही फाफेइतका फास्ट नसला, तरी त्याच्या बरोबरीनं साहसंही करत असतो. हां, आता साहसं कधीकधी अंगाशी येतात.

कोयनेच्या भूकंपाच्या आदल्या रात्री भाल्याच्या मोहात अडकलेल्या सुभाषला मौलीबाबाने किडनॅप केलं होतं. भूकंपाच्या आणि भुयाराच्या कृपेने सुटला. इंद्रूच्या हस्तकांकरवी बन्याबरोबर सुभाषही किडनॅप झाला होता. चालायचंच! फाफेची दोस्ती निभावायची म्हणजे असले प्रसंग येणारच! हा आपला गडी साधा-सरळ आहे, बावळट नव्हे.

शरद शास्त्री

प्रत्येक वर्गात एकतरी ढापण्या पुस्तकपांडू स्कॉलर किडा असतोच. हो, कोयनेच्या भर भूकंपात, मध्यरात्री संस्कृत कोटेशन आणखी कोणाला आठवणार! बन्या, सुभाष इतका तुडतुडीत चपळ नसला तरी अगदीच घरबशा नव्हे, पण अनावश्यक धावपळ टाळण्याकडे याचा कल. म्हणजे सायकल ट्रिप काढायला हरकत नाही, पण मागे कॅरियरला एखादा जाडजूड ग्रंथ मात्र अडकवलेला. असाच एकदा त्याला वेड्यांच्या इस्पितळातून पळालेला वेडा भेटला, आणि शास्त्रीबुवांचाच ग्रंथ आटोपायची पाळी आली होती! असा हा शरद जितका हुशार, तितकाच हळवा. स्कॉलरशिप परीक्षेत नापास झाल्यावर त्याच्या वडिलांनी झापलं, आणि हा भाबडा चक्क आत्महत्या करायला निघाला होता! फास्टर फेणे होता म्हणून बरं...!

इंद्रू इनामदार

पुण्याहून फुरसुंगीचा फाटा जिथे फुटतो, त्याच्या बरोबर विरुद्ध दिशेला हडपसर गाव आहे. त्या हडपसरच्या इनामदारांचे हे एकुलते एक लाडके - आणि म्हणूनच की काय - हुकलेले - चिरंजीव. विद्याभुवनातही वशिल्याने वर्णी लावू पाहणारे.

इंद्रूलाही स्वतःपलिकडे काहीही दिसत नाही. यालाही सायकल हाणायला आवडते, पण हार पचवायची खिलाडूवृत्ती नाही. सायकल शर्यतीत जिंकावं म्हणून एकदा याने बन्याला किडनॅप करायचा घाट घातला होता. मानापमानाच्या कल्पनेपायी बारागाड्यांची जत्रा उधळून द्यायचं कारस्थान रचलं होतं. आपला स्वार्थ साधला ना, आपलं मनोरंजन झालं ना, मग दुनिया गेली तेल लावत. जणू इंद्रू हाच विश्वाचा केंद्रबिंदू आणि बाकीच्यांचं अस्तित्व फक्त इंद्रूच्या सोयीसाठी!

हाही फाफेच्याच वयाचा, पण फाफेचा शत्रूच म्हणा ना. पण फाफेची चपळाई वा मिश्किली याच्यात औषधालाही नाही. याची अंगकाठीही फाफेच्या बरोबर विरुद्ध. पैलवानकीचा निसटता स्पर्श झाल्यासारखी गोटीबंद शरीरयष्टी. गुटगुटीत बाळसेदार चेहरा. डोळे बारीक, पण लुकलुकते. चेहऱ्यावरचे हावभाव मात्र खुनशी. हाही कधी एकटा दिसायचा नाही. पण याच्यासोबत असतात ते याचे जिगरदोस्त नसतात, ते असतात त्याचे पित्त्ये.

इंद्रूसारखेच लोक मोठे होऊन काळ्या काचांच्या स्कॉर्पियो उडवत फिरत असावेत.

रॉबिन हुड

वयानं साधारण २२-२३ च्या अलीकडे पलीकडे असलेला इंग्लीश तरुण. हा गडी मूळचा सरदार घराण्यातला. पण पिढीजात वैरामध्ये वडील मारले गेले आणि याची सरदारकीही गेली. राजगादीकडूनही त्याला न्याय मिळालेला नाही. पण तो तसा हार मानणाऱ्यातला नव्हे. अन्याय म्हणाल तर त्याला जर्रा सहन होत नाही. अंगात रग भारी. शरवुडच्या जंगलात दडून, दंड थोपटून त्यानं बंड पुकारलं आहे. शिडशिडीत पण काटक अंगकाठी. आव्हान स्वीकारायला आणि निशाण अचूक भेदायला कायम तयार असलेली तेजतर्रार नजर. मरियमकडे बघताना हीच नजर मृदू-मिश्किल होते.

धाकला जॉन, टक पुजारी, तांबडा विली अशा आपल्या टोळीतल्या सोबत्यांबरोबर असेल, तर रॉबिनचा मूळचाच रगेल स्वभाव अजूनच खुलतो. तसा रॉबिन अगदी दिलदार गडी, प्रसंगी अंगचे कपडेसुद्धा काढून देईल! पण तिरंदाजी हया विषयात त्याला जिवलग मित्राने जरी आव्हान दिलं तरी आपण वरचढ आहोत हे सिद्ध करायला तो जंग जंग पछाडील! रॉबिन आणि तिरंदाजी हे एक अद्वैतच.

अलीकडे टोळीचं पुढारीपण आल्यापासून साहेबांना थोऽडी 'ग'ची बाधा झालेली आहे म्हणा. पण मूळचा खेळकर स्वभाव खुलून दिसावा, इतपतच. अंगावर कायम हिरवेगार कपडे. त्याची ती फेमस लाल कुंची. पाठीवर अर्थात लाडका तीरकामठा. कमरेला शिंग. स्वारी खुशीत असताना लट्ठंभारती बिशपबुवा किंवा कोतवालसाहेब भेटले, तर त्यांची कंबक्ती भरलीच म्हणून समजा..

बिपिन बुकलवार

वय पंचविशीच्या आतबाहेर. हसरा, मिश्किल, चश्मिष्ट चेहरा. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे बेलबॉटम प्यांट घालतो. गिरगावातल्या फणसवाडीत भाड्याने राहतो, कॉलेजात शिकतो, महिन्याच्या महिन्याला बँक हापसून आणतो.

बिपिनदाच्या पैशाला वाटा अनेक. स्वारी सदैव रद्दीवाल्याकडच्या दुर्मीळ पुस्तकांत डोके घालून बसलेली तरी दिसेल, नाहीतर रद्दीवाल्याशी खेळकर घासाघिशी करून एखाद्या जुनाट पुस्तकाचा सौदा पटवण्यात तरी गर्क झालेली दिसेल. पोस्टाची तिकिटं, जुनीपुराणी दुर्मीळ पुस्तकं आणि एखाद्या खलाश्याच्या पोतडीत शोभतीलशा चित्रविचित्र चीजवस्तू यांत पड्ड्याला रस मोठा.

हा कधी एकटा भेटायचा नाही. सोबत मोना आणि विजू - वय वर्षं १२-१३ च्या आसपास - हे गोष्टीवेल्हाळ मित्र असणारच. त्यांना बिपिनभय्याकडून कायम गोष्टींचा रतीब हवा असतो. नि स्वत: बिपिनची तरी त्याला हरकत कुठे आहे!

तो आहे तसा वल्ली. पैज मारेल, आणि ती जिंकूनही दाखवेल. अठरा तासांत मुंबईला चक्कर मारायच्या भानगडीत ज्यूल व्हर्नने लिहिलेलं बिपिनचं लाडकं पुस्तक मात्र माशांनी खाल्लं. त्याचं दु:ख मोठं!

शब्दचित्रे: आदूबाळ, अस्वल, मेघना भुस्कुटे, संवेद

रेखाचित्रे: अमुक

***

एव्हलिन विलो : करामतींची राणी

- श्रीजा कापशीकर

भा. रा. भागवत विशेषांकात आजच्या पिढीतील मुलांचाही सहभाग असावा असा विचार आम्ही केला. त्यासाठी काही मुलांकडून 'माझा आवडता सुपरहीरो / माझे आवडते पात्र' या विषयावर एक लहानसा परिच्छेद / लेखन मागितले होते. पैकी श्रीजा कापशीकर या १४ वर्षांच्या मुलीने तिच्या आवडत्या पात्राबद्दल हे स्फुट लिहिले आहे. हे पात्र म्हणजे 'हॅरी पॉटर'मधील एव्हलिन विलो. 'अशा नावाचे कोणते पात्र 'हॅरी पॉटर'मध्ये आहे बुवा?' असा विचार करताना तुमच्या लक्षात एक गंमत आली असेल. ती म्हणजे, श्रीजाने वर्णन केलेले हे पात्र 'हॅरी पॉटर'मधील पात्र नसून, हॅरी पॉटरवर आधारित जी 'फॅनफिक्शन्स' आंतरजालावर लिहिली गेली आहेत, त्यांतील एक आहे, ज्याला श्रीजाने व तिच्या मैत्रिणीनेच जन्माला घातले आहे.

एव्हलिन भारांच्या विश्वातली नसली, तरीही आजच्या मुलांच्या जगात डोकावून घेतलेला हा किंचितसा कानोसा तुम्हांलाही आवडेल आणि 'ऐसी'च्या परिवारातल्या या नव्या नव्या लेखिकेला तुम्ही सांभाळून घ्याल, अशी आशा आहे. मूळ इंग्रजी लेखनाचा अनुवाद 'ऐसी'सदस्य ऋषिकेश याने केला आहे.

***

एव्हलिन विलो[१], करामतींची राणी ऊर्फ प्रँकिंग क्वीन! जगभरातील मुली तिला आदर्श मानतात. ती एक मैत्रीण, प्रेयसी, पत्नी, बहीण, मुलगी होतीच, शिवाय ती लढवय्यी होती. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ती एक राणी होती. तिने मला शिकवलं आहे, की माणूस असणं हे 'ओके' आहे, आणि आपल्या भावना दिसू देणंही 'ओके' आहे. ती एक लढवय्यी होती - एक निष्णात लढवय्यी! - एव्हलिन 'ऑरर्स'[२]मधल्या सर्वांत धाडसी लढवय्यांपैकी एक.

सर्वात शक्तिशाली यक्षाच्या थोबाडावर ठोसा मारण्याची धमक तिच्यात वयाच्या सतराव्या वर्षीच आली होती. तिने मला स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवलं. तिने हेही दाखवून दिलं की स्त्रिया अजिबात कमकुवत नसतात. तिने लैंगिक भेदभावाची सगळी जुनी समीकरणं मोडून काढली आणि स्वतःही त्या प्रतिमेला जागली. ती हॉगवर्ड्समधली सर्वोत्तम करामतगार (प्रँकर) होती. सात वर्षं मुखवट्याआड राहून, तिने सर्व गोष्टी समर्थपणे घडवून आणल्या. तेव्हा ती फक्त सतरा वर्षांची होती. आजवर बघितलेल्या सर्वाधिक 'पोचलेल्या' चेटकिर्णींपैकी (witches) ती एक होती.

एव्हलिनला 'त्यागा'चे महत्त्व कळले होते. जग वाचवण्यासाठी तिने स्वत:चे आयुष्य अर्पण केले. ती आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत राणीच राहिली. मृत्यूच्या क्षणाला ती अत्यंत अदबीने व तयारीने सामोरी गेली आणि जेव्हा मृत्यू तिच्याकडे रोखून बघत होता, तेव्हाही ती जराही विचलित झाली नाही. मरण्यापूर्वी तिने मृत्यूलादेखील तिचे राणीपद मान्य करायला भाग पाडले. तिने अतिशय बारकाईने, बारीकसारीक तपशिलांसह आपल्या करामतींची योजना केलेली असे.

स्वत:ला जे योग्य वाटते त्यावर विश्वास ठेवावा आणि त्यासाठी ठामपणे उभे राहावे असे एव्हलिनने मला शिकवले. तिचे प्राधान्यक्रम ठरलेले असत. ती करामती करे, ती एक चांगली मैत्रीणही होती; पण त्याच वेळी तिच्या कामावरून तिचे लक्ष कधीही ढळत नसे. ती सोळाव्या वर्षीच 'लढाईची योजनाकर्ती' (बॅटल प्लॅनर) झाली होती.

आतापर्यंत मी वाचलेल्या आणि लिहिलेल्या पात्रांपैकी एव्हलिन हेच सर्वांत प्रेरणादायक पात्र आहे. एव्हलिन विलो ही मी आणि माझ्या मैत्रिणीने मिळून जन्माला घातलेली एक सर्वस्वी नवी व्यक्तिरेखा आहे.

तिचे मरण व्यर्थ गेलेले नाही. एव्हलिन विलो मरण पावली खरी, पण तिने मरणाला जिंकले होते!

करामतींच्या या राणीचा विजय असो!

***

१. एव्हलिन विलो
(http://www.quotev.com/story/5208378/The-Pranking-Queen-James-Potter/)

२. हॅरी पॉटर या प्रकरणाशी फार परिचित नसणाऱ्या वाचकांच्या माहितीसाठी: 'ऑरर्स' हा 'हॅरी पॉटर'च्या पुस्तकातल्या 'मिनिस्ट्री ऑफ मॅजिक'मधील विशेष प्रशिक्षित लोकांचा एक चमू असतो. 'काळ्या विद्ये'शी संबंधित गुन्ह्यांचा तपास करणं आणि गरज पडल्यास, तिचा गैरवापर करणाऱ्या गुन्हेगाराशी लढून त्याला पकडणं हे त्या चमूचं काम असतं.

***

चित्रः जालावरून साभार.

***

भा. रा. भागवत - समग्र साहित्यसूची

- सौ. नीला धडफळे

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
१		अंतराळ प्रवासाचे पहिले पुस्तक			अनुवादित	
२	१९६१	अंतराळात अग्निबाण	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
३	१९८४	अक्काचे अजब इच्छासत्र	इंद्रायणी प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
४	१९९४	अक्रुधान ते पिक्रुधान	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
५	१९९६	अदृश्य माणूस	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	अनुवादित	एच. जी. वेल्स
६	१९९२	अद्भुत व्यक्तीच्या शोधात धाडसी वीर	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
७	१९९४	अलकनंदा आणि जादूगार जिन	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
८	१९९९	असे लढले गांधीजी	मधुराज पब्लिकेशन्स, मुंबई	कादंबरी	पुनर्कथित	
९	१९६५	आगे बढो फास्टर फेणे	पॉप्युलर प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
१०	२००८	आनंदी आनंद गडे	राजा प्रकाशन, मुंबई	क्रमित कादंबरी	अनुवादित	लॉरा इंगल्स वाईल्डर
११	१९७१	आपल्या आगगाड्यांची कहाणी	नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली	कथासंग्रह	अनुवादित	
१२	१९७७	आरसेनगरीत जाई	नवीन प्रकाशन, पुणे	कादंबरी	रूपांतरित	लुईस कॅरल
१३	१९९६	इरावतीचा शोध	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१४	१९६६	उडती छबकडी	भारतीय ग्रंथ भवन	कथासंग्रह	स्वतंत्र	
१५	१९६२	उमलती कळी	नाग विदर्भ प्रकाशन, अमरावती	क्रमित कादंबरी	अनुवादित	लॉरा इंगल्स वाईल्डर
१६		एक चत्मकारिक रात्र				

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
१७	२००८	एक होते सरोवर	राजा प्रकाशन, मुंबई	क्रमित कादंबरी	अनुवादित	लॉरा इंगल्स वाईल्डर
१८	१९९०	एका चिन्याचा जमालगोटा	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
१९	१९९८	एकांड्या बेटावरचे थरारनाट्य	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	--"--
२०	१९७५	ऑलिंपिक महोत्सव आणि खेळाडू	नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली	कादंबरी	अनुवादित	
२१	१९९६	कंपनी चालली सूर्याकडे	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
२२	१९७३	काळा बाण	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
२३	१९९४	काशाची काशीयात्रा	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
२४	१९९५	किड्याने घातले कोडे	परिमल प्रकाशन, औरंगाबाद	कादंबरी	स्वतंत्र	
२५	१९९६	किल्ल्यातील कारस्थान	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
२६	१९९६	कॅप्टन किडचा खजिना	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
२७	१९९८	कॅप्टन ग्रँट! तुम्ही कुठे आहात?	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
२८	२००९	कैद्याचा खजिना	पुरंदरे प्रकाशन, पुणे	कादंबरी	अनुवादित	
२९	१९९४	क्रिकेटची खुमखुमी जिरली	अद्वैत प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
३०	२००४	खजिन्याचा शोध	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
३१	१९८४	खजिन्याचे बेट	ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, नवी दिल्ली	कादंबरी	अनुवादित	
३२	१९७१	खजिन्याच्या बेटावर संजूराजू	पॉप्युलर प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
३३	१९६४	खरा खजिना	राजा प्रकाशन, मुंबई	कथासंग्रह	स्वतंत्र	
३४	१९८६	गडावरचा खजिना	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
३५		गढीचा मालक				
३६	१९८४	गप्प बसा मुंछासेन	शकुल प्रकाशन, पुणे	कादंबरी	रूपांतरित	

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
३७		गांजलेले जीव			अनुवादित	
३८	१९८२	गालफाटूचा पराक्रम	सोनसळे अॅन्ड कं., पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
३९	१९८६	गिरिशिखराचे गुपित	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
४०	२००३	गुप्त खजिन्याचे बेट	अतुल बुक एजन्सी	कादंबरी	अनुवादित	--"--
४१	१९८२	गुलमर्गचे गूढ आणि फास्टर फेणे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
४२	१९८०	घड्याळाचे गुपित	इंद्रायणी प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
४३	१९९७	चंद्रावर स्वारी	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	रूपांतरित	ज्यूल व्हर्न
४४	१९८५	चक्रीवादळात फास्टर फेणे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
४५	१९९२	चला उत्तर ध्रुवाकडे	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
४६	१९९४	चाणक्य	मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
४७	१९८५	चिंकू चिंपांझी आणि फास्टर फेणे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
४८	१९८५	चिंकूचे चाळे आणि फास्टर फेणे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
४९		चिटोऱ्याचा प्रताप			स्वतंत्र	
५०	१९९४	छगन सांगू लागला	कृष्णा प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
५१	१९९४	छगनचे चऱ्हाट चालूच	कृष्णा प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
५२	१९९४	छोटी मोठी यंत्रे	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
५३	१९९६	जंगल बुकातील दंगल त्या दंगलीतील दोन पोरे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	अनुवादित	
५४	१९८५	जंगलपटात फास्टर फेणे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
५५	१९६२	जगाच्या कल्याणा	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
५६	१९७९	जयदीपची जंगल यात्रा	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
५७	१९६५	जवानमर्द फास्टर फेणे	पॉप्युलर प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
५८	१९७७	जाईची नवल कहाणी	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	रूपांतरित	लुईस कॅरल
५९	१९९६	जुनाट भावलीची भन्नाट कथा आणि इतर पाश्चात्य गोष्टी	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
६०	१९३२	जॉर्ज वॉशिंग्टन	ग. पां. परचुरे प्रकाशन	चरित्र	अनुवादित	
६१	१९६०	ज्ञान आणि मनोरंजन: भाग पहिला	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	माहितीपर	स्वतंत्र	
६२	१९९८	ज्यूल व्हर्नची अद्भुत सृष्टी	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
६३	१९९८	झपाटलेला प्रवासी	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
६४	२००९	टिंग टिंग टिंगा	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
६५	१९८९	टिक टॉक फास्टर फेणे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
६६		टिल्लू नावाचा विदूषक			रूपांतरित	
६७	१९६५	ट्रिंग-ट्रिंग-फास्टर फेणे	पॉप्युलर प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
६८	१९७५	डाकूंची टोळी आणि बालवीर	परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
६९		ढब्बू राजाची गोष्ट			रूपांतरित	
७०	१९९८	तीन बलून बहाद्दर	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	अनुवादित	
७१	१९९६	तुटक्या कानाचे रहस्य	सुरेश एजन्सी, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
७२	१९७२	तैमूरलंगाचा भाला	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
७३		तोंड मिटा मुंछासेन			रूपांतरित	
७४	१९५९	तोचि साधु ओळखावा	महाराष्ट्र प्रकाशन	चरित्र		
७५	१९९४	तोरणा कोणी जिंकला?	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
७६	१९७०	त्यांनी पाहिलेला भारत	नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली	कादंबरी	अनुवादित	
७७	१९५९	त्यांसी म्हणे जो आपुले	महाराष्ट्र प्रकाशन			
७८	१९९६	थँक्यू, मिस्टर शार्क आणि दुसऱ्याही काही मजेदार लोककथा	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
७९	१९९६	दर्याई डाकू शार्की आणि दुसऱ्याही काही मजेदार लोककथा	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
८०	१९८४	दर्याई डाकूंच्या गोष्टी	इंद्रायणी प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
८१	१९९६	दर्यादेशची राजकन्या	शांताई प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
८२	१९७५	दीपमाळेचे रहस्य	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
८३	१९८२	दुःख पर्वताएवढे ('ला मिझरेबल्स'चे भाषांतर)	संजय प्रकाशन, पुणे	कादंबरी	अनुवादित	
८४	१९९५	दुर्मिळ तिकिटाची साहसयात्रा	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
८५	१९५९	देव तेथेंचि जाणावा	महाराष्ट्र प्रकाशन	कादंबरी		
८६	१९८६	धूमकेतूच्या शेपटावर	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
८७	१९९२	ध्रुवाने लावले वेड	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	--"--
८८	२००६	नंदू करतो मोत्याची शिकार!	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
८९	१९८२	नंदूचा यांत्रिक माणूस	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
९०	२००६	नंदूच्या थापांचे ... गरगर फिरे विमान!	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
९१	२००६	नंदूने रचले मनोरथ	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
९२	१९८७	नागफणी खजिना	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
९३	१९९२	निर्जन बेटावर धाडसी वीर	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
९४	१९६८	निळा मासा	नाग विदर्भ प्रकाशन, अमरावती		स्वतंत्र	
९५	१९५७	न्यायाधीशाचे अंतरंग			अनुवादित	

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
९६	१९४६	पबुताईची फ कशी झाली?	केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
९७	१९४२	पबुताईच्या गोष्टी	केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई	कथासंग्रह	स्वतंत्र	
९८	१९८६	पळवलेल्या पोराची गोष्ट	ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, नवी दिल्ली	कादंबरी	स्वतंत्र	
९९	२०००	पशुमानवाचे बेट	ज्ञानदा पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे	कादंबरी	अनुवादित	
१००	१९५५	पाच भावांची गोष्ट	ग. पां. परचुरे प्रकाशन	चरित्र	अनुवादित	
१०१	१९९७	पाताळलोकची अद्भुत यात्रा	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	रूपांतरित	ज्यूल व्हर्न
१०२	१९९४	पिझारोचे थैमान	पुरंदरे प्रकाशन, पुणे	कादंबरी	अनुवादित	
१०३	१९९४	पिस्तुल बॉम्बच्या कथा	अद्वैत प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
१०४		पुनश्च खजिन्याची भेट			अनुवादित	
१०५		पुनश्च भेट			स्वतंत्र	
१०६		पृथ्वी दुभंगली	राजा प्रकाशन, मुंबई			
१०७	१९९८	पोलादपूरचा रणराक्षस	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
१०८	१९७३	पोस्टाच्या तिकिटांची नवलकहाणी	नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली	कथासंग्रह	अनुवादित	
१०९	१९८२	प्रतापगडावर फास्टर फेणे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
११०	१९५८	फार फार सुंदर शहर	आशय प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	अनुवादित	
१११	१९८२	फास्टर फेणे टोला हाणतो	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
११२	१९८२	फास्टर फेणे डिटेक्टिव्ह	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
११३	१९६५	फास्टर फेणेचा रणरंग	पॉप्युलर प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
११४	१९८२	फास्टर फेणेची एक्स्प्रेस कामगिरी	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
११५	१९८२	फास्टर फेणेची काश्मिरी करामत	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
११६	१९८५	फास्टर फेणेची डोंगरभेट	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
११७	१९८५	फास्टर फेणेच्या गळ्यात माळ	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
११८	१९६५	फुरसुंगीचा फास्टर फेणे	पॉप्युलर प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
११९	१९९२	बर्फभूमीवरील बहाद्दर	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
१२०		बलदंड बन्यान			अनुवादित	
१२१	१९८२	बाईलचोर	सोनसळे अॅन्ड कं., पुणे			
१२२		बाजीराव			पुनर्कथित	
१२३	१९९७	बादशाही जासूद	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
१२४	१९६५	बालबहाद्दर फास्टर फेणे	पॉप्युलर प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
१२५	१९५६	बेन फ्रँकलिन - अमेरिकेचा गुणी शास्त्रज्ञ	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
१२६	१९८४	बोला बोला मुंछासेन	शकुल प्रकाशन, पुणे	कादंबरी	रूपांतरित	
१२७	१९७२	ब्रह्मदेशातला खजिना	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१२८	१९६६	भटक बहाद्दर	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
१२९	१९९४	भाग्यशाली सिक्सर	अद्वैत प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
१३०		भारत पाक युद्ध			अनुवादित	
१३१	१९८३	भारद्वाजाची भरारी	सोनसळे अॅन्ड कं., पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
१३२	२००४	भाराभर गवत	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह		
१३३	१९७२	भुताळी जहाज	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१३४	१९९४	मडकोबा	शब्दवेध प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	अनुवादित	
१३५		महाभारत			पुनर्कथित	

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
१३६	१९८८	महेश उडाला भूर्रर्रऽऽऽ	ज्योस्त्ना प्रकाशन, मुंबई	कथासंग्रह	स्वतंत्र	
१३७	१९४६	माझा विक्रम	केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई		स्वतंत्र	
१३८	१९९६	मायापूरचे रंगेल राक्षस: अर्थात् अतिशक्तिमान घंटासुर व चंडासुर आणि त्यांचे बहुढंगी तऱ्हेवाईक मित्रगण यांच्या अद्भुत साहसांची नवलकहाणी	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	इंद्रायणी प्रकाशन, पुणे	फ्रांस्वा राबले
१३९	१९९५	मुंबईला चक्कर	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
१४०	१९६४	मुक्काम शेंडेनक्षत्र	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
१४१	२००८	मूर्तीच्या शोधात मोना	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१४२	२००८	मोठ्या रानातले छोटे घर	राजा प्रकाशन, मुंबई	क्रमित कादंबरी	अनुवादित	लॉरा इंगल्स वाईल्डर
१४३	१९९६	रॉबिनहूड आणि त्याचे रंगेल गडी	इंद्रायणी प्रकाशन, पुणे	कादंबरी	अनुवादित	
१४४	१९६६	रॉबिन्सन आणि मंडळी	रुची प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
१४५	१९९४	लाख मांजरी	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१४६	१९६५	वनस्पतींचा जादूगार	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
१४७	१९९६	विज्ञानवेडे शास्त्रज्ञ	अनुबंध प्रकाशन, पुणे	कादंबरी	अनुवादित	
१४८	१९८९	विमानचोर विरुद्ध फास्टर फेणे	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
१४९		वीर पांडव			स्वतंत्र	
१५०		वैतागवनांतील वाफारे	कॉंटिनेंटल प्रकाशन, मुंबई	कथासंग्रह	स्वतंत्र	
१५१	२००९	शाब्बास शरलॉक होम्स! (भाग पहिला)	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	अनुवादित	आर्थर कोनन डॉयल
१५२	२००९	शाब्बास शरलॉक होम्स! (भाग दुसरा)	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	अनुवादित	--"--
१५३	२००९	शाब्बास शरलॉक होम्स! (भाग तिसरा)	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	अनुवादित	--"--

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
१५४	२००९	शाब्बास शरलॉक होम्स! (भाग चौथा)	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	अनुवादित	आर्थर कोनन डॉयल
१५५	२००९	शाब्बास शरलॉक होम्स! (भाग पाचवा)	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	अनुवादित	--"--
१५६	१९७५	शाळेतली भुताटकी	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई			
१५७	१९५८	शिंगी	नाग विदर्भ प्रकाशन, अमरावती	कादंबरी	स्वतंत्र	
१५८		छत्रपती शिवाजी	अमर चित्र कथा	कॉमिक स्ट्रिप / चरित्र	पुनर्कथित	
१५९	१९५६	सगळं सगळं ठीक होतं	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई		अनुवादित	
१६०		सफरचंद			अनुवादित	
१६१	१९५६	समुद्र सैतान	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१६२	१९९६	साखर सोंड्या आणि दुसऱ्याही काही मजेदार लोककथा	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
१६३	१९९४	सागरी चोरांवर पोरांची मात	अद्वैत प्रकाशन, पुणे	कथासंग्रह	स्वतंत्र	
१६४	१९९०	साता समुद्राचा सुलतान	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१६५	१९६२	तारस बलबाचे दोन सुपुत्र	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१६६	२००४	सिंडरेलाची मुलगी मिंडरेला (सहा छानदार परीकथा)	अनुबंध प्रकाशन, मुंबई	कथासंग्रह	स्वतंत्र	
१६७	१९८०	सुधीरवाडी	संजय प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
१६८	१९६४	सूर्यावर स्वारी	लाखाणी बुक डेपो, मुंबई	कादंबरी	अनुवादित	ज्यूल व्हर्न
१६९	१९४३	सोव्हिएटच्या समरकथा	केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई	कथासंग्रह	अनुवादित	

क्र.	प्रकाशन वर्ष	पुस्तकाचे नाव	प्रकाशन	प्रकार	रचना	मूळ लेखक
१७०	१९५५	हरिण बालक	उर्जा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	मार्जरी किनन रॉलिंग्स्
१७१	१९८६	हर्क्युलीस	ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, नवी दिल्ली	कादंबरी	अनुवादित	
१७२	१९९७	हवाई हुकूमशहा	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	अनुवादित	
१७३	१९९०	हाजीबाबाच्या गोष्टी	मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई	कथासंग्रह	अनुवादित	
१७४	१९९०	हिंमतवान जासूद	राजा प्रकाशन, मुंबई	कादंबरी	स्वतंत्र	
१७५	१९९६	डाकू बनला डिटेक्टिव्ह आणि दुसऱ्याही काही मजेदार लोककथा	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कथासंग्रह		मॉरीस लेब्लाँ
१७६	१९९४	भटांच्या वाड्यातील भुतावळ	पुरंदरे प्रकाशन, पुणे	कथासंग्रह		चार्ल्स डिकन्स
१७७		पुत्र असावा ऐसा गुंडा	उत्कर्ष प्रकाशन, पुणे			
१७८		शिकंदरचा बिलंदर कुत्रा	उत्कर्ष प्रकाशन, पुणे			
१७९		ढोरगावचा चोर	उत्कर्ष प्रकाशन, पुणे			
१८०		अगडबंब मंडळाच्या गोष्टी	उत्कर्ष प्रकाशन, पुणे			
१८१	१९९५	अक्काचे अजब इच्छासत्र	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
१८२	१९९४	खजिन्याचा शोध	पुरंदरे प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
१८३	१९९६	दर्याई डाकूंच्या गोष्टी	उत्कर्ष प्रकाशन, पुणे	कादंबरी	स्वतंत्र	
१८४	१९७८ पुनर्मुद्रण	चाणक्य	अमर चित्र कथा	कॉमिक स्ट्रिप /चरित्र	पुनर्कथित	

***

ही सूची अपूर्ण आहे. ती पूर्णतः निर्दोष नाही. विश्वासार्ह माहितीच्या अभावामुळे काही रकाने रिकामे ठेवले आहेत. पुढील आकडेवारी ही अशा सूचीवर आधारित आहे. अर्थातच, तीसुद्धा पूर्णतः निर्दोष नाही. ही केवळ पहिली पायरी आहे. यातले काही आकडे पाहून कुणाला भारांच्या साहित्यिक कारकिर्दीमागचे इतर कार्यकारणभाव शोधण्याची इच्छा झाली, तर या सूचीचं प्रयोजन सफल झालं असं म्हणता येईल. वाचकांनी यथाशक्ती ही यादी परिपूर्ण करण्यास व यादीतले दोष नजरेस आणून देण्यास मदत करावी, ही विनंती.

भा. रा. भागवत ह्यांच्या १८४ पुस्तकांची माहिती उपलब्ध झाली. अनेक पुस्तकांबाबत प्रकाशक, प्रकाशनवर्ष, साहित्यप्रकार असे विविध तपशील मिळाले नाहीत.

त्यांच्या ९१ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी किमान १८४ पुस्तकं लिहिली. त्यांना किमान ३७ प्रकाशक लाभले. त्यांचं पहिलं पुस्तक १९३२ साली प्रकाशित झालं नि त्यांच्या हयातीत प्रसिद्ध झालेलं त्यांचं शेवटचं पुस्तक २००० सालचं आहे. म्हणजे त्यांची लेखक म्हणून कारकीर्द ही सुमारे ६८ वर्षांची आहे. ६८ वर्षांत किमान १८४ पुस्तकं म्हणजे सरासरी वर्षाकाठी सुमारे २.७ इतकी. इतके प्रसवशील लेखक मराठीत किती टक्के असतील असा प्रश्न पडतो.

त्यांच्या १८४ पुस्तकांपैकी १६९ पुस्तकांच्या रचनाप्रकाराबद्दल माहिती उपलब्ध झाली. त्या १६९ पुस्तकांपैकी पूर्णपणे स्वतंत्र अशी सुमारे ५६%, तर अनुवादित / रूपांतरित / पुनर्कथित / आधारित अशी पुस्तकं ४४%.

भागवतांनी स्वतंत्रपणे जन्माला घातलेल्या व्यक्तिरेखांपैकी जवळपास सर्व व्यक्तिरेखा ह्या पुरुष आहेत. त्यांच्या १०२ पुस्तकांमध्ये प्रधान व्यक्तिरेखा ही पुरुष आहे, तर ९ पुस्तकांमध्ये ती स्त्री आहे.

यांव्यतिरिक्त आशय (साहस, विनोद, वैज्ञानिक, माहितीपर, ऐतिहासिक, इ.) व कथानकाचा परिसर (अंतराळ, पुणे, महाराष्ट्र, अमेरिका, आशिया, इ.) यांनुसारही विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला. परंतु माहितीच्या विश्वासार्हतेबद्दल एकमत नसल्याने व उपलब्ध आकड्यांत एकवाक्यता नसल्याने ती आकडेवारी वगळली आहे.

साहित्यप्रकारविल्हे:

माहिती उपलब्ध: १८४पैकी १५५

९८ कादंबऱ्या
४८ कथासंग्रह
४ क्रमित कादंबऱ्या
३ चरित्रे
१ माहितीपर
२ कॉमिक स्ट्रिप / चरित्र
२८ माहिती अनुपलब्ध

१८४

रचनाप्रकारविल्हे

माहिती उपलब्ध: १८४पैकी १६९

९४ स्वतंत्र
६१ अनुवादित
९ रूपांतरित
५ पुनर्कथित
१५ माहिती अनुपलब्ध

१८४

प्रमुख व्यक्तिरेखा

माहिती उपलब्ध: १८४पैकी १११

१०२ पुरुष
९ स्त्री
७३ माहिती अनुपलब्ध

१८४

प्रकाशकविल्हे

माहिती उपलब्ध: १८४पैकी १६६

४० उत्कर्ष प्रकाशन, पुणे
३४ राजा प्रकाशन, मुंबई
१६ मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई
१० लाखाणी बुक डेपो, मुंबई
७ पॉप्युलर प्रकाशन
४ अद्वैत प्रकाशन, पुणे
४ इंद्रायणी प्रकाशन, पुणे
४ केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई
४ नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली
४ पुरंदरे प्रकाशन, पुणे
३ ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, नवी दिल्ली
३ नाग विदर्भ प्रकाशन, अमरावती
३ महाराष्ट्र प्रकाशन
३ सोनसळे अॅन्ड कं., पुणे
२ अमर चित्र कथा

२ कृष्णा प्रकाशन, पुणे
२ ग. पां. परचुरे प्रकाशन
२ शकुल प्रकाशन, पुणे
२ संजय प्रकाशन, पुणे
१ अतुल बुक एजन्सी
१ अनुबंध प्रकाशन, पुणे
१ अनुबंध प्रकाशन, मुंबई
१ आशय प्रकाशन, पुणे
१ उर्जा प्रकाशन, मुंबई
१ कॉंटिनेंटल प्रकाशन, मुंबई
१ ज्ञानदा पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे
१ ज्योत्स्ना प्रकाशन, मुंबई
१ नवीन प्रकाशन, पुणे
१ परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई
१ परिमल प्रकाशन, औरंगाबाद
१ भारतीय ग्रंथ भवन
१ मधुराज पब्लिकेशन्स, मुंबई
१ मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
१ रुची प्रकाशन, पुणे
१ शब्दवेध प्रकाशन, पुणे
१ शांताई प्रकाशन, पुणे
१ सुरेश एजन्सी, पुणे
१७ माहिती अनुपलब्ध

१८४

***

आकडेवारी, निष्कर्ष: सलिल बडोदेकर.

पडताळणी, संस्करण: अमुक, मेघना भुस्कुटे.

***